UNIVERSAL
LIBRARY

OU_192821

UNIVERSAL
LIBRARY

॥ श्रीराम ॥

गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ।

महाराष्ट्र-कुटुंब-माला

पुष्प २६ वें

# ग्रहणापूर्वी सुटका


लेखक

वसंत बळवंत

[redacted] कुलकर्णी


आवृत्ति पहिली

एप्रिल १९३८

# महाराष्ट्र-कुटुंब-माला

—संपादक—

**नारायण विनायक कुलकर्णी**

—प्रकाशक—

**विठ्ठल रामचंद्र खाडिलकर**

—मुद्रक—

**कृ. ह. सहस्रबुद्धे**

श्रीज्ञानेश्वर प्रेस—कोल्हापूर

—प्रमुख एजंट—

**मेसर्स परचुरे पुराणिक आणि मंडळी—मुंबई**

—प्रमुख प्रचारक—

**विश्वनाथ बाळाजी मोडक (कोल्हापूर—शाहूपुरी)**

—प्रकाशन-स्थल—

**महाराष्ट्र—कुटुंब—माला कचेरी**

३९२, नारायण पेठ—पुणें.

मालेचें २७ वें पुष्प—“ **भूक** ” जून १९३८ मध्यें प्रसिद्ध होईल.

# विनंती विशेष-

श्री. नारायणराव कुलकर्णी यांनीं लिहिलेली "ग्रहणापूर्वी सुटका" ही कादंबरी आज आम्ही मोठ्या आनंदानें वाचकांना सादर करीत आहोंत. प्रस्तुत कादंबरीच्या प्रसिद्धीचा योग अनेक कारणांनीं अपूर्व आहे. असा योग प्राप्त करून देणाऱ्या परमेश्वराच्या चरणीं प्रथम नम्र-भावानें वंदन करतों.

'प्रभात फिल्म कंपनी'चे प्रख्यात दिग्दर्शक व्ही. शांतारामजीनीं या कादंबरीकरितां आपल्या आर्टिस्टकडून हौसेनें व प्रेमानें चित्र दिलें; "मौज" पत्राचे मालक श्री. पां. म. भागवत यांनीं अत्यंत तत्परतेनें, ब्लॉक व ब्लॉक प्रिंटिंग करून दिलें; व कोल्हापूर येथील 'माले'चे मित्र श्री. यशवंतराव फडके, मालक कलाभुवन प्रेस यांनीं प्रकाशनाबाबतची अद्यावत कळकळीनें काळजी वाहिली, याबद्दल आम्ही त्यांचे कायमचे ऋणी आहोंत.

मार्च महिन्यांत 'माले'च्या प्रचारार्थ आम्हीं हैद्राबाद (दक्षिण) कडे दौरा काढला. हैद्राबाद व शिकंदराबाद येथील मराठी भाषेच्या व वाङ्मयाच्या थोर अभिमान्यांनीं 'माले'च्या कार्याचें उत्तम स्वागत केलें हें नमूद करून ठेवण्यांत आम्हांला विशेष अभिमान वाटतो.

हैद्राबादचे विख्यात साहित्यिक श्री. दिवाकर कृष्ण केळकर, एम्. ए. एल्एल्. बी., वकील, उत्साही तरुण श्री. गोविंदराव हरि मसलेकर व शिकंदरबादचे श्री. गणेशराव मराठे यांनीं मालेकरितां अत्यंत श्रम—सायास सोसले; याबद्दल त्यांचे आभार न मानणें केवळ कृतघ्नपणाचेंच ठरेल.

'प्रसादचिन्हानि पुरः फलानि।' या दृष्टीनें मालेंतील प्रस्तुत पुस्तकास जें आत्यंतिक थोर भाग्य लाभलें आहे, त्याचा उल्लेख या ठिकाणीं करणें सर्वांत विशेष आनंदाचें व अभिमानाचें असें आमचें परमपवित्र कर्तव्य होय.

श्रीमंत परशुरामराव माधवराव ऊर्फ भाऊसाहेब पंडित,

पंत अमात्य, हुकमतपन्हा, अधिपती बावडा,
यांचे सेवेशीं.

श्रीमंत,

आपल्या प्रेमळ सहवासांत चार क्षण अत्यंत सुखाचे गेले. आपण आपपरभाव विसरून मजविषयीं जी कळकळ, जें प्रेम व्यक्त केलें त्याचें स्मृतिचिन्ह म्हणून हें कादंबरीपुष्प अत्यंत प्रेमादरानें आपणास अर्पण करीत आहें.

विनम्र

-ना. वि. कुलकर्णी-

|| श्रीराम ||

# ग्रहणापूर्वी सुटका.

## — उपोद्घात —

नवा पोषाख करून प्रसाद माझ्यासमोर येऊन उभा राहिला. मी पुस्तक वाचण्यात मग्न झालें होते. प्रसादाकडे माझं किती वेळपर्यंत लक्षच गेलं नाहीं !

" आई, मी कसा दिसतों ग ?–" या वाक्यानं शेवटीं प्रसादानं आपल्याकडे वेधलंच माझं लक्ष. मी तोंडासमोरचं पुस्तक बाजूला करून त्याच्याकडे पाहिलें.

माझा आवडता बाळ प्रसाद. त्याला नव्या चांगल्या पोषाखांत पाहून मला कोण आनंद झाला ! कित्ती कित्ती छान दिसला तो मला ! "कित्ती सुरेख दिसतोय ग बाई माझा चिमणा शिपाई !!"

माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडत असतांच मीं आवेगानें प्रसादाला माझ्याजवळ ओढून मांडीवर घेतला, आणि कवटाळून त्याचे मटामट मुके घेत सुटलं ! प्रसादाला मी देत असलेलें मुक्यांचें बक्षीस हवेंच होतें; पण गुलाम उगीचच धडपड करून माझ्यापासून निसटण्याचा प्रयत्न करायला लागला.

"आम्ही नाहीं जा ! हें काय ग आई ! माझा पोषाख बिघडेल ना !" म्हणत, दाडगाई करीत, हसरा चेहरा करून तो दूर सरला. पुन्हां माझ्यासमोर उभा राहिला ! आणि–

"मी कसा दिसतोय हें सांगायचं नाहीं न् उगीचच आम्हांला हें करायचं—"

माझ्या निर्मळ मनाच्या बाळाचे खडीसाखरेपेक्षांही गोड शब्द माझं हृदय अत्यानंदानं उचंबळवीत होते.

देहभान विसरून वात्सल्याचा वर्षाव प्रसादावर करीत डोळ्याचें पातें न लवविता माझ्या चिमुकल्याकडे पहात राहिलें. त्रिभुवन ओंवाळून टाकावं माझ्या प्रसादबाळावरून असंच त्यावेळीं मला वाटत होतं. कौतुकाच्या अमृतानें ओथंबलेले शब्द माझ्या तोंडून, प्रसादाकडे तन्मयतेनें पहात असता, सहजीं बाहेर पडले —

" कसं छान छान दिसतंय माझं बाळ !—"

आणि त्याचबरोबर —

" किती सुंदर दिसतंय हें मूर्तिमंत वात्सल्याच दृश्य ! "

हें वाक्य माझ्या कानावर आलं !

मीं वळून पाहिलं. तों स्वारी दारात आम्हां माय—लेकरांकडे पहात हंसत उभी होती !

" अग बाई ! " स्वारीला पाहून लज्जामिश्रित आनंदोद्गार माझ्या तोंडून निघाला !

" आई, बाबा आले ! " म्हणत प्रसाद धावत जाऊन स्वारीला बिलगला. स्वारीनेंही त्याच्या चिमुकल्या पाठीवर लाडक्या थापट्या मारीत ओणवून त्याचे मुके घेतले.

" आपल्या अपत्यांचं कौतुक करावं तुम्हीं बायकानींच ! " जवळ येत स्वारी म्हणाली.

" अन् कौतुक करण्यासारखं आपल्या मुलाना सजवावं पुरुषांनींच !—" मीं अभिमानानें हंसत लगेच प्रत्युत्तर दिलं.

" होय ?—मग मीं सजविलेलं तुझं हं—" हातांतल्या बॅगमधून उभ्याउभ्याच एक रेशमी हातरुमालांतून गुंडाळलेली वस्तु काढून माझ्या हातीं देत म्हणायचं झालं—" दुसरं अपत्य कसं काय सजविलं आहे मीं पहा बरं ! "

" अगबाई ! हें काय ? " म्हणत मीं हातांत घेतलेली वस्तु पाहण्यासाठीं किती घाईनें हातरुमाल बाजूला करीत म्हटलं.

पण तितक्यांत प्रसाद माझ्या हातांशीं झोंबत, " आई, मला दाखव, मला बघूं दे " म्हणून, टाचा उंच करून भंडावूं लागला.

" काय आहे ग आई ?–मला पाहूं दे ना–"

" ती प्रसादाची बहिण आहे ! " माझ्याकडे पहात स्वारीनं विचारलं मला कीं–" कशी सजली आहे तुझी कन्या ?

त्या वस्तूकडे–नव्या सुंदर बांधणीच्या पुस्तकाकडे मी पहात राहिलें. माझ्या डोळ्यांत आनंदाश्रूंनीं गर्दी केली. माझ्या मनांत त्यावेळीं काय काय आलें नी काय काय नाही, हे एक माझं मलाच माहित ! आनंद, समाधान, दुःख, शोक, सुख, या सगळ्या–सगळ्या भावनांनी माझें हृदय क्षणात भरून आलं ! क्षणमात्र मी कुठं आहें, हें देखील त्या स्थितींत विसरलें !

माझ्या आयुष्यांतला चालू क्षण म्हणजे कधींही न विसरणारा सोन्याचा क्षण होता; पण स्वारीच्या अत्याग्रहानें आणि प्रोत्साहनानें मीं जें काय लिहिलें होते; तें स्वारीनेंच भारी हौसेनें पुस्तकरूपानें छापून माझें आज केवढें कौतुक केलें होतें हें !

हातांतल्या पुस्तकाकडे मी आणि माझ्याकडे स्वारी पहाण्यांत किती वेळ गेला कोण जाणें !

" सजली आहे ना तुझी कन्या तुझ्या मनासारखी ? " पुन्हां स्वारीनें अत्यंत आतुरतेनें आणि उत्कंठेनें प्रश्न केला. आतां मी जरा भानावर आलें. मला बोलायचें कांहींच सुचेना. मी सादर दृष्टीनें स्वारीकडे नुसतें पाहिलें. पण तेवढ्यानेंच स्वारीला हवं होतं तें उत्तर मिळालें स्वारीच्या मुखमंडलावर, आनंद, अभिमान आणि कृतकृत्यता हे भाव झळकलेले मला दिसले. प्रसादनें माझ्या हातून पुस्तक केव्हां घेऊन त्यावरचें चित्र तो पहायला लागला हें मला कळलेंच नाहीं !

" ही आई–हे बाबा !–" पुस्तकावरील चित्रावर बोट ठेऊन प्रसाद म्हणत नुसता नाचूं लागला. " होय ना हो बाबा ?-होय ना ग आई ? तुम्हींच ना ?-अन् आई, हें तुझ्या कडेवर बाळ कोण आहे ?–"

" कोण बरं ?—"

" मी !" प्रसादच म्हणाला. तो हंसला. आम्हीही हंसलों.

इतक्यांत, पुरुषोत्तम, शाम, बाळ, शिवाजी, जन्या, मधु, यशवंत, ही प्रसादच्या मित्रांची बालसेना–प्रसादला "संघात" घेऊन जायला धांवत, बागडत आली.

"चल. चलतोस ना "संघात" प्रसाद? उशीर होतोय ना आपल्याला?–" सगळ्यांनीं एकच गिल्ला केला. प्रसाद लगेच माझ्या हातांत पुस्तक देऊन त्या बालसेनेबरोबर सूं पळाला!

आम्ही त्या बालसेनेकडे कौतुकाने आणि आनंदाने पाहूं लागलों.

"प्रसाद सगळ्याना किती आवडतो–त्याच्या सगळ्या मित्रांना भारी तो हवाहवासा वाटतो–पाह्यचं ना?—" मी कौतुकानें बोललें.

"आणि ही तुझी लाडकी लेक–हे वाङ्मयापत्यसुद्धा प्रसाद-सारखेंच साऱ्यांना प्रिय होईल–तशीच आहे ती!" स्वारी अभिमानानें उद्गारली. कारण "शुद्ध बीजा पोटीं। फळे रसाळ गोमटीं" असें मुळीं साधुसंतांचें वचनच आहे!

तें ऐकून मला कित्ती आनंद झाला; पण मी उगीचच मान वेळीत "इश्श! कांहींतरीच! आपलं आपणच चागलं म्हणून घ्यायचं अन् कौतुक करून घ्यायचं!" म्हटलंच!

"पुरुषाना विनय शिकावा लागतो. निदान सोंग आणावं लागतं–पण बायकाना त्याची उपजतच देणगी ईश्वराकडून मिळालेली असते!" या बोलण्याने स्वारीनं मला निरुत्तर केलें!–मी अधिकच लाजले.

"बरं, पुस्तक लिहायला लावलं. खर्च करून छापलं, प्रुफं तपासलीं, मेहनत करून, श्रम घेऊन, हातांत पुस्तक आणून देऊन आपल्या माणसाचं आपणच इतकं कौतुक केलं–करतों आहें–आणि करीनही. पण आतां एवढं तरी करा–" म्हणून मध्येंच स्वारी माझ्या-कडे पहात क्षणभर थांबली—

"काय?–" अशा प्रश्नार्थक नजरेनं मीं पाहिलं.

"श्रमपरिहार्थ आम्हांला कांहीं चहा-फराळ नको का?–कौतुक करणाराचं एवढंसुद्धां कौतुक नको का करायला?–" अथाग प्रेमळ नज-रेनें पहात, अन् माझ्या हनुवटीला हलकेंच हात लावून हंसून म्हणणं झालं!–

" इश्श ! हें काय हे ?–" असं कांहीं तरी म्हटलं मी अन् आंत जाऊन चहा–फराळाच्या तयारीला लागलें.

जवळचा पाट स्वतःच घेऊन स्वारी माझ्या जवळच बसली. माझ्या पुस्तकाबद्दल एकसारख्या गोष्टी सुरू केल्या. त्या चालू असतां मला माझ्या वडिलांची-आप्पांची आठवण झाली. त्यांनीं माझं हें पुस्तक पाहिलं असतं. वाचलं असतं आणि त्याना आनंदानं आकाश ठेंगणं झालं असतं ! हें मनात आलं आणि डोळ्यांत पाणी आलं.

तेव्हा स्वारी म्हणाली, " हें काय ? अशा आनंदाच्या वेळीं डोळ्यात पाणी काय म्हणून ?–"मीं खरं कारण सांगितलं, तेव्हां स्वारीलाही उदास वाटल ! पण लगेच विषय बदलला. मला पुन्हां आनंदीत करण्याच्या बुद्धीन बोलायला सुरुवात केली—

" बरं पण राणीसरकार, छापलेलं पुस्तक स्वतः आम्हांला केव्हां वाचून दाखविणार ?—"

" छे: गडे !–मी–नाहीं–" मी मान हलवीत अस्पष्ट पुटपुटलें !–

" वाः ! वाः ! नाहीं म्हणजे ?—पुस्तक मला अर्पण केलं आहेस ना ?–थाटाचा जाहीर अर्पणसमारंभ नसला तर नसं दे !–पण अर्पण-करणाराला निदान अर्पण कर्त्यांने वाचून दाखवायला नको कां ?" असं म्हटल्यावर कुणास हसूं आल्याशिवाय राहील ?

स्वारीच्या आग्रहानं बरोबरच चहाचा घोट घेत मी किंचित् लाजत व गालांत हंसत कबूल केलं-"उद्यां वाचीन ! "–

# ग्रहणापूर्वीं सुटका.

## प्रकरण पहिलें

## अनोळखी पाहुणा !

“ आप्पासाहेब पुरोहित इथेंच रहातात ना ? ”

घराचें पुढचें दार उघडून एका हातात चामड्याची मोठी बॅग व दुसऱ्या हातांत होल्डॉल असलेला एक तरुण आत आला. त्यानें उभ्या-उभ्याच मोठ्यानें विचारलें.

बाहेरच्या बैठकीच्या जागेंत त्या वेळीं कोणीच नव्हतें. आप्पा आज सकाळच्याच गाडीनें मुंबईला गेले होते. वसंत दोन वेळेपुरता जेवायला तेवढा घरीं असायचा. मग तो यावेळीं कुठून घरीं बसायला ?

मी मागील दारीं वेणीफणी करण्यांत गुंतले होतें..एकटीच होतें मी; आप्पा गांवाला गेले होते, तरी स्वयपाकाची उगीच कशाला अळंटळं करावयाची ? आपली घरांतली प्रत्येक गोष्ट ज्या वेळची त्यावेळीं बिनचूक करावयाची. घरांतली झाडलोट, पाणी तापवणं, सडासंमार्जन, आंगणांत आणि तुळशीपुढें रांगोळी घालणें, आंगधुणीं, स्वयंपाक, जेवणीं, उष्टी-खरकटी हीं सारीं आताशा मलाच उरकावीं लागत. अन् मी ती अगदीं बिनबोभाट करीत असे. मी वडिलांच्या—आप्पांच्या प्रेमळ—पण कडक शिस्तीखालीं तशी तयारच झालें होतें.

आणि कामं—कामं झालीं तरी अशीं कितीं असणार तीं ? इनमिन तीन माणसं आम्हीं घरांत. त्या तेवढ्या कामाला वेळ तरी कितीसा लाग-णार ? आळस झाडून अन् झटपट कामाला लागलं कीं तेव्हांच उरकायचीं तीं ! ज्या वेळचीं त्यावेळीं कामं उरकलीं म्हणजे घरांतल्या साऱ्यांनाच किती

तरी बरं असतं आपापल्या कामाला लागायला. आपल्याला देखील मग वाटेल तेवढा मोकळा वेळ मिळतो मनासारखीं दुसरीं कामं करायला.

अशीच आज मीं रोजच्यासारखी कामाला लागायच्या तयारींत होतें. माझी वेणीफणी चालली होती. कवि गोविन्दाग्रजाच्या वाग्वैजयंती-तल्या "प्रेमळ देवा, जिवलग देवा माझ्या जीवाच्या देवा। कसे बिसरला या दासीला देवा हो एकच देवा!" ही एका सुंदर कवितेंतील ओळ उगीचच माझ्या जिभेवर नाचत होती. नेहमीं कामांत असताना कुणाच्या तरी, कसल्या तरी कवितेचें चरण गुणगुणायची मला संवयच लागून गेली होती. तोंडानें गुणगुणत काम करताना कसें झपाझप तें उरकतं. कामाचा कंटाळा येत नाहीं. वेळ कसा जातो हें समजत नाहीं. असा माझा अनुभव होता.

आप्पा घरीं असले आणि त्याच्याकडे बसायला आलेल्या मंडळीशीं त्याचें बोलणे चाललेलें असले, म्हणजेसुद्धा माझी गाण्याची गुणगुण काम करताना चालू असेच; पण तितकी मोठ्यानें ती गुणगुण नसे. नादांत असलेच म्हणजे एखादे वेळीं गुणगुणताना स्वर उंच होई. पण आप्पांना तें खपत नसे. ते बाहेरूनच मोठ्याने ओरडत, "चारू, काय चाललं आहे. आम्हीं बाहेर बोलतों आहोंत-लक्षात आहे का?—"

अन् त्यामुळें मी गप्प होई. आज आप्पा घरीं नव्हते. माझा स्वरही उंचावला होता गाताना! मी खुशाल निःशंकपणानें तोच तोच चरण घोळीत होते. त्या नादात बाहेरचं लोटलेलं दार उघडल्याचा आवाज मला ऐकायलाच आला नाहीं. पण आप्पांचं नाव मोठ्यानें उच्चारल्याचा आवाज मात्र मला ऐकायला आला. त्यावेळीं कुंकू लावून अंग धुवायला उठत होते. बाहेरचा आवाज ऐकला. तसं माझं गुणगुणणं थांबलं. मी बाहेर आले.

तों एक तरतरीत तरुण आपल्या दोनही हातांत आपल्याबरोबरचें प्रवासी सामान घेऊन उभा असलेला मला दिसला! मला त्यानें पाहिलें. हातांतील सामान खालीं ठेवीत मला पुन्हां पहिलाच प्रश्न केला—

"आप्पासाहेब पुरोहित इथेंच असतात ना?—"

मीं होकारदर्शक मान हालविली.

" घरीं आहेत आप्पासाहेब ?–" आप्पाच्याऐवजीं मला समोर पाहून जरा चाचरतच त्या अनोळखी तरुणानें विचारलें.

" आप्पा मुंबईला गेले आहेत. " मीं सांगितलें.

तें ऐकून त्या तरुणाचा चेहरा एकदम चमत्कारिक झाला. त्याचक्षणीं वाकत खालीं ठेवलेल्या आपल्या सामानाकडे त्याचे हात गेले; आणि–" अरर !-अस का ?–" एवढेंच काहींसा तो आपल्याशीं उद्गारला. त्याची दृष्टि बाहेर रस्त्याकडे वळली. आल्या पावलींच परत बाहेर पडण्याची त्याची तयारी असावी असे मला दिसलें.

" आप्पाना भेटायचं आहे ?–" मीं होऊनच तेवढ्यात विचारलें.

" हो–त्याच्याकडेच आलों होतों–पण–" घुटमळत त्यानें म्हटलें.

" आप्पा उद्या रात्रीं नक्की येणार आहेत. ते येईपर्यंत इथं राहायला काहीं हरकत नाहीं !–" तो तरुण आप्पा घरात नाहींत हें कळल्यावर इथें उतरावें कसें ? या पंचायतींत पडला आहे हें चटदिशीं ओळखून पटदिशीं बोललें. इतकेंच नाहीं तर त्याला आपलें सामान उचलून तें ठेवण्यास योग्य ती जागा दाखवीत म्हटले; " सामान असूं दे त्या ठिकाणीं. आप्पाच्या जागेत बसायला काहीं हरकत नाहीं. चला तिकडे ! "

माझं बोलणें ऐकून तो तरुण आश्चर्यानें चकित होऊन माझ्याकडे थोडा वेळ पहातच राहिला. पण मला काहींच वाटलें नाहीं. तो आपल्या घरीं उतरायला परस्थ आला आहे. आप्पा घरीं नाहींत, हें ऐकून तो गडबडला आहे, हें कळल्यावर त्याला थांबायला सांगून निश्चित करणें माझें कर्तव्यच होतें.

आप्पांच्याकडे नेहमींच ओळखीचे, अनोळखीचे लोक वारंवार उतरायला येतात, रहातात. आज आप्पा घरीं नाहींत, म्हणून त्यांच्याकडे आलेल्या मनुष्याला का तसेंच परत लावायचें ? आप्पांची नेहमींचीच मला ताकिद असे–मी घरीं नसलों, आणि कोणी आपल्याकडे उतरायला आले, तर त्याची विचारपूस करायची, त्याला उतरून घ्यायचं, त्याची जेवणाखाण्याची नीट व्यवस्था ठेवायची, हें असें आमच्या इथें नेहमींच चाले. माझ्या तें चांगलें आंगवळणीं पडलें होतें.

इतके दिवस तर आप्पा स्वतः आल्यागेल्याची उठबस करीत स्वतः स्वयंपाक करून जेवायला त्याना घालीत. मला कळतंय तेव्हांपासून मी हें पहात होतें. आम्ही अगदीं लहान असतांनाच आमची आई आम्हांला कायमची सोडून गेली होती. तेव्हांपासून अगदीं परवांपरवापर्यंत आप्पांनीं मला आणि वसंताला परक्याच्या दारांत नेलं नाहीं. ते स्वतः माझी वेणी-फणी देखील करीत. माझें आणि वसंताचे कपडेधुणें—आम्हांला स्नानें घालणें, जेवायला करून घालून पोशाख घालीत. शाळेला पाठवीत. त्याना माणसाची भारी आवड त्याच्याकडे नित्य ये—जा कुणाची नाहीं, असें नसेच कधीं.

त्यामुळे माझ्या बोलण्याचें त्या तरुणाला आश्चर्य वाटलें, तसें त्याला 'आप्पा येईपर्यंत रहा असे सांगतांना कांहींच वाटण्याचें व त्याच्या आगमनाचें काहींएक कारण मला नव्हतें.

तो तरुण जरा संकोचला. पण विशेष आढेवेढे न घेता मीं दाखविलेल्या जागीं त्यानें आपलें प्रवासी सामान ठेवलें आणि आप्पांची जागा दाखविली, तिथं तो निमूटपणें शिरला.

आलेल्या पाहुण्यास प्रवासीकपडे उतरायला—आराम घ्यायला—आणि करमणुकीकरितां आलेलीं ताजीं वर्तमानपत्रें—मासिकें वगैरे देऊन त्याची सुखसोय पहायला—आप्पा जशी तत्परता दाखवीत, तशीच त्यांची बरोबर नक्कल मीं या वेळीं केली.

मग मी आंत निघालें.

तेवढ्यात त्या तरुणानें मला विचारलें— "आप्पासाहेबांच्या घरीं दुसरं कोणी पुरुष माणूस नाहीं ?—"

"माझा भाऊ आहे कीं! बाहेर गेला आहे तो. येईल थोड्या वेळानें." अन् मी आंत गेलें.

चहाकरितां शेगडीवर आधण ठेवलें. अन् मग ध्यानात आलें कीं, पाहुण्याचे प्रातर्विधी अजून व्हायचेच असतील; त्याबद्दल विचारायला हवं होतं म्हणून पुन्हां बाहेर गेलें. विचारलें. "होय तर!" असें त्यांनीं उत्तर दिलें.

शौचकूप दाखवून दिला. मागच्या आंगणात डाळिंबीच्या झाडाखालीं पाट, स्वच्छ टावेल, दंतमंजन, साबण आणि दोन ऊन पाण्याच्या तपेल्या भरून ठेवल्या नि मग केटलींत चहा–साखर टाकून त्यावर पाण्याचें आधण ओतण्याकडे वळलें.

हातपाय तोंड धुवून पाहुणा बसायच्या जागेंत गेलेसे पाहिलें. मी चहाचा कप, त्याबरोबर चार दोन मी घरींच केलेल्या बिस्किटांपैकीं बिस्किटें बशींत ठेऊन, त्यांच्यापुढें नेऊन ठेवला!–त्या वेळीं पाहुणे आपल्या बॅगेंतले कपडे काढून तें आंगांत चढविण्याच्या तयारींत होते—

"बाहेर जायचं आहे?—" मींच विचारले.

"होय!–" चहाचा कप उचलीत ते म्हणाले.

"मग स्नान उरकून जायला हरकत नाहीं. अनायासें पाणी तापलेलंच आहे. स्नान झालं असलं म्हणजे बाहेर उशीर थोडासा झाला तरी हरकत नसते.–बाहेरून येईपर्यंत स्वयपाकही पण होतोच आहे–" मी सरळ सागून मोकळी झाले. "पण आपल्या कामाच्या वेळेप्रमाणें पहावं. बाहेरून आल्यावर स्नान झाल तरी माझी काहीं हरकत नाहीं!"

स्नानाबद्दल सांगितलं त्या वेळीं पाहुण्याना कांहीं विशेष वाटलंसं दिसलं नाहीं; पण स्वयंपाक 'बाहेरून येईपर्यंत होईल,' हे ऐकून त्यांचा चेहरा एकदम जरा बदलला.

"स्नान करून जायला हरकत नाहीं. पण जेवणाचं–" संकोचानें किंचित् माझ्याकडे तर किंचित् खालीं पहात पाहुणे म्हणाले;–

'जेवणाचं काय?-जेवायला दुसरीकडे जाणार?" ते संकोचलेले लक्षांत येऊन व त्यांच्या बोलण्याचा हेतु समजून मीं म्हटलें; "छे:! तुम्ही आमच्याकडे उतरायला आला आहांत ना? मग दुसरीकडे कसे जेवायला जाणार?–आमच्याकडे उतरायला आलेला पाहुणा जेवायला दुसरीकडे गेलेला आमच्या आप्पांना नाहीं खपन! अन् आप्पांना कळलं म्हणजे ते माझ्यावर रागावतील आणखी!–आप्पा घरीं नाहींत म्हणून संकोच करायचं कारण नाहीं कांहीं!"

खरें म्हणजे मी कोणत्याहि आपुलकीच्या आग्रहानें म्हटलेंच नाहीं. त्या म्हणण्यांत आप्पांनीं शिकवलेली फक्त कर्तव्यदक्षताच होती!

पण माझें बोलणें ऐकून तो पाहुणा मोठ्यानें हंसला!

" ठीक आहे. जेवायला जाणार होतों. पण आतां नाहीं जात. मात्र स्नान उरकूनच बाहेर जाऊन येतों–शक्यतों लवकरच येईन–साडेअकरा वाजण्याच्या सुमारास आलें तर चालेल ना ? "

" हो चालेल कीं ! " असें उत्तर मीं दिलें. त्यांच्या स्नानाची तयारी करून दिली.

स्नान उरकून कपडे बदलून पाहुणे बाहेर पडले.

मग मी आंग धुवून स्वयंपाकाकरिता चुलीपुढें गेलें.

दूधवाली, दळपीण या येऊन गेल्या. धोबी आला. त्याला आप्पाचे, वसताचे कपडे काढून दिले.

अकरा वाजता, सकाळपासून बाहेर गेलेला वसत आता अगदीं एकादा घोडा नाचत यावा तसाच आला ! " झाला कीं नाहीं स्वयंपाक, आपल्याला बोवा फार भूक लागली आहे. ताई, तूं भारी चेंगट आणि आळशी आहेस, चटपट तुला कामच करता येत नाहीं—" अशी दररोज-चीच त्याची बडबड सुरू झाली.

" तुझं स्नान तर होऊं दे. तोंपर्यंत माझा स्वयंपाक होतो कीं नाहीं बघ ! झाला नाहीं तर मग म्हण—" मीं शांतपणाने चुलीवरील भाताची तपेली उतरून मुरण्याकरिता खालच्या निखाऱ्यावर ठेवीत वसंताला म्हणाले !

" माझ्या स्नानाला आज सुट्टी–माझ्या स्नानाशीं आज तुला काय करायचे आहे ?–झालं असलं तर तूं आपली मला वाढ कशी !–"

तितक्यांत, दोन पाट, दोन तांबे व भांडीं, दोन ताटें, मीं मांड-लेली वसंतानें पाहिलें. त्याबरोबर तो माझ्या अंगावर एकदम ओरडला—

हें काय ग ताई ? आप्पांच्याबरोबर आज मला जेवायला वाढ-णार आहेस वाटतें ? वाः ! मी त्यांना चुकवतों आणि तूं मुद्दाम असा चावटपणा नेहमीं करतेस. जेवतांना आप्पानीं माझ्यावर हवं तसं तोंड-सुख घ्यावं आणि ती तूं गंमत पाहून आनंद मानावास, असंच वाटतं ना तुला ?—"

" अरे पण वसंत, आप्पा आज सकाळींच मुंबईला गेले आहेत ना ?–निदान आज तरी तुझी गंमत पहावी ही माझी इच्छा असली तरी ती सफल कशी होईल रे ?–" मी वसंताला उत्तर दिलें. पण तो त्यामुळें एकदम कायपण खजील झाला !–पण क्षणभरच. लगेच चिडून माझ्या-वर उसळला नि म्हणाला, " मग हे दोन पाट कोणाकरिता माडलेस ? दुसऱ्या पाटावर तू माझ्याबरोबर जेवायला बसणार आहेस वाटतें ?

मलाही वाटलं, " लहानपणी जशी आपण अंगत-पंगत करीत होतों–तशीच आतासुद्धा करायला काय हरकत आहे ? " असं वसंताला म्हणावं. पण लहानपणचा गोड स्वभावाचा मायाळू वसंत आतां राहिला होता कुठें ? म्हणून मग मीं काहींच बोलले नाहीं.

" आपल्याकडे पाहुणे आले आहेत. त्याच्याकरितां दुसरा पाट आहे ! " एवढेंच सांगितलें.

त्यावरही–" आणखी कोण हे पोटभक्त नवे पाहुणे उपटले ? या पाहुण्यांनीं तर भंडावून सोडलं बोवा ! आमच्या आप्पाना पाहुण्यांचा सोसच फार ! घ्या म्हणावं पाहुणेच पाहुणे ! तुम्हीं घरीं असला तरी पाहुणे आणि नसलां तरी पाहुणे ! या रिकामटेकड्या पाहुण्याना आमच्याकडे येऊन पाहुणचार झोडण्यापलिकडे दुसरी कसलीं कामंच नसतात कीं काय कोण जाणे !–पाहुण्याशिवाय आप्पांना करमत नाहीं आणि आप्पांच्याशिवाय पाहुण्यांना चैन पडत नाहीं..." अशी वसंतानें वाटेल ती टकळी चालविलीच !

मला त्याची ती बडबड मुळींच आवडली नाहीं. पण तो ऐकणार मला थोडाच. त्याचें तोंड बंद व्हावें म्हणून मीं त्याला म्हटलें, " मग करतोस ना स्नान वसंत ? माझा स्वयंपाक झाला आहे. तुझें स्नान होतंय तंवर पाहुणेही येतील. " " म्हणजे ? पाहुणे आल्याशिवाय तूं मला जेवा-यला वाढणारच नाहींस का ?–" वसंत पुन्हां खेकसलाच !

" आज आप्पा घरीं नाहींत ना ? तूं बरोबर असलास तर तेवढं बरं नाहीं का होणार ? " मी म्हणालें; " म्हणजे दिसायलाही तें चांगलें दिसतें. मलाही मोकळ्या अंगानें वाढतां संवरतां येईल. पुरुषाबरोबर पुरुष जेवायला असला म्हणजे अनोळखी माणसाला पण तेवढा संकोच वाटत नाहीं ! "

" मोठी आली आहे आजीबाई मला शहाणपणा शिकवायला !– आप्पांनीं तुला शहाणी–शहाणी म्हणून चढवून ठेवली आहे–आणि तूंही चढली आहेस ! " अशी कुरबुर त्यानें चालविलीच. पण पाहुण्यांच्या-बरोबर जेवायला बसल्याशिवाय सोय नाहीं, हें ओळखून तो धडपडत–चडपडत कां होईना, पण स्नानाच्या तयारीला लागला !

घड्याळात साडे अकराचा ठोका पडला, पाहुण्याचा टांगाही येऊन थाबला. वसंताचे स्नान पण आटोपलें.

वसंतालाच पाहुण्याना जेवायला हांक मारायला मीं सांगितलें. तो हांक मारायला बाहेर गेला. ते कपडे काढीतच होते. त्यांना हाक मारून वसंत आत आला. पाहुण्याना पाहिल्यावर वसंताला मजाच वाटली.

माझ्याकडे पहात हसत वसंत हलकेंच म्हणाला, " ये चारुताई, पाहुणा अगदीं तरणा बाड आहे कीं ! एकाद्या बोलपटात नायक होण्याला शंभर टक्के लायख आहे बेटा ! मला वाटलें, एकादा म्हातारा लब्ध प्रतिष्ठित–रंजिस चेहऱ्याचा–बावळट देशभक्त असेल कुणी तरी ! पण मी अगदींच फसलो. असले तरुण पाहुणेसुद्धां आमच्या आप्पांच्या पोतडींत असतात म्हणायचें–"

मलाही वसंताच्या बोलण्याचें हंसू आलें, तो आणखीदेखील कांहीं बोलला असता; पण तेवढ्यात पाहुणे आंत जेवायला आले.

दोघे जेवायला बसले. आपल्या मेळांत बसणारा पाहुणा आहे, असें वाटून वसंत त्यांच्याशीं बोलूं लागला.

कोण, कुठले, नाव गांव काय ? आप्पांची आपली ओळख कुठली, वगैरे प्रश्न वसंतानें पाहुण्याना केले. त्यानींही काहीं प्रश्नांची मोजकी पण चतुर उत्तरें वसंताला दिली. आप्पांबद्दल सांगतांना व त्यांच्या आपल्या भेटीचा योग कसा आला याबद्दल बोलतांना मात्र फार फार आदरपूर्वक रसाळपणानें सुंदर वर्णन केलें.

आगगाडींतून आपल्या चारदोन बरोबरच्या स्नेह्यांबरोबर आपण प्रवास करीत असता आमच्याच शेजारी एका कोंपऱ्यांत आप्पासाहेब वाचनांत चूर असलेले आपण कसे पाहिले; त्यांच्या साध्या–किंबहुना जरा बावळट पोषाखामुळें आमच्यापैकीं कांहींनीं उगाचच त्यांची चर्चा कशीं

आरंभली; त्याकडे पाहूनही ते प्रथम कसे स्वस्थ बसले; पण जेव्हां आमच्यांत कांहीं निरनिराळ्या विषयांची चर्चा सुरू होऊन कांहींचा मूर्खपणा जाहीर होऊं लागला तेव्हां आपण होऊन योग्य प्रसंग पाहून आमच्यांत आप्पासाहेब कसे मिसळले; त्याची विद्वत्ता, चर्चा करण्याची बिनतोड शैली आणि त्या सर्वापेक्षाही आम्हां ताज्या तरुणांसही लाजविणारें "आपल्या राष्ट्राच्या उत्कर्षाविषयीं आपल्या संपूर्ण स्वातंत्र्याबद्दल" तळमळणारे मनाचे तेजस्वी तरुण पाहून आपण कसे मुग्ध होऊन गेलों; आपण तर त्यांचे तेथल्या तेथेंच भक्तिभावानें आणि आदरानें कसे पाय धरले; हें सर्व सांगून आप्पासाहेबांनींच गाडींतून उतरताना आपल्याला केव्हा तरी आपल्याकडे अवश्य यायला सांगितले. आप्पासाहेबांचा प्रचंड निवडक ग्रंथांचा संग्रह पाहण्याच्या आणि शक्य तर त्याचा उपयोग करण्याच्या हेतूनें येण्याची मला अत्यंत उत्सुकता पुष्कळ दिवस होती. तो योग अगदीं अल्प मिळाला, म्हणून इथें आज आलों. पण आलों तर आप्पासाहेबच इथें नाहींत त्यामुळे मनाचा प्रथम थोडा विरसच झाला—"

जेवणावर वसंताचें आणि पाहुण्याचे बोलणें झालें; त्यातील मुख्य महत्त्वाचा भाग साराशानें वरीलसारखाच होता.

आप्पांचें गुणसकीर्तन तरुण अनोळखी पाहुण्याच्या तोंडून ऐकत असतां मला किती आनंद वाटत होता. बोलतांना पाहुणे मधून मधून माझ्याकडे आणि वसंताकडेही खालच्या डोळ्यांनीं पहात होते.

आप्पांच्या स्तुतीबद्दल वसंताला विशेष कांहींच वाटत नव्हतें; हें मला दिसलें. पण पाहुण्याना तें उमगले कीं नाहीं कोण जाणें.

आप्पासाहेब घरीं नसतांनाही आम्हीं त्यांच्या मुलांनीं आपल्याला चांगलें वागविलें, आग्रहानें आणि मोकळ्या मनानें रहावयाला भाग पाडलें; याबद्दल पाहुण्यांनीं अतिशय आनंद व्यक्त केला. त्यांनीं अगोदर वसंताला नांव विचारलें तेव्हां आपल्या नांवाबरोबर माझेंही नांव त्यानें सांगून टाकलें.

आम्हीं आप्पांचीं मुलें म्हणून आमच्याबद्दलसुद्धां पाहुण्यांनीं किती तरी आदर व्यक्त केला. त्या वेळीं "लोकांना आपल्याबद्दल आदर आहे,

पण खुद्द आप्पांना कुठें तेवढा आदर आहे?" असें आचरटपणानें वसंत म्हणून आपली अक्कल पाजळतो कीं काय ही भीति मला वाटली! पण तेवढ्यात—

"वसंतराव, आपलें शिक्षण काय चाललें आहे?" असा पाहुण्यांनीं त्याला प्रश्न केला.

"शालेय शिक्षणावरचा आपला विश्वास उडाल्यामुळें आपण शिक्षणाला केव्हाच रामराम ठोकला आहे!" वसत मोठ्या ऐटीनें दण-दणीत उत्तर देऊन मोकळा झाला! मला वसताने दिलेले हें आचरट उत्तर मुळीच आवडलें नाहीं. पाहुण्यानींहि त्याच्याकडे चमत्कारिक नजरेनेंच पाहिलें. पण वसंत आपल्याच तोऱ्यांत होता.

"आणि चारुताईचं शिक्षण—" लाजऱ्या नजरेने माझ्याकडे पाहिल्या न पाहिल्यासारखे करीत वसंतालाच पाहुण्यानीं विचारलें.

आता वसंत माझ्याबद्दल काय काय अलाप काढतो, हीच पंचाईत झाली. "तिलाच विचारा" म्हणतोय! का "नेहमीं नेहमीं आजारी पडणारी शिकणारँ काय कपाळ?" असें म्हणून हसतोय का आणखी कांहीं भलतंच बरळतोय, असं मला वाटल पण तसें न होतां जरा शुद्धीवर राहूनच अर्ध सरळ उत्तर त्यानें देऊन पुढच्या अर्ध्या उत्तरांत त्यानें आपली अक्कल पाजळलीच!—

"चारुताई इंटरमध्यें होती. आप्पासाहेबांच्या मनांत हिला खूप शिकवायचं होतं; आणि ताईच्याहि मनात खूप खूप शिकायचं होतं—पण मध्यंतरी शाळा कॉलेजांत जाणाऱ्या मुलींच्या विनयभंगाची सांथ पसरली. त्यांत हिलाही एकदा झळ लागली. त्याचा परिणाम हिच्या मनावर झाला त्यापेक्षा आप्पांच्याच मनावर फार झाला. त्यांनीं हिला शिक्षण सोडायला लावलं. हिनंही सोडलं!"

कारणाशिवाय उगीचच वसंतानें हें सागितलें. मला त्याचा फार फार राग आला. हें कशाला उगीच एकाद्याला सांगायला हवं?

पण विनयभंगाची झळ मला लागली हें वसंताचें वाक्य ऐकून पाहुण्यानें माझ्याकडे पाहिलें. मी वसंताला डोळ्यांनीं दाबीत होतें; तेंही त्यांच्या दृष्टीस पडलें. मला कसेसेंच झालें.

" यांचा विनयभंग झाला ?—त्या हलकटाचें थोबाड तिथल्या तिथें कुणी रंगवून टाकलें नाहीं ? " एकदम संताप होऊन पाहुण्यांनीं प्रश्न केला.

" कुणी कशाला ? आमच्या या ताईनेंच ह्या विनयभंग करू पाहणाऱ्या त्या हलकटाचें कानशील फोडून काढलें ना ?—" वसंतानें लगेच सांगितलें.

" शाबास ! " आनंदाचा उद्गार त्यासरशीं पाहुण्यांच्या तोंडून बाहेर पडला. आणि माझ्याकडे सादर दृष्टि लावली !

त्या दृष्टीला क्षणमात्र माझी दृष्टि भिडली ! माझ्या सर्वांगातून कसली तरी मधुर लहर लहरली !

" मुलीमुलींतून स्वाभिमानाचें तेज असे दिसूं लागले तर विनयभंग करण्याची कुणाची माय व्याली आहे ? " असें मोठ्या आवेशानें पाहुण्यांनीं आनंदोद्गार काढल्यावर जरा वेळानें वसंताकडे वळून स्वारीनें त्याच्या उद्योगाबद्दलची चौकशी आरभली.

" वसंतराव, आपला उद्योग काय चालूं आहे सध्या ? "

आतां वसंताला आपलें सत्तेचें कुरण आढळलें. आणि मग त्याच्या बेगुमान थापांना उत आला.

" कीर्ति आणि संपत्ति पायाशीं लोळायला लावणारा आणि त्रिखंडात उत्कर्षाला पोंचलेला ' सिनेमा'चा उद्योग हातीं घेण्याच्या उद्योगांत आपण आहोंत ' असे वसंतानें बेधडक पाहुण्यांना सांगितलें. सुरुवात पाहुण्यांना आनंददायक वाटली असें मीं पाहिलें. पण आप्पासाहेब आपल्याला भाडव द्यायलाला तयार नाहींत; त्यामुळें आपलें आप्पांचें सध्यां बनत नाहीं, यासारखें तो जेव्हां बरळायला लागला आणि पुढें पुढें तर—इंग्लिश, बंगाली, गुजराथी, मराठी, नटनटींची नामावळी, त्यांचीं गुणवर्णनंच करायला लागला, तेव्हां पाहुणे, तिरस्काराच्या नजरेनेंच त्याच्याकडे पाहूं लागले. ' हं असं काय ? ' मला त्यातलें विशेष माहीत नाहीं ' अशींच तुटक उत्तरें नाखुषीनें त्याला देऊं लागले.

वसंताची अक्कल पाहुण्यांनीं जोखली, हें मीं ओळखलें. पण स्वतःच्या बोलण्याच्या भरांत वसंत पाहुण्याची खुषी ना खुषी आवड—नावड पहातोच कशाला ? तो त्यांच्यावर खुशाल वाटेल तें लादीत होता.

जेवणें झालीं. दोघे हात धुवून बाहेर गेले. तरी तेंच तेंच वसंत पाहुण्याना सांगत होता. ते निमूटपणें नाइलाज होऊन ऐकत होते.

"आपण आराम करा—हा मी आता इतक्यांत आलोंच,' असें सांगून वसंत पाहुण्याच्या हातावर गुळखोबरें देऊन त्यांच्यापासून सटकला!

त्यांच्याशीं बोलत बसला, हें किंवा तो सटकला आणि आप्पांच्या टेबलावरचीं ताजीं वर्तमानपत्रें चाळण्यात, पुस्तक वाचण्यात पाहुणे गढले कीं प्रवासातील शीण घालविण्याकरिता त्यानीं तणावून दिलें हेंहि मला आता काहींच कळणें शक्य नव्हतें.

मी आपलें वाढून घेऊन जेवायला बसलें. आता मी एकटीच होतें. जेवताना कसे कोण जाणें—अनोळखी तरुण पाहुण्यांचेच विचार माझ्या मनात यायला लागले!

---

# प्रकरण दुसरें

## " माया ! "

' पंडित ' नाव किती चागले आहे ! नावाप्रमाणेंच तोंडावर तेजही आहे. उगीच नाहीं आप्पाना कौतुक वाटून त्यांनीं आपल्या घरीं पंडितांना बोलावलें. भक्तिभावाने आप्पाच्या पायावर त्यानीं मस्तक नम्र केलं; यात परस्परानीं परस्पराना कसे चागलें ओळखलं !

ते आले कसे ? बोलले कसे आणि काय काय ?—वाणींत एक प्रकारचें गोड माधुर्य आहे. डोळे तेजस्वी-अगदीं चमकदार ताऱ्यासारखे आहेत ! आदर वाटेल मला अशाच तऱ्हेनें कसे वरचेवर पहात होते माझ्याकडे ! गडबडलेल्या पंडिताना मीं ठेवून घेतलें—तेही लगेच रहायला संकोच सोडून तयार झाले.

माझं मन पंडिताबद्दल—त्या तरुण अनोळखी पाहुण्याबद्दल मला न कळतांच विचार करूं लागलं. मला त्यांत मौज वाटूं लागली. इकडे जेवीत होते आणि इकडे विचार करीत होते.

पंडित—पाहुणा माझ्या घरांत—माझ्या मनातच कसा शिरला हे मला कळलेंच नाहीं !

पडितांशीं मी काय बोललें, हें आता मला आठवेनाच ! ते वसंताशीं काय बोलले, माझ्याबद्दल त्यानीं काय उद्गार काढले, वसंत स्वतःची बाष्कळ प्रौढी सांगत असता त्याना त्याबद्दल काय वाटत होत, त्यानें तें बोलूं नये, स्वतःला हास्यास्पद करून घेऊं नये, असं वाटत होतं; तें सगळं सगळं आठवूं लागलें; पण मी काय बोललें हें बरीक मला कांहींच आठवेना. पण तशी मी आठवण्यासारखं बोललें होतें तरी कधीं ?—बोलावसं—वसंत—ते बोलत असता आपण मध्येंच बोलावें असें मला नुसतें वाटत

होतें, पण मी मुळीं बोललेंच नाहीं. पण हेंही मला आठवेना! आप्पांची त्यांनीं स्तुतिस्तोत्रें गायिलीं म्हणून का मला आणि माझ्यासारख्या मुलींना त्यांनीं "शाबास!" म्हणून धन्यवाद दिले म्हणून मला पंडितां-बद्दलचे विचार येऊं लागले, त्याच्याबद्दल आदर वाटूं लागला? ते अपरिचित, अनोळखी नाहींत, अगदीं फारा दिवसांचे आपल्या परिचयाचे आहेत, असेंच आपल्याला वाटूं लागलें? काहींच समजेना मला! वाटा-यला लागलं, चट्दिशीं उठावं, बाहेर जावं, आणि पंडिताबरोबर खूप बोलावं!

माझं जेवण त्याच विचारांत झालं. पण तशीच मी हात वाळवीत ताटावर किती वेळ तरी बसलें होतें. कशी भानावर आलें कोण जाणें! भानावर आल्यावर माझी मीच लाजल्यासारखी झालें. आजपर्यंत आमच्या घरीं किती पाहुणे आले होते, राहिले होते; मी त्यांच्यांशीं बोललें होते, ते माझ्याशीं बोलले होते.

पण आजचा अनुभवच मला नवीन--अगदीं अपूर्व असाच होता! हेंच खरें! नाहीं तर मी इतका विचार आजच्या पाहुण्याबद्दल कसा करूं लागलें असतें?

उठलें, हात धुतले. खरकटीं भांडीं गोळा केलीं. मोलकरणीकरितां बाजूला ठेवलीं. शेणगोळा केला. झांकापाक केली. तें करीत असतां गाणें गुणगुणण्याची लहर आली मला. गोविंदाग्रजांच्या मुरलींतलें--

वांकड्या अधरि हा पावा। वांकडाच डोळा डावा।
किती वेळ असाच पहावा। अबू खेल करो वनमाली॥ कन्हया॥

हेंच कडवें कां आठवलें आणि मी तें म्हणूं लागलें कोण जाणें! गुणगुणतां गुणगुणतां तें मोठ्यानेंच म्हणूं लागलें. पण तितक्यांत जणूं काय आप्पाच बाहेर आपल्या बैठकींत बसले असून त्यांनीं ऐकलें तर ते रागानें मोठ्यानें ओरडतील असेंच मला वाटलें. आणि मी त्याच क्षणीं गप्प राहिलें!

आप्पाच्याप्रमाणें पंडितांनाही असे गाणें गुणगुणलेलें आवडणार नाहीं. असें उगीचच मनात आलें नी मी गप्प राहिलें हें एकपरी बरेंच झालें असें वाटलें.

पंडितांनीं आपल्या स्वरूपाची, वाणीची आणि एकंदर बोलण्या-चालण्याच्या तऱ्हेची माझ्या मनावर एक प्रकारची मधुर मायाच पसरली कीं काय कोण जाणें! एकाच दिवसांत, त्याचें माझ्याशीं विशेष कसलें बोलणें झालें नसतानासुद्धा, वसंताशीं बोलण्याच्या प्रकारावरून, तेवढ्यानेच आप्पाच्याबद्दल आदरपूर्ण दरारा वाटतो तसाच त्याच्याबद्दल मला कां वाटूं लागला—मला समजेना!

"ताई, अव चारुताई, हैसा का व घरामदीं—" अशा हाका मारीत बाहेरूनच आमची सुंद्रा मोलकरीण आली नसती,तर पंडिताबद्दलच्या माझ्या विचाराचा शेवट केव्हा झाला असता कुणास माहित!

सुंद्रा आंत आली. येता येता तिनें आप्पाच्या खोलीकडे सहज पाहिलें वाटतें; तिला आप्पा न दिसतां त्यांच्या खोलींत दुसरेंच नवखें माणूस बसलेले दिसलें त्यासरशीं तिचा हाका मारण्याचा आवाज मंदावला. ती माझ्या समोरच आली.

"अं? सुंद्रा? तूं केव्हां आलीस? अन् चारसहा दिवस कुठें ठिकाणा नव्हता! गावाला का गेली होतीस?" मी सुंद्राला पाहून माझ्या विचारातून खडबडून जागी होत तिला प्रश्नांवर प्रश्न करण्याचा सपाटा लावला. "सरशी सकाळीं आली होती. तुझ्याबद्दल ती कांहींच बोलली नाहीं. केव्हां आलीस तूं?-सरशी आता कां आली नाही?"

"सकाळच्या पारीं—गुरं सुटायच्या वक्ताला-जवा हाकड सरशी आली व्हती न्हवं, तवा आलें मी गावास्न!" सुन्द्रा माझ्या प्रश्नाचें उत्तर देत म्हणाली. "आन् सरशी इंदूला कशी येतीया हाकडं? घरांमदी पावनं आईल्याती!- म्या म्हटल जाती मीच! आप्पास्नीबी वाईच इचारायचं हूतं—आप्पा कुठं हैती व ताई? भाईर दिसलं न्हाईती-कुण्णु न्यारच पावनं दिसत्याती ततं?—"

"आप्पा आज सकाळीं मुंबईला गेले आहेत—कां? त्यांच्याशीं काय होतं तुझं काम? तुझ्याकडे पाहुणे आले आहेत?—" मीं विचारलें.

"जी. सरशीपायीं आल्याती. सोयरीकीचा इचार हाय!" सुंद्रानें आपल्या घरची माहिती दिली.

" सरशीला पहायला आले आहेत ? तिचं लग्न करणार आहेस वाटतं ? नवरा मुलगा आला आहे का पहायला सरशीला ? त्यानं पसंत केली का तिला ?–तिला आवडला का तो ? "

माझे हे प्रश्न ऐकून सुंद्रा हंसायलाच लागली, व म्हणाली कीं—

" अव, तुमच्यावाणी आमच्यांत असतया व्हय ? आमच्यात न्हवरा–न्हवरीला कोन इचारतुया ? पदूर बघायचा. शेतवाडी बघायची, न्हवरा ठयेवायपायीं काय देतुया–त्येचा उपेग आपणास्नी, आपला उपेग त्येला म्होरं नाचारी परपंचांत काय होतुया का ह्येचा इचार करायचा अन् लगीन–याव करुनश्यानी बायलं हुयाच इक्तंच ! आमचं व कसलं कुणब्या माळ्याचं ? "

सरशीच्या लग्नासंबंधानें सागतांना आपल्या जातींतल्या लग्नाच्या जुळवाजुळवीची माहितीही पण दिली. ती ऐकून मला हंसूंच आले.

सुंद्रानें खरकटीं भाडीं घासलीं. केरवारे केले. आणखी कांहीं करायच आहे का म्हणून विचारलें, तेव्हां दिवे पुसून भरून ठेवायला, दळप नीट करून गिरणींतून दळून आणायला वगैरे मीं तिला सांगितलें.

एवढ्यात तिसऱ्या प्रहरची चहाची वेळ झालीच ! मी शेगडी फुलवली व चहाची तयारी चालविली.

वसंत पंडितांच्याबरोबर बोलत बसला आहे कां पंडित एकटेच आहेत—म्हणजे त्याप्रमाणें चहा टाकायला बरं पडेल अशा कल्पनेनें मी हलकेंच बाहेर जाऊन डोंकावून पाहिलें. वसंताचा पत्ता नव्हताच ! पडितांची स्वारी–कांहीं तरी भरभर लिहिण्यात मग्न झाली आहे असें दिसलें. चाहूल लागून लिहिण्यातली तंद्री मोडूं नये म्हणून मी तशीच मांजराच्या चोरट्या पावलीं परतले.

सांगितलेलीं सारीं कामें उरकून सुंद्रा परत जायला निघाली. तिला चहा दिला. जातांना तिनें " आप्पा कवा येत्याल ? " म्हणून विचारलें.

" उद्यां संध्याकाळीं ! पण आप्पांच्याकडे काय काम आहे तुझें ?" मी तिला विचारलंच !

" तुम्हास्नी सांगून का उपेग ?–काव्यांचं काम हाय ? शेन्या मानसाचा इचार घ्येवा लागतुया ! आप्पा म्हनत्याल मला मागनं, मला

कां इचारलं न्हाईस! सरशीचं वंगाळ व्हईल असं म्या सांगितलं असतं काय? म्हून त्येंच्या कानावर घालाया व्हीवा!–पोरगी कुट पडतीया–कसं व्हतया–ह्यें आम्हा आडान्यास्नी काय व कळणार?—अन् कार्व्याला पैका नगं? पैक्याबदली आप्पास्नीच इचारायचं व्हतं?–बरं, जाती मी!–"

सुंद्रा गेली नी मी पंडिताना चहा देण्यासाठीं उठले. सुंद्राच्या सरशीला पहायला पाहुणे आले आहेत. तिच्या लग्नाचे ठरतें आहे–आपल्या घरीं पडित पाहुणे आले आहेत–आपण त्याना चहा देण्यासाठीं जात आहोंत—काय? पडित मला पाहूला आले आहेत?—

इश्श! काहीं तरीच काय माझ्या मनात आले? मला असा विचित्र–अकल्पित विचार आल्याबद्दल माझाच मला राग आला!–मला हंसूंही आलें!

सकाळीं आल्यानंतर पंडिताना चहा करून मींच दिला होता. आतां त्यांच्यासाठीच चहा घेऊन चाललें होतें; पण सकाळच्या आणि आताच्या मनःस्थितींत अंतर पडलें होतें, हें नाकबूल करण्यांत काय अर्थ?

आतां चहा द्यायला जाताना प्रत्येक पावलाबरोबर माझं हृदय उगीचच्या उगीच धडधडूं लागल हे बरीक खरें!

मूर्ख मनाच्या वेड्या विचारांना पिटाळून लावीत–मी आप्पांची मुलगी आहें–याची आठवण मनाला देत, आप्पाना रोज दुपारचा चहा द्यायला जात असे,–ज्या निःशंकपणानें जात असे, तशीच जातेस, असें समज,–हें स्वैर सुटूं पाहणाऱ्या मनाला बजावलें.

चहा घेऊन पंडिताकडे गेलें.

त्यावेळीं पंडिताचें लेखन थांबलें होतें. खुर्चीवरून उठून, आप्पांच्या बैठकीच्या जागेंत आप्पा नेहमीं बसत असत; त्यांच्या समोरच्या भिंतीवर लावलेल्या माझ्या मृत आईच्या भव्य तैल–चित्राकडे एकचित्तानें पहाण्यांत पंडितांची स्वारी तल्लीन झाली होती!

आईचा आणि माझा तोंडावळा अगदीं सारखा होता. माझ्याकडे पंडितांनीं निरखून पाहिलें नव्हतें; पण पाहिलें होतेंच. त्याच कल्पनेनें ते आईच्या चित्राकडे पहात आहेत कां? असें कांहींच्या कांहींच माझ्या मनांत आलें. अन् कसेंसेंच झालें.

माझें पाऊल वाजलेलें ऐकतांच पंडितानीं मागें वळून पाहिलें. माझ्या हातांत चहाचा कप पाहून त्याना आश्चर्य वाटलें—

"अ? चहा?—चहाची मला तशी कांहीं जरूरी नव्हती!—" माझ्याकडे स्थिरशा नजरेने पहात आणि बाजूच्या खुर्चीकडे वळत पंडित म्हणाले. त्याच्या शेजारच्या छोट्या टेबलावर कपबशी ठेवीत मीं म्हटलें—

"आप्पाचा या वेळीं चहा होतोच. रोजच्याचप्रमाणें झाला आहे. मुद्दाम कांहीं केला नाहीं.— वसंत बाहेर गेला वाटतें?—"

"केव्हांच!" चहाचा कप उचलीत म्हटलें पंडितांनीं.

आता मी तिथें उभें रहायच का, नि बोलायचं काय? मोठी पचाईत पडली मला. पण पंडितानींच माझ्याशीं बोलायला सुरुवात केली—आईच्या चित्राकडे पुन्हा पहात त्यानीं विचारलं— "हे तैलचित्र तुमच्या आईचं का?—"

मीं मानेनेच 'होय' म्हटलें.

"हं! तरी मला वाटलंच!"

"काय वाटलं?" पंडिताच्या उद्गाराचा अर्थ मीं कुतूहलाने लगेच त्याना विचारला. कसें विचारावे ही शकादेखील त्यावेळीं मला शिवली नाहीं. त्यांनींही पण तितक्याच सरळ व स्पष्टपणानें आपल्या त्या उद्गाराचा खुलासा केला.

"सच्छीलतेच्या आणि पावित्र्याच्या श्रेष्ठ सौंदर्याचें मूर्तिमत तेज तुमच्या आईच्या तोंडावर चमकत आहे. अशाच माउलीच्या पोटीं जन्म घेणारीं रत्नं तशींच तेजस्वी का असणार नाहींत?"

वसंतानें जेवणावर माझ्याबद्दल सागितलें होतें, त्यालाच उद्देशून पंडित हें बोललें तें मला समजलं. आईचं वर्णन झालं म्हणून मला जितका आनंद झाला, तितकीच माझ्याबद्दलच्या गौरवाच्या उल्लेखानें मी लाजलें. पण आईच्या गौरवपर उद्गारानें, अशी आई आपल्याला लहानपणींच सोडून गेली, तिच्या प्रेमाचा आसरा आपल्याला लाभला नाहीं, हें ध्यानांत येऊन मला वाईट वाटलं. माझ्या डोळ्यांत चटकन् पाणी उभं राहिलं! पंडितांच्या तें लक्षांत आल्याशिवाय राहिलें नाहीं.

त्यांनाही चमत्कारिक वाटलें असावें. मी डोळयातील पाणी लपविण्याचा प्रयत्न तेवढ्यांत केला. त्यानींही चट्दिशी विषय बदलला.

आप्पाच्या विशाल व मोलवान् ग्रंथसंग्रहाचा सादर उल्लेख करून ते म्हणाले, " आप्पासाहेब असते, तर त्यांच्या या सुदर ग्रंथसंग्रहांतील बरींच पुस्तकें पाहतां आलीं असतीं. पण ते आल्याशिवाय आपल्याला शक्य नाहीं पहाणें "

" का ? हवीं असतील तर मी दाखवूं शकेन. माझ्याजवळ कपाटाच्या किल्ल्या आहेत. कोणती हवीं आहेत पुस्तकें पहायला ? " मीं विचारलें व म्हटलें, " इथलीं पुस्तकं इथंच वाचणारास द्यायला आप्पांनीं मला एकदांच सांगून ठेवलं आहे. "

" होय ! मग फार उत्तम होईल. इथं आल्यासारखं मोठंच काम होईल माझं ! "

" कोणतीं हवीं आहेत पुस्तकं ? " मीं विचारलें.

पंडितानीं पुस्तकाचीं नावे सांगितलीं. आंतून किल्ल्या आणून मी त्यांना हवीं होतीं तीं पुस्तकें चट्दिशीं काढूनही दिलीं.

" तुम्हीं वाचलीं आहेत हीं पुस्तकं ? " हें पाडितानीं विचारताना मी हंसलें. त्यावर तेच लगेच म्हणाले—" बाकी हें विचारणंच चूक आहे म्हणा ! आप्पासाहेब वाचून घेतल्याशिवाय स्वस्थच राहाणें शक्य नाहीं—आणि तुम्हीं वाचल्याशिवायही राहणार नाहीं हें तितकेंच खरें आहे ! "

मी काहीं बोललें नाहीं; पण अचूक ओळखल्याबद्दल मला पंडितांबद्दल मोठी मौज वाटली !

" आप्पासाहेब उद्यां येईपर्यंत आतां आपला वेळ मोठा मजेंत जाईल ! " मीं दिलेल्या पुस्तकांपैकीं एक पुस्तक हातीं घेत पंडित म्हणाले. त्यांना पुस्तक उघडून केव्हां वाचूं असें जणूं झालें होतें असेंच मला वाटलें!

पंडितांना आप्पांच्याप्रमाणेंच पुस्तकांचा हव्यास आहे हें पाहून मला सकौतुक आनंद वाटला ! त्यांनीं पुस्तक उघडलें—तशी मी तिथून निघालें.

वसंत एकदां जो बाहेर गेला तो संध्याकाळच्या जेवणाच्या वेळीं उगवला. घरीं अपरिचित पंडित एकटे आहेत, हें ध्यानात देखील राहिलें नव्हतें त्याच्या. बाहेर वाचनांत गढलेल्या पंडितांना त्यानें पाहिलें आणि आत माझ्याजवळ "आमच्या आप्पांच्या सारखा पंडितरावही पुस्तकांतला किडाच दिसतो आहे!" अशी त्याच्यावर टीकाच केली.

रात्रींच्या जेवणावर वसंत त्यांच्याशीं दुपारप्रमाणेंच सिनेमाबद्दल, नाटकाबद्दल, नटनटीबद्दलच बोलत सुटला. त्याबरोबर कुलिन स्त्रियांनीं नाटक–सिनेमांत कामे करावीत कीं नाहींत, यावरील त्यांनीं न विचारतांच आपलें अनुकूल मत देऊन त्यानाही त्यांचें मत विचारूं लागला.

त्यातून रात्रीं सिनेमाला जाण्याचा विषय निघाला. मला त्यानें आग्रह चालविला. घरीं पंडिताना एकटें ठेवून आपण कसें सिनेमाला जाणार हा प्रश्न मला आला पण वसंताच्या डोक्यांत काहींच आलें नाहीं. मी त्याला पर्यायानें सुचविलें. तेव्हा त्यानें पंडितानाही "काय पंडितराव, तुम्हीं येणार का सिनेमाला?" असें सहज सलगीनें विचारलें.

त्यानीं थोडा वेळ उत्तर दिलें नाहीं. पण आपण होय म्हटलें नाहीं, तर आम्हा बहिण–भावांना जाता येणार नाहीं– अशी समजूत होऊन, आपल्यामुळें दुसऱ्यांची कुचंबणा होऊं नये म्हणून त्यांनीं "हो, त्याला काय हरकत आहे? मी सहसा नाटक सिनेमाला जात नाहीं–पण आज तुमच्या संगतीं जायला हरकत नाहीं." असा होकार भरला.

आप्पा घरीं नसतांना–त्रयस्थ नवखा तरुण बरोबर असतांना आपण सिनेमाला कसें जावें? हें मनांत आलेंच माझ्या, पण वसंत बरोबर आहे, तेव्हां जायला काय हरकत आहे? असा निकाल दुसऱ्या मनानें दिला. मी वसंताला "जाऊंया" म्हटलें.

जेवणीं होऊन कामें उरकलीं. वसंत आणि पंडितराव यांच्याकरितां अंथरुणें घातलीं. भरलेला पाण्याचा तांब्या, दिवा उशाशीं ठेवून दिला. अन् आम्ही तिघेही सिनेमाला निघालों.

आपलें पंडितांनीं ऐकलें. आपल्याला मान दिला, असें वाटून वसंताला फारच अभिमान वाटला, तो त्यांच्याशीं जिगर दोस्ताप्रमाणें

बोलूं लागला. अन् गंमत ही कीं पंडितही त्याच्याबरोबर ऐसपैस बोलूं लागले.

त्या दिवशीं " माया " बोलपट होता.

आम्हीं तिघे ओळीनें एकत्र बसलों होतों. मी, माझ्याजवळ वसंत आणि त्याच्याजवळ पंडित. आम्हीं गेलों तेव्हां जाहिराती दाखविल्या जात होत्या. तिकिटें काढावयाच्या वेळीं चलाखी करून पंडित पुढे झाले; पण वसंतानें त्यांना आपला त्या सृष्टींतील मोठेपणा प्रत्ययाला आणून देण्याची संधि दवडली नाहीं! " अ हं पंडितराव, त्या भानगडींत नका पडूं. थिएटरचे मालक माझे दोस्त आहेत. आपण त्यांचे सन्मान्य पाहुणे आहोंत. चला मुकाट्यानें माझ्याबरोबर ! " असें म्हणत आपल्या मागून आम्हास येण्यास सांगितलें.

पंडित वसंताकडे साश्चर्य पाहूं लागल्याचें मीं पाहिलें.

" माया " बोलपट पहात असता मी त्यांत अगदीं रंगून गेलें होतें. अगदीं सुरवातीपासूनच माझें मन आकर्षिलें गेलें.

" मधली विश्रांति " झाली. अंधेरातून आम्हीं उजेडात आलों. मी पाहिलें, पंडिताची दृष्टि पडद्यावर खिळून अजूनही राहिली होती ! वसंत मात्र सिगारेट ओढीत आपल्याच ऐटींत होता !

मी उगीचच इकडे तिकडे पहात होतें. इतक्यात माझ्या समोरील—बऱ्याच पुढच्या रांगेत माझ्याप्रमाणेंच इकडे तिकडे—मागें वळून पहात असलेली सुलभा पाटणकर—मला दिसली ! मला पाहून ती हंसली. मीही तिला पाहून हसलें. ती मानेनें मला आपल्याजवळ बसायला बोलवणार—तोंच तिचें लक्ष वसंताकडे—आणि पंडिताकडे गेलें वाटतें. तिची दृष्टि वळतांच, त्या अनुरोधानें माझीही दृष्टि वळली. वसंत पंडितांशीं बोलत होता, पण त्याची दृष्टि सुलभेकडे होती. वसंताकडे पंडितांचें तोंड होतें.

मीं पुन्हां लगेच सुलभेकडे पाहिलें. तिची मुद्रा तिरस्कारयुक्त झालेली, माझ्याकडून मान वळवून समोर पाहूं लागत असलेली मला दिसली. इतकेंच नाहीं तर एक दोन मिनिटांत सुलभा तिथून उठली. तिच्याबरोबर एक दोन " भाई " लोकांप्रमाणें

पोषाख असलेले तरुण–मला वाटतें, तिच्याच सांकेतिक सूचने-वरून–उठले व त्यांच्यासह ती थिएटरच्या बाहेरच पडली ! मला तिच्या या वागण्याचें मोठें नवल वाटलें. पण कारण कांहींच समजलें नाहीं. सुलभा तशीच विचित्र आहे हें मनांत आलें नि स्वस्थ बसलें.

सिनेमा संपला. आम्ही जायला उठलों. त्यावेळीं सुलभा मला दिसली नाहींच. त्यावेळीं गेली ती गेलीच !

घरीं परत येत असता वसतानें विचारलें " कसा आहे बोलपट ?"

" सुंदर आहे !" माझ्या आणि पंडिताच्या तोंडून एकदम सार-खाच उद्गार निघाला !

एकाच शब्दाच्या उद्गारांची मला मोठी गंमत वाटली !

" बोलपटाची कल्पना श्रेष्ठ अभिरुचीची आहे !" पंडित आणखी म्हणाले.

" कथानकही पण तितकंच चागलं आहे !" माझें मत मीं सांगितलें.

" वसंतराव, आपल्याला काय वाटतें, सागाल काय ?" पंडितांनीं वसंताला विचारलं. त्यांच्या विचारण्याचा रोख मध्यवर्ती कल्पनेबद्दल व कथारचनेबद्दल असावा अशी माझी कल्पना झाली. पण वसंतानें नट–नटींच्या कामाबद्दल, दिग्दर्शकाच्या शहाणपणाबद्दल, आणि छाया–चित्रणाच्या चांगुलपणाबद्दलच सांगायला सुरवात केली. पण पंडित त्याला 'हु' कार देत असले, तरी आपला प्रश्न वसंतानें ओळखला नाहीं, असें त्याच्या हुंकाराच्या स्वरावरून मीं ओळखलें.

मला त्यावेळीं मनांत वाटलें, वसंतापेक्षा पंडितांनीं मला कथानका-बद्दल विचारलें असतें, तर मी तें मुळाबरहुकूम त्यांच्यापुढें जसेंचें तसें शब्दचित्र मांडिलें असतें ! वसंतानें " माया " चित्रावरून एकदम उडी मारली आणि सुलभेकडेच तो वळला.

" चारुताई, तुझी सुलभा आली होती " माया " पाहायला ! पाहिलीस का ?–पण ती इंटरव्हलनंतर उठूनच गेली !" वसंत न थांबतां बोलूं लागला; " बाकी बरोबर आहे, उद्यां, ×××× शिक्षण संस्थेच्या इमारतफंडाकरिता धर्मार्थ नाट्यप्रयोग आहे, त्यांत मुख्य नायिकेचं काम आहे ना सुलभेचं. मग ती जाग्रण कशी करणार ? म्हणून लवकर

गेली असावी. पण तुझ्याकडे कशी आली नाहीं ? बोलल्याशिवाय कशी गेली ? कां नाट्यप्रयोगांत ती काम करणार म्हणून तुझा तिचा मतविरोध होऊन दोघींत सध्यां वितुष्टच आलें आहे ? पण तिनें नाटकांत काम केलं म्हणून बिघडलें कुठें ? वास्तवीक म्हणजे त्या धर्मार्थ नाट्यप्रयोगात तूंसुद्धा भाग घ्यायला हवा होतास ! पण आमच्या आप्पांना तें आवडत नाहीं आणि तुलाही तें नको आहे !–पण म्हणून तिच्याशीं वितुष्ट करण्यांत अर्थ काय आहे ?–"

वसंतानें हें बोलूं नये असें मला वाटत होतें. पण काय करणार मी ? मला त्याला थांबविताही येईना. पडिताना त्या विषयाशीं कांहींच कर्तव्य नव्हते–ते मुकाट्यानें चालत होते.

नंतर " उद्याच्या धर्मार्थ प्रयोगाला आपण जाऊ या ! पंडितराव तुम्हीं उद्या आहातच ! तुम्हीं पण जरूर प्रयोग पहा. सुलभा काय झकास काम करते म्हणतां ? " हे बोललाच वसंत.

पडिताना तो विषय मुळींच आवडला नसावा, हे त्याच्या धड नाहीं होय निश्चित उत्तर न देण्याच्या तऱ्हेवरून व त्या वेळच्या त्याच्या उच्चारावरून मला वाटलें. पण तें तितकेंच.

"मायेनें ' माझ्या मनावर चागलाच परिणाम केला होता. ' माया ' मला आवडली. तिच्या मनाची आणि माझ्या मनाची ठेवण पुष्कळशी सारखीच आहे, असें मला वाटून बरे वाटले. अन् नायक–पडित–यांच्यांत काय साम्य आहे ? हा प्रश्न मनात आला अन् त्या वेळींही मनात चमत्कारिक–मजेदार कल्पना येऊन सर्वांग थरारलें.

त्याच विचारात आम्ही घरीं आलों.

सकाळीं पांच वाजता नित्याप्रमाणें उठलें–पहाटे आप्पांना चहा करून द्यायचा. मींही घेई. तशीच उठलें. चहा केला. तीन कप केला. पंडितांना द्यावा काय ! प्रश्न पडला, बाहेर जाऊन ते उठले आहेत का हें पहावें म्हणून गेलें. तों काय ! ते उगाच दिवा मोठा करून वाचनांत तद्रूप झाले आहेत हें मला दिसलें ! अगदीं आप्पांचीच तऱ्हा ! मी चहा त्यांच्यापुढें नेऊन ठेवला. वसंत झोंपलाच होता अजून त्यालाही चहाला उठवलें.

चहा आणलेला पाहून पंडितानीं किती साश्चर्य माझ्याकडे पाहिलें !

" अं !–या वेळीं–इतक्या लवकर चहा ?–हें काय चारुताई ?–" पंडितानीं प्रश्न केले.

" आप्पा रोज या वेळीं चहा घेतात. त्याप्रमाणें मीं केला ! " मीं म्हटलें.

त्याना मनापासून आनंद झाला ! त्यांनीं मुकाट्यानें चहा घेतला. वसंत उठला ! पण चहा घेऊन पुन्हा निजला तो !

उजाडलें. मी नित्यकृत्याला लागले.

दहा वाजतां तारेचा शिपाई पंडिताच्या नांवाची तार घेऊन आला. त्यानीं तार घेऊन वाचली.

मी आग धुवून स्वयंपाकाला लागत होतें. तों ' प्रवासी ' पोषाक चढविलेले पंडित आंत आले.

" चारुताई, आतांच महत्वाची तार आली आहे मला. आत्ताच्या आत्ताच जायला पाहिजे ! येतो मी. आप्पासाहेब आज संध्याकाळी येणार, त्यांची माझी भेट झाली असती म्हणजे बरं झालं असतं. नंतर कदाचित् मी चारदोन दिवस राहिलों असतों. मी त्याच हेतूनें आलों होतों. पण आतां इलाज नाहीं. आप्पासाहेब आले म्हणजे सांगा त्यांना. मी त्यांच्या टेबलावर पत्र लिहून ठेवलंच आहे त्याना ! वसंतराव बाहेर गेले आहेत. त्यांचा निरोप घेतां आला असता तर आनंद झाला असता ! ' आज रात्रींच्या धर्मार्थ खेळाला त्याच्याबरोबर जाणें अशक्य झालें, त्याबद्दल त्यांना वाईट वाटेल, पण काय करणार ?–असो, तुम्हीं आपुलकीनें आणि निःसंकोच मनानें, ओळखदेख नसतां, अगदीं घरच्याप्रमाणें वागविलेंत; याबद्दल मी अत्यंत ऋणी आहें तुमचा ! माझे धन्यवाद आहेत तुम्हांला ! मी हें विसरणारच नाहीं कधी ! तुम्हीं पण आठवण ठेवा—बरं; येतों आतां !—"

असें म्हणून माझा निरोप घेऊन पंडित निघालेच. मी आपली त्यांच्याकडे चकित होऊन पाहूंच लागलें !

पंडित माझ्यापुढून केव्हाच निघून गेले होते ! मी जागची उठलें नाहीं. जागची उठण्याचें भानच मला राहिलें नाहीं. नाहीं उठलें त्यांतही

कांहीं वावगें झालें नाहीं म्हणा. मी का पुरुष होतें, का माझं पंडितांचें तसें कांहीं नातें होते, म्हणून त्याना पोंचवायला दारापर्यंत जायला हवं होतं ?

—पण पंडित आले काय काल आणि आज सकाळीं गेले काय !

—पण ते गेले. जातांना माझ्याशीं बोलून, मला सांगून, मला धन्यवाद देऊन गेले.

—मी स्वयंपाकाला लागलें. स्वयंपाकात माझें चित्त लागलें. नित्य संवयीप्रमाणें गाण्याची गुणगुण माझी सुरू झाली ! अन् काय आश्चर्य !—मला कुणी सुचवलं गुणगुणायला कोण जाणे ! मी आपली—

आलांत ते कशाला ? जाता तरी कशाला ?

केलांत मूक हल्ला ! बळकाविलांत किल्ला !!

याच ओळी गुणगुणूं लागलें ! पंडितांच्या येण्याजाण्याशीं गाण्यातील ओळींच्या अर्थाचा कांहीं संबंध होता काय ?—काय सांगणार मी ?

———

## प्रकरण तिसरें

# सुंदर स्वप्न !

एकाद्या विख्यात नाटक मंडळीनें, प्रख्यात कुशल नाटककाराच्या बसविलेल्या सुंदर नाटकाचा प्रथम प्रयोग असावा. थिएटरमध्यें प्रेक्षकांची चिकार गर्दी झालेली असावी. नाट्यप्रयोगाला सुरुवात व्हावयाला अगदीं थोडा अवधी असावा. दिव्याचा दिव्य आल्हाददायक प्रकाश पडलेला आहे, प्रेक्षकांची दरक्षणीं प्रयोगदर्शनार्ची उत्कंठा वाढते आहे, त्याचा संमिश्र कलरव ऐकावयाला येत आहे; पडद्यातूनच, मधुरवाद्याच्या वादना-बरोबर—मंगलाचरणाचा कर्ण—मनोहर, घणघण घंटेच्या सुरुवातींतूनच सुस्वर ऐकावयाला येऊन आपल्या कानाला, आणि पडद्याआडून रंगभूमीची पूजा करताना जाळलेल्या उदाचा मधु—गंध नाकाला विलक्षण प्रसन्नता आणून सुरुवात होणाऱ्या नाटकाकडे, कान, मन आणि चित्त, हीं एकसमयावच्छेदेंकरून आकर्षिलीं जात आहेत. रंगभूमीवरील भावी नाटकांत काय—काय आणि कसल्या कसल्या सुखद चमत्काराचीं दृश्यें आपल्याला दिसणार, याची यत्किंचित्‌ही पूर्व कल्पना नसूनही कांहींतरी भव्य, सुंदर, सुखदायक आपल्याला पहावयाला मिळणार असा मनाला विश्वास वाटत असल्यामुळें कान आणि डोळे समोरच्या पडद्याकडे लागले आहेत—

अशा वेळची हळुवार अंतःकरणाच्या-पूर्वी कधीं नाटक न पाहिलेल्या प्रेक्षकाच्या अंतःकरणाची अवस्था कशी असेल ?

पंडित काल आले. आज गेले. तेवढ्यात केव्हा काय आणि कसें झालें, हें कळेना. पण माझ्या आयुष्यांतल्या नाटकाचें मंगलाचरण सुरू झालें आहे, असेंच मला वाटूं लागलें ! प्रेक्षक मीच. रंगभूमीच्या पडद्या-आड मीच उभी आहे, अंतःकरणात प्रकाशच प्रकाश पडला आहे,

वाद्यांचे मधुर आवाज कानावर येत आहेत. आंवतीभंवती कोणी नसतांना देखील गोड कलरव त्यांत कुठूनसा मिसळतो आहे; आणि सावध आहे कीं बेसावध आहे, हे माझें मलाच समजत नाहीं. आपल्यातच दंग झालें आहे–माझ्याच हृदयात मंगलाचरणाचे सुस्वर आलाप चालू झाले आहेत, असा मला प्रतिक्षणीं भास होत आहे!

मी स्वयंपाक करीत होते. गाण्याची गुणगुण चाललीच होती. सुंद्रा आली. आप्पा आले का म्हणून चौकशी करून गेली. मी तिला काय सांगितलं कोण जाणे! दूधवाली आली. 'दूध घ्या ताई!' म्हणून कितीदा तरी म्हणाली. पण जेव्हा तिनें–"कुठे गेलं हाय हो तुमचं चित्त! दुधाला भाड घ्या म्हणतें तर तुम्हीं ऐकतच नाहीं," असे म्हणाली, तेव्हा मी भानावर आले!

वसंत आला. त्यानें पंडिताबद्दल–ते बाहेर दिसले नाहींत, म्हणून चौकशी केली. ते तातडीने गावाला निघून गेले हें मी वसंताला सांगितलें, पण कसे आणि कशा स्वरात कुणास ठाऊक!

"बावळट लेकाचा आला काय आणि गेला काय? मला तर लफंग्याच दिसतो! आप्पाना भेटावयाला आला होता ना? आजचा धर्मार्थ खेळ पहावयाला रहाणार होता ना? सुलभेचें सुंदर अभिनय कौशल्याचें, बहारीचें काम पहायला न रहाणारा बेटा शंभर टक्के अरसिकच म्हटला पाहिजे!" वसंत त्यांच्याबद्दल असें वाटेल तें बडबडूं लागला. मला वसंताचा राग आला. पण माझी मनःस्थिति त्याच्या लक्षात आली नाहीं, याचा मला आनंदही झाला!

जिकडे पाहीन तिकडे पंडिताच्या मूर्तीच मूर्ती दिसूं लागल्या. सभोंवारची वस्तून् वस्तू पंडिताचेच रूप धारण करूं लागली होती!– वाटलं अजून ते आप्पाच्या बैठकींत पुस्तक वाचीत बसले आहेत. "माया" पहावयाला आम्हीं बसलों आहोंत. परत त्याचबद्दल बोलत येत आहोंत–

मी अगदीं खुळी–वेडी झालें का?–पंडितानी येऊन काय केलें?

'**सुजन कसा मन चोरी?**–' हेंच मी कांहीं तरी गुणगुणूं लागलें. तेंसुद्धां किती मोठ्यानें? वसंतानें तें ऐकलें.

स्नान करीत असलेल्या वसंतानें तें ऐकलें. तेथूनच तो मोठ्यानें

ोरडला ! " वाः ताईसाहेब ! वाः ! "

अन् त्या सरशीं मी काय दचकलें ! लाजलें ! गप्प बसलें ! वाटलं, संतानं माझं मन ओळखलं !

वसंत पाटावर येऊन बसत म्हणाला, " ताई, तूं अगदीं भागुबाई आहेस पहा ! "

" काय झालं रे ? " मीं स्वतःला सावरीत त्याला विचारलें.

" तूं घरात वाटेल तेवढें, वाटेल त्या नाटकातले, हवे तें पद ह्मणशील. पण सुलभेसारखे रंगभूमीवर काम करायला तुला धाडस ह्यायच नाहीं ! म्हणूनच म्हटलं तूं भागूबाई आहेस ! स्वयपाकघरांत, चूल फुंकीत नाटकातले पद बाल–गंधर्वापेक्षा चांगलं म्हटलंस, तरी त्याचा लोकाना काय उपयोग ? "

वसंताच्या या बोलण्यानें मला किती हायसें झालें ! किती बरं वाटलं ! माझ्या मनात शिरलेल्या सज्जन चोराला वसंतानें अचूक पकडलें नाहीं, या कल्पनेचा केवढा आनंद झाला मला त्या वेळीं !

वसंतानें काहीं विचारल तरी त्याला उत्तर द्यायला मला आतां धीर आला.

" सुलभेबरोबर काम करायला तूं तयार का झाली नाहींस ?–" वसंत विचारता झाला.

" तयार झालें असतें तर काय झालें असतें ?–" मीं उलट प्रश्न केला.

" काय झालं असतं ? पुष्कळ पुष्कळ झालं असतं ! हं: ! काय झालं असतं म्हणे !–"

वसंत मला वेडावीत म्हणाला, " सुलभे इतके तुझ्यांत नाट्यगुण –संगीतज्ञान आहे हें जगाला कळलं असतं ! जगानें तुझ्या आंगच्या कलेचं कौतुक केलं असतं ! कुलीन स्त्रियानीं कामें करण्याच्या योग्य प्रथेला आणखी जोर आला असता ! धर्मार्थ खेळाला थोडासा जास्त पैसा तुझ्या-मुळें मिळाला असतां आणि शिक्षण संस्थेच्या इमारत फंडाला साह्य केल्याचा मोठेपणा मिळाला असता तुला !–"

" अन् त्याबरोबरच आप्पांनीं कार्टी बहकली, उनाड झाली, बेचाळीस कुळया नरकात घातल्या, आपल्या तोंडाला काळं फासलं, अशा लाख शिव्या देऊन घराबाहेर घालवून दिलं असतं. हाही फायदा माझ्या पदरात पडला असता! नाहीं रे?" मी म्हणालें.

" म्हणूनच म्हणालों तूं भागूबाई आहेस म्हणून!" वसंत उद्गारला.

" मग काय मी पुरुष आहें? आहेच बाई मीं!" मी म्हटले.

" पण आप्पानीं परवानगी दिली असती, उत्तेजन दिलं असतं, तर सुलभेबरोबर काम केल असतंस का?" वसंतानें विचारलें.

" नाहीं?"

" का?"

" मलाच तें आवडत नाहीं म्हणून!"

" का पण!–"

" नाटक, सिनेमात काम करणं म्हणजे मोठं महत्त्वाचं शतकृत्य केलं असं होतं, असं मला मुळींच वाटत नाहीं!" मी स्वच्छ व स्पष्ट सांगितलं!

" पण तुझ्या मैत्रिणीला–सुलभेला तस वाटतं–आम्हां नवयुगांतल्या ताज्या तरुणांनाही तसं वाटतं–त्याला कांहींच अर्थ नाहीं का?–"

" नाहीं!–"

" कां?–"

" मी तुमच्यासारखी आचरट पुरुषही नाहीं–आणि सुलभा म्हणजे मी नाहीं!–"

" का नाहीं? याचा स्पष्ट जबाब दे!–तिच्याबद्दल नापसंती दाखवणं म्हणजे तिचा उघड उघड अपमान करणं होय!–जबाब दे!–"

" पण तुला का तिच्याबद्दल इतका राग आला?–"

" आपल्या मैत्रिणीच्या वागण्याला तूं नापसंती दाखवितेस? तुझ्या शंभर नंबरी सनातनी वृत्तीला शंभर हाय हाय!!"

" आपल्या बहिणीला रंगभूमीवर काम कर म्हणून उत्तेजन देणाऱ्या भकेल भावाला पण तितकेंच हाय हाय!!"

वसंत तावातावानें बोलत होता. मीही सहज बोलत होतें. पण शेवटीं तो चिडलाच! "आप्पा मला भकेल म्हणतात–उडाणटप्पू–उनाड निघाला म्हणतात म्हणून तूंही म्हणतेस? मी मुळींच असे धाकट्या बहिणीकडून अपमानाचे शब्द ऐकून घेणार नाहीं–" वसंत म्हणाला, आणि मीही पण त्याला सांगितलें, "नसेल ऐकायचं तर जा बाहेर!–"

"तुझ्यासारखीच्या नशीबीं नटी होऊन त्रिखंडांत कीर्ति मिळविण्याचं भाग्य आहे कुठें? तुम्हीं लग्नं करून घ्यावीतं. बावळट नवऱ्याबरोबर गुलगुल गोष्टी कराव्यात–चूल न् मूल यांतच जन्म काढावा. यापेक्षां तुम्हीं जन्माला येऊन जास्त काय करावें?" अशीच मन मानेल तशी बडबड करीत वसंत हातावर पाणी पडतांच कपडे घालीत घालीतच बाहेर पडला!

तो बाहेर गेल्यावर मला एकपरी बरेंच वाटलें! तो गेल्यावर मी जेवायला बसलें. जेवण झालं. कामं उरकलीं.

कांहीं तरी वाचण्याकरिता बाहेर आप्पाच्या बसायच्या जागेंत गेलें.

काल पंडितांना वाचण्याकरितां कपाटांतून काढून दिलेलीं पुस्तकें तशींच अस्ताव्यस्त पडलीं होतीं, कांहीं उघडी ठेवलीं होती, कांहींत खुणा घालून ठेवलेल्या होत्या. मी तीं एकत्र केलीं, जिथल्या तिथं कपाटांत ठेवून दिलीं.

आप्पाच्याकरितां पंडितांनीं जाताना चिठ्ठी लिहून ठेवली होती, ती दृष्टीस पडली. ती चट्कन् मी उचलून हातीं घेतली. अक्षर किती सुंदर होतं! जशी काय पाणीदार टप्पोरीं मोत्येंच! उघडून आप्पांना काय लिहिलें आहे, तें वाचावं असं भर्रदिशीं मनांत आलं. वाटलं उगीचच! आपल्याबद्दलच कांहींतरी मजकुर असेल. पुष्कळ सुंदर अक्षराच्या ओळी–मोत्यांच्या लडीच्या लडी पहायला मिळतील. पत्र उघडलंसुद्धा त्या भरांत. पण तितक्यांत आठवलं, आप्पाना दुसऱ्यांचीं–त्याचींसुद्धा–त्यांनीं स्वतः दाखविल्याशिवाय पत्रं कुणीं वाचलेलीं आवडत नाहींत. आपलीं पत्रं दुसऱ्यांनीं वाचायचीं नाहींत अशी त्यांची सगळ्यांना सक्त ताकीद आहे. मी पत्राची तशीच–न वाचतांच मोठ्या नाखुषीने घडी केली. कष्टानें तें आप्पा आल्यावरोबर त्यांना सहज दिसेल असें त्यांच्या टेबलावर ठेवून दिलें.

पण त्याकडे पहात तशीच किती वेळ तरी जागच्या जागीं खिळून उभी होतें! एक कसलें तरी वाचायला पुस्तक घेतलें आणि एका खुर्चीवर बसलें. वाचायला लागलें तर पंडितांच्या अनंत मूर्तींनीं माझ्या भोंवतीं गर्दी करायला सुरुवात केली. मग मी काय वाचणार? मुकाट्यानें पुस्तक मिटलें आणि स्वस्थ कुठें तरी पहात बसलें.

त्या मूर्ति मला आवडूं लागल्या. आनंद देऊं लागल्या. पण मी त्यांना आवडतें का? माझ्यामुळें त्यांना आनंद होतो का? हें मनांत यायला लागलं! मी त्यांना माझ्याभोंवती खुशाल गर्दी करूं देते, पण माझ्याबद्दल त्यांना काय वाटत असेल? माझ्या मनांत त्यांच्याबद्दल विचार येत आहेत तसे त्यांच्या मनांत माझ्याबद्दल येत असतील का? त्यांच्या मनांत मी शिरलें नसतें, मी त्यांना आवडलें नसते, तर त्यांनीं माझ्या भोंवतीं अशी कां गर्दी केली असती?

माझें पंडितांशीं लग्न होईल? माझे ते होतील? आप्पा त्यांना शोधून आणून मला त्यांच्या पदरात घालतील? ते माझा स्वीकार करतील? मला आप्पांनीं विचारलं तर, मला पंडितांशींच लग्न करायचें आहे, हें आप्पाना मी सांगूं शकेन? पंडित मला आवडले पण त्यांना मी आवडेन असें माझ्याजवळ काय आहे?

माझें मन एकसारखं भटकत सुटलं! मीं त्याला मोकाट सोडलं!

आप्पा मला विचारतील का? माझी संमति, पसंती विचारतील का? का त्यांच्या श्रीमंतीचा विचार करतील? युक्तायुक्तता पहातील का आपलाच हेका आणि अधिकार चालवतील? त्यांचें कुल, त्यांचें शील-पहातील?–पण खात्रीनं त्यांचं शील चांगलेंच आहे–एकच दिवस आपण त्याची चालचलणूक पाहिली नाहीं का? त्यांच्या तेवढ्या वागणुकींतच आपल्याला त्यांचं शील दिसलं नाहीं का?-शीलाला अयोग्य असें हुच्चपणाचं वर्तन काय होतें त्यांचें?–नाहीं तर पत्रिका पाहण्याचा अट्टहास करतील?–पण माझे आप्पा तशा विक्षिप्त विचारांचे नाहींतच मुळीं!—हो, पण पंडितांचें अगोदरच लग्न झालं असलं तर? तें कुठें आपल्याला माहित आहे?......

हा विचार आला नी मी अगदीं खट्टु झालें!

पण, मनाला जसं आवडतं तसेंच तें आहे, असं आशा सांगते! ती आशा त्याच वेळीं माझ्या अनुकूल विचाराला पुढें भरकटायला, मला साहाय्य करायला धावली! तिनें माझ्या कानांत हळूंच सांगितलें, "छे: ग! वेडी आहेस कां तूं? पंडिताचें लग्न होईल कुठलें! त्यांचें तुझ्याशींच लग्न व्हायचं आहे! तुलाच ते पहायला आले होते मुद्दाम! तुलाच त्यांनीं पसंत केली असून तुझेच ते व्हायचे आहेत!—तूं त्यांना मनांतून हांकून देऊं नकोस. चालूं देत तुझे त्याच्याबद्दलचे विचार!

पुन्हां माझें मन पंडिताच्या मागें धांवायला लागलें कीं!

पुरुषच प्रेमाचा शोध लावीत स्त्रियांच्या मागे लागत असतात म्हणतात–ते फाजील असतात–म्हणे; म्हणे कशाला? इतके दिवस मीच म्हणत नव्हतें का?–माझा विनयभंग करूं पाहणाऱ्याचें माझ्याजवळ प्रेमाचा शोध करूं पाहणाऱ्याचे मीच नव्हतें का भररस्त्यावर श्रीमुख रंगवून काढलें होतें?–तीच मी पंडितांच्या मागें प्रेमाचा मागोवा घेत निघालें होतें मग स्त्रिया प्रेमासाठीं पुरुषाच्या मागें–मनोमन का होईना–धावतातच कीं!–असें त्यांच्या मागें धावायला मी त्यांचें काय पाहिलें होतें? गरीबी–श्रीमंती, सत्ता–अधिकार? समाजांतला मोठेपणा का शहाणपणाच्या पदव्या? प्रेम हें काहीं पहातच नाहीं. ज्यावर प्रेम जडतें, त्याला ते असलं तरी हवंच असतं पण नसलं तरी नडत नाहीं! पण समाज, रूढी अगोदर तेवढेच पहातो! प्रेम मुळीं पहातच नाहीं!

आप्पा समाजाला, प्रचलित रूढीलाच चिकटून आपला घात करतील का? अडाणी सुंद्रा नुसता पदर पाहून, सोयऱ्याचा उपयोग आपल्या प्रपंचाला पाहून आपल्या सरशीला कुणाच्याही पदरीं टाकायला तयार झाली तसेच आप्पा तयार होतील? पण आप्पांच्याबद्दल–त्यानीं मला ज्या प्रेमानें वागविली आहे, माझ्याशीं जसे वागत आले आहेत, त्यावरून कालत्रयी अडाणी सुंद्राच्या चालीनें ते मुळींच चालणार नाहींत, असें माझें मन मला ग्वाही देऊं लागलें.

जाऊं काय, पंडितांशीं लग्न करून द्यायला आप्पा अनुकूलच नव्हे तर उत्सुकच आहेत, असें गृहित धरून माझ्या मनाला मी आणखी स्वैर विचार करायला संपूर्ण परवानगी दिली!

मी ज्या जागीं बसलें होतें, त्याच्या मागेंच माझ्या आईची प्रतिमा होती. त्या प्रतिमेला घातलेल्या हाराचें टोंक बरोबर माझ्या माथ्यावर लोंबत होतें: जणुं काय आईच्या शुभाशीर्वादाचा हातच माझ्या मस्तकीं त्यावेळीं होता !

माझ्यासमोरच्या भिंतीवर आप्पानीं मोठ्या आवडीनें एक नितांत रमणीय असें रंगीत निसर्गाच्या देखाव्याचे मोठें चित्र काढविलें होतें ! दोन बाजूंला विशाल पर्वतांचे कडे, त्यांमधून उड्या मारीत, वळसे वेलांट्या घेत स्वैर गतीनें मजेमजेंत सरिता वहात होती ! तिच्या कडेकडेनें किती तरी प्रकारचीं हिरवींगार झाडें ऐटीनें वहात्या पाण्यांत आपल्या हालत्या, धावत्या प्रतिबिंबाकडे पहात दंग झालीं होतीं. मावळत्या सूर्याची आरक्त किरणरेषा नदीच्या पाण्यात चंचल रीतीनें किती तरी लांबच लांब उमटलेली मनाला वेड लावींत होती.

त्या समोरच्या चित्राकडे माझी दृष्टि वळली ! तिथेंच स्थिर झाली. पहातां पहातां तें चित्र नसून प्रत्यक्षच तें सृष्टिसुंदरीचें विलासस्थान आहे, आप्पांनीं माझ्या आग्रहावरून पंडितांना पुन्हां आपल्याकडे बोलावलें आहे, त्यांचा माझा परिचय करून त्यांनींच दिल्यानंतर आम्हीं रोज त्या सुरम्य-स्थानाकडे फिरावयाला जाऊं लागलों, त्या प्रमाणें आज-आतां-यावेळींही गेलों आहोंत. पर्वताच्या एका उंच टोंकाला-जिथून सभोंवतालचा सर्व भाग-खालीं वहाणारी नदीसुद्धां पहावयाला सापडेल-अशा ठिकाणीं मी व पंडित, एकमेकांचीं हृदयें एकमेकांना, मनानें, वाचेनें, शब्दांनीं खुलीं करण्याच्या उद्देशानें बसलो आहोंत ! मनें निरामय झालीं आहेत. मी अगदीं घायकुतीला आलें आहे. अस्पष्ट, लाजऱ्या शब्दांनीं मी माझं हृदय उघडं केलं आहे. पण पंडित मिस्कीलपणानें अजून आपल्या हृदयाचा ठाव मला लागूं देत नाहीत. ते गंभीर झाले कीं मी हंसत आहे. मी गंभीर झालें, चिडलें, रागावलें कीं पंडित माझी कुचेष्टा करीत आहेत-

मीच मला त्या स्थितींत स्पष्ट स्पष्ट पहात होतें. माझेंच बोलणें मला ऐकायला येत होतें !

पंडित माझ्याशीं बोलत होते. तें मला समजत होतें !

आमच्या संभाषणाला कुठून आणि कशी सुरुवात झाली आणि त्याला विषयांतराचे फाटे किती आणि कसे फुटत गेले याची दाद कुणाला होती ? पण इतकें खरें कीं पहिल्यादा आमच्यातील चाललेलं बोलणं आम्हां दोघांनाही मोठं सुखदायी असंच होतं. एकमेकाच्याबद्दल एकमेकाना आदर–प्रेम–प्रीति ही जास्त जास्तच वाढविण्याकरितांच खटाटोप होता आम्हां दोघाचाही ! पण मग काय झालं कुणास ठाऊक ? पंडितानीं आपला मोहरा बदलला. त्यानीं आपल्या ठिकाणच्या एकापेक्षां एक काळ्याकुट्ट, दुष्ट, भयंकर अशा दोष–दुर्गुणाचा पाढा वाचायलाच प्रारंभ केला ! एक दुर्गुण दुसऱ्या दुर्गुणापुढें काहींच नाहीं, अशा रीतीनेंच त्यांचें बोलणें होतें. पहिल्यादा मला वाटलें, हें सहज थट्टेनेंच चाललें आहे. म्हणून मी हसण्यावर नेऊं लागलें. पण पाहिलें तर पंडिताचा चेहरा सागताना चागलाच गंभीर होता. खरे–खरें, मनापासून–मनांतलेंच ते सागत होते !

अन् मग मला तें ऐकवेनासुद्धा ! कानात बोटें घालून बसावेंसें वाटूं लागलें. आंग थरारलें माझें !

पंडिताचें–मी ज्याना रूप–गुणानीं देवपदाला चढवीत होतें, ते हे पंडित–त्यांचें अंतरंग इतकें हिडीस ?

पण काहीं केल्या माझा त्यांच्या त्या बोलावर विश्वासच बसेना !– मला मुद्दाम बनवून सागत आहेत, माझी परीक्षा पहात आहेत–सांगतात तें सारें खोटें आहे असंच माझं आंतलं मन मला त्यावेळींसुद्धां सागत होतें !

माझ्या मनाचा गोंधळ उडाला आहे हें पडितांनीं ओळखलें. अन् उडाला होता हें मी नाकबूलही करीत नाहीं.

" असा मी अंतरंगांत हिडीस दुर्गुणांनी भरलेला आहे समजलीस चारू ? " पंडितांनीं प्रश्न केला; "मग आतां साग, तुझ्या प्रेमाचा स्वीकार करून, तुझ्याशीं लग्न लावून जन्माची तूं दुःखी होशील असें मी कां आचरण करुं ?–"

" पण त्यासरशीं मला काय वाटलें कोण जाणें–मी उसळून म्हटलें–

" मग तसें दुर्गुण माझ्यांतहि नसतील, कशावरून ?–दोष दोषांत वजा करावेत. गुणा–गुणांची मिळवणी करावी म्हणजे झालें ! "

" मी चंचल स्वभावाचा आहे !–"

" बायकाही त्या चंचलपणाला पारख्या नसतात !—"

" बारान् बारा चोवीस तास बायकोच्या पदराआड तोंड लपवून बसण्यांत पुरुषार्थ मानणारा मी नाहीं !–"

" किती चागलं आहे हें !–' बायल्या ' हें उपहासाचें उपपद जग बहाल करणार नाहीं ! "

" मी शरीरानें नाजूक नाहीं–दिसायला देखणा नाहीं ! "

" बायकांच्या जन्माला गेला असतात तर ते दोष ठरले असते !–"

" संकटांना आमंत्रण देण्याचा माझा जातिस्वभाव आहे–"

" पुरुष म्हणविणाराना हें भूषणच नव्हे काय ? "

" मला बंगला नाहीं, मग दारात ' मोटार ' कुठली असणार बायकोला बसायला– ? "

" बंगला आणि मोटार यावर कां मी प्रेम करणार आहे ?–"

" स्वतःच्या अंगीकृत कार्यात यश मिळेपर्यंत मला माझ्या बायकोची आठवण होणार नाहीं–अशांत महिनेच्या महिने, वर्षेसुद्धां जाण्याचा संभव असणार !–"

" मग त्यांत बिघडलं कुठं ? हातांतलं काम अर्धवट टाकून आपल्या भोंवती पिंगा घालीत पतिने फिरलेंच पाहिजे, अशी इच्छा बाळगून त्याकरितां आकाशपाताळ करणारी ती आदर्श पत्नि कशी होईल? "

" पण माझं काम पाहून तूं मला असले प्रेम अर्पण करायला सज्ज आहेस ?–"

" माणसाची वैभवशाली परिस्थिति पाहुन कां प्रेम अर्पण होत असतं ?–"

" मी दारुबाज आहें ?–"

" असूं दे !–"

" बाहेरख्याली आहें–"

" चालेल–"

" पक्का रेसर आहे ! "

" कांहीं विशेष नाहीं–"

" जातपात लक्षांत घेणारा नाहीं !—"

" आजच्या कालांत तें अवश्यच आहे !—"

" माझ्या कोणत्याही आवडत्या व्यसनाच्या आड माझ्या बायकोनं आलेलं मला खपणार नाहीं !—"

" तें मग पाहूं !—"

" मित्र–मैत्री–परपुरुषाशीं सलगी–याचा मला तिटकारा आहे ! "

" असंच हवं !—"

पंडिताचा माझ्या उत्तरानीं कोंडमाराच झाला ! त्यांना आतां मला जास्त छेडतांच येईना ! माझा अंत किती पहाणार ते यापेक्षां ?

ते गप्प बसले !

विजयी मुद्रेनें मी त्यांच्याकडे उन्नत मस्तक करून पाहूं लागलें !

वादाकरितांच आमचं बोलणं होतें. प्रश्नोत्तरांत मी पंडितांनाही हार गेलें नाहीं ! कशी जाणार ? एका शुद्ध, सात्वीक आणि श्रेष्ठ प्रेमाच्या चिरंतन प्राप्तिकरितां स्त्रीजात कोणतेंही दिव्य करायला तयार होत असते, याची पुरुष जातिला सहज कशी कल्पना येणार ?

" माझ्या आणि तुझ्या सज्जनपणाचा फायदा घेऊन एकाद्यानें तुझ्या किंवा माझ्या मित्र म्हणविणाऱ्यानें तुझा अभिलाष धरला, तर तूं काय करशील ? — "

" आपण काय कराल हें अगोदर सांगा "

" मी तिथल्या तिथें त्याचा खून पाडीन !—"

" पुरुषांच्या ठिकाणची हीच वीरवृत्ति चालू काळांत मेली आहे, याचेंच मला वाईट वाटतं !—"

" पण तूं सांग ना काय करशील ?—"

" माझा ' विनयभंग ' करू पाहणाराला मी काय प्रायश्चित्त दिलं होतें—वसंतानें सांगितलें आहे ना ?—" तशीच त्याची पुनरावृत्ति होईल ! "

“ तो माझ्यापेक्षां देखणा शाहणा–तुला आवडला तरी ?–”

“ कुलकन्येला जन्मांत एकदांच–आणि एकावरच–खरं खुरं प्रेम करतां येत असतं म्हटलं ! ”

यावर पंडित अगदीं चूपचाप झाले ! काय बोलणार ? मी याही वेळीं त्यांच्यावर विजय मिळविला !

ते माझ्याकडे सादर दृष्टीनें पाहूं लागले क्षणभर !

मला वाटलं–काय वाटलं हें शब्दानीं, खऱ्याखुऱ्या शब्दानीं मला वर्णन करता येणं शक्य नाहीं–त्याच क्षणीं माझा हात आपल्या हातीं घेतील. ‘ प्रेमसत्तेनं या वेळेपासून माझी–मी तुझा ’ हेच उद्गार मला ऐकायला मिळणार ! मी धन्य होणार !

पण पंडितांनीं त्यानंतरसुद्धा कुत्र्याच्या वांकड्या शेपटीच्या न्यायाची गत केलीच !

स्वर्ग हातीं येणार ! आपल्या आयुष्याच्या नाटकाचा पहिला अंक गोडींत–प्रेममिलनात संपणार ?- असें वाटूं लागलें, तोंच पंडित म्हणतातच मला–

“ दैवयोग काय असेल तो खरा ! मला अजून निश्चित कांहींच सांगतां येत नाहीं ! ” आता मात्र मी सर्वस्वी निराश झालें ! मला भोंवळ आली. डोळ्यापुढें कांहींच दिसेना ! मी घट्ट डोळे मिटून घेतले !

दैवयोग ?–दैवयोगाची सर्वांना, सर्वकाळींच का गरज असते ?– माझा दैवयोग काय आहे ?

पण दैवयोग माझ्या बाजूचा होता. आम्हीं, कुठें, कसे, किती वेळ बोलत होतों, आमच्या भोंवतीं परिस्थिती काय होती, याकडे लक्ष होतं कुणाचं ? आकाशांत घनदाट मेघ जमले होते. अगदीं अंधारून आलें होतें. वीज चमकून काळ्या ढगाच्या हृदयावर सौम्य मजेदार नाच करीत होती. त्याच विजेनें याच वेळीं एकदम क्रुद्ध रूप धारण केलं ! ती अशी कडाक्यानें कडाडली–त्या बरोबर मी भ्यालें. घाबरलें नी एकदम पंडितांना जाऊन घट्ट मिठी घातली. त्यांनीं तितक्याच त्वरेनें आणि तत्परतेनें मला भीतिमुक्त करण्याकरितां कवटाळलें ! !

मी खडबडून भानावर आलें ! पाहिलें तों काय ? मी आप्पांच्या जागेंत समोरच्या Land-scape कडे पहात होतें—आणि आप्पा दारांत पाऊल टाकीत होते !

माझ्याकडे पहात हंसून आप्पा मला विचारीत होते—"चारु, इथेंच होतीस का ?—दारांत टांगा थांबलेला ऐकायला आला नाहीं तुला ? मी बाहेरूनच तुला चार दोनदा हांका मारल्या, त्या ऐकायला आल्या नाहींत तुला ?— इतकी कसल्या विचारांत गुंगली होतीस ?—"

मी आप्पांचे प्रश्न नुसती त्यांच्याकडे पहात ऐकत होतें—

माझें आतांपर्यंत तें सुंदर दिवास्वप्न होतें. त्यांतून पुरती भानावर कुठें मी आलें होतें ?—नाटकाचा अंक संपला कीं प्रवेश—मी स्वतःलाच प्रश्न केला !—

---

प्रकरण चवथें

# आप्पांचें नाटक!

" काय चारुताई, आम्हीं गावाहून दमून भागून आलों आहोंत–आम्हांला कांहीं चहापाणी देणार का ? "

प्रकासांतील कपडे उतरीत व एकेक खुंटाळ्यावर ठेवीत आप्पा मला म्हणाले. गांवाहून केव्हांही आप्पा आले म्हणजे मला मोठेपणा देऊन मोठ्या गोड शब्दांनीं मला सांगत तसेंच आतां त्यांनीं सांगितलें.

नेहमीं आप्पासाहेब अशा रीतीनें मला जेव्हां असें सांगत तेव्हां मला किती बरं वाटायचं! मला हंसू यायचं. आनंद व्हायचा! पण आज आप्पांनीं तशाच शब्दांनी सांगितलें तरी मला भारी चमत्कारिक वाटलें! आप्पांनीं सांगेपर्यंत मी स्वस्थच कशी राहिलें? अगोदरच मला चहा करायला जायचं कसें सुचलं नाहीं, याचीच मला ओशाळगत वाटून लाजल्यासारखं झालं!

अनुभवी आप्पांच्या चाणाक्ष–तीव्र दृष्टींतून कांहींसुद्धां जुनं–नवं सुटायचं नाहीं. ते काल गेले तेव्हांच्या आणि आज आले त्या वेळच्या माझ्यांत अंतरंगीं निराळेपणा आला होता. हृदयांतल्या फरकाचें प्रतिबिंब तोंडावर उमटायचेंच! तसें माझें झालें असेल. तें चट्कन् आप्पांच्या लक्षांत येईल अशी माझी मलाच उगीच भीति वाटली. मला त्यांच्या समोरून तोंड फिरवावेंसें वाटलें.

त्या विचाराच्या भरांत आप्पांना चहा करून द्यायला जायचें भानच मला राहिलें नाहीं. आप्पांचें अजून माझ्याकडे लक्षसुद्धां गेलें नव्हतें. ते आपल्याच विचारांत होते.

चहाची आठवण आप्पांनींच मला देऊन मला इष्टापत्तीच मिळवून दिली असें वाटून "हो, आत्तां इतक्यांत आणतें ना चहा!" असें कांहींसें आपल्याशींच पुटपुटत मी तिथून स्वयंपाकघराकडे सटकलें!

आमचे आप्पा-कोणत्या योग्य शब्दांनीं त्यांचें यथार्थ वर्णन करूं मी ?-आदर्श बाप, आदर्श नागरिक, जिवंत देशभक्त, आदर्श पुरुष-एवढं म्हटलं म्हणजे 'पुरे झालं, कळलं तुझ्या आप्पांचं वर्णन!' असें लोक म्हणतील मला. पण तरी देखील आप्पांच्याबद्दल मी भारताएवढं वर्णन करूनसुद्धां मला अपुरेंच वाटेल. मातेची माया आणि पित्याचें अत्युच्च कोटींतील वात्सल्य आप्पाच्या ठिकाणीं सर्वांशीं एकवटलें होतें; एवढें तरी सांगितल्याशिवाय मला चैन पडत नाहीं.

माझ्या लहानपणींच आई मला सोडून गेली होती. मला आतां ती नीटशी आठवणसुद्धा नाहीं; पण तिची उणीव आप्पांनींच भरून काढली होती.

माझं आणि वसंताचें आप्पांनीं एकाच मायेनें संगोपन केलं होतं. त्यांनीं आईवरील आत्यंतिक प्रेमामुळेंच ती गेल्यावर दुसरं लग्न केलं नाहीं असें म्हणण्यापेक्षा, सावत्र आई आम्हाला येईल, तिच्या राज्यांत आमचे हाल होतील म्हणूनच नव्या संसाराच्या व्यापांत आवर्जून पडले नाहींत, असेच म्हटलें तर तें खरें होईल.

वसंताच्या आणि माझ्या बाबतींत आप्पांनीं सारखीच काळजी घेतली, सारखीच आमच्यावर माया केली, सारखीच आम्हांला वागविण्यांत दक्षता ठेविली; तरी वसंत त्यांच्या मनासारखा निघाला नाहीं; पुढें निवळेल अशीही आशा त्यांना उरली नव्हती. माझ्याबद्दलचे त्यांचें मत अजून तरी चांगलें होतें. मुलीच्या जातीला-समज लवकर येतो. परिस्थितीचें ज्ञान मुलापेक्षां लवकर होतें, म्हणतात. माझं तसंच होतें. आप्पा माझ्याबद्दल बोलणं निघालं कुणाजवळ तर हेच उद्गारत. मलाही तसेंच वाटे. आप्पांचा स्वभाव सगळ्यापेक्षां-वसंतापेक्षां मला जास्त समजे. ते आपल्याला कसे वागवतात, त्यांच्या आपल्याविषयींच्या इच्छा अनिच्छा, महत्वाकांक्षा काय आहेत, आमच्याकडे, संसाराकडे आणि एकंदर जगाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि काय आहे, आपल्या परतंत्र देशाविषयीं त्यांच्या अंतःकरणांत

कोणती, कसली खळबळ चाललेली असते, आपल्या मुलांनीं कमींत कमी आणि जास्तींत जास्त उज्ज्वल असें कांहीं तरी श्रेष्ठ ध्येय ठेवून तें गांठण्याकरितां अहोरात्र धडपडलें पाहिजे, असें त्यांना कसें वाटे, हें मला किती तरी लवकर कळूं लागलं होतं. वसंत बरीक अगदींच निराळा निघाला.

आप्पांच्या एकंदर विचारांशीं मी फार लवकर समरस होई. त्याप्रमाणें माझ्या हातून वागण्याचे प्रयत्नही करी. असें वागताना मधून मधून माझ्या हातून चुकासुद्धां होतच साहजीक. पण आप्पा त्या सुधारण्याकरितां अशा कांहीं मायेच्या शब्दांनीं सांगत कीं, त्या चुकांची सुधारणा मी हौसेनें करण्यास तप्पर असे. माझी चूक समजावून देण्याच्या अशा एकाद्या प्रसंगीं " चारु, तूं माझी मुलगी आहेस ! तुझ्या आईचे सद्गुण तर इतके होते, तिचें चारित्र्य इतकें उज्वल होतें कीं, तसें हजारांत एकाद्याच अन्य स्त्रीच्या ठिकाणीं कदाचित् सांपडूं शकतील. तुला असं चालणार नाहीं. आईला साजणारी लेक तूं झालं पाहिजेस ! ही आप्पा पुरोहिताची मुलगी—म्हणून तुला लोकानीं म्हणतांना माझी छाती सात्त्विक आभिमानानें पुढें आली पाहिजे !—वसंत उडाणटप्पू निघाला. भकला. त्यानं माझी निराशा केली आहे. माझं पाणी त्याच्यांत नाहीं. मी त्याचं नांवच टाकलं आहे. त्याचं नशीब आणि तो ! काय त्याचं व्हायचं असेल तें होऊं दे !—पण तूं समंजस आहेस. तूं माझं, आपल्या आईचं, कुळाचं नांव केलंस—आणि तसं तूं करशील असं मला वाटतं—तरीसुद्धां माझ्या आणि तुझ्या जन्माचं सार्थक होईल. " असें अगदीं कळवळून आप्पा मला सांगत. त्यांच्या त्या सांगण्याचा सुपरिणाम आणि वागण्यांत सुधारणा माझ्यांत झालेली त्यांना दिसे. त्यामुळें ते माझ्यावर माया करीत ! आतांशा तर त्याचें सारें लक्ष माझ्यावरच लागलें होतें.

वसंताला पुष्कळ—पुष्कळ शिकविण्याची त्यांची इच्छा होती. पण वसंत नादान निघाला. त्यांनीं मलाही शिक्षण देण्यास कमी केलं नाहीं. पण जेव्हां व्रात्य तरुणानें माझा भर रस्त्यावर विनयभंग केला. त्या वेळेपासून त्यांच्या मनांत परिवर्तन झालें. त्यांनीं मला शिक्षणांतून काढून घेतलें. त्यांच्या मनांत त्या वेळीं माझ्या लाजीरवाण्या एका विनयभंगाचेंच

कारण होतें, असें नाहीं. आणखी अनेक कारणें असतील. पण सांगतांना त्यावेळीं त्यानीं मला सांगितलें; "शिकून परीक्षा देऊन–तू नोकरी करावीस, स्वतंत्र राहून स्वतःची चैन चालवावीस, त्यांतच आयुष्याचं इतिकर्तव्य मानावंस; असं नाहीं. ज्ञान हें ज्ञानाकरितां घ्यायचं असतें. पोटापाण्याचा प्रश्न सुटण्याकरिता, स्वतःचं तेवढं सुख पाहण्याकरितांच नाहीं. तूं संसारी व्हावंस, आदर्श कन्या, आदर्श पत्नि, आदर्श माता व्हावंस असें मला वाटतं. त्याला लागणारं शिक्षण-तेवढा समंजसपणा-तुझ्या जवळ आता आहे. तें स्वतः कुठेंही बसून ताजें ठेवशील–संपन्न करशील......"

आणि आणखी पुष्कळ असेंच काहीं सांगितलें. माझी जात्याच प्रवृत्ति संसाराकडे असल्यानें आप्पांचें सांगणें मला वावगेंही वाटलें नाहीं. मी कॉलेज सोडलें.

आप्पाची माया आपल्यावर किती आहे, ते आपल्याकडे कोणत्या दृष्टीनें पाहातात, हें मला चांगलें कळूं लागल्यापासून, त्यांची जितकी मला माया वाटे, तितकाच त्यांच्याबद्दल आदरयुक्त दराराही वाटे !

कॉलेज सोडून घरीं राहिल्यापासून आप्पा माझ्याकरितां स्थळें शोधूं लागले होते; तें स्थळ कशाप्रकारचें शोधणार ही कल्पना पुरती होतीच मला. तरी ते मला विचारल्याशिवाय, माझी पसंती पडल्याशिवाय पसंत करणारे अगदीच कट्टर आणि सनातनी नव्हते, हें मला समजत होतें.

आपल्या स्नेह्यासोबत्यात माझ्या लग्नासंबंधानें आप्पांनीं विषय काढून स्थळ सुचविण्याबद्दल बोलणें सुरू केलेलें मी ऐकत असे. माझ्या देखत तें पुष्कळ वेळा होई. त्याप्रसंगीं आप्पांचीं खरीं मतं मला स्पष्टपणें कळत.

एकदा एका स्नेहानें आप्पांना म्हटलें, "तुमची योग्यता, चारूचं रूप आणि शिक्षण हीं लक्षात घेतां चारु एकाद्या जहागीरदार-इनामदारालाच आपण द्यायला हवी ! तशीं स्थळ का पहात नाहीं ?—"

त्याला आप्पांनीं "कशाला ? दुर्गुण–दुर्व्यसनें यांचीं माहेरघरें म्हणजे जहागीरदार–इनामदार !—तशा खाईत लोटण्यापेक्षां चारूला

एखाद्या विहिरींत लोटलेली काय वाईट ? " असें स्पष्ट सांगून बिचाऱ्याला गप्प बसविलें.

पण त्याच वेळीं मला "काय चारु, व्हायचं आहे का तुला जहागिरदारीण-इनामदारीण, दिवसांतून वीस वेळां मोलाचे पोषाख बदलायला,पंचवीस वेळां किंमतीचे दागिने घालायला मिळतील. गव्हर्नराच्या पार्ट्या झोडशील. गव्हर्नराच्या बायकोशी हस्तांदोलन करायला सापडेल. नित्य नव्या भारी किमतीच्या मोटारी तुझ्या पाचवीला पुजल्या जातील. होय म्हण कीं लागलों त्या उद्योगाला !" असें विचारून माझी चेष्टा केलीच.

दुसऱ्या एकानें एका बड्या सरकारी अधिकाऱ्याचें स्थळ दाखविलें. तेव्हां जशी काहीं आप्पांच्या तळपायाची आग मस्तकालाच गेली; ते उद्गारले, "मोठ्या पगाराच्या मलिद्याच्या मिंधेपणानें ज्याचा स्वदेशाभिमान गतप्राण झालेला नसेल असा सरकारी अधिकारी विरळा ! माझ्यासारख्या वृत्तीच्या माणसाला तसें स्थळ दाखवितांना तुम्हीं माथें जरा ठिकाणावर ठेवायला नको होतें काय ?"

तिसऱ्या एका भाबड्याला, माझ्या अपुऱ्या शिक्षणाबद्दल वाईट वाटलें, तो आप्पांना म्हणाला, "चारुशीलेचं लग्नच करायचं होतं तुम्हांला तर मग तिला इतकं तरी शिक्षण दिलंत का आणि अशी वाढविलीत का ? आतां एवीतेवीं राहिलेंच आहे, तर तिचें शिक्षण पूर्ण करा. तोपर्यंत राहीना लग्न ?"

त्याला आप्पांनीं हंसत हंसत उत्तर दिलें, "अहो, चारूचं लग्न सुखासुखी कां लोंबवलं आणि तिला शिकवून मोठी केली ? लग्नसराई आली कीं स्थळं पहायला लागावं-नाहीं मिळालं कीं स्वस्थ बसावं. अशाच कारणानें चारुचं शिक्षण आणि त्याबरोबर तिचं वय वाढलं. त्याला मी काय करणार ? पण आतां तिला शिक्षणही देणार नाहीं आणि तिचं लग्नही ठेवणार नाहीं !-तुम्ही स्थळं दाखवा !"

"स्थळ दाखवा ? कुणाला : तुम्हांला का चारुला ? पसंत करणार कोण ? तुम्हीं का चारु ? तिला लग्न करायचं तर तिलाच आपल्या करितां स्थळ पाहूं द्या-ठरवूं द्या ! तुमच्या ओंजळीनं कां तिला पाणी प्यायला लावतां ? शिकली आहे, मोठी झाली आहे ना आतां ?-

" वेडे आहांत ! चारु शिकली आहे, मोठी झाली आहे, म्हणजे काय ? परीक्षेला नेमलेल्या पुस्तकाची घोकंपट्टी केली म्हणजे सारी अक्कल आली वाटतं तिला ? अन् मोठी झाली म्हणजे किती ? बापापेक्षा ? तिचं कल्याण, सुख कशांत आहे, हें अनुभवानें कळूं लागलेल्या, तिच्या खऱ्या मायेच्या माणसापेक्षां ? मुलं शाळा कॉलेजांत जाऊन शिकूं लागलीं, आईबापाच्या जिवावर झकपक् पोषाख करूं लागली, पुस्तकी पोपटपंची करूं लागली, कीं तीं आपल्यापेक्षा शहाणी झाली, आपल्यापेक्षां त्यांना समजूं लागलं, त्याचें हितानहित आपल्यापेक्षां त्याचं त्याना पाहूं देण्यांतच खरा शहाणपणा आपला आहे, आपलं त्याच्यासंबंधीं कांहींच कर्तव्य उरलं नाहीं, त्यांनीं सागावं आणि आपण नदी–बैलासारख्या खुशाल माना डोलवाव्या, त्याना भावी आयुष्यातले खाचखळगे दाखविण्याच्या भरीस पडूं नये, ती उनाडतील तसे बेशक उनाडूं द्यावें, त्यांतच इतिकर्तव्यता मानावी, असल्या आचरट कोटींतल्या बापासारखा बाप मी नाहीं ! चारूकरितां स्थळं दाखवायचीं तुम्हीं–मीसुद्धां-निवडायचीं मी आणि पसंत करायचं चारूनं !—असा आहे आपला खाक्या !!

—आणि खरोखरीच आप्पानीं हाच खाक्या चालूं ठेवला होता !

आतांपर्यंत कितीतरी अशीं स्थळं आलीं; त्यांपैकीं कांहीं आप्पांना बरीं वाटत, मला आवडत; पण सर्वस्वीं मला किंवा आप्पांनाही पटत नसत !

अशा स्थितींत होतां होतां आजपर्यंतचे दिवस लोटले होते.

आप्पा मुंबईहून आले. त्यांनीं कोण आलें–गेलं का म्हणून मला विचारण्याच्या अगोदरच त्यांनीं पंडितरावांनीं त्यांच्या करितां लिहून ठेवलेलं पत्र वाचलें–मी त्यांना चहा आणला तेव्हां तें ते वाचीतच होतें. त्यांनीं माझ्याकडे चौकशीही केली.

मीं पंडित आल्यापासून जाईपर्यंतची सारी हकीकत सांगितली. रात्रीं वसंतानें त्यांना सिनेमा पहावयाला नेलें; मीही गेलें होतें. हेंसुद्धां सांगितलं. पण तें सांगतांना मला कसेंसेंच झालें !

ते वागले कसे, बोलले कसे, मीं त्यांना वागविलें कसें, त्यांच्यांशीं बोललें काय, कसें ?– या बद्दल एकदमच आप्पांनीं सारें विचारलें नाहीं.

विचारलें तेंही अशा रीतीनें कीं, मला ते मुद्दामच कांहीं हेतूनें विचारतात असें मुळींच वाटूं नये.

मी त्याना सागत होतें, सांगतांना माझी तारंबळ उडत होती. जीभ चाचरत होती. लाज न जुमानतां वर डोकें काढीत होती. मी बोलतांना आवंढे गिळीत होतें; आप्पांच्या ध्यानात येऊं नये म्हणून इकडे तिकडे मान फिरवीत होतें.

इतकें करून, इतकें आप्पापासून लपवून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करूनसुद्धां आप्पांच्या ध्यानांत माझी स्थिति आली कीं काय कोण जाणे !

पंडितरावांचें पत्र वाचून टेबलावर ठेवीत आणि माझ्या हांतून चहाचा कप घेत, माझ्याकडे पाहून " अरे ? हा लेकाचा पंडीत क्षीर-सागर, माझ्या गैरहजेरींत आला आणि गेलाही ? वाः ! फारच शहाणा दिसतोय मला ! " आप्पा म्हणाले. मग त्याची मनापासून–त्यांना मना-पासून आवडणाऱ्या एकाद्या चलाख, हुषार माणसाची करीत तशी, पंडितरावांची त्यानीं वाखाणणीही केली. " बेटा आहे तेजस्वी ! नांव काढील जगांत ! " असेंही मनाशीं पुटपुटलें ते ! मी ऐकलं. मला किती बरं वाटलं ! आप्पांना ज्यानीं चांगलं म्हटलं, आप्पा ज्यांना नांवाजतात, जे आपल्यावर जादू करून गेले. ते पंडितराव आपले होणार–असं वाटल्याखेरीज कसं राहणार मला ! खरंच तसं मला वाटलं; आणि त्या वाटण्यामुळेंच त्यांच्यासंबंधानें आप्पांनीं मला विचारतांना प्रत्येक वेळीं माझी तिरपीट त्रेधा उडूं लागली.

पण त्यानंतर काय झालें कोण जाणें, कशावरून तरी वसंतावर ते संतापले. त्याला अगोदर बोलबोलले. त्यानें ऐकलं न ऐकलं करून तो बाहेर चालतां झाला. अन् मग ते जगीचच माझ्यावर उसळले. ' तूं त्या नादान कार्ट्याचींच बहीण, त्याच्या सारखीच माझ्याशीं बेमान होणार ! तो तूं एकच ! मी गावाला, गेलेला पाहून, त्याचं ऐकून नवख्या पाहुण्याबरोबर, अनोळखी तरुणांबरोबर ' सिनेमा ' पहायला जाण्याइतकी निर्लज्ज कशी झालीस ? माझ्या तोंडाला तूंही एक दिवस काळं फासणार !—

नाहीं नाहीं तें ते बोलूं लागले मला! अगदीं धारेवरच धरली त्यांनीं मला! दारांतच कां उभी राहिलीस? भांगच कां असा काढलास? कुंकूं बारीकच कां लावलेंस? अशीच का बसलीस? पदर मुद्दामच तसा घेतेस. शहाणपणाची तुला घमेंडच झाली आहे—

एक दिवस सरळ बोलेनात कीं सरळ वागेनात माझ्याशीं आप्पा! पंडितरावांचं पुन्हां नाव येऊं दिलें नाहीं तोंडांतून! मग मला त्यांच्याबद्दल विचारायची गोष्ट दूरच!

प्रेमबिम आपण कांहीं जाणत नाहीं. तुझ्या त्या आचरट सुलभेप्रमाणें नाचरेपणा करण्याची लहरच तुला अलिकडे येऊं लागली आहे! बाष्फळ पदेंच गुणगुणतेस—एक ना दोन! माझे पूर्वीचे—माझ्यावर माया करणारे ते हेच का आप्पा, असा प्रश्न मला पडला. नव्हे—तसा प्रश्न पडण्याइतकेंदेखील मला भान राहिलें नाहीं.

माझा जीव उडून गेला! मी अगदीं रडकुंडीला आलें.

पण आप्पांच्यापुढें बोलण्याची माझी काय प्राज्ञा होती?

आप्पा बाहेर आहेत हें मला माहित नव्हतें; दिवसभर ते माझ्याशीं कांहींच बोलले नव्हते. मी एकटीच आंत होतें. पंडितांची मानसमूर्ती माझ्यापुढें उभी होती.

'आज माझी आई असती; तर आईच्या गळीं पडून मी तिच्याशीं हट्ट धरला असता, माझं लग्न करायचंच झालं तर पंडितांशींच कर. आप्पाना तूं सांग, बायकांचं हृदय—मुलीचं हृदय—बायकांनीं—आईनंच जाणावं! आई ती आई! बाप तो बाप! काहीं केल्या आईची सर बापाला यायची नाहीं. मी पोरकी पोर! आप्पा माझं कशाला ऐकतील?—ते आपल्यावरून जग ओळखणार!—आपल्या मनावरून माझं मन पारखणार! त्यांच्या मनाप्रमाणं माझं मन कसं असेल? मी स्पष्ट बोललें तरी त्यांनीं माझं ऐकलं पाहिजे ना?' माझ्या मनात येत होतें. मी रडत होतें.

त्याच वेळीं आप्पा कशालासे आंत आले. त्यांनीं मला रडतांना पाहिलें.

अन् मला पाहून, काय नवल तरी, " चारु चारु, पोरी रडतेस ? काय ग ? काय झाले ? " आप्पांनीं मला कळवळून विचारलं.आप्पांचा कंठ गद्गदला होता. त्यांच्या डोळ्यांत अश्रूंनीं गर्दी केली होती.

ते माझ्याजवळ आले. ममतेनें त्यांनीं माझ्या पाठीवरून हात फिरविला. आपल्या हातांनीं माझे डोळे पुसले, आणि मला म्हणाले; " वेडे पोरी, रडतेस ? मी असतांना रडतेस ?–तुला सुखस्थानीं पडलेली पाहण्याकरितां मी धडपडतों आहे. केवळ तेवढ्याचकरितां मी जिवंत राहिलों आहें. तुझ्या सुखापेक्षां मला काय हवं आहे या जगात ? लक्षांत ठेव; चारु, पोरी, तुझ्या मनाप्रमाणें तुझ्या आप्पानं केलं आहे, असं जेव्हां तूं म्हटलेलं ऐकेन तेव्हांच माझ्या आयुष्यांतलं इतिकर्तव्य केलें असं मला वाटेल. नंतर मी मरायलादेखील आनंदानें तयार होईन!–वसंताला मी चांगला बाप नाहीं असं वाटतंय; इलाज नाहीं माझा. पण तुलाही जर माझ्याबद्दल तसंच वाटायला मीं लावलं, तर माझं शहाणपण काय उरलं ?... "

आप्पा बदलले; ते माझ्या मनाप्रमाणं करणार; पंडितरावांशीं माझं लग्न लावून देऊन मला सुखी करणार !– आप्पा किती चांगले आहेत– ' आप्पा, मला सुखी करायचं असेल तर पंडितरावाच्या पदरांत मला घाला–' असें मी म्हणणार होत्यें त्या वेळींच. पण तेवढ्यांत आप्पाच म्हणाले, त्यांनीं निराळंच काढलं–

" चारु, उद्यां एक गृहस्थ तुला पाहायला येणार आहेत. माझा त्यांचा पत्रव्यवहार झाला आहे. मी त्यांना मुंबईला पाहिलं आहे. सुशिक्षित आहे. घरचा चांगला आहे. तुझ्या योग्यतेचा आहे. मला हवा वाटत होता, तसाच जांवई आहे. देशाभिमान त्याच्या नसानसांतून भरला आहे. स्वार्थाकरितां नव्हे, देखाव्याकरितां नव्हे, तर देशाकरितां खराखुरा तळमळणारा, तो एक राष्ट्रवीर आहे. तुझा पति व्हायची लायखी त्याचीच एकाची आहे, अशी माझी खात्री झाली आहे. तूं त्याला पाहशील आणि मगच म्हणशील, आप्पांनीं अगदीं आपल्या मनाप्रमाणेंच केलं. तुला तो पसंत पडलाच पाहिजे– "

" आतां मी पसंत काय कुणाला करणार कपाळ माझं ? " माझ्या मनांत आलं ! इतके मधले दिवस आप्पांनीं कठोर होऊन छळलं ! आतां मायेच्या गोड शब्दांनीं ते माझा गळा कापूं लागले !

एका क्षणीं आशा, तर दुसऱ्या क्षणीं निराशा ! ऊन-पावसाचा खेळ सुरू झाला. नाटकाचा पहिला प्रवेश-पहिला अंक फार महत्त्वाचा असतो. नाटककाराला लिहायलाही तो फार अवघड असतो; त्याप्रमाणें त्यांत भूमिका करणाऱ्या चांगल्या चांगल्या नटांचीही करामत ईरेला घालूनदेखील त्रेधा उडत असते. कसें जमतें, काय होतें ? अशी धाकधुक नाटककाराला-तशी नटानाही वाटत असते.

क्षणांत वाटावें जमूं लागलं, आतां मनासारखें झालें. पण दुसऱ्याच क्षणीं आपण कुठें तरी वहावत चाललों-बिघडलं सारं-शेवटपर्यंत बिघाडच. नाटकाचं मातेरं होणार झालं !—

तशीच माझ्या आयुष्याच्या नाटकाची-पहिल्या प्रवेशाची, नव्हे पहिल्या अंकाची गत झाली होती ! पहिला प्रवेश-निदान कल्पनेंत माझ्या मनासारखाच झाला होता. किती हायसं झालं होतं. पण दुसऱ्या प्रवेशापासून, आप्पांच्या वागण्यानें सारखी चलबिचल करून सोडली होती.

नायकाची-पंडितरावांची-आणि माझी दृष्टिभेट झाली होती. " दादा, ते आले ना !-दादा, ते आले ना ? " असें म्हणणाऱ्या रुक्मिणीप्रमाणें पंडितांनीं येता क्षणीं माझी मनःस्थिति करून टाकली होती. श्रीकृष्णांनीं प्रथम दर्शनीं रुक्मिणीला वेड लावलं तसंच पंडितांनीं मला आपलं वेड लावलं होतं ! पण रुक्मीचा आणि शिशुपालाचा अडथळा रुक्मिणीला आला. भिष्मकाचा आधार रुक्मिणीला होता.

पण माझी गत रुक्मिणीपेक्षां कठीण होती. वसंत उदासीन होता. त्याला माझी कल्पनाच नव्हती. खुद्द आप्पांचा दांडगा विरोध मला. अन् उद्यां ते आपण होऊन माझ्यापुढें शिशुपालाला-कोण्या मसण्या देशाभिमानी राष्ट्रवीराला माझ्या गळ्यांत लग्नाची माळ-कां फांसाची दोरी-घालायला आणून उभा करणार होते !

— बाप कसले कसाब ! उगीच नाहीं मुलींचीं माथीं भडकत आणि आईबापांच्या मनाला अन् अधिकाराला पायाखालीं तुडवून आपल्याला आवडेल तसं वागायला लागत !

—सुंद्राच्या सरशीसारखी मी एकाद्या अडाण्याची अडाणी मुलगी असतें तर किती बरं झालं असतं ?

—सुलभा आपल्या आईबापांचं ऐकत नाहीं. त्यांच्या तोंडावर त्यांना बोलते. आपल्याला जसं वाटेल तसें वागते, तेंच चांगलं करते ती! अशा आईबापाशीं तसंच वागलं पाहिजे. मी सुलभेसारखीच आप्पांना सडेतोड उत्तरं देऊं कां? दिलीं तर काय बिघडणार आहे? अगोदर आम्हांला शिकवावं कां? समजू द्यावं कां? अन् मग आमच्या जाणत्या मतस्वातंत्र्यावर गदा आणून आमची मुस्कटदाबी करावी का? सर्व सत्ताधारी प्रजेची गळचेपी करणाऱ्या सरकारात आणि तशीच मुलीची गळचेपी आपल्या अधिकारात करणाऱ्या बापांत अंतर काय?

—मनांत हजार विचार येत होते आणि जात होते!

—“ बोल, चारु, पोरी, तुझ्या अंतःकरणांतलं स्पष्ट बोल. तूं सांगशील, तूं ज्याला पसंत करशील, त्याच्याशीं तुझं लग्न लावून देऊन तुला सुखी करतों. पंडितांशीं तुला लग्न करायचं आहे? त्याच्यावर तुझं प्रेम जडलें आहे? ठीक आहे! तुझी पसंती ती माझी पसंती!—”

असेंसुद्धा एकदा अकल्पित रीतीनें आप्पा मला म्हणाले, माझ्या तोंडाला मधाचं बोट लावलं. मी वेडीनं खरं आप्पांना, एकदां लाजत-मुरडत कां होईना सांगितल.

पण ‘ फिरून ये रे माझ्या मागल्या ’ आप्पानीं केलंच!

पुन्हां पंडितांना त्यांनीं हजार खोडी कल्पनेनेंच काढल्या!—

—एक वर्तमानपत्राचा संपादकच माझ्यापुढें आणावयाचा आहे, त्यालाच तूं पसंत कर असे आप्पांनीं फर्मान सोडलें मला!

माझं होणार तरी काय? माझ्या आयुष्याचा असा खेळखंडोबा आप्पा कां करायला तयार आहेत?-अशा प्रश्नाबरोबर आप्पा माझ्यापुढें पंडितरावांच्या जोडीला त्यांना प्रतिस्पर्धी ज्यांना ज्यांना म्हणून उभे करीत होते—ते सारं माझ्या मानसदृष्टीपुढें न येतां, पंडितच सारखे ठळकपणें येत. माझ्याकडे हंसत पाहून धीर देत-गोड गोड—बोलत होते—

आप्पांच्या प्रत्येक विरोधाबरोबर पंडितांवरील माझें प्रेम वाढतंच चाललें होतें!

एक दिवस संध्याकाळीं आप्पा बाहेर निघाले होते. त्यांनीं चहा मागितला होता, तो घेऊन मी त्यांच्या बसायच्या जागेंत गेले. त्यावेळीं ते

आनंदांत दिसले, माझ्याकडे पहात होते. मिस्कीलपणानें हंसत होते. त्यानीं पुष्कळ दिवसांनीं माझी आज थट्टा केली. "काय ताईसाहेब, तुम्ही उद्या लग्न झाल्यावर आपल्या पतिराजाच्या हातात हात घालून जाणार म्हणायच्या! मग आप्पाची आठवण तरी होईल का?" आणि मग म्हणाले, "उद्यां सकाळीं हुश्शार रहा! उद्यां येणारे गृहस्थ तुझ्याशीं नक्की लग्न करूनच, येथून तुझ्यासह जाणार आहेत. भावी वराच्या मेजवानीचा थाट उद्याच झाला पाहिजे. काय आहे, नाहीं घरात पहा. मला सांग. जरूर त्या सामानाची यादी करून ठेव. मी बाहेरून आल्यावर ते सर्व आणण्याची व्यवस्था करीन. आणि उद्या जरा नीटनेटकी ऐस. वेंधळी राहू नकोस! आईवेगळ्या मुलीला वडिलांनीं दाडगी बनविली आहे, ओळा कांहींच लावला नाहीं, असा माझा बदलौकिक करूं नकोस!—"

अन् आप्पा गडबडीनें बाहेर गेले.

नको होती ती वेळ आप्पांनीं आणलीच शेवटीं माझ्यावर! माझं न एकता माझ्या पसतीची पर्वा न करितां कुणा धटिंगणाच्या गळ्यांत मला बाधणारच! हा विचार मनांत आला. मला भोंवळ आली. तरीदेखील संस्कार म्हणून काहीं असतोच!—तो जागृत झाला—

त्याचबरोबर पंडितरावांची मूर्ती माझ्यापुढें उभी आहे, असें वाटलें. स्वारी गंभीर होती. तीक्ष्ण, रुष्ट नजरेनें माझ्याकडे पहात आहे असें वाटलें. मी करुण, रुद्ध कंठानें, हात जोडून

**मम सुखाची ठेव देवा। तुम्हांपाशीं ठेवा।**

अगदीं पंचप्राण एकवटून म्हणण्याचा प्रयत्न करीत होतें. मला असह्य झालें. तशीच मी मटकन् खुर्चीवर बसलें.

टेबलावर डोकें टेकत होतें. मनमुक्त रडावें असें वाटत होतें. डोळ्यांत पाणी आलेंच होतें.

डोकें टेकतां टेकतां आप्पांच्या टेबलावर पडलेल्या एका पत्राकडे माझी पाणी भरलेली नजर गेली.

अक्षर तेंच पंडितांचें मोत्याप्रमाणें सुंदर अक्षर मला दिसलें. त्यांचें अक्षर !—क्षणापूर्वी त्याची मानसमूर्ति डोळ्यांपुढें होती. आतां प्रत्यक्ष त्यांचें अक्षर !

पत्र पाहिलें. मन अनावर झालें. त्यासरशीं तें मीं उचलून घेतलें. वांकलेली होते ती ताठ बसले. पदरानें डोळे पुसत, तें पत्र उघडलें—

पत्रांत थोड्याच ओळी होत्या—लिहिलें होतें—

आपलें कृपापत्र पोंचलें. निघून उद्यां सकाळीं येत आहें. सविस्तर भेटीं अंतींच श्रुत होय हे विज्ञापना.

आपला नम्र,

**पंडित क्षीरसागर**

वाचलन् मग जें काय झालें तें झालें मला ! दुःखाश्रुंच आनंदाश्रूंत रूपांतर झालें !

—' आप्पा—आप्पा—माझे आप्पा किती चांगले आहेत ! '

—' काय तरी आप्पांनीं गुंतागुंतीचें नाटक केलें हे !—आतां येऊं दे त्यांना—असें बोलून घेतें.—

—अन् त्या आनंदाच्या भरांत साऱ्या घरभर नुसतं नाचत सुटावं असं वाटूं लागलं मला !

—उद्यां केव्हां उजाडतो अन् पंडितांचा. टांगा दारांत थांबतांना केव्हां दिसतो मला असं होऊन गेलं !—

—तितक्यांत आप्पा बाहेरून आले !—मी तिथें थांबते कशाला ?

—" चारु, चारुताई, पोरी—" आप्पा हांका मारीत होते— मी पळालें आंत केव्हांच ! कशी थांबणार मी तिथें ?

———

प्रकरण पांचवें

# आमचीं लग्नें.

दुसरे दिवशीं सकाळीं नित्याप्रमाणें उठलें. पहाटेचा आप्पांना चहा दिला. कामाला लागलें. हातांनीं कामें चाललीं होतीं. लक्ष दाराबाहेर थांबणाऱ्या टांग्याकडे होतें. दरक्षणीं उत्कंठा वाढत होती. किती कवींच्या मधुर मधुर कवितांतील पंक्ती जिभेवर नाचत होत्या.

वेळ झाली. टळून गेली. कशाच्या तरी निमित्तानें कितीदां तरी बाहेरच्या घड्याळांतले कांटे कोणत्या कोणत्या आंकड्यावरून चालले आहेत हें पाहण्याचा मोह मला अनावर होत होता.

मला वाटत होतं माझ्यासारखीच आप्पाच्या मनाची पण स्थिति असेल. पण त्यांना का एकच तेवढा उद्योग होता ? हा आला, तो आला, याच्याशीं बोल; त्याला सल्ला दे. ताजीं वर्तमानपत्रें चाळ. हें त्यांचें चाललंच होतें.

टपालाचा शिपाई आला. पत्रांच्या पेटींत आप्पांचीं पत्रें त्यानें टाकलीं. मींच पेटींतून काढून आप्पांना नेऊन दिलीं.

अपेक्षित पत्र त्या पत्रांत होतें. आप्पांनीं तें सावकाश वाचलें. येतां न आल्याचा निःसंदिग्ध खुलासा पत्रांत केला होता. नंतर केव्हां निघेन तें अगाऊ कळवीन असेंही होतें.

आप्पांनीं तें मला सांगितलें. मी खट्टु झालें. पण आप्पांना कांहीं विशेष वाटलें नाहीं. उलट त्यांना एक प्रकारचा विशेष आनंद झाला. अभिमानच वाटला ! त्यांनीं उद्गारही तसेच काढले ! “ जो विशेष प्रकारच्या ध्येयामागें लागला आहे, तो असेंच वागणार ! लग्नासारखी बाब महत्त्वाची तर खरीच. पण तें म्हणजे कांहीं आयुष्याचें सारसर्वस्व

नव्हे! ध्येयपूर्तीला उत्तम प्रकारें साह्यभूत होणारं तें एक उत्कृष्ट साधन आहे. आपल्यावर पडलेलं जोखमीचं काम बाजूला सारून–टाळून, अंगा-वेगळं टाकून लग्न जमविण्याकरितां पंडित आला नाहीं हेंच त्यानें चांगलं केलं. असा तो न वागता, तर आपल्या मर्जीतून अगोदरच तो उतरला असतां!"

पंडितराव अपेक्षेप्रमाणें आले नाहींत, म्हणून मी खट्टु झालें खरी; पण आज नाहीं, तरी उद्या परवा ते येणार– आपली आतां त्याच्याशींच प्रेमाची जन्मगांठ बांधली जाणार, हें निश्चित झाल्यामुळें–आप्पांनीं तें निश्चित केल्यामुळें मी निश्चितच होतें; आतां माझ्या मनाचें मीच समाधान घालीत होतें.

मी स्वयंपाकाला लागलें. पंडितराव येणार म्हणून स्वयंपाकाची तयारी रोजच्यापेक्षां जरा जास्त होती केलेली. आप्पानीं आपल्या आवडत्या भाज्या आणल्या होत्या. आपल्याला जास्त जे आवडते जिन्नस तेच करायला मला सांगितलें होतें.

आपल्याला जें जास्त आवडतें, तेंच भक्तिभावानें, प्रेमानें माणूस देवाला, आपल्याला आवडणाऱ्या, प्रिय असलेल्या माणसाला नैवेद्य म्हणून देत असतें; आपल्याला आवडणारा जिन्नस देवाला. प्रिय माणसाला तोच जिन्नस आवडणार, हीच माणसाची समजूत असतें. तेंच आप्पांनीं आज केलं होतं. मलाही तसंच वाटत होतें.

पंडितराव आले नाहींत, त्यांच्याकरितां स्वयंपाक नव्हता; पण आप्पांचे आवडते पदार्थ करायचे होते; ते करतांनासुद्धां मला बरं वाटत होतें.

स्वयंपाक करतांना मनांत येत होतं, आज मा उद्यां आपलं लग्न होणार. आपण पतिबरोबर जाणार. मग आप्पांना त्यांच्या मनासारखं– आवडतं–कोण करून घालायला आहे! त्यांचें उतार वय झालं. सत्तेचं घरीं माणूस नाहीं. आई असती तर–पण ती नाहीं. उतार वयांत आप्पांनीं खानावळीचा रस्ता सुधारायचा! खानावळींत त्यांची आवडनिवड कोण पहाणार!—त्यांचे खाण्यापिण्याचे हाल होऊं नयेत, असं त्यांना कोण म्हणणार!–वसंतानें लग्न करून घेतलं तर! आप्पांनीं त्याचं लग्न करून

देऊन सून घरीं आणिली तर ! कितीतरी गोष्टी चांगल्या होतील. वसंताच्या दुष्टपणाला पायबंद बसेल. तो ताळ्यावर येईल. बायकोच्या ओढीनें घरात त्याचं लक्ष लागेल. आहे त्याच्यांत तो नीट वागायला लागला, तर आप्पांना तेवढ्यानें सुद्धां समाधान वाटेल. त्यांच्या जेवणाखाण्याचे हाल चुकतील. त्यांचें उत्तर आयुष्य सुखासमाधानांत जाईल.

—पण तें व्हायचं कसं ? वसंताला तें पटायचं नाहीं. तो आप्पांचें ऐकायचा नाहीं. आप्पा आपला बाणा—आपला स्वाभिमान सोडून मन वळविण्याचा व्याप करणार नाहींत.

—वसंत कसाही असला, विशेष शिकला नसला, तरी आप्पांच्या नांव लौकिकावर त्याला मुली येणार नाहींत असं नाहीं. येत होत्यासुद्धां. पण बुद्धिपुरःस्पर आप्पा त्याकडे दुर्लक्ष करीत होते; एखाद्या वेळीं ते खडखडीत म्हणतसुद्धा “ कुणाच्या मुलीच्या गळ्याला असा गळफास लावूं ?” एकाद्या अश्राप मुलीच्या जन्माचं माझ्या स्वार्थाकरितां मातेरं करूं ?

—अन् आप्पांनीं सांगितलं असतं, तरी वसंत त्यांचें ऐकायला बसला होता थोडाच ? त्याच्या कानांत जसं काहीं वारंच शिरलं होतं ! नटव्या नटी त्याला हव्या होत्या. आतांशा तर तो आमच्या सुलभेच्या मागें मागें असतो ना ?—तिनें परवां ‘ धर्मार्थ ’ नाटकांत काम केल्यापासून तिचं प्रस्थ त्यानें जास्तच माजवलं होतं. त्याला ती ‘ देवता ’च वाटायला लागली होती हें मला माहित होतें ! मुलभा मुलखाची छादिष्ट आणि विक्षिप्त ! वसंताबरोबर ती कधींच लग्नकरून घेणार नाहीं असें मला वाटे. अन् घेतलं एकाद्या वेळीं तरी प्रापंचिक-गृहिणी या नात्यानें काडिचा उपयोग होणार नाहीं, हें तितकंच खरं होतं.

आपल्या जन्मदात्या—आप्पांच्या सुखदुःखाकडे वसंतानें कां लक्ष पुरवूं नये ? त्यांच्या मनाप्रमाणें थोडं तरी वागायला तयार कां होऊं नये ? आई-वडिलांचा संतोष होईल असं मुलांनीं वागायचं नाहीं तर कोणी ? आई—वडिलांचा संतोषाची आशीर्वाद कुणाचं कल्याण करणार नाहीं ! हें मला वाटतं, पण ज्या वसंताच्या मनांत यायला हवं हें, त्याला कुठें काय वाटत होतं !

आमच्या शेजारची सरला–माझी बालमैत्रीण, मी, वसंता अन् सरला लहानपणीं एकत्र खेळलों. सरलेला वसंत भारी आवडायचा. माझ्याबरोबर ती सुरवातीला शिकायला होती. तिच्या मनांतलं मी एकदां काढून घेतलं होतं. तिनं पण वसंत आपल्याला आवडतो, असं खरं सांगितलं होतं. तिला करून घ्यावी, म्हणून तिच्या वडिलांनीं आप्पांना किती गळ घातली होती. पण आप्पांनीं आपल्या चिरंजिवांची एकंदर तऱ्हा ध्यानीं घेऊनच सरलेच्या वडिलाना "तुम्ही त्या संकटांत पडूं नका आणि मलाही तुमच्या शिव्याशापांचे धनी बनवूं नका !" असं सांगून त्यांना परतलं होतं.

सरला माझी वहिनी झाली असती तर–मी आपल्या सासरी गेल्याबर आप्पांच्याबद्दल काळजी करण्याचं कारणच उरत नव्हतं !–

माझ्या मनात वसंताच्या लग्नाबद्दलचे विचार चालले होते–

दारावरून कुणाचं तरी लग्न वाजत चाललं होतं–

कुणाचं लग्न चाललंय हें पाहण्याच्या स्वाभाविक उत्सुकतेनें मी हातांतलं काम टाकून दारात पहायला जाणार होतें–इतक्यांत सकाळींच बाहेर गेलेल्या वसंताचा फेरा आला. तशी मी थांबलें.

"कुणाचं रे लग्न वसंता दारावरून गेलं ?" मीं वसंताला विचारलं.

"शेजारच्या सरलेचं !– तुझ्या बालमैत्रिणीचं !–" वसंतानें सांगितलें, "एक वृद्धकपी झूल चढवून, घोड्यावर बसून वाजत गाजत चाललाय वधू पळवून न्यायला ! जा–जा–पहायला ताई !"

"सरलेचं लग्न ?" मी चकितच झालें ऐकून ! ठरलं केव्हां ? जमलं कुठें ? आपल्याला कसं कळलं नाहीं ? लग्नपत्रिका आपल्याला कशी आली नाहीं ? पण लगेच लक्षांत आलं ! आप्पांनीं फेटाळलं. वसंतानें नाकारलं सरलेला. मग तिचा बाप कशाला लग्नपत्रिका पाठवील ?

ऐकलं नी मीं 'च् च् च्' केलं !

"कां ग ताई ! 'च् च् च्' करायला काय झालं तुला ? सरलेचं लग्न होतंय ही च् च् च् करण्याइतकी वाईट गोष्ट आहे ?" वसंतानें मूर्खपणाचे प्रश्न केले.

" नाहीं तर काय रे ! सरलेला म्हातारा नवरा मिळाला ही चांगली गोष्ट आहे वाटतं?–"मी जरा तीव्र स्वरांत म्हटलें," कमनशिबी बिचारी !"

" पण तुला काय इतकं वाईट वाटतं ?—"

" तुझ्याशीं तिचं लग्न झालं नाहीं म्हणून ! तुलाच सरला मिळायला हवी होती !"

" झालं ! माझ्या आयुष्याची तिथंच इतिश्री झाली असती !" वसंतानें प्रलाप काढले ! " मी सरलेशी लग्न करण्यासारखं होतं काय सरले जवळ ? तुझ्या सारखीच एक नंबरची अजागळ मुलगी ती ?"

वसंत बडबडत होता; पण त्याचें बोलणें मला ऐकायलाच येत नव्हतें. मी सरलेच्या भवितव्यांतच चूर झालें होतें ! 'कसं होणार सरलेचं!' तरुण वसंतासारखे भडकलेले. म्हातारे कपी लग्नाला उतावळे आहेतच ! आईबाप परिस्थितीनें नाडलेले ! 'सरलेसारख्या निःसहाय मुलींनीं करावं काय ? जन्मभर सरलेनें म्हाताऱ्याची बायको म्हणून वागायचं आणि वसंताला मनांतल्या मनात वागवायचा ! त्याच्या नांवाची जपमाळ घेऊन दिवस कंठायचे ! असें तिनें केलं तर तिला दोष का द्यावा ? असं तिला वागावयाला भाग पाडणारा समाज दोषी नव्हे का ? वसंता दोषी नव्हे का ?—

" ताई, मी लवकरच लग्न करणार आहें !–" वसंतानें माझी तंद्रा मोडली हें ऐकवून !

" होय ? मग फार चांगलं होईल ! वहिनी घरीं येईल. मी निष्काळजी होईन. घर उभं राहील. आप्पाचे दिवस हालांत जाणार नाहींत !–" मीं आनंदून म्हटलें ! " म्हणजे ? मी लग्न करणार तें माझ्यासाठीं का आप्पांच्यासाठीं ? आणि हा प्रपंचाचा खटारा ओढण्यासाठीं का मी लग्न करणार आहें ?" वसंतानें प्रकाश पाडला.

" ताई, तुझ्यासारख्या, सरलेसारख्या चूल फुंकीत बसणाऱ्या मुलीबरोबर का लग्न करणार आहे ? रांधावाढा उष्टीं काढा अशांत दिवस-रात्र घालविणारी बायको पत्करून मी काय करणार ? मी कुणाला पसंत केलं आहे माहित आहे तुला ताई ?–"

" कुणाला ?–" लक्ष नसतांच मी विचारलं !

" सुलभेला ! "

" तें मला तूं पुष्कळदां सांगितलं आहेस ! पण सुलभेनं तुला पसंत केलं आहे का रे ?......"

" मग काय सुलभा तुझ्या त्या बावळट पंडिताला पसंत करणार ? त्याला पसंत करावंस तूं आणि त्यानं पसंत करावं तुला ! समजलीस ? दोघंही तुम्ही अजागळ ! "

पंडिताचं नांव घेऊन त्याना अजागळ म्हटलेलं मला नाहीं आवडलं. मी त्याच्याकडे रागानें पाहिले.

" पहातेस काय अशी ? पंडिताला—तुझ्या भावी पतीला मीच बावळट म्हणतों असं नाहीं. सुलभासुद्धां तेंच म्हणते ! " वसंत दात विचकीत सांगायला लागला: " माया बोलपट पहावयाला गेलों होतों ना आपण त्या दिवशीं, त्यावेळीं आपल्याबरोबर पंडिताला सुलभेनं पाहिलंच होतं. त्यानंतर मला सुलभा दुसऱ्या दिवशीं नाटकाच्या वेळींच भेटली होती. त्या वेळीं तूं आलीच नाहींस नाटकाला. तुलाच विचारणार होती ती. पण तें तिनं मला विचारलं ?

" बावळट बाहुलं चारूनं काल कुठून पैदा करून बरोबर आणलं होतं ? त्याच्याशीं ती लग्न करणार आहे का काय ? बाकी दोघंही एकमेकांना साजेशींच आहेत म्हणा !—नशीबंच आपलं म्हणायचं कीं त्या तसल्या अजागळाशीं आपल्याला जन्म काढायचा प्रसंग आला नाहीं ! "

सुलभेनेंही पंडितरावांबद्दल तोडलेले तारे वसंतानें वरीलप्रमाणें मला ऐकवून माझा संताप पराकोटीला पोंचविला. पंडितरावाबद्दल सुलभेनें असे तारे कां तोडावेत हेंच मला कळेना.

रागानें मी फणफणत असतां मला विचारायची बुद्धी सुचली नाहीं, तरी त्याचाही खुलासा वसंतानें आपण होऊनच केला. माझ्या रागाकडे दुर्लक्ष करीत तो म्हणाला, " ऐकलंस ताई, आपल्या बापाच्या आग्रहानें पंडित आपल्या घरीं येण्याच्या अगोदर सुलभेला पहावयाला गेला होता ! सुलभेनें त्याला लगेच लावल्या वाटाण्याच्या अक्षता ! सुलभेला का पंडित आवडणार आहे ? त्याला तुझ्यासारखीनंच पसंत करावं !—पंडितांपेक्षां माझ्यासारख्यालाच सुलभेनें निवडावं !—आणि निवडलंही आहे म्हणा !—"

पंडितरावांना सुलभेनं पसंत केलं नाहीं, यांत तिला नशीब वाटलें !

पण त्यांना मीं पसंत केलं हें माझं खरोखरीच नशीब मला वाटलें !

सरला, सुलभा, मी, वसंत यांच्या मनोवृत्तीबद्दल, आम्हां सर्वांच्या भवितव्याबद्दल मी विचार करूं लागलें.

एकाच आईबापाच्या पोटीं वसंताचा आणि माझा जन्म झाला ! मला आप्पांच्याबद्दल असं का वाटतं? वसंताच्या स्वभावाची घडण अशी का ? सरला, मी, सुलभा, साऱ्याजणीच शिकलेल्या; तरी आमच्या सगळ्याजणींच्या मनोवृत्तींत फरक का ? आमच्या दृष्टि भिन्न का ? सुलभेला तसं कां वाटतं ? मला असं का वाटतं ?

न विचारतांच वसंतानें आपण होऊनच स्वतःबद्दल आणि सुलभेबद्दल मला आणखी माहिती पुरविली—

" आप्पा तुझ्या लग्नाची काळजी वहातात. ते तुझ्या आणि त्यांच्या मनासारखं करतात. आपलं त्यांचं जमत नाहीं. माझी काळजी ते वहाणार नाहींत. माझे मार्ग त्याना पसंत नाहींत. आपण सुलभेबरोबर फक्त रजिस्टर पद्धतीनें लग्न करणार आहोंत. लग्नानतर दोघेही नट–नटी म्हणून सिनेमा जगात जोडीनें पदार्पण करणार आहोंत. कुलीन, देखणी, सुविद्य व सत्तेची नटी आपल्याजवळ असली म्हणजे सिनेमासृष्टींत पैसा आणि कीर्तीला कांहीं तोटा नाहीं. "

सुलभा पुढें मागें सिनेमांत जाणार अशी माझी अटकळ होती. तशीच गुणगुण अलिकडे पसरली होती. अधूनमधून वर्तमानपत्रातूनही येत असे. पण वसंताबरोबर ती लग्न करणार आणि दोघेही सिनेमांत जाणार हें मीं नवीन ऐकलं. ऐकून वाईट वाटलं. त्रास झाला. पण मी करणार काय ?–जो बापाला जुमानीत नाहीं, तो बहिणीच्या बोलण्याला काय धूप घालणार ?

मग मी वसंताशीं बोललेंच नाहीं. त्याचेंही बोलणें ऐकण्याची इच्छा नव्हती मला. " जेवायचं असलं तर चल. झालंय माझं ! मी त्याला सांगितलं. आप्पांच्याबरोबर तो नसेच अलीकडे.

तो जेवला. एकाद्याला गव्हर्नराच्या भेटीला जाण्याच्या वेळीं जशी घाई असते, तशा घाईगर्दीनें हातावर पाणी पडतांच कपडे करीत सिगारेटचे फवारे सोडीत आप्पा बाहेरून यायच्या आंत चालतां झाला.

सरलेच्या करुण विवाहाची गोष्ट मी विसरले. वसंत–सुलभेच्या लग्नाची हकीकत ऐकून मी बेचैन झालेंच होतें, पण सुलभेनं पंडितांना नाकारलं. त्यांना बावळटांत काढलं, या हकीगतीची माझ्या मनाला चुटपुट लागली. सुलभा माझ्यापेक्षा नटवीही होती आणि देखणीही होती. पण पंडितही कमी देखणे नाहींत. मग त्यांना तिनं का झिडकारलं? ते तिला बावळट कां वाटले? त्यानीं तरी तिला पसंत केलं असेल का? तिच्यापुढें मी तशी कांहींच नव्हे. मग त्यांना मी कशी पसंत पडेन? हे विचार माझ्या मनांत आल्याशिवाय राहिले नाहींत. पण सुलभेनं ज्याना नापसंत केलं त्यांना मी पसंत केलं याबद्दल मला खरोखरी आनंदच झाला. अन् मी पसंत नसले तर लग्न ठरवायला यायला ते तयार तरी कसे झाले असते? तेव्हां मी कशीही असो; त्यानीं पसंत केलंच आहे मला याचाच आनंद माझ्या मनाला.

आप्पा बाहेरून आले. कपडे काढून आंत आले. "कां! ताईबाई! झालंय का? वाढता कां आम्हांला? म्हणजे मी मोकळा होईन. तुम्हीही मोकळ्या व्हाल!" मला म्हणाले.

मी त्यांचें पान मांडलं. वाढलं. पाय धुतांधुतां आप्पांनीं माझी थट्टा केली. मला ऐकायला येईल असे आप्पा आपल्याशींच बोलले; "आज एका माणसानं स्वयंपाक मन लावून चांगला केला असेल. पण बेटं तें जेवायला येणारं माणूस आलं नाहीं म्हणून खट्टुही झालं असेल. पण आमचा त्याला काय इलाज! आमचा काय दोष? त्या माणसाला घेऊन येण्यांत हलगर्जीपणा करणाऱ्या आगगाडीला दोषी धरलं पाहिजे! जाब विचारला पाहिजे!"

मी खालीं पहात मनापासून हंसलं.

आप्पा जेवायला बसले. जेवणावर अशाच गोष्टी ते बोलत होते. वसंतानें सांगितलेली हकीकत–सुलभेबरोबर रजिस्टर पद्धतीनें लग्न करणार असल्याची हकीकत–आप्पांना सांगावी असें मनांत आलं. पण धीरच

होईना. त्यांना राग येईल, वाईट वाटेल. आताचं आनंदी-समाधानी वातावरण माझ्या सांगण्यानं पार बदलेल अशी मला भीति वाटली. मी कांहींच बोललें नाहीं.

आप्पाचं जेवण सपण्याच्या वेळीं नटली थटलेली सुंद्रा आत आली. नाकात भली मोठी नथ. कुंकवाचा मोठा टिळा लावलेला. नवं, त्याच्या चालीचं आगभर लुगड नेसलेली. कोंपराच्या पुढेंपर्यंत बटबटीत मोठ्या काठाची चोळी घातलेली सुंद्रा पाहिली. मला हंसू आलं तिला पाहून.

पण ती किती आनदात होती. ती दुरूनच, पण चागली जमीनीला डोकें टेकून आप्पाच्या पाया पडली. मला हाक मारून, माझ्याही पडली.

तिनें आपल्या सरशीच लग्न ठरवल होतं. लग्नाला वऱ्हाड निघाल होत. आप्पांना व मला सुंद्रानं "माझ्या पोरीच्या लग्नाला आलं पाहिजे. तुम्हींच पोरीच लगीन थाटून दिलांत. पैक्या अडक्याची सोय केलीत. आतां पोरीच्या डोक्शीवर तादूळ टाकाया आल्याबिगर राहूं नगा. तुमच्या पायाच्या कृपेनं सोयरा बी बेश मिळाला. चार बैलं हैती. कुणबावा मोठा हाय. सरशीला सुख बी लागल. माजीं दोन शेतामाळाची तुकडीं हैती, तीं बी बघील. जाडाजोडा इटुबारखमाईवानी हाय!-आलं पाह्यजे लग्नाला!-"

तेंच तेंच पण किती अगत्याने आप्पांना सांगितलं!

सरशीचं लग्न ठरलं. वऱ्हाड निघालं. सुंद्रा आप्पांचे आभार मानते. त्याच्या, माझ्यादेखील पाया पडते, आप्पाचे उपकार मानते.

ऐकून मला कौतुक वाटलं! आणि विशेष गंमत-त्या गरीब बिचारीच्या-अंतःकरणापासून मानाच्या-बोलावण्याला आप्पांनीं मान दिला.

"तुझ्या सरशीच्या लग्नाला येतों-चारूला घेऊन येतों-काळजी करूं नकोस" असं सांगून तिला निरोप दिला. बिचारी सुंद्रा किती आनंदांत-हंसतमुखानं गेली.

आप्पा मला घेऊन सरशीच्या लग्नाला गेले. गरीब कुणब्याच्या पोरीचं लग्न! ती जागा काय? ते लोक काय? त्यांच्या लग्नाची तऱ्हा काय? साराच हेंगाड्याचा प्रकार! तशा लग्नाच्या मांडवांत आप्पा व मी गेलों. पण सुंद्राला, सरशीला आमच्या जाण्यानें आनंद काय झाला! एक दिवस उभाउभीच आम्हीं तिथें होतों. आप्पा व मी गेल्यामुळें

सुंद्राला गगनांत न मावणारा आनंद झाला ! आप्पांनीं आपला मान ठेवला. आप्पा आले. तिला आप्पांच्याकरितां काय करूं, आणि काय न करूं असें झालें !

हिरवी चिरडीं नेसलेली, आंगभर पाढरें पातळ लपेटलेली, कोपरभर हिरव्या बागड्या भरलेली व पाढऱ्या शेल्याच्या बुरख्यांत तोंड लपविलेली, पाय, हात पिवळे केलेली, कपाळाला मोठे थोरले रंगीबेरंगी कागदाचें,बाशिंग बांधलेली सरशी–तिला पाहून मला हंसूंच कोसळलें. मी तिला हलकेंच हाक मारली. अन् ती जी काय लाजली म्हणता ! सांगायची सोयच नाहीं !

तिचा नवरा पण पाहिला. तरणाताठा, काळाच होता. पण भारी राकट ! तोही आपल्यापरी सजला होता. डोकीला मुंडासं. त्यालाच बाशींग बांधलेलं. अंगांत नवा मलमलीचा सद्रा–त्याच्यावर चित्रविचित्र शिलाई होती. पाठीवर मोरसुद्धा काढले होते. नेसतं आखूड धोतर, बरंच जुनं–मळलं होतं. आंगभर माखलेली हळद–आग काळं असल्यानें–हिरवीगार दिसत होती !

तें कांहीं असलं तरी सुद्राला आनंद झाला ! गरीबाच्या दारीं मोठ्यांनीं यावं, त्यानीं आपुलकीनं पहावं–आपलं म्हणावं–एवढेच त्याना मनापासून वाटतं. तेवढं केलं मनापासून मोठ्यांनीं म्हणजे झालं ! यापेक्षा जास्त त्यांना कांहीं नको असतं. देखाव्याच सहभोजन करून, मागून त्यांचा उपहास, तिरस्कार करण्यापेक्षा माणसानं माणूस ओळखलं म्हणजे पुष्कळ झालं ! तेंच आप्पांनीं सुंद्राच्या–सरशीच्या बाबतींत केलं. माणूस राखायची हीं आप्पांची रीत मात्र मोठी खोल, चांगली वाटली !

सुंद्राच्या सरशीचं लग्न झाले. सुंद्राच्या इच्छेप्रमाणे तादूळ टाकून आम्ही परतलों.

सरशीला आपल्या नवऱ्याबद्दल काय वाटत असेल ? तिच्या नवऱ्याला तिच्या बद्दल काय वाटत असेल ? त्यांचीं लग्नं कशी होतात ? लग्नाकडे पाहण्याची दृष्टि त्या लोकांची काय असते ?...' माझ्या मनांत येत होतें.

आप्पांना मधूनमधून त्याबद्दल मी विचारीत होतें. लग्नांतल्या गमतींचा विचार करीत होतें; त्यांचा चांदवा निघालेला. आंगभर गोषा

घेऊन चांदव्याखालून गाणीं गात आणि हातांत बेगड चिकटविलेले नारळ घेतलेल्या बायका वाजत गाजत चाललेल्या; चादवा धरणाऱ्यापैकीं एकाच्या हातांतील अडकित्त्याला लिंबू खोंचलेलें. त्या सर्वांची माहिती मी आप्पांना विचारली. त्याना तरी सगळी कुठली माहित ? तरी त्यानीं ऐतिहासिक–धामधुमीच्या काळांत लग्नाच्या पद्धती बसविलेल्या आहेत असें काहीं सांगितले.!

पण ते लोक अडाणी असले तरी, त्यांच्यांत लग्नाकडे पाहण्याची दृष्टि आणि त्याच्या रीतीं,सुधारलेल्या आणि पुढारलेल्या लोकांच्या लग्नांतील चालीरीतीपेक्षां आणि तऱ्हेपेक्षां शतपटीनें चागल्या आहेत असें आप्पा म्हणाले.

आप्पा–आणि आप्पांच्यापेक्षा मी रोज डाकेच्या वेळीं एका पत्राची वाट पाहूं लागलें.

काहीं झालं तरी लग्नाची बाब ! अगोदर जुळतें कसें, जुळलें तरी धडपणीं अखेरपर्यंत नीट–निर्विघ्नपणे पार पडतें कसे ? याचीच काळजी असते. कोणी दुष्टपणानें, तर कोणी मूर्खपणानें मध्यें बिब्बा घालतात. प्रेम बाजूला पडतें. व्यवहार आड येतो. मानपान जाचक होतो. कुणाच काहीं कुणाचं काहीं उगीचच उपस्थित होतं; कुणी आजारी पडतं; मरतं; अपशकून होतो !

पंडितरावांच्या पत्रांत, त्यांच्या येण्याला जसजसा विलंब लागूं लागला, तसतशी मलाच काय, पण आप्पांनासुद्धा काळजी वाटूं लागली. ते वरचेवर उद्गारूं लागले.

तसं पडितरावांचें आणि आप्पाचें समोरासमोर बोलणं तरी झालं होतें! कुठं केव्हा त्याची भेट झाली होती ? केव्हा काय बोलण झालं होतं ! पण त्यानंतर पुढचा सगळा पत्रोपत्रीं कारभार !

त्याचे वडील–दाजीसाहेब त्याचं नांव–श्रीमंत होते तरी मोठे चमत्कारिक स्वभावाचे होते म्हणे ! स्वतःच्या कर्तबगारीवर श्रीमंत झालेले–अभिमानी आणि उर्मट ! ते पंडीतरावांकरितां मुली पहात होते. आपण पाहिलेल्या मुलींपैकींच पंडितरावांनीं मुलगी पसंत केली पाहिजे, असा त्यांचा हट्ट होता. त्यांत पिता–पुत्रांचं बिनसलं होतं. तरी पंडितराव

आपल्यापरी वडिलांची—दाजीसाहेबांची समजूत काढण्याचा आणि त्यांचे मन संभाळून आपल्या मनासारखं व्हावं, अशा खटपटींत होते.

त्यांची वारंवार जीं आप्पांना पत्रें येत; त्या पत्रांतील लिहिण्याच्या झोंकावरून आम्हांला वाटत होतं तसं! नाहीं तरी आम्हांला काय कळणार? पण वाट पाहतां पाहतां एक दिवस सकाळीं स्वारीचं पत्र आले नी लगेच दुसऱ्याच दिवशीं सकाळीं स्वतः येणं झालं!

मग माझी काय तारंबळ! आप्पांची कोण गडबड! दारांत टांगा थांबल्याचा भास झाला. खुद्द आप्पा सद्याची गुंडी गडबडीनें घालीत आणि कसाबसा रुमाल डोक्याला गुंडाळीत निघाले. दरवाजांपर्यंत भावी जामाताला सामोरें जाईपर्यंत आप्पांची कोण त्रेधा!

स्वारी हंसतमुखानें दारात पाय ठेवतांना दिसली. मी आंतूनच डोकावून पाहिलें. मला भारी भारी आनंद झाला!

आप्पांनीं बाहेरूनच मोठ्यानें मला हांक मारून सांगितलें—"ताईसाहेब, पाहुणे आले बरं का? चहा घेऊन या लवकरच बाहेर!"

मी चहा फराळाचं घेऊन बाहेर निघालें. पण आता पहिल्या दिवशींची मी कोठें होतें? अन् पहिल्या दिवशींची अनोळखी पाहुण्याची स्वारी तरी कुठें होती? बाहेर जातांना हृदय धडधडायला लागलं! आनंद मनांत मावत नव्हता अन् हृदयाचं धडधडणंही थांबत नव्हतं!

चहा फराळाचं मी छोट्या टेबलावर ठेवलं! परत निघालें. आप्पा म्हणाले, "कां ग ताई, निघालीस! पंडितरावाना लाजायचं इतक्यांतच काहीं कारण नाहीं तुला? थांब ना जरा!"

"ओळख आहे ना अनोळखी पाहुण्याची?" पंडितानींही आप्पांच्या समोर विचारायलां कमी केलं नाहीं!

"पहिल्या खेपेला अनोळखी!-आतां अनोळखी म्हणून कसं चालेल?—नाहीं ग ताई?" आप्पा त्यावर म्हणाले.

आमचं लग्न ठरलं. स्वारीचे वडील लग्नाला आलेच नाहींत. ऐन वेळीं काय चारदोन मित्रमंडळीच तेवढी आली.

आप्पांनीं आपल्या विचाराप्रमाणें–अगदीं वैदिक पद्धतीनें लग्न व्हावें अशी इच्छा प्रकट केली. रजिस्टर करायचें असेल तर त्याला आपली ना नाहीं असेंही सांगून टाकलें.

स्वारीनें आप्पाच्याच इच्छेचा पुरस्कार केला. रजिस्टर पद्धतीबद्दल बोलताना स्वारी म्हणाली,

" वडिलाचा या लग्नाला विरोध आहे. त्याच्या इच्छेप्रमाणें मी वागलों नाहीं. त्यांची इस्टेट त्यानीं कमावली आहे. ते मला देणार नाहींत. मी त्यावर आपल्या मताप्रमाणें वागता यावें म्हणून स्वेच्छेनें, आनंदानें आणि स्वाभिमानानें पाणी सोडलें आहे. वडिलांची इस्टेट मी घेईन; त्याची वासलात मी लावीन आणि माझ्या अर्धांगीचे हाल होतील; तसें होऊं नये, म्हणून रजिस्टर पद्धतिनें लग्न लावून, कायदेशीर रीतीनें माझ्या पत्नीला मला अडथळा करता यावा म्हणूनच लग्न करावयाचें कीं नाहीं? पण ती ब्यादच नाहीं. यापुढें मीच मिळविन तेव्हा इस्टेट मिळणार मग पुढची तरतूद आतां कशाला? ज्याला चांगलं वागावयाचें असेल त्याला वैदिकपद्धतीच्या लग्नबंधनाचा संस्कार पुष्कळ आहे!"

–आणि आमचं मंगलकार्य मंगलवाद्याच्या मधूर आलापांत ब्राह्मणाच्या संस्कारपूर्ण मंत्र घोषांत लागलें!

–आप्पा–माझे आप्पा! त्यानीं अगदीं–अगदीं माझ्या मनासारखं केलं!

–धर्मसत्तेनं आम्हीं परस्परांच्या प्रेमाचा ताबा मिळविला!

–मी आनंदानें फुलून फुलून रडलें!

— —

प्रकरण साहवें

# सुलभा.

"या तुम्ही चारुताई !"

मला पहातांच मायाकाकूनीं-सुलभेच्या आईनें-माझें मोठ्या आनंदी मुद्रेनें स्वागत केलें. मला जवळ बसवून घेऊन त्यांनीं माझ्या पाठीवरून मायेनें हात फिरविला.

माझ्या लग्नानंतर बापघर सोडून आपघरीं मी दुसरे दिवशीं जाणार होतें. शेजारीपाजारीं ओळखीच्या माणसांना भेटलें. तसेंच सुलभेला भेटावें असें मनांत आलें. त्याकरिता मी तिच्या घरीं गेलें होतें.

सुलभा माझ्या घरीं लग्नाला आली होती. अगदीं खूप नटून थटून आली होती. ज्यांना तिनें नाकारलें होतें, त्यांच्याच गळ्यांत मीं विवाहमाला घातली होती. सुलभेनें नाकारल्याचं रहस्य वसंतानें मला सांगितलें होतें हे तिला माहित नव्हतें.

लग्नाच्या समारंभांत ती माझ्याशीं बोलली, हंसली. तिनं माझी थट्टामस्करीही केली. माझ्याशीं बोलतांना मधूनमधून ती तिकडे·आढ्येतेनें, कुर्यानें आणि तुच्छतेनेंही पाही, हेंही मी पाहिलें होतें. पण उघड तीही काहीं माझ्याशीं बोलली नाहीं. मला बोलण्याची काय गरज होती? तिच्या मनासारखं झालं होतें. आतां तिकडे अशा दृष्टीनें पाहण्याची तिला गरज नव्हती. पण मनुष्यस्वभाव ! त्याला काय करणार ? माझ्या मनासारख झालं होतं. मला तिच्या त्या चमत्कारिक नजरेनं पाहण्याचा राग येत नव्हता ! उलट तिच्याबद्दल एकपरी हंसूंच येत होतें. पण उघड हंसून मी तिचा उपहास-तिरस्कार केला नाहीं.

मला हवा होता तो आनंद परमेश्वराच्या कृपेनें, आप्पांच्या, आईच्या आशिर्वादानं आणि माझ्या चांगल्या नशीबानें मला मिळाला होता. अशा

त्या आनंदांत सुलभेच्या स्वभावधर्माप्रमाणें ती माझ्याशीं कशीही वागली, माझ्या आवडत्या माणसाकडे ती तुच्छतेनें पहात राहिली, तरी तिचा तिरस्कार करण्याचें मला काय कारण होतं ?

प्रचंड प्रेक्षकसमुदायाने नव्या नाटकाचा पहिला अंक पाहूनच नाटककाराला आणि नटाना यशाचें प्रशस्तीपत्र द्यावें म्हणजे नाटककाराच्या आणि नटाच्या मनात ज्या प्रकारच्या आनंदाच्या ऊर्मी उठतील, त्यावेळीं त्याना प्रेक्षकातील दहापाच वाकड्या बुद्धीच्या, विकृत स्वभावाच्या प्राण्यांनीं नाकें मुरडलीं, तर त्याचा संपर्क ते लावून घेत नाहींत, त्यांना त्याची बाधा होत नाहीं, ते आपल्याच आत्मानंदांत गर्क असूं शकतील, तशीच चालू स्थिति माझी होती !

त्याच आनदाच्या अवस्थेत सुलभेला भेटावयाला मी गेलें होतें. पण त्या वेळीं ती घरीं नव्हती. घरांत जातांच बाहेरच्या सोप्यांत सुलभेच्या वडिलांनीं माझी विचारपूस केली. स्वयपाक घरात मायाकाकूंनीं माझें वर सांगितल्याप्रमाणें हार्दिक स्वागत केलें.

सारें जग माझ्याकडे आनंदानें आणि कौतुकानें पहात आहे— माझ्या लग्नानें माझ्या आयुष्याच्या नाटकाचा पहिला यशस्वी अंक संपला होता, त्याचा मधुर परिणाम मनांत खेळत होता— अवघें जग माझ्याकडे त्याच दृष्टीने पहात आहे हें मायाकाकूनींही मला गोड शब्दांनीं आणि पाठीवर हात फिरवून अनुभवाला आणून दिलें होतें. मग माझ्या आनंदांत आणखीभर पडल्याखेरीज कशी राहील ?

" उद्यां जाणार म्हणे तूं चारुताई आपल्या घरीं ?—आज सकाळीं वसंत सांगत होता ! बरं झालं बाई ! ससाराला लागलीस-छान झालं !— आप्पासाहेबांनीं भारी चांगलं केलं तुझं !—आम्हांला आनंद झाला ! केव्हा निघणार ग तूं उद्या ?—" मायाकाकूं जिव्हाळ्यानें माझ्याशीं बोलूं लागल्या.

" उद्यां रात्रींच्या मेलनें ! " मी उत्तर दिलं. अन् पुढें विचारलें; सुलभा कुठें आहे ? "

" सुलू का ? गऽ बाई ! ती कुठं न् काय ? क्षणभर कां तिला स्वस्थ घरांत बसून देतंय कोण ?—"सुलभेचं नांव माझ्या तोंडांतून निघायच्या

अवकाश ! मायाकाकूंनीं आपल्या लाडक्या लेकीचं आवडतं पुराण एकदम माझ्यापुढें सांगायला सुरुवात केली:—

" सकाळीं नुसता चहा घेऊन सुलू गेली आहे ती अजून आली नाहीं ! वेळेला जेवायला देखील यायला होत नाहीं तिला आताशा कारण कॉलेजच्या गॅदरिंगचें नाटक आहे ना म्हणे लवकरच ! त्यांत सुलुनं भाग घेतला आहे. काम करणार आहे ? तिचीं व्याख्यानं, तिचीं संमेलनं, तिचं नाटक, कांहीं विचारूं नकोस तिची धांवपळ ! शहाण्या अन् हुषार मुलींना कुणी क्षणभर चैन पडूंच देत नाहीं का ग ? सुलूच्या प्रोफेसरांचा आग्रह तिनं नाटकात काम केलंच पाहिजे. व्याख्यानं दिलींच पाहिजेत. ती चांगली आहे, हुषार आहे. काम चांगलं करते म्हणतात ! म्हणून काय झालं ग ? तूंच सांग चारु, तिच्या जीवाकडे कुणी पहायला नको का ? तिचा जीव तो काय अन् तिच्या मागें तसदी लावायची ती किती ?

" अन् आमच्या सुलूचा स्वभाव पडला भिडस्त ! तिला कुणाला स्पष्ट शब्दानं तोडवत नाहीं. साऱ्या गडबडींत तिला अभ्यासालासुद्धा घटकाभर फुरसद मिळत नाहीं बघ ! बाहेरून अशी थकून भागून येते, कीं कांहीं विचारूं नकोस ! तिला जेवायलासुद्धां नकोसं होतं; मग अभ्यासाचं पुस्तक उघडायला त्राण उरणार कुठून ?

" तिला स्वत:ला नाटकांत काम करण्याची हौस आहे; गाण्याची आवड आहे; समाजांत पुढें पुढें व्हावं असं पण तिला मनापासून वाटतं, हें पण खरं आहे, तिला ज्यांत आनंद वाटतो, तें करायला आम्हीं तरी नको म्हणून तिचा हिरमोड कां करावा ? नाहीं का ?

" बाकी, सुलू आमचं ऐकायला बसली आहे थोडीच म्हणा ! मी तिला असं कीं तसं मुळीं कांहीं सांगतच नाहीं नी माझं ऐकतही नाहीं ती! पण खरं म्हणजे आम्हीं तिला सांगायचं तरी काय ? आम्हांला तिला सांगण्याइतकं कळतंय तरी काय ? ती उ· आम्हांला सांगते, शिकवते हो

" स्वारीसुद्धां सुलूला कांहीं एका शब्दानं बोलत नाहीं. एकुलती एक पोर, त्यातनं आमच्या दैवानं हुषार न् तरतरीत आहे.मग बोलणार कोण तिला ? तिच्या सद्गुणांच्या नी शहाणपणाच्या तोलाकडे पाहिलं म्हणजे

आम्हांला तिचं कोडकौतुकसुद्धां मनाप्रमाणें करतां येत नाहीं. आम्हांलाच वाईट वाटतें. तरी बरं का, होईल तितकें स्वारी आनंदानं नी अभिमानानें सुलूच कांहीं उणं पडूं देत नाहीं हो ! म्हणायचं होतं, आहेत कुठं आपल्याला दहापाच मुलं ? एकटी पोर ! आपला जीव गहाण ठेवून पोरीच्या हौसेमौजेसारखं आपणाला नको का करावयाला ? घरची गरीबी जन्मालाच पुजली आमच्या! म्हणून पोरीला का त्याची जाणीव देऊन झळ लावायची ? आतापासूनच का तिला हिरमुष्टी करून गरीबीच्या दुःखाचे चटके द्यायचे ?

" पुढं तिच्या नशीबानं काय व्हायचं असेल तें कुणास ठाऊक ? पण आपल्या हातात आहे तेवढं, करून सुलूला आनंदात ठेवायला नको का आम्हाला ?–

" आणखी बरं का चारु, आमची सुलूसुद्धा शहाणी हो ! तिला हें सारं समजतं ! मला आणखी स्वारीला त्रास होतो हें तिला ओळखूनं, एकादा जिन्नस–जिन्नसवार पातळच म्हणेनास एकादं– मागायचं तिच्या जीवावर येतं. मागत नाहीं ती ! " पण चार मित्रात नी मैत्रिणींत जर तिला वावरायचं असतं–तेव्हा तिन मागितलं नाहीं, तरी आम्हींच समजून तिची संजोगणा करायला नको का ? "

सुलभेच्या घरीं मी गेलें नी सुलभा बाहेर गेलेली असली, माया-काकूंचीच भेट झाली कीं, मला नेहमींच मायाकाकू वरील सारें पुराण ऐकवीत. मला नवीन कांहींच नव्हतें. सागायचं त्यांनीं नी ऐकायचं मी ! आतां तितक्याच भक्तिभावानं मी ऐकत होतें. त्या जरा मध्येंच थांबल्या. पुन्हां त्यांना आणखी सुलभेबद्दल नवीन सांगायची आठवण झाली. मी कांहीं मध्येंच त्यांना विचारणार तों त्याच सांगूं लागल्या

"काय गंमत आहे बघ चारु; आमची सुलभा, पण आम्हीं तिच्या-करिता तसं कांहींच करीत नाहीं. तिला गाण्याची, चित्रकलेची, अभिनयाची, पोहण्याची व विलायती खेळांची भारी हौस–तुला माहितच आहे. तुझी मैत्रिणच ती–तेव्हां तुला माहित नाहीं थोडेंच आहे ? पण पैसे टाकून तिला सारं शिकवायचं म्हटलं तर आम्हांला कसं शक्य आहे ? पण देवच सुलूचा वाली आहे हो !–वेळ मोडून आणि उद्योग सोडून आप्पा कवठेकर सुलूला गायला नी वाजवायला शिकवतो. चित्रकार नाईक

तसेंच मन लावून शिकवतात. नाटकांतला अभिनय शिकवण्याचं अवघड नी जिकीरीचं काम तुझ्या वसंतानं हौसेनं आपल्याकडे घेतलें आहे. सुलू म्हणतेच मुळीं कीं, अभिनय शिकवावा तर वसंतानेंच! काय–त्याचं ती वर्णन करते म्हणतेस!–कुठं ग एवढ्या वयांत वसंत तो अभिनय शिकलाय? तसंच पोहायला नी विलायती खेळांत प्रविण करायला भय्यापंत किती खटपट करतो म्हणतेस?–कुणी त्यांतलं–एक पैसा का मागत त्याकरितां?–सुलूसाठीं ते सारे किती मेहनत घेतात बघ!–आजच्या काळात कोण कोणाकरितां असें झटणार आहे ग?–तूंच साग. –

आईचा जीव!–मायाकाकूना सुलभेबद्दल काय सांगावें नी किती सांगावें?–किती गुणवर्णन करावें आणि कसं कौतुक करावं असें होऊन गेलें होतें! त्यात माझ्यासारखी श्रद्धेने निमूट ऐकणारी मी त्याना सांपडलेली! मग त्या काय सागायला कमी करणार?

आतां त्या जरा थांबल्या. “अजून कशी सुलू आली नाहीं? तूं तिच्यासाठीं येऊन जायला खोळंबली आहेस. पण आता इतक्यांत येईल ती. तुझी तिची भेट झाल्याखेरीज बरीक जाऊं नकोस तूं. गेलीस म्हणजे येशील कधीं नी भेट होईल कशी कुणास ठाऊक?” असें त्या म्हणाल्या; पण नंतर तेवढ्यावरच त्या थांबल्या नाहींत. “किती दिवसांनीं तूं आली आहेस तर तुला कांहीं खायला प्यायला नको द्यायला मला? सुलू नी तूं मला काय दोन आहांत? सुलू तशी तूं! त्यांतून तूं उद्यां आपल्या घरीं जाणार. थांब अशी जायला चुळबुळ करूं नकोस! आतां इतक्यांत कांहीं खायला करतें, चहा करतें–नंतर सुलू पण येईल.” असें म्हणत म्हणत मायाकाकू खायला-प्यायला करायच्या तयारीला लागल्याच! शेगडींत कोळसे टाकून फुलवीत आणि कपाटांतील सामान, फळीवरचीं भांडीं जवळ घेत, मायाकाकू माझ्याशीं कांहीं कांहीं आणखी इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत होत्याच. बोलण्याचें अवधान सुटून त्या चहा, फराळाच्या नादांत गुंतल्या.

[illegible] मनांत मायाकाकू आतांपर्यंत सुलभेबद्दल जें जें बोलल्या, त्यांतल्या [illegible] ठळक गोष्टीच यायला लागून मी त्यावरच विचार करूं ला[illegible]

सुलभा, वसंत, तिचे बाकीचे मित्र, प्रोफेसर्स, मायाकाकू, सुलभेचे वडील, त्यांचें परस्पराशीं वागणें, सुलभेकडे कोण कोण, कोणकोणत्या दृष्टीनें पहात आहे, ती त्या लोकांकडे कशी पहात आहे, तिच्याबद्दल तिच्या आईवडिलांच्या कल्पना काय आहेत, तिच्या स्वतःच्या कल्पना काय आहेत ! आणि एकंदर वातावरण कसें आहे ! याबद्दलचा उगीचच कांहींच्या बाहीच विचार मनांत येऊन मनाची कांहीं विलक्षण अवस्था झाली.

तितक्यांत बाहेर कोणी तरी मोठमोठ्यानें बोलत असल्याचा आवाज माझ्या कानीं आला. माझें चित्त तिकडे वेधलें. बोलणारापैकीं एक आवाज सुलभेच्या वडिलांचा होता. तो मला परिचित होता. दुसरा अनोळखी आवाज होता. सुलभेच्या वडिलाचा आवाज सौम्य, नम्र आणि खालच्या स्वरांत होता. दुसरा अनोळखी आवाज कर्कश, कठोर, रागीट आणि रुक्ष होता.

माझ्या प्रमाणेंच मायाकाकूंचेही लक्ष बाहेरच्या बोलण्याकडे गेलेंच, त्यांनीं तिकडे कान दिला. त्या सरशीं त्यांचें तोंड खर्रकन् उतरलें. त्या रंजिस झाल्या !

चट्कन् बाहेर जाऊन तें बोलणें थांबवावें, मोठमोठ्यानें बोलून अकांडतांडव करणाऱ्या दुसऱ्या गृहस्थाला एकदम बाहेर हांकून लावावा, असेंसुद्धा त्यांना वाटलें असावें. माझ्याकडे तेवढ्यांत त्यांनीं ओशाळतें पाहिलें. मी यावेळीं तेथें नसतें तर बरं झालं असतं, असं माझ्या मनांत आलं. त्यांनादेखील तसेंच वाटलें असेल. नव्हे, त्यापेक्षां, "ही तेथून निघून जाईल यावेळीं तर फार चांगलं होईल, आपल्या अब्रूचे धिडवडे हिच्यासमोर नकोत निघायला !" असेंसुद्धां त्यांना वाटलें असेल.

कारण बाहेरचं बोलणंच तसें होतें !

बाहेर बोलणं चालू होतं,

"जसं आतांपर्यंत संभाळून घेतलंत शेटजी, तसंच आणखी थोडे दिवस संभाळून घ्या मेहेरबानी करून ! मी तुमचं सारं देणं देऊन टाकतों लवकर !–" खालच्या स्वरांतला अजीजीचा हा आवाज सुलभेच्या वडिलांचा होता.

" हें पहा रावसाहेब, हे वायदे आजपर्यंत मी पुष्कळ ऐकले आहेत. दिवाणजीला शंभर हेलपाटे दिलेत. त्यांना तोंड चुकवतां. मी स्वतः दहा वेळां आलों, मलाही गुंगारा दिलात. आतां मी तुमचा वायदा ऐकायला मुळींच तयार नाहीं. तुम्हांला राजामहाराजाच्या थाटानें–ऐटीनें रहायला पाहिजे. तुमची कोणती चैन कमी आहे हो ?–"

" अहो, पण शेटजी–"

" अहो नाहीं आणि पण नाहीं. मिजास राजाची आणि नांदणूक भडबुंजाची ठेवतां का आणि आमच्या सारख्याच बोलून घेता का ? ऐपत नाहीं, मिळकत नाहीं, तरी जगाच्या जिवावर एवढ्या थाटात राहायला सांगितलं कोणी तुम्हांला ?–सहा महिन्याचं तुमचं घर भाडं थकलं म्हणून तुमच्या नांवानं तुमचा घरवाला आमच्याकडे ओरडत होताच, कोणा कोणाला तुम्हीं बुडावायचा विचार केला आहे तें तरी कळूं द्या ? दूधवाला, धोबी, मोलकरीण, दाणेवाला, सारे तर तुमच्या नावानें ओरडताहेत–मी माझ्या कानांनीं ऐकलं आहे ना ?–

" माफ करा म्हणतों ना शेटजी !–आता जास्त–"

" माझी बाकी टाका. राहिलं. बोलायचं नडलं आहे काय माझं !–माफ करा म्हणे ! घरीं रेडिओ लावता ! बाजाची पेटी आहे. तुमची मुलगी सायकलशिवाय फिरत नाहीं. दिवसांतून दहा वेळा पोषाख बदलतां येतील इतकीं पातळं आणि लुगडीं आमच्या दुकानांतून घेऊन आलांत मोठ्या तोंडांन–मीं म्हटलं जाऊं द्या, माझी मुलगी काय आणि तुमची मुलगी काय एकच ! हौस आहे माणसाला. करूं द्या हौस. म्हणून तुम्हीं न बोलतां थाबलों. तगादा केला नाहीं.

बोला, आजपर्यंत इतकं तोडून मी तुम्हांला कधीं बोललों होतों. तुम्हीं ही बोलण्याची पाळी आणली. मला फार वाईट वाटतं; पण काय करणार! आमच्या नरड्याला गळफांस लागायची वेळ आली तरी तुम्हांला सवलती द्यायच्या किती आणि वायदे ऐकायचे किती ? "

हें आणि असेंच कितीतरी तो परका गृहस्थ सुलभेच्या वडिलांना एकसारखा टाकून बोलत होता.

मला तें ऐकवेना. अगदीं चोरट्यासारखं झालं मला. बसलें तरी पंचाईत निघालें तरी पंचाईत अशी माझी स्थिति झाली. मायाकाकूंच्या तोंडाकडे पाहाण्याचा धीर मला होईना. मी खालीं जमीनीकडे पहात मुकाट्यानें बसलें.

—घरच्या गरीबीच्या अशा परिस्थितींत आपल्या ऐपतीबाहेर वागणं, आपल्या मुलीला सुलभेला वागविणं चांगलं का? उरीं ऋण अन् दारीं पेव—आपले आप्पा म्हणतात, तसेंच वागतात; तसें सुलभेच्या आई—वडिलानीं का वागूं नये?

—सुलभेनं तरी असं का वागाव? ती काहीं आतां लहान नाहीं. घरची खरी परिस्थिति तिला न समजण्याइतकी काहीं ती असमंजस—अज्ञानी खचित नाहीं. तिनं आपलं बेफाट-वागणं समंजसपणानें सोडूं नये कां?—

—माझ्या मनात हे विचार इतक्या त्वेषानें येत होते कीं काय सांगूं? पण त्यांचे हे विचार मला येऊन काय उपयोग? ज्याचे त्यालाच यायला नकोत कां? मला विचार आले, मी एकादवेळीं सुलभेजवळ बोलून दाखविले तरी त्याचा उपयोग काय!

—या लोकांना लोकांचं असं बोलून घेववतं कसं? सहन होतं कसं? स्वतःची परिस्थिति ओळखून आपल्या वागण्यांत बदल कसा करतां येत नाहीं? याचं मन मुरदाड कसं बनलं? देणेदारांची हवीं तशीं बोलणीं ऐकून त्यांना घशाखालीं अन्न कसं जातं? श्रीमंती थाटानं ल्यावं, नेसावं कसं वाटतं! फाटकं नेसूं, ओलं कोरडं खावूं पण कुणाचं फट् म्हणून घेणार नाहीं, असा स्वाभिमान कसा नसतो या लोकांना?

जिवाचे लचके तोडणारी बोलणीं ऐकून घेऊन, समाजांतल्या खोटेपणाच्या—मोठेपणाला भलत्या धुंदीनें बळी कां पडतात हे लोक?

अशा विचारांनीं मला भंडावलं. सुलभेचा, मायाकाकूंचा आणि सुलभेच्या वडिलांचा मला राग आला. त्यांची चीड आली न् कींवही पण आली!

—सुलभा इतकी शहाणी असून ती खुशाल बेफाट वागते कशी?— मायाकाकू, सुलभेचे वडील स्वस्थ बसतात कसे? डोळे उघडून आपली परिस्थिति न्याहाळीत कां नाहींत? सुलभेला समजावून कां देत नाहींत?—

—त्या बोलणाराची काय चूक होती? तो वाईटसाईट बोलला हें खरं. पण—माझ्या विचाराच्या भरात बाहेरचं बोलणं बंद केव्हा झालं, परका माणूस गेला केव्हा, हें मला कळलंच नाहीं. मी त्या त्रासदायक विचारांत आणखी तशीच किती वेळ गुंतलें असते कोण जाणें.

इतक्यांत बाहेर तीनचार जणांच्या हंसण्याचा-मिश्र हास्याचा मोठा आवाज आणि त्या मागोमाग "आई, आई, काहीं तरी खायला केलंस कां तरी मला? कढत कढत चहा हवा आहे बाई मला अगोदर! कुठं आहेस तूं आई?"

हीं वाक्यें माझ्या कानावर आलीं. मी खडबडून वर पाहिलें.

"सुलू आली!"

"सुलभा आली!" माझ्या आणि मायाकाकूंच्या तोंडांतून जवळ-जवळ एकदमच शब्द बाहेर पडले. अन् सुलभा तेवढ्यात आमच्या-समोर येऊन उभी राहिली. बदामी रंगाचें भारी किंमतीचे गोल नेसलेली तें तिचें पातळ, तसल्याच रंगाचा आंगातला तिचा ब्लाऊज, दोन बाजूस पुढें सोडलेल्या तिच्या त्या दोन वेण्या, मनगटावरचें सोन्याचें घड्याळ-कानांत नटीसारखे मोत्यांचे हेलकावे घेणारे घातलेलें एरिंग; तिचा तो थाट पाहिला न् मी थक्क झालें.

पण त्याहीपेक्षां जास्त जी मी थक्क झालें ती, मायाकाकूंनीं सुलभेला पाहतांच, क्षणभरापूर्वीचा त्यांचा रंजीस झालेला, उतरेला चेहरा होता तो एकदम बदलून, आनंदी, हंसरा झालेला पाहिला, हे पाहून!

"आलीस बाई एकदांची! बरं झालं! ही चारु तुझ्यासाठीं केव्हांची तिष्ठत बसली आहे इथं येऊन! बरी वेळेवर तरी आलीस!—हं बैस आतां हिच्याजवळ!—" असें म्हणत मायाकाकूंनीं खायला केलेलं बशांत घालून आम्हां दोघीपुढें ठेवलं!

सुलभेचं माझ्याकडे आतां लक्ष गेलं. इतका वेळ ती आपल्याच नादांत गुंग होती. आपल्या आईला आणखी कांहीं बोलणार होती कीं

काय कुणास ठाऊक. पण एक तर ती येतांच तिच्यापुढें खायला ठेवलेली बशी ठेवली आणि चहाचा कप ठेवला! आणि दुसरें, मी तिच्या दृष्टीस पडलें!

आतां तिनें माझ्याकडे मोर्चा वळविला!

"ओहो! बाईसाहेब! आलांत का तुम्ही? झाली का आमची आठवण?–म्हटलं येतेस का तशीच जातेस! पण आलीस! चागलं झालं हं!–" सुलभा बोलली.

सुलभा बोलली. मी नुसती हंसलें.

पुन्हां बाहेर हास्याचा मिश्र आवाज ऐकला. तेव्हां सुलभेला आठवण झाली. ती मायाकाकूंना म्हणाली, "आई, चहा आणखी आहे ना? भय्यापंत आलाय, नाईक आहे, आण्णा कवठेकराला तर मी जवळ जवळ ओढीतच घेऊन आलें आहें. त्यांना नको का चहा–फराळाचं द्यायला?. माझ्याबरोबर माझ्याइतकेच तेहीपण दमले आहेत मला शिकवून! भारी बाई आज दमायला झालंय. वाटतं तें समेलन नको नू तें नाटक नको!—आम्हा सगळ्यांना चहाही हवा आहे नी फराळाचंही पण हव आहे हं! थोडं केलं असलंस तर जास्त कर बाई आई अगोदर!– थाब हं, मी त्यांना सागून येतें–चहाफराळ झाल्याशिवाय जाऊं नका म्हणून!–नाहीं तर बाहेरच्या बाहेरच ते पसार व्हायचे मला न विचारतां!–"

मध्येंच माझ्याकडे वळून ती म्हणाली, "तुझा वसंत भारीच बाई विक्षिप्त!–त्याला किती आग्रह केला मी यायला–पण चक्रम्‌सारखंच केलं त्यानं!–मध्येंच त्यानं यःपलाय केलंन्‌!–पण चल. तो नाहीं तर तूं सांपडलीस!—आईचं होतय तोंपर्यंत आपण सारींचजणं बोलत बसूं बाहेर!"

माझ्या हाताला धरून ती ओढूंच लागली. मला बाहेर जाण्याची इच्छाच होईना. "नको ग! बाहेर कशाला? इथंच बसूं ये कीं!" मी न उठतांच म्हणालें.

तेवढ्यांत मायाकाकूंनाही काय वाटलं कोण जाणें; त्या म्हणाल्या, "तिला कशाला बाहेर नेतेस? माझ्याजवळ बोलत बसलीय, बसूं दे तिला. त्याच मंडळींना हवी तर इथं बसायला घेऊन ये म्हणजे झालें!"

सुलभा बाहेर गेली. भय्यापंत, नाईक आणि आण्णा यापैकीं कोणीच आंत आले नाहींत. ते बाहेरच बसले. माझ्या ते सारे ओळखीचे होते, पण माझा त्याच्याबद्दलचा ग्रह कांहीं तितकासा चांगला नव्हता-म्हणून मी बाहेर जायचं खरोखरीं टाळलं. त्यांना थांबायला सांगून सुलभा पुन्हां आंत आली.

मायाकाकूंनीं फराळाचं पुष्कळ केलं होतं. चहाही सगळ्याकरितां केला. सुलभा त्या मंडळींना चहा वगैरे बाहेर देऊन आली. माझ्या जवळ फराळाला बसली.

नाटकाच्या, अभिनयाच्या आणि गाण्याच्या तालमीच्याच तिनें गोष्टी काढल्या. त्याला चित्रपटाच्या आणि सिनेमानटींच्या गोष्टीबद्दलचीही जोड दिली. मला वाटले ती माझ्याबद्दल बोलेल, माझी विचारपूस करील. पण तें तिच्या गावींच नव्हतं! तिच्या त्या गोष्टी मला कांहीं आवडेनात!

चहा–फराळ होई पर्यंत मला तिच्या तसल्याच त्या गोष्टी निमूट ऐकाव्या लागल्या.

मी होऊनच जर तिला भेटायला गेलें होतें, तर माझ्याशीं हें बोल नी तें बोल असं तिला मी कशी म्हणणार?

मी घरीं जायला निघालें. काकूंना विचारलं. सुलभेला विचारलं तेव्हां आतां कुठें मायाकाकूंच्या लक्षांत आलें आणि त्या तिला म्हणाल्या, "सुलू, अग चारु उद्यां आपल्या घरीं जाणार आहे. तुझा निरोप घ्यायला आली आहे. तिला नीट निरोप दे!–"

"असं होय!–अय्या!-चारु उद्यां का जाणार तूं? अस्सं! त्या चक्रमय्यानं तुझ्या गळ्याला लग्नाचा फास तर लावलाच. अन् आतां तो उद्यांच तुला पळवणारही म्हणायचा!" सुलभा म्हणाली आणि आपणच मोठ्यांदा हंसली!

माझ्याकडे आणि सुलभेकडे मायाकाकूंनीं पाहिलें. तिच्यावर त्यांनीं डोळे मोठे केले; "असं काय सुलू कांहीं तरी बोलावं ग!" असें म्हणाल्या; पण त्याबरोबर लाडक्या लेकीच्या बोलण्याचं कौतुक वाटून त्याही हंसल्या.

मला भारी चमत्कारिक वाटलें. दोघींचाही मला राग आला. "कुठून आलें भेटायला" असें वाटलें.

मी उठलें. सुलभा "आलेंच हं इतक्यात" पुटपुटत बाहेर गेली. मायाकाकू मला म्हणाल्या, "थांब ग जरा. मला तुझी ओटी भरूं दे. कुंकूं लावूं दे !-"

मी थांबलें. त्यानीं माझी खणानारळांनीं ओटी भरली. कुंकूं लावलें. मीं त्याना आदरानें नमस्कार केला. "येतें" म्हणून निरोप घेतला. सुलभेला बाहेरच भेटतें म्हणून सांगितलें. त्यांनीं मला निरोप दिला. "सुलूला वरचेवर पत्र पाठवीत जा म्हणजे तुझी खुशाली आम्हांला कळेल. तितकं बरं वाटेल." असे म्हणून त्या कामाला लागल्या.

सुलभेला नी तिच्या वडिलाना भेटून-विचारून जावं म्हटलं. वडिल दिसलेच नाहींत मला. ते केव्हाच बाहेर गेले होते.

जातां जाता या-त्या खोलींत सुलभा कुठें आहे हें पाहाण्याकरितां डोकावत चाललें, तों मला काय दिसलें ?—

नाईकनें सिगारेटची पेटी उघडून सुलभेपुढें केली आहे. सुलभेनें त्यांतली सिगारेट काढून तोंडांत धरली आहे. आण्णा कवठेकरानें काडी ओढून तो ती सिगारेट पेटवीत आहे ! सगळ्यांचे तोंडात सिगारेट होती ! धुराचे लोट हवेंत पसरत होते.

मला सुलभेनें पाहिलें. ती चमकली. तोंडांतली सिगारेट चटकन् हातांत घेऊन लपविली. हंसत किंचित् पुढें आली नी "निघालीसच होय ग ? बरं आहे. कधींमधीं आठवणीनें पत्र पाठवीत जा हं !-पाठवशील ?" म्हणाली. मानेनें मीं निरोप घेतला. तिनें दिला. मी बाहेर पडलें.

घरीं येईपर्यंत सुलभेचें तें विचित्र-आचरट दृश्य डोळ्यांपुढें नाचत होतें ! आणि मनांत येत होतें-' कसं या सुलभेचें पुढें होणार ? " हिच्या-भोंवतीं वसंत पिंगा घालतो आहे. हिच्याशीं तो लग्न करणार आहे-काय सुख लागणार आहे हिच्यापासून वसंताला ?

त्याच मनःस्थितींत मी घरीं पोंचलें.

———

प्रकरण सातवें

# सुलूच्या सहवासांत !

दुसऱ्या दिवशीं सकाळच्याच गाडीनें आम्ही निघणार होतों. निघण्याची तयारी माझी मीच करायची, अशी अवस्था असायची; पण माझ्या लग्नाला आलेल्या गोतावळ्यापैकीं माझ्या एक आते अजून होत्या; त्यांनीं मला कांहीं करूं न देतां, फराळाचें, बाधाबांधीचें सगळें काम आपल्याकडे घेतलें होतें. अधूनमधून आप्पाही त्यांना " जिजी, हें विसरूं नकोस; चारूला बरोबर तें दिलें पाहिजे." असें दक्षतेनें सुचवीत होते. मी उगीचच आंतून बाहेर नी बाहेरून आंत करीत होतें. आतेच्या मागून हिंडत होतें. त्या माझ्याशीं बोलत होत्या. आपल्यापरी मला कांहीं कांहीं उपदेशाच्या गोष्टीही सांगत होत्या.

वसंता घरींच होता. माझ्याशीं एकादा शब्द बोल, बाहेर जाऊन स्वारीची थट्टा मस्करी कर,–अगदीं उसन्यासारखें, ओढून चंद्रबळ आणल्यासारखेंच त्याचें वर्तन चाललें होतें. खरें म्हणजे त्याला केव्हां आपण बाहेर जाऊं असेंच झालें असावें; पण तशाही स्थितींत कसा कोण जाणे माझ्याकरितां अजून थांबला होता.

वरचेवर घड्याळात पहायचा; आंत येऊन " हं, झालं का आते ? आटप लवकर, उशीर होत चाललाय, " असें आतेला म्हणायचा; तसाच " हं, काय, ताईसाहेब, आटोपला का तुमचा जामानिमा ? पडूं द्या एकदां वेळेवर तुमची घराबाहेर धिंडका !–तुम्हीं बायका अशाच; वेळेवर गाडी गांठतां येत नाहीं. इतका पसारा माजवितां. मग विलायतेच्या प्रवासाची तयारी करायला तुम्हाला वर्षाची मुदत दिली तरी शेवटीं ऐन वेळीं अशीच आपली तारंबळ करून घ्याल. आपली तारंबळ, दुसऱ्याचे हाल करण्यांतच तुम्हांला मोठेपणा वाटतो का काय ? "

वसंत कसाही बोलला तरी त्यावेळीं मला बरेंच वाटत होतें. मी हसून बोलायला उत्तेजनच देत होतें.

पण आतेला त्याचें बोलणें मुळींच आवडत नव्हते. ती त्याच्यावर चांगलीच खेंकसे व त्याला गप्प करी. पण वसंताला त्याबद्दल कांहींच वाटत नव्हतें. उलट तिलाच तो, " तुला काय होतंय बोलायला ? तुमच्या बोलण्याच्या दिरंगाईनें गाडी चुकायची–जावईबुवाची मर्जी बिघडून ते डोक्यांत राख घालायला उठायचे ! त्याला भ्यायला पाहिजे ना आम्हांला ?–शिवाय आतां ही परक्याची झालेली ब्याद जितक्या लवकर आपल्या घराबाहेर जाईल तितकी चांगली नाहीं का ?–ही गेली म्हणजे आम्ही मोकळे झालों. आम्हाला कांहीं आमचीं महत्त्वाचीं कामं आहेत कीं नाहींत ? "

अशी बडबड त्यानें केलीच !

" घरचें खाऊन लष्करच्या भाकरी बडविण्याचीं–नाटकाच्या तालमी घेण्याचीं हींच ना महत्त्वाचीं कामं तुझीं ? " असें वसंताला उत्तर द्यावें, असं एरव्हीं माझ्या मनांत आलं असतं. मीं दिलंही असतं. पण त्यावेळीं मला तें काहींच सुचलें नाहीं. माझ्या मनांत कोणते विचार येत होते नी काय ?–मला कांहीं समजतच नव्हतं ! आनंद-हुरहुर–यांनीं माझ्या मनाची अवस्था भारी चमत्कारिक झाली होती.

" टांगे आणूं का ?–" मनगटावरील घड्याळांत पहात बाहेरून येत वसंतानें आतेला विचारलें.

" उगीच घाई नको तुझी ! तुला कुठें जायचं असेल तर जा पाहूं. मी आप्पाला सांगेन टांगे आणायला समजलास ! जा तूं ! " आतेनें त्रासिकपणानें वसंताला सांगितलें.

आप्पांचेंही आतून बाहेर–बाहेरून आंत अकारण-सकारण हेलपाटे चाललेच होते. ते त्या वेळीं कोणाशीं कांहींच अवांतर बोलत नव्हते. मोजकें सांगणें–सुचविणें त्यांचें जें काय चाललें होतें, तें आतेला.

माझ्याबरोबर तर ते जवळजवळ बोलत नव्हतेच; पण फारसे माझ्याकडे पहातही नव्हते. मीं त्यांच्याकडे एकदां सहज पाहिलें. त्यांची मुद्रा किती गंभीर दिसली मला ! वरून धीरगंभीर स्वरूप धारण करणाऱ्या

समुद्राच्या पोटांत विलक्षण कल्होळ चाललेला असतो. आप्पांच्या बाह्य गंभीरतेकडे पाहून मला तसेंच वाटलें.

त्यांच्या घरांतून परक्याची होऊन मी आज बाहेर पडत होतें; मला हुरहुर वाटत होती ती त्याच कारणानं! आपल्या घरीं जाणार. आपल्याला मनासारखा सागाती मिळाला, हा आनंद असला तरी "**प्रिय सख्या मी बावरतें**" या तांबे कवींच्या कवितेची आठवण त्याच वेळीं मनांत येऊन, त्यांतील भावार्थाचा अनुभव मी घेत होतें; त्यामुळें आप्पाशीं मीं काय बोलावें, हें मलाही सुचत नव्हतें.

आप्पा आपल्यापरी विलक्षण संयमी असले तरी, मी जाणार या कल्पनेचा पगडा त्यांच्या मनावर बसून परिणाम करीत होता यांत शंका नव्हती. कण्वमुनींचीच त्यांना उपमा सार्थ होत होती त्यावेळीं!

निघण्याची तयारी झाली. टांगे आले. आप्पा, आते आणि त्यांच्याबरोबर वसंताही आमच्याबरोबर स्टेशनवर आम्हाला पोंचवायला आल्याशिवाय राहिला नाहीं.

आम्ही गाडींत बसलों. गाडी सुटेपर्यंत सारींच माणसें फलाटावर होतीं. मी आतेशीं बोलत होतें; आप्पा स्वारीबरोबर बोलत होते; वसंत मात्र गाडीच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पुनःपुन्हा येरझारा घालीत होता! आतेशीं बोलत असलें तरी माझें लक्ष आप्पांच्या–स्वारीबरोबर चाललेल्या बोलण्याकडे होतेंच.

"पंडितराव, आपल्यासारखा जांवई मला मिळाला हें भाग्यच आहे! मला आतां चारूची काळजी नाहीं. आपण येत जा सवड होईल तशी, चारूला वरचेवर पाठवीत चला. मी कांहीं तसा उठल्यासुटल्या तुम्हांला तसदी देणार नाहीं. पण मी जिवंत आहे तोंपर्यंत तिचं माहेर तिला दिसूं द्या. मला थोडं फार करतां येईल तेवढं माहेरपण करण्याची संधि द्या! माझ्या पश्चात् चारूला माहेरची आशा काय आहे? आमचे दिवटे चिरंजीव, पहातांच आहांत–काय चारूला माहेरचं सुख देणार आहेत, हें दिसतंच आहे मला..."

अशा तऱ्हेचीं आप्पांचीं कांहीं वेंचक वाक्यें माझ्या कानांवर आलीं. माझ्या पोटांत खळबळून आलें. डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहिलें नाहीं!

मी एवढी मोठी, शिकलेली, माझ्या मनासारखं सारें झालेलं तरीही माहेर सोडताना माझी इतर सासरीं जाणाऱ्या मुलींप्रमाणेंच गत झाली !

गाडी सुटण्याची घंटा घणघणली. गार्डानें हिरवें फडकें फडफड-वीत, तोंडातली कर्कश शिटी फुकली. गाडीनेंही आपला नवा चमत्कारिक शिटीचा आवाज ऐकला.

"ये हो चारू ! पत्रबित्र पाठीव !" आतेनें सांगितलं.

"बरं आहे आप्पासाहेब ! लवकरच वर्तमानपत्रकारांची परिषद् आमच्याकडे भरणार आहे. त्या वेळीं अवश्य यायला पाहिजे आपल्याला. मला बरंही वाटेल आणि आपला पुष्कळ उपयोगही होईल !" स्वारी नमस्कार करीत आप्पाना म्हणाली.

"बरं आहे पाहूं आयत्यावेळीं जमेल तसें !" असें स्वारीला म्हटलें; चालू झालेल्या गाडीबरोबर आपणही चालत, आप्पा मला म्हणाले, "चारूताई ! संभाळून ऐस. जपून वाग. ये......"

त्यांचा कंठ भरून आला होता. एकेक शब्द ते कष्टानें उच्चारीत होते. मी नुसती मान हलविली. बोलवेनाच मला. पुन्हा पाण्यानें डोळे भरून आले.

आप्पा परत फिरले. मी अजून त्यांच्याकडे पहातच होतें. त्यांनीं उपरण्याचें टोंक डोळ्याला लावलेलें मला दिसलें. मला दिसूं नये म्हणू-नच आप्पा चटकन् परतले हें मला समजलें.

वसंत बराच दूर पुढें उभा होता; त्याच्या समोरून आम्हीं बस-लेला डबा चालला. तो कुठें नी कोणाला पहात होता कुणास ठाऊक. इतक्यांत आमच्याकडे त्याचें लक्ष पोंचलें. त्यानें स्वारीला, हात उंच करूनच "गुड् बाय्" म्हटलें. मलाही ओरडून म्हणाला, "यावं ताईसाहेब ! मी लवकरच येईन बरं का समाचाराला तुझ्याकडे ?"

मी मानेनें त्यालाही योग्य तें उत्तर दिलें. गाडी झपाट्यानें चालूं लागली. आप्पा, आते, वसंत–सर्वच माणसें दृष्टिआड झालीं. मी अजून कुठेंतरी बाहेरच शून्य दृष्टीनें वेड्यासारखी पहात होतें !

किती वेळानं मी खिडकीबाहेर पहात होतें, ती आत वळलें कुणास ठाऊक! स्वारीकडे मी पाहिलें; स्थिर-स्निग्ध दृष्टीनें माझ्याकडेच पहाणं होत होतं! आतां आम्हीं दोघे होतों. आमचा प्रवास व्यवस्थित सुरू झाला होता-आगगाडीचा-आणि आयुष्याचाही!

माझ्याबरोबर बोलायला स्वारी उत्सुक झाली होती. मलाही कांहीं तरी बोलावंसं वाटूं लागलं. पण काय बोलायच सुचेच ना मला!

माझ्या आयुष्यांतल्या नाटकाच्या दुसऱ्या अंकाला सुरुवात झाली आहे. आम्हां दोन मुख्य पात्राना एकत्र आणून बाकीचीं बाजूला झालीं आहेत; बोलायला, हंसायला, सुखासुखाच्या गोष्टी करायला पूर्ण अवसर मिळाला आहे. मनांत आल. गंमत वाटली. पण बोलायचं काय नी कसें? बोलणें होईल तें कोणत्या प्रकारचे?-आप्पाच्या आठवणीनें, त्यांच्या नुकत्याच गहिवरल्या आवाजांतल्या शब्दानीं, त्यानीं उपरण्याच्या पदरानें डोळे टिपले, त्या दृश्यानें माझ्या डोळ्यात अजून पाणी तरंगत होतें.

तरीदेखील स्वारीकडे मीं पाहिलें. पाहून किंचित् गालांतल्या गालांत हंसलें! माझ्या हंसण्याला स्वारीनेंही प्रतिहास्याची गोड सांथ दिली!

"आप्पासाहेब आपल्याकडे लवकरच येणार! माझ्या विनंतीला त्यांनीं मान देऊन कबूल केलं मला येईन म्हणून!" स्वारीनं बोलायला इथूनच सुरुवात केली. "ते येईन म्हणाले हें ऐकून मला फार आनंद झाला! आले म्हणजे चार आठ दिवस त्याना जास्त ठेवून घेऊं. त्यांना बरं वाटेल. आपल्यालाही आनंद होईल. मोठा मजा येईल, नाहीं?"

आप्पांच्या येण्याचा विषय स्वारीनें काढला! मला आनंद झाला मला आनंदित करण्यासाठींच मुद्दाम बोलायचं झालं होतं. मग मला आनंद होणार नाहीं? बसंताचा उल्लेख करून त्याची कुत्सित कुचेष्टा केली असती, तर मला ती निमूटपणें ऐकावीच लागली असती. काव्यमय प्रेमाच्या शब्दांची खैरात करायला सुरवात झाली असती, तर कोण नको म्हणणार होतं? पण त्या वेळीं, त्या स्थितींत, तशा बोलांनीं माझ्या मनाला प्रसन्नता आलीच कशी असती? मला तसली भाषा ऐकायला नकोशी झाली असती-स्वारीचा रागदेखील आला असता!

पण परकायाप्रवेश करून, परक्याला आपलंसं करणें ही मोठी कला स्वारीला अवगत असल्याचें मला प्रत्यक्ष दाखवून दिलें. स्वारी-बद्दलचा आदर त्याच क्षणीं कितीतरी पटीनें वाढला माझा !

आप्पाचं नांव आणि त्याचा आपल्याकडे येण्याचा आवडता विषय अनपेक्षितपणानें स्वारीनें काढल्यानें, माझ्या मनाची हुरहूर, चलबल थांबायला वेळ लागला नाहीं. आप्पा येणार आहेत, ही कल्पनाच माझ्या सुखाच्या वाढीला कारण करून दिली स्वारीनं. मला वाटलं आपल्या-बरोबर आताच आप्पा आहेत !

मी मग स्वारीशीं बोलूं लागलें. तोंडांतून येणारे शब्द, आप्पासंबंधीं माझ्या माहेरासंबधीं प्रत्यक्ष असले, तरी त्याखालीं न बोलतांच उमटणारे शब्द त्याचे अर्थ आम्हा परस्परांत परस्परांविषयीं सहानुभूति–आदर–याच भावना वाढीस लावीत असल्यास नवल काय ?

खऱ्या लेखकाचं सहृदय अंतःकरण आणि कुशाग्र बुद्धीच्या संपादकाचं कुशल चातुर्य याचा प्रीतिसंगम झालेला होता ना एकाच स्वारीच्या ठिकाणीं ? लेखणींतून उतरणाऱ्या शब्दांनीं जिथें अवघ्या जगाला आपल्याकडे आकर्षून घ्यायचं म्हणजे हातचा मळ तेच शब्द मला ऐकायला लावून माझं अंतःकरण जिव्हाळ्यानं काबीज करायला स्वारीला कितीसा वेळ लागणार ?–अन् स्वतः कुशल संपादक असायचं–तेव्हां माझी मर्जी सुप्रसन्न करून मला संपादन करायला स्वारीला कठीण कां जाणार ?

स्वारीशीं मी बोलूं लागलें तसा माझा संकोच हळू हळू कमी होऊं लागला. निघतांनाची हुरहुरही हलके हलके मावळूं लागली.

आमच्या प्रश्नोत्तरांत स्टेशनें येत होतीं नी जात होतीं. तिकडे मग लक्षच गेलं नाहीं माझं.

एका कुठल्याशा स्टेशनवर गाडी उभी राहिली. आमच्या डब्यां-तील कांहीं उतारू उतरले; तेथेंच आपल्या सामानासुमानासह घाईघाईनें एक जोडपें चढलें. पहिल्यांदा कुणी एक तरुण मुलगी चढतांना ओझरती दिसली. मीं सहज तिच्याकडे पाहिलें. तों काय विलक्षण योगायोग ! ती मुलगी–माझी शेजारची, माझ्या अगोदर महिना दीड महिना लग्न होऊन सासरीं गेलेली सरला !–सरलाच होती ती ! तिच्या पाठोपाठ

एक बरेच उतार वयाचे—चागले बूटपाटलून—डोकीवर साहेबी टोपी—अशा साहेबी थाटातले—गृहस्थ गाडींत चढले. मी दोघांना पाहिलें. सरलेचें म्हाताऱ्याशीं लग्न झालेलें मला माहितच होतें; ते गृहस्थ सरलेचे पति असावेत, हे माझ्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं.

बसायला जागा शोधण्याकरितां सरला पाहूं लागली. तेव्हां तिची माझी दृष्टादृष्ट झाली! आम्हीं दोघींनीं एकमेकींकडे मोठ्या आश्चर्यानें पाहिलें—

"ये ग सरलु!" तिनें विचारण्याच्या अगोदरच मीं तिला हांक मारून माझ्याजवळ जागा दिली. स्वारी पलीकडे सरकली. सरला माझ्याजवळ येऊन बसली.

तिच्या पतिराजानी बरोबरचें सामान बाजूच्या बांकाखालीं लावलें. नंतर ते स्वतःसाठीं बसायला जागा शोधूं लागले. त्यांनीं सरलूकडे, माझ्याकडे पाहिलें. नंतर दूरवर नजर टाकली. आमच्यापासून बऱ्याच अंतरावर एक जागा रिकामी असलेली त्यांनीं पाहिली. त्यांना सरलुजवळच बसायला हवें होतें; त्यानीं त्या अपेक्षेनें पाहिलें. पण आमच्या जवळपास जागाच नव्हती. थोड्याशा खट्टु मनानें—नाइलाज होऊनच ते सरलेकडे पहात आणि "ठीक, तुम्हांला जागा मिळाली, बरं झालें. आपण मिळेल तिथं बसूं या!" असें काहींसें आपल्याशींच पुटपुटत व आपल्या सामानाकडे लक्ष असूं द्या, असें सरलूला बजावीत रिकामी दिसलेली जागा पटकावण्याकरिता गेले.

सरलूला हांक मारून मी होऊनच जवळ बसायला बोलावलं हें स्वारीनं पाहिलं; आमची ओळखच आहे हें ओळखून आपण बरोबरचीं वर्तमानपत्रं चाळायला लागून आम्हाला बोलायला सवड करून दिली. स्वारीनें एकदां आम्हां दोघींकडे ओझरतं पाहिलं. माझ्याकडे पाहिलें नी वर्तमानपत्राकडे दृष्टि वळविली.

सरलु माझ्याकडे आणि स्वारीकडे पुन्हां पुन्हां अशा कांहीं दृष्टीनें पाहूं लागली कीं मला त्या तिच्या पाहण्याचा अर्थच कळेना.

आमचं नातं तिच्या लक्षांत आलं. आम्ही कुठं चाललों आहोंत हें ती समजली. तरी आमच्यांत तूं कुठें—मी कुठें—असे पहिले सामान्य प्रश्नोपप्रश्न झालेच!

गाडी चालू होती. चालत्या गाडींत-इकडून तिकडे किती माणसें तरी दोन्ही बाजूंच्या बाकांचा आधार घेत जात येत होतीं. त्यांतच एका गृहस्थाचें जातां जातां स्वारीकडे लक्ष गेलें. त्यानें " ओ हो! पंडितराव! तुम्ही ?–" हांक मारून नमस्कार करीत म्हटलें. स्वारीनें त्यांना पाहिलें "अरे ! तुम्हीं ?–चला, येता का तिकडे ? जरा गप्पासप्पा तरी मारू; म्हटलं आज गप्पा मारायला गाडींत कुणी मिळतंय कीं नाहीं ? तुम्ही भेटलांत, फार उत्तम झालें ! " " चला, काय हरकत आहे ?" म्हणत स्वारीही उठली. जातां जातां मला म्हणायचं झालं, " येतों हं मी थोड्या वेळांत !" आणि दोघेही गेले.

आतां आम्ही-सरलु-मीच राहिलों.

सरला स्वारीकडे, त्याच्याशीं बोलणाऱ्या आणि त्याना बरोबर नेणाऱ्या गृहस्थाकडे पहात होती. मला वाटलें, ही अतिशय तिरस्कारानें त्याच्याकडे पहात असावी.

सरलूबरोबर काय बोलावं हें मला सुचेना !-दुर्दैवी सरलू !

ही पण माझ्याशीं बोलूं लागेना ! माझ्याकडे-इकडे तिकडे उगीचच चमत्कारिक नजरेनें पाही !

मींच काहीं तरी बोलावं म्हणून तिच्याशीं बोलायला सुरुवात केली–

" सरलू, आता चढलीस हेंच तुझं स्टेशन वाटतं ?—"

" हो ! हेंच स्टेशन ! या स्टेशनाचंच माझं गांव–तिथेंच घर–तिथंच दार–अन् तिथंच माझं मरण !—" सरलू म्हणाली !

ऐकून माझ्या आंगावर कांटाच उभा राहिला. मी तिच्याकडे पहायलाच लागलें ! तेव्हां, " पहातेस काय माझ्याकडे ? पाहण्यासारखं माझं नशीब तें पलिकडे नटून थटून बसलें आहे तें पहा ! "

मी कळसूत्री बाहुलीच बनलें. वेड्यासारखी तिच्या नवऱ्याकडे पाहूं लागलें. " चारू, वसंतापेक्षां शतपटीनें चांगलं आहे ना ?–" मला अचानक सरलूनें पाहिलें; जवळ आली; बसली. तिला एकदम ब्रह्मांड आठवलें ! माझ्या डोळ्यांत टच्कन् पाणी आलें. सरलूचे डोळे लाल

झाले होते; तिच्या डोळ्यांत पाणी नव्हतें, पण तिच्या हृदयांत निखारे रसरसताहेत असेंच मला वाटलें—

" सरलू—" मी कांहींतरी तिच्याशीं बोलणार होतें, पण काय बोलूं?—तिच्या पाठीवर हात ठेवला नी तिला हांक मारली—

" काय विचारणार तूं मला चारू?" जिवाचा तडफडाट होऊन सरलूच बोलूं लागली, " कसं काय आहे तुझं म्हणून विचारतेस? हें माझें जन्माचं कर्म कसं ओढवल म्हणून विचारतेस?—अग, घरची गरीबी असली, मुलीला आई नसली, बाप सावत्र आईच्या ओंजळीनें पाणी पीत असला, मुलीच्या आवडत्या ठिकाणाहून अकारण नकार मिळाला असला, मुलीला आई–बापाविरुद्ध बंड पुकारण्याचं धैर्य नसलं, म्हणजे जसं मुलीचं होतं–तसंच माझं झालं आहे!"

ती मध्यें जरा थांबली!—माझ्या डोळ्यांतलं पाणी तिनं पाहिलें–ती पुन्हां उसळली—

" चारू, माझ्याकरितां तुझ्या डोळ्यांत आणि आतां–हातचा कायमचा बाण सुटून गेल्यावर–पाणी उभें राहून काय उपयोग?–अन् तसं म्हणशील तर आमच्या माईनं माझं चांगलं कल्याण केलं आहे हो!–माझं काय वाईट झालं आहे? लग्न लागतांच मी एकदम श्रीमंतीण झालें. रावबहादुरीण बनलें. इतकंच काय, पण चार मुलांची–तीन मुलींची आई झालें आहे. चार सुनांची सासू अन् मुलींकडून दहा लहान लहान नातवंडाचा आजीपणा पण मला प्राप्त झाला आहे. आहेस कुठं तूं?–माझी सर का तुला यायची आहे!"

" काय बोलूं मी सरलू?–" मीं अगतिकपणें म्हटलें.

" कांहींच बोलूं नकोस. मीच आपण होऊन तुला सांगतें ना!" सरलुच चिडक्या आवाजांत म्हणाली, " आतां जवळ होते तेच ना तुझे पति? पाहिले. प्रथम वरापासून बायकांना का सुख लागतं खरं?–अग, दुसरेपणावर, तिसरेपणावर, चौथेपणावर अशा वाढत्या प्रमाणावर मुली दिल्या जातात, त्या प्रमाणानंच मुलींच्या सुखाची वाढ होत असते! समजलीस? माझी माई तशी फार दूरदर्शी! ती दुसरेपणावर आली–पण तिनें मला चौथेपणावर देऊन मला सुखी केली आहे!–आतां ती आपल्या

मुलींना अशी दुसरेपणावरसुद्धां देणार नाहीं आहे, ती गोष्ट वेगळी ! कारण, माझ्याइतकी तिची आपल्या मुलीवर माया पण नाहीं—न् त्या माझ्या इतक्या चांगल्याही नाहींत !— ”

मला तिचं हृदय फुटून चाललेलं बोलणं ऐकवेना, मीं विषय बदलावा म्हणून म्हटलं, “ आतां सरलू तूं चालली आहेस कुठें ?—”

“ कुठं म्हणजे ?—माझ्या तिसऱ्या मुलीच्या चवथ्या बाळंतपणाला. —माझ्या मुलींचं मी बाळंतपण करायचं नाहीं तर कुणी ग ?—मग नको जायला मला ? ” सरलु म्हणाली. मला हंसावें का रडावें हेंच कळेना सरल बरीक भेसूर हंसली ! मी भ्यालेंच तें ऐकून !

आतां तिला असह्य झालं. इतका वेळ ती बेफाम होती. पण आतां तिला रडूं आवरेना ! माझ्या मानेवर तिने डोकें टेकलें. ढसढसा ती रडायला लागली ! तिला जगाची—सभोंवतालच्या लोकाची—कांहींच पर्वा नव्हती. तिच्या नवऱ्याकडे त्या वेळीं माझी नजर गेली. त्यानें तोंडापुढें वर्तमानपत्र धरलें होतें !

मी तिला जवळ घेतली. घट्ट कवटाळली. कांहीं बोललें बरीक नाहीं. तिचं हृदय हलकं होणंच जरूर वाटलें मला !

“ ह्या आम्ही बायका अशाच मरायच्या नाहीं ग ?— ” पुष्कळ वेळानं हताश शब्दांत ती म्हणाली. मी तिला सावकाश थापटीत होते.

“ चारू, मी साऱ्या जगाकडे तिरस्कारानें पाहतें-तुझ्या पतीकडेसुद्धां पाहतांना माझ्या डोळ्यांत तोच तिरस्कार होता—पाहिलास तूं ?—”

“ पुरे कर ! सरलू, तूं आतां कांहींतरी बोलूं नकोस गडे ! ” मीं म्हटलें.

“ पण तूं ओळखलंस ना ? मग झालं तर. पण चारु, मी तुम्हां दोघांकडे तिरस्कारानं पाहिलं तरी, त्याचा भलता अर्थ तूं समजूं नकोस हं !— माझी—एका हतभागी तुझ्या मैत्रिणीची—तुम्हांला दृष्ट लागूं नये म्हणूनच तुमच्याकडे पाहतांना तिरस्कार होता तो—असं समज बरं का ?—मी तुझी वहिनी झालें असतें तुझ्या वसंताची झालें असतें—तर आम्हांलादेखील कुणाची तरी दृष्टच लागली असती ! नाहीं का ग ?” पुन्हां तिला हुंदका आवरेना !

वसंतावर सरलूचं केवढं प्रेम हें ? ही त्याची बायको झाली असती—असलीच बायको त्याला हवी होती—हिच्यामुळें तो लवकर शुद्धीवर आला असता—हिनं त्याला आणला असता—पण आतां काय उपयोग ? हिच्या जन्माचं असं मातेरं झालं. वसंताचं काय होणार आहे कुणास ठाऊक ?—माझ्या मनांत त्या वेळीं हेच विचार आले. मला अति वाईट वाटलें.

मुली—लग्न झालेल्या मुली का बिघडतात—त्यांचें वांकडें पाऊल कां पडतें ? सरलूचं एकाद्या वेळीं वांकडें पाऊल पडलं—तिच्या मनासारखं झाल नाहीं, याचमुळें तिच्यावर वांकडा प्रसंग आला—तर ?—दोष कुणाचा ? सरलूचा ?—आईबापाचा ? नवऱ्याचा ?—

झर्‌कन् भलतेच विचार मनात येऊन गेले ! माझं सर्वांग थरारलं ! सरलूलासुद्धां तें जाणवलं ! तिनें माझ्याकडे पहात ‘ काय ग, काय झालं ?’ म्हणून विचारलं. काय सांगणार मी तिला ?

“ चारू, तूं माझ्या जिवाभावाची मैत्रीण ! तुझ्याजवळ पोटातलं सारं ओकलें !—कुणाजवळ मन मोकळं करायचं, नाहीं तर मी, ग ?—जगाजवळ कां बोलतां येतं मनातलं ?—आज तूं माझी आईच भेटलीस ! कांहीं तरी बडबडलें म्हणून माझा तूं तिरस्कार करशील का ?—आतां माझ्या तोंडाला कायमचं कुलूप पडेल. तुझ्याजवळ बोलावंसं वाटत होतं. आज अशी अचानक तुझी गांठ पडली. बोलून टाकलं सारं !—झालं ! आतां मी न् माझं नशीब ! जीवंत आहे तोंवर झगडायचं नशीबाबरोबर, दुसरं काय ?—”

ती हताश झाली !

मी हताश होऊन तिला कुरवाळीत होतें !

एका स्टेशनावर गाडी थांबली. स्वारी आपल्या जागेवर बसायला आली. त्याच स्टेशनावर सरलू उतरणार होती. तिचा नवरा उठून आला. उतरायचा इषारा सरलेला त्याच्याकडून मिळाला. ती उठली. हमालांनीं त्यांचें सामान उतरून घेतलें.

“ येते चारू, ओळखदेख असूं दे !—” असें कांहीं तरी अर्धवट पुटपुटत माझ्याकडे व स्वारीकडे एकदां वळून पाहून ती आपल्या नवऱ्यामागोमाग गाडीखालीं उतरली ! तिचा प्रवास तसा सुरू झाला !

आमची गाडी चालू झाली—आमचा प्रवास चालू झाला !

सरलूच्या सहवासांत जो वेळ गेला—तेवढ्यांत जें काय ती बोलली त्याचा परिणाम माझ्या मनावर विलक्षण झाला होता. मी त्याच विचारांत गुंग होतें. नंतर आम्ही बोलूं लागलों. स्वारीनें सरलूबद्दल मला कांहींच विचारलं नाहीं. मीं सांगितलें नाहीं. मी स्वारीशीं बोलत होतें—बोलतांना माझा आनंद मला मिळत होता. पण सरलू, तिचं बोलणें, तिची मुद्रा पुनःपुनां डोळ्यापुढें येऊन माझ्या आनंदाला धक्के दिल्याखेरीज रहात नव्हती ! त्याच स्थितींत आम्ही आमच्या स्टेशनावर उतरलों !—

प्रकरण आठवें

# माझें विश्व !

मी आपल्या सासरीं आलें—असें म्हणण्यापेक्षां स्वतःच्या घरीं असें म्हटलें तर तेंच जास्त खरें. मला सासर होते; माझे सासरे होते; सख्या सासूबाई नव्हत्या; होत्या पण त्यांना सासूबाई म्हणणें म्हणजे 'सासूबाई' या पवित्र नावाचा उपमर्द करण्यासारखंच होईल. म्हणून ज्या गांवीं, ज्या घरीं मामजी रहात होते, त्या गांवीं—घरीं मी गेलेंच नाहीं. मला नेलें नाहीं, तर मी सासरीं आलें असें कसें म्हणूं ?

मामंजींनीं पूर्वार्जित कांहीं नसतां स्वतःच्या पराक्रमानें मोठी मिळकत मिळविली होती. माझ्या खऱ्या सासूबाई निवर्तल्यावर पुन्हां लग्न करण्याच्या भरीस मामंजी पडले नाहींत तरी त्यानीं स्वतंत्र असा संसार मांडला होता.

स्वारीला मामंजींचा धाक पहिल्यापासून होता; प्रत्येक गोष्ट चिरंजिवानं आपल्या मताप्रमाणेंच केली पाहिजे, आपलं ऐकलंच पाहिजे अशीच मामंजींची वृत्ति होती. स्वारीला कळत नव्हतं. तिथंपर्यंत सारें ठीक होतें; पण पुढें कळूं लागल्यावर मामंजींचा अरेरावीपणाचा दुरभिमान आणि लाजिरवाणं वागण हें न आवडून दोघांत मतभेद झाला.

आपल्या मताप्रमाणें वागायचं नसेल—विशेषतः जवळ केलेल्या मंडळींच्या शब्दाप्रमाणें ऐकायचं नसेल, तर घर सोडलें पाहिजे; आपल्या मिळकतींतील एक कपर्दिका मिळायची नाहीं, असें मामंजींनीं स्वारीला बजावलें.

मामंजींना सून अशी हवी होती कीं, जिच्या वडलांकडून मोठा हुंडा मिळेल, जी आपला, आपल्यापेक्षांही आपल्या त्या मंडळींचा वरचष्मा चालूं देईल, त्यांच्या धाकांत राहील, त्यांची सेवा करील.

तशा किती तरी मुली स्वतः मामंजीनीं हेरून ठेवल्या होत्या; त्यांच्या त्या मंडळींनींही स्वारीकरितां निवडून जवळ जवळ ठरवून ठेवल्या होत्या.

पण स्वारीनं वडिलाचा शब्द मुळींच त्या बाबतींत मानला नाहीं. मग त्यांच्या मंडळींचा मान ठेवणं दूरच !

त्याच वेळीं पिता–पुत्रांत खडाजंगी उडाली. मामंजींनीच गहजब केला ! जन्म दिल्याबद्दल, पालनपोषण केल्याबद्दल, शिक्षण दिल्याबद्दल कृतज्ञतेचे शब्द बोलून, ती कृतज्ञता यावज्जीव विसरणार नाहीं, असें स्पष्ट सागून वडिलांच्या मिळकतीवर तुळशीपत्र ठेवलें; एका दहा मिनिटांत तडकाफडकीं निकाल लावून टाकला व स्वतःच्या पायावर उभें रहावयाचें, स्वावलंबी व्हावयाचें, आपल्या शिक्षणाच्या, कर्तबगारीच्या जोरावर चांगल्या रीतीनें जगण्याचा आटोकाट प्रयत्न करावयाचा असा संकल्प करून, स्वारी वडिलांच्या घरांतून त्यांना नम्रपणें नमस्कार करून बाहेर पडली होती.

–मग मी सासरीं मामंजीच्या घरीं कशी जाणार?–स्वारीनें स्वतःची म्हणून जी स्वतंत्र जागा घेतली होती–तिथेंच मी आलें. म्हणूनच मीं म्हटलें, मी आपल्या घरीं आलें.

घरीं आल्यानतर ओघाओघानें स्वारींनीं मला आपली–घरासंबंधीं–मामंजींसंबंधीं सारी हकीकत मोठ्या मजेमजेनें सांगितली. "सासू-सासऱ्याचं कृपाछत्र इथं नाहीं–दीर नणंदा-वहिनीचं कौतुक करायला इथं नाहींत–कुणी आलं तुझ्या ओळखीपाळखीचं तर हा माझ्या सत्तेचा बंगला आहे-हा एवढा अवाढव्य जमिनजुमला आहे, असें सांगून मोठेपणा मिळविण्याची संधि नाहीं–आपण तें काहीं ठेवलंच नाही. पण त्याबद्दल तुला वाईट वाटायचंही कारण नाहीं ! सासरा आणि सासूही ( आहेत्या बाईलाच उपहासानंसुद्धां म्हणायचं झालं तर ) आहेत, पण त्यांचा रक्त आटवणारा जाच नाहीं; छळायला दीर नणंदा नाहींत–हें सौख्य तुला काय थोडं आहे ?"

सासरकडची–मामंजींच्यासंबंधींची– ही हकीकत जशी स्वारींनीं मला समजावून दिली तशीच माझ्या घरची–स्वतःसंबंधींची तितकीच तितक्याच गमतीनें सांगितली–

"... बाकी, आपण स्वतंत्र आहोंत–राजाराणीचंच राज्य आहे, इथं कोणी बोलणार नाहीं, कुणाचं ऐकायला नको, मन मानेल तसं वागलं तरी चालेल, अशी समजूत झाली, तर तीही चुकीचीच ठरेल हं !

"कुणाच्या तरी सहाय्यानें–सहानुभूतीनें छापखाना उभा केला आहे, लोखंडाची मालकीण व्हावं लागलं आहे. तें लोखंड सुख कांहीं लाभूं देणार नाहीं स्वस्थ बसण्याचं; बाहेरचीं कामं येतात, तीं घ्यावीं लागतात; वर्तमानपत्र आहे जोडीला, तें वेळच्या वेळीं निघालंच पाहिजे.–नोकर येतात–जातात–संप करतात–कामाला खीळ बसण्याचा आकस्मिक प्रसंग येतो–वेळ पडली तर खिळे जुळवलं पाहिजेत–लोखंडी यंत्र स्वतः चालविलं पाहिजे, मजकूर मिळविला पाहिजे–स्वतः लिहिला पाहिजे–जाहिराती मिळविल्या पाहिजेत–आणल्या पाहिजेत–वसुलीसाठीं हिंडलं पाहिजे–

"माझा उद्योग चाललाच आहे. पण अर्ध्या वाट्याची हक्कदार–बरोबरीचं नातं–समान हक्क आहे तुझा–तूं मिळविला आहेस, आप्पासाहेबांनीं तो तुला दिला आहे त्याचा भोगवटा तुला केलाच पाहिजे !

"पतीच्या सुखाचे वांटेकरी व्हावयाचा मान जर मिळविणार तर त्याच्या श्रमाचाही वाटा उचललाच पाहिजे हक्कदारानें नाहीं का ?........"

"माझ्या बरोबरीनं वागण्यांत सुखही घ्यावं आणि दुःखही स्वीकारावं......"

अशा तऱ्हेच्या माझ्या घरात–माझ्या विश्वांत मी आलें.

स्वारीनं मला समजावून सांगितलं खरं; पण खिळे जुळण्याची–मशीन चालविण्याची वेळ मला कधीं आलीच नाहीं !–आली असती तर–तर खात्रीपूर्वक मी सांगतें, तीं तीं कामें मी आनंदानें करायला तयार झालें असतें. आपल्या घरचीं सारीं कामें करायला हरकत कोणती ?

त्यांत लाज कसली ? मोठ्या एकत्र कुटुंबांतल्या बायका, धुणं, पाणी धारापाणी, शेणगोठा करीत नसतात का ? त्यांना कुठं लाज नाहीं वाटत ? त्यांना कमीपणा नाहीं वाटत ? खिळेजुळणीचं आणि यंत्र चालविण्याचं काम करण्याची वेळ आली नाहीं तरी वर्तमानपत्रा-करितां आलेले लेख वाचणं, निवडणं, त्यावर स्वारीबरोबर चर्चा करणं, स्वारीचे लेख-तोंडीं सांगत असतांना-जलदीनं लिहून घेणं, उपमुद्रितें तपासून जेवढें होईल तेवढं स्वारीचं काम हलकं करणं हें मी लवकरच मोठ्या हौसेनें करूं लागलें होतें-त्यांत मला आनंदही वाटत होता ! पण तेंही एकसारखं असं फारसं करावं लागत नसे. जरूरी-पुरतीं छापखान्यात माणसं होतीं-संपादकीय काम हातच्या मळासारखं स्वारीला होतें. मग त्याची जोखीम नेहमीं माझ्याकडे येतेच कशाला !

पण माहेरच्या स्वयंपाकघराचा ताबा सुटला-नी घरीं येताच, लगेच सरळ आपल्याकडे घ्यावा लागला. मला त्यात कांहीं अवघड-वाईट वाटलंच नाहीं !-नवी नवरी-पहिलीच खेप-मी कां स्वयंपाक करावा ?-खानावळींतले डबे आणले म्हणून काय झालें ? मी स्वस्थ बसणार ! झोंपा काढणार !-असं मला वाटलंच नाहीं कधीं ! आप्पांची तशी शिक-वणच नव्हती नी माझं मला कळत कां नव्हतं ?

मी स्वयंपाक करूं लागलें. माहेरीं मला येतच होतं बरंच; पण स्वारीच्या आवडीनिवडी लक्षात येऊं लागल्या. जें सांगणं होईल तें करूं लागलें-केव्हा केव्हां एकादा नवा जिन्नस करायला सांगायचा-स्वतःसुद्धां करून दाखवावयाचा; स्वतः स्वयंपाकांत शिरून करायचं होई, "तुला काय येतंय् ! मी पहा कसं झकास करतों ?" म्हणत अस्तन्या सरसावून पुढं व्हायचं झालं, म्हणजे मी म्हणे, "हें काय हें ? पुरुषांनीं आम्हां बायकांच्या स्वयंपाकघरांत कशाला अशी लुडबुड करायला हवी !"

त्यावर लगेच उत्तर येई, "मग बायकांनीं तरी आमच्या वर्त-मानपत्रांत कां लुडबुड करावी ? कां लेख लिहावेत ? तपासावेत ? हवं नको म्हणावं ? बायकांना जशीं पुरुषांच्या बरोबरीनं कामें करावीशीं वाटतात-तशीं आम्हां पुरुषांनाही बायकांच्या बरोबरीनं केव्हा केव्हा हीं अशीं कामें करावीशीं वाटतात ?"

माझा स्वयंपाक स्वारीला आवडूं लागला. आम्ही दोघेच असलों म्हणजे पुष्कळदां बरोबरच आम्हीं जेवायला बसत असूं. मीं आग्रहानें स्वारीला वाढावं–स्वारीनंही आपल्याला आवडलेला जिन्नस मला आग्रह करकरून वाढावा! अशा वेळीं मला भारी मजा वाटे!–"हें असं मला भारी आवडतं!" असें मी एकदां सहज म्हणालें. तेव्हा म्हणायचं झालं–

"म्हणूनच तूं मला आवडलीस! उगीच नाहीं तुला पसंत केलं! अन् खरं सांगूं, तूंच मला मिळालीस म्हणून माझी धडगत आहे–माझ्या हातून थोडं फार कार्य होण्याची मला आशा आहे–नाहीं तर–"

"नाहीं तर काय?–" स्वारी जरा थाबली म्हणून मीं विचारलें

"तुझी ती सुलभा–तिच्याशीं जर लग्न करून जन्म काढायचा प्रसंग माझ्यावर ओढवला असता–आला होता तसा प्रसंग–आमच्या वडिलांच्या अत्याग्रहानें ओढवणार होता तो!–मी पाहायलासुद्धां गेलों होतों तिला एकदां! पण माझं नशीब शिकंदर!—मी तिला नापसंत करायच्या अगोदरच–तिनेंच माझ्या कपाळीं 'नापास'चा शिक्का मारून मला कायमचा सुखी केलं तिनं!–"

"पण सुलभा आली असती घरीं–तर काय झालं असतं एवढं?" मी मुद्दामच खवचटपणानें विचारलें.

"काय झालं असतं?–तिच्या फॅशन्स पुरवतां पुरवतां माझ्या नाकीं नऊ आले असते! घरच्या जेवणा–बिवणाची गोष्टच सोडून दे!–पण तिला सुखी–समाधानी करण्यासाठीं–न जाणो, छापखाना विकावा लागला असता लवकरच!–वर्तमानपत्राला रामराम ठोकावा लागला असतां–तिची हौस पुरविण्यासाठीं–नाटक कंपनीच्या किंवा सिनेमा–स्टुडिओच्या दारीं माझ्या बायकोला सिनेमांत घेतां कां?–तिच्याबरोबर रहायला मला परवानगी देतां कां?–हें विचारण्यासाठीं, तिला नटवून-थटवून आणि आपण तिचा पट्टेवाला होऊन खेटे घालावे लागले असते!–आणखी काय व्हावयाला हवं होतं? सांग पाहूं!–"

माहेरीं आप्पांचे स्नेही सोबती नेहमींच यायचे–रहायचे–कामाचा–स्वयंपाकाचा–वाढायचा धबडगा केवढा असायचा! तोच प्रकार इथं माझ्या घरींही नेहमींच मला अनुभवाला येत होता!

कवि, लेखक, समाजसेवक, देशभक्त, अशांची ये-जा सारखी असायची. बैठकी बसलेल्या असायच्या! जेवणीं-खाणीं, चहा, एक- सारखा चाललेला! असा धबडगा सुरू असला म्हणजे स्वारीची दिवसांतून क्षणभरसुद्धां भेट होणं मुष्कील व्हायचं! एकादा शब्द बोलायलादेखील फुरसद सांपडायची नाहीं आम्हां दोघांना! अशा एकादे वेळीं मन अनावर व्हावं, एकादा शब्द स्वारीचा ऐकायला मिळावा, कांहींतरी लाडकी थट्टा आपण जाऊन करावी, असं मनाला वाटे, तीनतीनदां हातांतलं काम टाकून बाहेर जाऊन डोकवावं. पण स्वारी-कवि, लेखक, नाटककार, कादंबरीकार, टीकाकार, वर्तमानपत्रांचे प्रतिनिधि, अशा जिगलग मित्रांच्या गराड्यांत मांडा ठोकून बसली आहे; सरस्वती स्वारीच्या जिभेवर सुंदर नाच करून राहिली आहे, असें पहावें-नी त्यांच्या रंगाचा भंग होऊं नये, तसंच कवि यशवंतांची—

ते हवेत माझे मला ।
परि भवति सदा गल्बला ॥

ही कविता गुणगुणत मागल्या पावलीं परतावं !

सुखांतलं दुःख-दुःखांतलं सुख अशा तऱ्हेनं मला एकप्रकारचा निराळा-निरतिशय अनुभव चाखायला नेहमींच मिळे !

वर्तमानपत्रकारांची जंगी परिषद् स्वारीनीं अत्यंत परिश्रमानें भरविली. त्या वेळीं आग्रहाच्या निमंत्रणानं आप्पा मुद्दाम आले होते ! स्वारीची आरंभापासून अखेरपर्यंत धांवपळ काय, घाई काय, त्रेधा काय, कांहीं बोलायची सोय नव्हती ! दोनदोन दिवस स्वारीच्या पोटांत घांसभर अन्न पडण्याची मुष्कील होती. रात्रीच्या रात्री अंथरुणाला पाठ लागत नव्हती.

अन् माझ्याही त्या वेळीं तशीच धांदल ! मंडळी आमच्याकडे उतरा- वीत किती ? सगळ्यांचीं जेवणींखाणीं-एक का दोन-प्रत्येकाच्या मिजासी संभाळतां संभाळतां मला पुरेवाट झाली ! पण अष्टौप्रहर राबत असतां न मला अननुभूत आनंदही होत होता !

माझ्या घरीं-माझ्या विश्वांत मी रंगलें होतें-दंग झालें होतें.

आप्पा तें सारें पहात होते; त्यांना पण किती आनंद होत होता! एकदां दोनदां त्यांनीं तसे उद्गारदेखील काढले!

“पतीच्या कार्यात सहभागी होतांना तूं तन्मय होतेस. स्वतःला विसरतेस. माझ्या पोटीं आल्याचं सार्थक केलेंस!” असे उद्गारतांना आप्पांच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले!

मलाही धन्य धन्य वाटलें!

छापखान्याच्या आणि वर्तमानपत्राच्या कामांतून स्वारीला क्षणभर उसंत मिळत नसे.

मला घरकामातून घटकाभर रिकामा वेळ सांपडत नव्हता!

मग नाटकाला-सिनेमाला नी फिरायला वरचेवर जायला आम्हांला कुठलं मिळणार? तसा योग वर्षांतून एकादा आला तर यायचा!

पण नेहमीं फिरायला जातां येत नाहीं किंवा नाटक-सिनेमाला जातां येत नाहीं, म्हणून मला वाईट कधींच वाटलं नाहीं. नव्हे त्याची आठवणही फारशी होत नसे!

कशाला होतेय्? आम्हांला आमच्या प्रेमाचं जगापुढं प्रदर्शन कां करायचं होतं? बाहेरून स्वारी आली कीं मी हंसतमुखानें पुढं व्हावं?–मला पाहिल्याबरोबर स्वारीचं हंसतमुख मला दिसावं–

–मला एकादे वेळीं बरं वाटत नसलं–तोंड वाईट झालं असलं तर स्वारीनं-बाहेरचा राग माझ्यावर न काढतां, आपली मिजास संभाळायला पुढें धावलें नाहीं, म्हणून अधिकाराचा ताशेरा न झाडता-अगोदर कळवळ्यानें माझ्याबद्दल विचारावें–माझी चौकशी करावी–

–मी पण, मला हें आणलं नाहीं, तें आणलं नाहीं, असें स्वारी दारांत दिसतांच छेडून, स्वारीचा जीव हैराण करण्यापेक्षां, पहिल्यांदा, स्वारीचा नूर पाहून पहिली त्याचीच चौकशी आस्थेनें करावी––

–स्वारीनें माझ्याकरितां आणलेलें पातळ मला एकदम पसंत पडावें––

–माझ्या पसंतीवर सोपवून, मीं एकादवेळीं आणलेलं पोलक्याचं कापड पाहून स्वारीला तेंच मनापासून आवडावें––

—वाचतां वाचतां—लिहितां लिहितां, वाऱ्यावर, दमून, थकून उघड्यावरच स्वारी झोंपावी-मी पाहिलें म्हणजे, हलकेंच झोंपमोड न होईल अशा बेतानें पांघरूण घालून, वाऱ्यापासून, माशांपासून, डांसांपासून होणारा त्रास वाचवी. असें स्वारीचें सुख पाहण्यांत—एवढी दक्षता ठेवण्यांत मला अत्यानंद होई !

—घरीं एकादे वेळीं चारदोन जास्त पाहुणे जेवायला असले, स्वयपाकात आणि इतर कामांत माझी तारंबळ होत असलेली पाहिली—तशी बाहेरच्या कामात थोडी फुरसद असली म्हणजे बाहेर पाहुण्यांना बोलत बसवून आत स्वारी स्वतः येऊन, झपझप पाट, पाणी, ताटवाट्या घ्यायची. मीठ चटण्यासुद्धा वाढून माझें तेवढेंच काम होण्यासारखा हातभार लावायची! पण, मी एवढा मोठा संपादक, एवढा प्रतिथयश लेखक, मी बायकोचं घरातलं इतकं क्षुल्लक काम कसं करूं ? असं कांहीं म्हणायचं नाहीं.

मग पुरुषी अरेरावी गाजविणं तर दूरच !

पराक्रमी पति पत्नीला आवडतो-पत्नीचं मन ओळखून वागणारा तिला सुखी करतो !

स्वारीजवळ त्या दोन्ही गुणाचा साठा भरपूर होता.

मला स्वारी आवडली ती उगीच नाहीं ?

दिवसामागून दिवस—महिन्यामागून महिने माझ्या घरीं—माझ्या विश्वांत परस्पराच्या सुखद सहवासात कसे भरपूर जात होते—हें मला कळतही नव्हतं !

आप्पाना वारंवार मी पत्र लिहून इकडची सारी हकीगत कळवी. त्यांचीं केव्हा सविस्तर तर कधीं त्रोटक पत्रें येत. कधीं पत्राला खूप उशीरही लागे. वसंताला एकदोन पत्रें मीं पाठविलीं. पण त्यानें उत्तरच पाठविलें नाहीं. मला वाईट वाटलें. पण मग पुन्हां त्याला मीं पत्रच पाठविलं नाहीं !—आप्पांच्या पत्रांत वसंताचा उल्लेख करून त्याच्याबद्दल चौकशी केली—तर उत्तरांत अचूक आप्पा त्याचाच तेवढा विषय गाळीत.

मला वाटे, वसंतानें माझ्याकडे यावं. चार दिवस स्वारीच्या सहवासांत रहावं. इथल्या संगतींत, त्याला कांहीं चागलं सुचेल. सुधारेल. असा सुधारलेला पाहून आप्पांना त्याच्या बाबतींत थोडं तरी हायसें होईल.

पण आप्या लिहायचे नाहींत–वसंताचें उत्तर येईना–मग मी तरी काय करणार ? वसंताच्या विचारानें मी केव्हां केव्हां बेचैन होई–!

त्याखेरीज मी कुणाला कधीं पत्रें पाठवीत नसे ! कुणाला पाठविणार ? असं पत्रं पाठविण्यासारखं दुसरं जिव्हाळ्याचं होतं कोण माझं, कीं ज्यांना पत्र पाठवून माझ्या विश्वांतला मला मिळणारा आनंद मी लिहून तो वाढीस लावावा ?

सुलभेला लिहायचं ? कशाला ? तिला माझ्या लग्नातल्या संसारसुखाची काय गोडी वाटणार ? ती उलट माझी टरच करायची. आपल्या मित्रांत–वसंताजवळ देखील !

सरलूला लिहावं असं एकादवेळीं मनांत येई. पण एकतर तिचा पत्ता मला कुठं ठाऊक होता ? अन् असता तरी–माझ्या लिहिण्यानं तिला आनंद होण्याऐवजीं दुःखच नसतं का झालं ? आपला आनंद तिला कळवावा तरी तिला आनंद व्हायचा नाहीं–तिच्याबद्दल चौकशी करावी, तर तिचं सुख मला ठाऊक झालं होतंच !–कांहीं लिहिलं तरी तिच्या दुःखावर डागण्याच दिल्यासारख्या व्हायचं ! म्हणून तिलाही लिहीत नसे !

अन् खरं सांगायचं, तर सगळ्यांना वरचेवर पत्र लिहितां येतील इतका–माझ्या घरच्या कामांतून वेळ तरी मिळण्यासारखा होता कुठं मला ?

माझं घर–माझं विश्व माझ्या आनंदाला अगदीं पुरेसं होतं !

स्वारीचं सुख पहायचं. स्वारीच्या कार्यांत सहभागी व्हायचं. प्रोत्साहन द्यायचं. सदा आनंदांत स्वारी राहील याकडे लक्ष ठेवायचं–हेंच माझं प्रेमाचं पहिलं आणि अखेरचं कर्तव्य ! असंच मला वाटूं लागलं होतं.

तसं वागण्यांत मला हवा तो आनंद आपसूख नी भरपूर मिळूं लागला होता !

अशा एकाद्या वेळीं स्वारी माझी थट्टा करी; अगदीं जुन्या पुराण्या–सनातनी बायकासारखी माझी सेवा काय करतेस ? हांकेला

धावतेस—थुंकीला हात पुढं करतेस ? जेवताना लहान मूल समजून धाकदपटशा घालून पोट तट्ट फुगेपर्यंत जेवायाला घालतेस ? झोंप यावी म्हणून बाळाला थोपटावं तशी आईचा आव आणून थोपटतेस—आहे काय हें !—'

केव्हां रागवावें-कधीं रुसावं—तर एकाद्या वेळीं भांडावं—नाटकाला न्या म्हणावं—व्याख्यानाला जातें म्हणावं-शहाणी—शिकलेली असून—अडाणी आहेस झालं !—

मी कांहीं मोठा नाहीं !—पण एक दिवस तुझ्या अशा प्रेमळ छळांत आपण केव्हा तरी मोठा होणार, असा रंग दिसतोय् मला !—

कारण—काय ? आजपर्यंत कित्येक थोर लोक जगांत जे नामवंत झाले—होऊन गेले—त्यांना, तू जशी आतां मला मिळाली आहेस—जसा प्रेमाचा छळ—वाद करतेस—तशाच त्यांना बायका मिळाल्या होत्या. तशाच त्या आपल्या नवऱ्यांना प्रेमानं छळीत होत्या !

—मग नको व्हायला मला मोठा एक दिवस ?

अशा अवस्थेंत माझं घर—माझं विश्व स्वर्गतुल्य वाटले तर तें खोटं कां आहे ?

—माझ्या सुखांत भर घालण्यासारखी मध्येंच एक गोष्ट झाली.

माणूस आहे. शरीरप्रकृती आहे. अति श्रम झाले—त्यातच थोडासा हवेंतही एकदम फेरफार झाला नी मी आजारी पडलें. विशेष नाहीं; नुसता ताप आला. नाइलाज होऊन मला अंथरुणावर निजणं भाग पडलं——

—स्वारीचीं कामं करतां येईनात म्हणून मला तळमळ लागली——

—मी बरी केव्हां एकदां होईन अशी स्वारीला तळमळ लागली——

—किती माझी सुश्रुषा केलीय् त्यावेळीं अष्टौप्रहर माझ्याजवळ बसून स्वारीनं पण !

—आजारांत इतकं प्रेमाचं माणूस घाबरून जाऊन सुश्रुषा करायला असलं म्हणजे आजारांतदेखील काय मजा पण वाटते ! मला अगदीं तशीच मजा वाटली ! आजारीपणाचाही मला आनंद वाटला !——

—पण स्वारीला माझ्यासाठीं कष्ट पडताहेत—स्वारीचं माझ्या हांतून कांहींच होत नाहीं, म्हणून वाईट वाटण्यांतही कांहीं कमी होईना !—

—मी स्वारीजवळ कितीदां हें बोलून दाखविलें——

–तेव्हां माझ्या अंगावरून हलुवारपणानें ऊबदार मऊ हात अगदीं हलकेंच फिरवीत म्हणायचं झालं—

" चारु, तूं बरी हो लवकर ! नव्हे, झालंच पाहिजे बरं तुला !– पण तूं जीवाकडे न पाहतां सारखी कष्ट करतेस–ते मात्र मी तुला यापुढें करूं देणार नाहीं.–पण मी सांगून का तूं ऐकणार आहेस ?–तुला राबविण्यांत शहाणपणा नाहीं. निदान आज ऐपत असून घरीं मी नोकर ठेवले नाहींत, हा माझाच गाढवपणा !–उद्यांपासून घरीं दोन नोकर ठेवून देऊं या !–अ ?–मग तुला कष्ट फक्त नोकरावर लक्ष ठेवायचे–जास्त नाहीं !–"

स्वारीचा हात मी आपल्या हातांत घट्ट दाबून धरला, स्वारी माझ्याकडे प्रेमार्द्र अशा स्थिर दृष्टीनं पहात होती !–किती बरं वाटलं मला त्यावेळी !–

———

प्रकरण नववें

# परिवार जमला कसा ?

" अं ? कोण ? नागू ! तूं रे इकडे कुठें ? "

टेबलावरील वर्तमानपत्रांतील निवडक मजकुरावर तांबड्या पेन्सीलीच्या खुणा करतां करतां स्वारीनें सहज वर पाहिलें तों समोर एक तरणाताठा–काळ्याकुट्ट रंगाचा–राकट कुणब्याचा पोर उभा असलेला दिसला.

त्याच्याकडे पाहतांच त्याने पुढे होऊन स्वारीच्या पायावर डोकें ठेवलें व दूर अदबीनें उभा राहिला.

भिवया आकुंचित करीत स्वारीनें त्याला न्यहाळलें. ओळखलें आणि त्याला वरील प्रश्न केला.

त्याच वेळीं स्वारीला चहा अन् फराळाचें द्यायला गेलें होतें मी त्या कुणब्याच्या पोराला मी पाहिले. मला जरा चमत्कारिक वाटलें.

त्याला केव्हांतरी अन् कुठेंतरी मी पाहिला असावा असें मला वाटलें. पण कांहीं आठवेना.

दारावरून रस्त्यावरून किती तरी माणसें जातात–आपण पुष्कळांना पहातों–माणसासारखीं माणसं पुष्कळ असतात. मनांत विचार आलान् गेला. त्या तरुणानेंही माझ्याकडे पाहिलें. त्यानें पण मला कुठें तरी पाहिलें असावं, मला ओळखल्याचा भाव त्याच्या मुद्रेवर उमटला असावा असें मला वाटलें ! त्यानें माझ्याकडे पाहिलें न पाहिल्यासारखें केलें; तशीच स्वारीकडे नजर वळविली नी मग लगेच जमिनीकडे दृष्टि लावली.

" नागू , इथं कसा आलास ? कुठून आलास ? कां आलास ? " स्वारीनें हातांतील काम चालू असतांच त्याच्यावर प्रश्नांचा मारा चालविला.

मग पहिल्यांदा कांहीं तो बोलेच ना! पायाच्या आंगठ्यानें जमीन उकरीत खालीं पहातच राहिला. त्याच्या डोळ्यांत पाणी आलें.

स्वारी त्याला चांगला ओळखीत होती. पण त्यांनीं ओळखावं—त्याला पाहिला नसतांना मी कसं ओळखावं?—ओळखीचा तो कां वाटावा हेंच समजेना मला! त्याच्याकडे आणि स्वारीकडे आळीपाळीनें मी मोठ्या कुतुहलानें पहात आहे हें स्वारीच्या लक्षात आलें.

"हा नागू आमच्या वाटेकऱ्याचा मुलगा! याचं बालपण आमच्या शेतवाडीवरच गेलं आहे! वाटा सोडून याचा बाप आपल्या खेड्याच्या शेतवाडीवर गेला; झालीं असतील त्याला दहा वर्षे. याच्या लहानपणापासून मी याला ओळखतों." अशी माहिती मला देऊन स्वारी नागूकडे वळली,

"तुझा म्हातारा म्हादबा ठीक आहे ना रे?—कसं काय चाल-लंयू तुमचं?"

तें ऐकून नागू एकदम जास्त रडायलाच लागला.

मी बुचकळ्यांत पडलें. त्याला पाहून त्याच्याबद्दल माझा ग्रह कांहीं चांगला झाला नाहीं. तो त्याचा रांकटपणा—लालभडक डोळे—बुरसलेलें तोंड—मळकट—घाणेरडे—अन् फाटके कपडे—मला कससंच वाटलं! अन् स्वारी त्याच्याशीं घरोब्यानें नी सलगीनें बोलत होती!

माझं काम नव्हतं तरी नागूची हकीकत ऐकायला मी मुद्दाम तिथं रेंगाळलें. पुन्हां पुन्हां विचारल्यावर नागूनें आपली हकीकत स्वारीला रडत रडत सांगितली—

"माझा बा गुमावला. जिमीन सावकाराच्या घरामंदि गेली. अन् आपुन देशोधडीला लागलों. पोटापान्याची सुई बघायापायी आलुया. म्हमईला जावं म्हटलं—पर ततनंच गांवचं ल्वाक माघारं येत्याती. कामच ततं लागत न्हायीती म्हनत्यात. थोरल्या धन्यापशीं गेलों पर त्येनीं थारा दिला न्हायी. नागू म्हणाला म्हनून धाकल्या धन्याच्या पायाप आलुया!"

नागूनं हें स्वारीला पुष्कळ विस्तारानं लांबड लावीत सांगितलं. पण त्या साऱ्याचा सारांश इतकाच होता.

नागू पोटासाठीं-नोकरी मागण्यासाठीं आला होत. त्याची हकी-कत ऐकून स्वारीला त्याची दया आली.

बोलून चालून शेतकऱ्याचा अडाणी पोर तो. छापखान्यांत—वर्त-मानपत्राच्या कचेरींत त्याला काम काय द्यायचें? त्याला येणार तरी काय? पण भरंवशानें, आशेनें धाकट्या धन्याकडे आला— थोरल्या धन्यांनीं-मामंजीनीं त्याला नकार दिला—म्हणूनच आला. आणि म्हणून त्याच्याबद्दल स्वारीचा जीव जास्त कळवळला!

जसा कांहीं आपल्याच कुटुंबांतला—आपलाच माणूस—तो घरीं आला तर त्याला जा म्हणून कसं सांगायचं?—अशाच कल्पनेनें नागूला "रहा आपल्याकडे! पाहूं काय तुला काम देतां येईल तें!" असें मोघमांत त्याला सांगूनही टाकलें! मी आश्चर्यानें स्वारीकडे पहायलाच लागलें! 'नाहीं तरी स्वारीला माणसांचा सोसच भारी! करायचंय काय माणसांची खोगीरभरती करून?' हा विचार माझ्या मनांत आला. स्वारीनें तें ओळखलें कीं नाहीं कोण जाणं; पण मला म्हणायचं झालं, "चारु, हा नागू तुझ्या दिमतीला असूं दे! स्वार्थ आणि परमार्थ! गरीब अडाणी शेतकऱ्यांना सगळ्यांनीं नागवलं तर त्यांनीं जायचं कुठं? जगायचं कसं? आपल्यां हातांत आहे तेवढं करू या! हा आपलाच माणूस आहे. नाहीं तरी आपण कुणाला तरी ठेवणारच होतों—तो हाच आला. बरंच झालं. नाहीं का?—" तसंच नागूला सांगितलं, "नागू, सध्यां या सांगतील ते घरांतलें काम करायचं. समजलास? नीट वागलास तर पोट भरशील—"

येतां क्षणीं नागूला आमच्याकडे आधार मिळाला. पोटाची सोय झाली!

त्याला केवढा आनंद झाला. त्यानें पुन्हां स्वारीचे पाय घट्ट धरले. माझ्यादेखील पाया पडला.

मी आजारी असतांना घरांत एकादा नोकर ठेवायचा असं म्हणायचं झालं होतं. चार दोन दिवसांत मी बरी होऊन कामाला लागलें होतें. मला नोकराची गरजही नव्हती, की आठवणही झाली नाहीं.

पण स्वारी मात्र विसरली नव्हती, हें नागू आपण होऊन चालून येतांच त्याला चट्दिशीं ठेवून घेतला, त्यावरूनच मी ओळखलें.

नोकर ठेवायचा हा स्वारीचाच आग्रह पडल्यावर मी नाहीं कशाला म्हणूं ? आणि तसं पाहिलं तर नागू अडाणी खेडवळ खरा पण चाणाक्ष अन् चलाख भारी !

आमच्या इथं राहिल्यावर किती भराभर त्याची कळा पालटली. हरकामास तो पुढें नाहीं असं नाहींच मुळीं !

माझीं कामं ऐकायचा; स्वारीच्या पुढं पुढं करायचा; त्यामुळं तो लवकरच स्वारीच्या गळयांतला ताईतच बनला !

घरांतलीं कामं संभाळून तो आतांशा छापखान्यातल्या आणि वर्तमानपत्राच्या कचेरींतल्या लहानसहान नोकरांवरसुद्धां करडी नजर ठेवायला लागला, त्याना धाक घालूं लागला.

गमतं कोण, कामांत चुकारपणा करतं कोण, सामान-सुमान डोळा चुकवून लाबविण्याची हात चलाखी करतो कोण? यावर कोणी न सागताच नागू आपली बारीक नजर ठेवून केव्हा स्वारीला तर केव्हा मला बित्तंबातम्या देऊं लागला ! आपलें प्रस्थ वाढवूं लागला. त्याच्याकडे स्वारी केव्हा लक्ष देई, केव्हां दुर्लक्ष करी. पण पहिल्यादा नागूबद्दल माझा अनुकूल ग्रह झाला नव्हता, तरी आता त्याच्या वागणुकीनें बदलला. अडाणी असून हुषार, प्रामाणिक, विश्वासू, कामाला तत्पर असें पाहिल्यावर माझा ग्रह बदलला तर त्यात विशेष काय ?

अडाणी माणसं इतकीं चांगलीं असूं शकतात याचंच मला नवल वाटे. नागूबद्दल स्वारीजवळ बोलताना हें मी केव्हां तरी बोले, पण स्वारी त्यावर नुसती हंसे !

असेंच मी एकदां कशावरून तरी स्वारीजवळ नागूबद्दल बोलायला गेलें, तेव्हा म्हणायचं झालं, "चारु, त्याचं असं आहे, कुणी–शहाणं असो कीं अडाणी असो, मालकावर छाप ठेवणें, हें सगळ्यानाच उपजत ज्ञान असतं ! मालक चांगला–सावध असला तर नोकरही नीट–सावध वागतो. पण मालक सैलपणानं–बेसावध वागूं लागला, तर नोकर त्यापेक्षांही बेफामपणानं वागायला कमी करायचे नाहींत.

"नागू आहे ठीक ! पण त्याला तशी सवलत दिली तर तो केव्हां आपल्या डोक्यावर बसेल–याचा नेम नाहीं. हें विसरून चालणार

नाहीं !—निदान त्याचं गुणवर्णन त्याच्यापुढें तरी वरचेवर करीत जाऊं नकोस !—"

स्वारीनं सागितलें. पण मनांत मला कांहीं तें पटलें नाहीं !—अति सावधपणा—नोकराबद्दल एकसारखा अविश्वास मनात वागवणं हें तरी चागलं का , असच मनात आलं. पण मी बोललें नाहीं काहींच !

नागूलाच काय पण छापखान्यातल्या आणि वर्तमानपत्राच्या कचेरींतल्या साऱ्याच हाताखालच्या माणसाना स्वारी अतीशय मायेनं नी आपुलकीनं वागवी. आपलं मोठं एक कुटुंबच आहे असें मानी. सगळ्यांच्या सोयी पहावयाच्या. कुणाचं उणं पडूं द्यायचं नाहीं. आपले हाल झाले तरी चालतील, पण आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांचं कांहीं कमी पडूं द्यायचं नाहीं, हा कटाक्ष स्वारीचा. त्याबरोबरच कदर आणि दराराही सर्वांवर सारखाच ! शिस्तीला चुकलेलं कुणी खपायचं नाहीं. कुणाची कधीं मग मुळीसुद्धा गय करायची नाहीं. कुणी मोठा असो कीं लहान असो कडकपणाने त्याची हजेरी घ्यायचीच ! हा स्वारीचा स्वभाव !

नागूला आमच्याकडे राहून आता जवळ जवळ वर्ष होत आलं होतं; घरातल्या कामापेक्षांही बाहेर बिलवसुलीचीं कामें त्याच्याकडे आलीं होती. मला आतांशा वरचेवर बरं वाटेनासं झालं होतं. वात्या होऊं लागल्या होत्या. घरांतलीं कामं उरकेनात. वेळेवर स्वारीला जेवायलाही घालता येईना मला !

कुणीतरी बाई माणूस घरांत हवंसं वाटायला लागलं. पण माणूस म्हटलं कीं तयार, असं कसं होणार ?

स्वारी आपल्या बाहेरच्या कामात चूर. मला सांगायचाही संकोच वाटे. नागू झाडलोट करी. पाणी भरी. बाजारहाट करी. दिवाबत्ती, दळूण आणणं—हेंही करी. पण चुलीपुढें बसून शिजवून वाढलं तर पाहिजे ? वाटलं, आप्पानां लिहावं नी आतेला आणवावं. लिहिणार होतें तोंच एक दिवस आप्पाचं पत्र घेऊन आमची सुंद्रा सरशीला घेऊन माझ्या घरीं शोध करीत येऊन हजर आली !

त्या मायलेकींना पाहून मला आनंदही झाला—आश्चर्य वाटलं !

पुष्कळ दिवसांनीं माहेरचं एकादं काळं कुत्रं जरी भेटलं तरी आम्हां बायकांना काय आनंद होतो, हें बायकांचा जन्म घेऊन सासरीं गेल्याशिवाय कुणाला कळायचं नाहीं !

सुंद्राला नी सरशीला पाहून मला तसाच आनंद झाला. मी तिची विचारपूस केली. सुंद्रा खराब अन् कष्टी दिसली; तशीच सरशीपण भारी उतरलेली नी काळवंडलेली दिसली !

सुंद्रानं आप्पांचं पत्र मला दिलं. अनायासें आलेल्या सुंद्राला नी सरशीला आपण ठेवून घेऊ, आपल्या त्या दोघी उपयोगी पडतील म्हणून मला बरें वाटलें.

सुंद्राला मी भेटलें, स्वारीकडून तिचें काम मी खचित करीन या भरंवशानें तशाही स्थितींत आनंद झाला तिला !

सरळ आणि प्रेमळ सुंद्रा ! ना माझ्या जातीची कीं गोताची. माझ्या माहेरची एक गरीब मोलकरीण ! पण आमचा ऋणानुबंधच किती चांगला–ती आम्हांला आमची वाटायची. तिला आम्ही आपले वाटायचे !

मला पाहिलं तिनं–माझी चालू परिस्थिती ओळखलीन् तिनं चट्दिशी ! ओळखली नी तिला काय पण आनंद झाला ! त्यापुढं ती घटकाभर आपलं आणि आपल्या लेकीचं दुःखदेखील विसरली !

मला न्यहाळून पहात म्हणते कशी सुंद्रा–" चारुताई, पोटाशी दिसताया जणूं ! लई ब्येस झालं व !–तुम्हास्नी सोन्यावानी ल्येक होईल व आप्पासाबास्नी नातवाला डोळ भरूनशानी बगूं द्या ! मंजी संमदं मनापरमान व्हईल त्येंच्या !–बाळातपनाला मलाच बलवा बरं ताईसाब !–तुमच्या आईची बाळातपणं म्याच केली हायती नव्हं ! वसंताच्या वक्ती मीच व्हतें. तुम्हास्नीबी म्याच पायावर घेतल्या !–अन् आतां ह्ये तुमचं पर बाळातपन माझ्याच हातनं व्हाया व्होवं ! आदुगरचं सांगून ठेवतें ! "

वेडी अन् अडाणी सुंद्रा ! आपलं सारं बोलतच सुटली ! मला किती लाजल्यागत होत होतं तिच्या बोलण्यानं, तिच्या लक्षांत तरी येत होतं का ? मी विषय बदलला. " राहूं दे तें तुझं कांहींच्या बाहीच बोलणं; अगोदर तुझी अन् सरशीची हकीकत कळूं दे मला. ती सांग ! "

" आप्पासाबांनीं कागदामंदी संमदं लिवलया नव्हं ? " सुंद्रा म्हणाली.

" आप्पांनीं काय पत्रांत कपाळ लिहिलं आहे तुझं ? " मी पत्र वाचलच होतं. त्यांत सुंद्रा तुझ्याकडे येते आहे: तुझ्याकडे राहील. तिला ठेवून घे चार आठ दिवस. तिचं कांहीं काम आहे, तें झालं म्हणजे ती परतेल. तिच्याबरोबर सगळ्या हकीकतीचं पत्र पाठीव. असंच मोघम होतं त्यांत. तें मी तिला सांगितलं नी म्हणालें, " आप्पांचं पत्र नसतं आणलंस तर मी काय तुला राहूं नको म्हटलं असतं कां ग माझ्याकडे ? आता सांग; नाहीं तर तूंच सांग ग ! सुंद्राला सांगायचं नसलं तर राहूं दे !—कसलं काम आहे तुमचं ?—"

माझा प्रश्न ऐकून सरशी डोळ्याला पदर लावून रडायलाच लागली.

सुंद्राही गंहीवरली, त्याच आवाजांत तिनं आपली हकीकत सांगायला सुरुवात केली–

" सरशी काय सांगतीया आपलं कपाळ ताईसाब ! सरशीच्या जन्माचं वाटूळं व्हयाचा वकुत आलाया. हिचा दाल्ला हिला नांदवीना. कुठं घर टाकून फरारी झालाया त्येंबी कळना !—

" वरीस झालं सरशी माझ्यापशीं आलीया. काय करील तर ? कुनाच्या जीवावर सरशीनं आपल्या घरांमंदीं तकडं करमावं व ?

" रिणाचा डोंगर डोक्शीवर करूनश्यानी ठेवलाया ? रोज उठून पठाण उबऱ्यांत देण्यापायीं धरनं धरून बसतुया ! हिच्या दाल्याचा पत्त्या न्हाई.

" म्हमईला गेला समाजलं तवा तकडं गेलों. ततंबी न्हाई.

" तरण्याताठ्या पोरीनं कसं दिस कटावत तुम्हींच सांगा बरं ताईसाब !–आम्ही गरीब—नाचारी झालों म्हणून का कुळी बाटवायची व्हय ? तर न्हवऱ्याला सोडचिट्टी देवी अन् दुसरा म्होतुराचा न्हवरा करून घेवा ! तशी रीत न्हावी व आमच्यांत ! जातीसाठीं माती खावी लागतीया !—

" सरशीला वंगाळ का बगून जागा दिली व्हती ? तुम्हीं पर परतक्ष बघीतलं व्हतंच कीं ! मस्त चांगलं बगीतलं. संमद्यान्नी दावलं. पर अकेरी जें व्हयाचं तेंच झालं बगा !

" प्वार लई बाजिदा निघाला. रिणपाणी करून, जिमनी इकून देसोधडीला गेला. आता ह्या पोरीचं काय करू मी ?–का कुठं बोलाया तरी येतया ?–"

सरशीची हकीकत सुंद्रानं सांगितली. मला भारी वाईट वाटलं. सरशीची कींव आली !

काय करावं या अडाणी लोकांना ? सरशीसारख्या चागल्या–सालस बायकोला टाकून कां जावं तिच्या नवऱ्यानं ? आतां सरशीनं काय करावं ?–मी तरी तिच्याकरितां काय करूं ?

" मग सरशीला घेऊन इथं कशी आलीस ? इथं काय करणार आहेस ?–" मी सुंद्राला अगदीं सहानुभूतीनेंच विचारलें, " मी तुझ्यासाठीं अन्–सरशीसाठीं काय करूं ?–"

" तुम्ही तरी काय करतायसा ? कुणीतरी मला सागितलं–सरशीचा दाल्ला या गांवामंदी आलाया. कुना मोठ्या शेटाकडं चाकरी धरलीया त्येनं !–तवा म्हटलं येवं तुमच्याकडं. आपुनच बगावं कुठं गवासतुया का. भेटला तर त्येच्या धन्याला बी सांगावं. काय बी करून आपल्या बायकुला नांदीव म्हनावं अन् सोधीन करावी. म्हनूनशानी आलुया ताईसाब !–तुम्ही कुट घराच्या भाहीर जानार अन् बघनार !-आम्हींच हिडून बघूं !-"

" इथंच आहे सरशीचा नवरा ? नक्की ? मग कांहीं काळजी करूं नकोस ! लागेल त्याचा शोध ! तूं पहाच ! पण मीही करीन शोध ! नांव–वर्णन सगळं सांग मला ! " सुंद्राला आणि सरशीला धीर देण्याच्या सद्बुद्धीनें अंतःकरणापासून मी म्हणालें, " सुंद्रा, आमचं वर्तमानपत्र आहे, त्यांत जाहिरात देऊं आणि तुझ्या जावयाचा शोध काढूं ! समजलीस !–" वर्तमानपत्र म्हणजे काय ? त्यात जाहिरात द्यायची म्हणजे काय ? आणि जाहिरातीनें शोध लागायचा कसा ? हें सुंद्राला कळणार कसं ? अडाणी ती ! अन् मीसुद्धां अडाणीच नव्हे का ? वर्तमानपत्रांत जाहिरात दिली तरी सरशीचा अडाणी नवरा–कुठं तरी हमाली–मजुरी करीत असेल, त्याला वर्तमानपत्र वाचायला कशाला येतंय ? नी वाचतोय् कशाला ? मग जाहिरात देण्याचा उपयोग काय ?

मीं कांहींतरी सांगितलें. त्या मायलेकींनीं ऐकलं. माझ्या सांगण्याचंच त्यांना बरं आणि खरं वाटलं. त्यांना वाटलं, मी सरशीच्या नवऱ्याला धरून, पकडून खचितच त्यांच्यापुढें उभा करणार!

स्वारी कुठल्याशा सभेला गेली होती. सुंद्रानं स्वारीची पण चौकशी केली. तिचा हेतू मीं ओळखला. तेव्हां तेंही सांगितलं तिला, कीं स्वारीलाही शोध करायला सुचवीन मी!

सुंद्रा निश्चित झाली. सरशीलाही बरं वाटलं.

"सरशीचा दाल्ला गवसू द्या–ताईसाब, तुमची वाचा खरी होऊं द्या. मी तुमच्या तोंडात तोंडभर साकार घालीन!" सुंद्रा मनापासून म्हणाली. "देव तुमचं भलं करील. तुमच्या पोटाला किष्णदेव येईल. तुमचं पांग फेडील–!"

मी संध्याकाळच्या कामाला उठलें. सरशीला नी सुंद्राला बसायला सांगितलं–

पण त्याना आपपर भाव कुठला? मोठेपणाच्या कल्पना त्यांच्या गांवींसुद्धां नव्हत्या. माहेरीं जशा दोघी कसलंही काम आनंदानें करायच्या, तीच रीन त्याची इथंही!

"अं! बस कशापायीं?" सुंद्रा म्हणाली, "काय बी काम सागा कीं ताईसाब!" ऐकून मला बरं वाटलं, दोघी वाटेल तें काम करायला तयारच होत्या.

पण विशेष काम नव्हतंच तर देऊं काय?–अन् द्यायला असलं तर सुचत होतं कुठं मला?

सुंद्रा–सरशी–माहेरचीं माणसं आपल्याकडे आल्याचा आनंद मनांत वावरत होता. त्यांची करुणाजनक हकिकत मनाची कालवाकालव करीत होती. सरशीबद्दल दया तर तिच्या आचरट–अडाणी नवऱ्याबद्दल तिरस्कार–मनांत क्षणाक्षणाला येत होता. हे अडाणी लोक शहाणे झाल्या-शिवाय–शिकल्याशिवाय कधीं सुधारायचे नाहींत, असें वाटत होतें.

मला सुचलें नाहीं, पण सुंद्रानें डाळतांदूळ निवडायला मागून घेतले. सरशीला तिनंच सांगितलें, 'दिवेबिवे पुसायला घे. तेल भर, विचार ताईना!'

सुंद्रा डाळतांदूळ निवडूं लागली. सरशी तेलवाती करूं लागली. मी शेगडी फुलवूं लागले. काम करतां करतां आप्पांच्या–वसंतांच्या गोष्टी सुंद्रा सांगतच होती–किती गोड वाटत होतं मला–त्या ऐकताना !

सभेहून स्वारी आली. पाहिलें तों दोन नव्या कुणब्याच्या बायका काम करीत आहेत; माझ्याशीं बोलत आहेत !

स्वारीला पहाताच दोघीही लाजल्या. पदर सावरीत, मर्यादेनें त्या झट्दिशीं उठून बाहेरच गेल्या ! मला मोठी त्याच्या वागण्याची गंमत वाटली. स्वारीनं साहजिकच चौकशी केली. मी पण सारी त्याची हकीकत सांगितली.

माझ्या माहेरच्या बाया आहेत, हें कळताच पुढचं ऐकण्यापूर्वीच माझी थट्टा करायची झालीच अगोदर !

" आप्पाना कळवल होतंस वाटतं ? मागणीच केली होतीस कां हक्कानं यांची ?–बाकी, मनासारखी तरतूद आपली आपणच करून घेतलीस, हें ठीक झालं ! आतां आपल्याला काळजी करायला नको !–एक अनुभविक सुईण झाली !–दुसरी घरकामात उपयोगीं पडेल–आपल्याला त्याच्या हातचा स्वयंपाकसुद्धां चालेल हो !—"

माझ्याकडे पहात म्हणायचं झालं !

पुरुषाना बोलताना लाजच वाटत नाहीं. मला किती लाजल्यासारखं झालं !

मीं मध्येंच थांबून अन् गंभीरपणानें सरशीची सगळी हकीकत सांगितली. ती मात्र अगदीं तितक्याच गंभीरपणानें अन् लक्षपूर्वक ऐकणं होत होतं !

चहा करायला सांगून बाहेर जायचं झालं.

चहा ठेवून सुंद्राबरोबर बोलायला मी मधल्या घरात ती बसली होती तिथें आले.

सरशीनें दिवे लावले. कुठें कुठें ठेवायचे म्हणून मला विचारले, एक दिवा पहिल्यांदा बाहेरच्या बैठकींत न्यायला मीं तिला सांगितला. ती बाहेर निघाली. ' जपून ग, पाडशील नाहीं तर ! " सुंद्रा तिला सांगत होती.

इतक्यांत बिलवसुलीला गेलेला नागू आंत आला.

" किती रे उशीर नागू केलास ? " मी नागूला पहातांच जरा रागानेंच विचारलें.

नागू नाव ऐकलं. सुंद्रानें, सरशीनें, त्याच्याकडे पाहिलें !

सरशी जागच्या जागींच नागूकडे पहात खिळली !–सुंद्राच्या तोंडाचा तर ' आ 'च आला !

" अगबाई !–" सरशीच्या तोंडातून उद्गार चटदिशीं बाहेर पडला !

सुंद्रा झटपट उठली !–मागें वळली !–मी मध्येंच होतें–माझ्याकडे पहात–" ताई, ताई, ह्यो ?–सरशीचा न्हवरा ! अन् हतं ?–" अडखळत, आश्चर्यानें, आनंदाने, भीतीने, सुंद्रा म्हणाली. सुंद्राकडे आणि हातांत दिवा घेऊन दगडी पुतळीप्रमाणें तटस्थ उभ्या असलेल्या सरशीकडे–नागू स्तंभित होऊन पहातच उभा राहिला !

माझा प्रश्न त्यानें ऐकलाच नाहीं !

आकस्मिक–अकल्पित एक नाट्यप्रसंगच जसा कांहीं होता तो !–

नागूच सरशीचा नवरा होता–तो तिला टाकून आला होता––

ती त्याला शोधायला आली होती–दोघांची भेट माझ्या घरीं अशा रीतीनें पडायचा आज असा योग होता !

स्वारीच्या गांवाकडचा नागू–माझ्या माहेरची सरशी ! स्वारीनें नागूला ठेवून घेतला–माझ्याकरितां–नागूकरतां सरशीला स्वारी ठेवायला कां नको म्हणेल ?–

स्वारीला हें समजलें. नागू अगतिक होऊनच नव्हे, तर स्वारीच्या आज्ञेनें सरशीला नादवायला तयार झाला ! तयार न होऊन सांगणार कोणाला ?––

स्वारीनें लगेच–चार दोन दिवसांत–त्याना संसारच थाटून दिला ! सुंद्राला सरशीला–माझ्या घरीं पाऊल ठेवतांच देवच पावला असें वाटलें तर त्यांत खोटं काय होतं ?–सुंद्रा जवळ असल्यामुळें व सरशी घरांत बावरूं लागल्यामुळें मला किती धीर वाटूं लागला !

---

प्रकरण दहावें.

# प्रीतीचा प्रसाद !

एकाद्या घटनेचा परिणाम क्षणभर आनंददायक हंसण्यांत होतो; पण त्या घटनेचें मूळ पाहूं गेल्यास तिथें त्रासदायक दुःखाची घाण सांचलेली असते असें आढळून येतें; अन् मग मनाची मोठी चमत्कारिक स्थिति होते.

सरशी-नागू या जोडप्याचा माझ्या घरीं अकल्पित भेटीचा-व्यवहारांतला खराखुरा नाट्यप्रसंग पाहिला, तेव्हां मला त्याची गंमत वाटली. मी आनंदानें हंसलें.

पण त्या, त्या वेळच्या आनंददायक वाटणाऱ्या घटनेच्या मुळाशीं काय होतें ? नागूनें आमच्या येथें राहतांना आपली बाजू कशी सजवून स्वारीपुढें मांडली होती ?-म्हातारा मेला, आपली जमीन सावकाराच्या घरीं गेली-आपण अन्नाला मोताद झालों, हें त्यानें डोळयांत पाणी आणून सांगितलें; या त्याच्या गोष्टी खऱ्याहि होत्या; पण, सुंद्रानें आल्यावळीं आणि नंतर सरशी संसार मांडून राहिल्यावर वेळोवेळीं नागूबद्दल ज्या कित्येक गोष्टी सांगितल्या, त्याचा मागमूसही नागूसारख्या अडाण्यानें आम्हांला लागूं दिला नव्हता !

आपलें लग्न झालें आहे, बायकोला निराधार सोडून आपण आलों आहोंत, सावकाराच्या घरीं आपल्या जमिनी जायला, नाच, तमाशे, जुगार, दारू, बाहेरख्याली हे आपले रंगढंग-दुर्व्यसनेंच कारणीभूत झाली आहेत, हें त्यानें कसें शिताफीनें लपविलें होतें. नाच, तमाशे करायचे, यात्रा-जत्रा धुंडाळायच्या, दारूपाण्यांत-बाहेरख्यालींत पैसे उधळायचे-डोंबारणींच्या पालांत दिवसच्या दिवस पडून रहायचं !-मग जमिनी सावकाराच्या घरांत गेल्या तर नवल काय !

शेजारला सरशी राहिल्यावर—आम्हीं तिला संसार मांडून दिल्यावर एकेक दिवस सरशीनें आपल्या गुणी (!) नवऱ्याचे एकेक आगलावे चाळे मला सांगितले. मला तर त्याचं आश्चर्यच वाटलें; पण जेव्हां स्वारीला मीं हें सांगितलें तेव्हां माझ्याइतकंच स्वारीला आश्चर्य वाटलें—नागूचा राग आला!

नागूला विचारलं. चांगला खडसला. त्यानेंही मग साऱ्या गोष्टी कबूल केल्या. पूर्वी चुकला—घसरला. आतां तो आपल्या देखरेखीखालीं सुधारत चालला आहे, चांगला सुधारेल लवकर, असें स्वारीला वाटलें.

सरशीला नांदवलंच पाहिजे, असें बजावून बळजबरीनें त्याला स्वारींनीं बिऱ्हाड करायला भाग पाडलें.

दुसऱ्या तिसऱ्याचं नागूनं ऐकलंच नसतं.सरशीला क्षणभर उभंसुद्धां राहूं दिलं नसतं त्यानें. पण स्वारीचें त्यानें नाइलाज होऊन कां होईना, पण ऐकलं. बिऱ्हाड केलें. फारा दिवसांनीं नवराबायकोची तिसऱ्याच ठिकाणीं—अनपेक्षितपणानें भेट होण्याच्या आनंददायक वाटणाऱ्या घटनेच्या बुडाशीं असा त्रासदायक उकिरडा होता!

नागू—सरशीचें बिऱ्हाड झालें. त्याची कानउघाडणी नीट वागण्याबद्दल—सरशीला वागविण्याबद्दल केली. नागू आपलें काम—छापखान्याचीं बिलें गोळा करण्याचें-पाहूं लागला. सरशी आपल्या घरांतलीं कामें उरकून माझ्या कामाला हातभार लावूं लागली.

आपल्या लेकीच्या संसाराचें गाडें सुरळीत चालूं लागलें हें पाहून सुंद्राचा जीव भांड्यांत पडला. आम्हांला दुवा देत—पुनःपुन्हां आमचे उपकार मानीत ती परत आपल्या गावीं गेली.

जातांना “ बाळंतपणाच्या वक्ती कागूद धाडा; आपुन येनार. ” असें बजावायला ती विसरली नाहीं! मी तिला बोलावीन म्हणून वचन दिलें. तेव्हां तिला केवढा आनंद झाला!

शहाण्याचं व्हावं चाकर पण मूर्खाचं होऊं नये धनी म्हणतात!

पण व्यवहारांत असें म्हणून चालत नाहीं. नागूसारख्या अडाणी—मूर्खाचा धनीपणा अळेबळें कां होईना पण पत्करावा लागलाच कीं नाहीं आम्हांला?— नागू स्वारीच्या गांवचा—वाटेकऱ्याचा मुलगा म्हणून—

स्वारीला, आणि सरशीसारख्या गरीब पण माझ्या बाळमैत्रिणीचा तो नवरा म्हणून मला-त्याचा धनीपणा पत्करावाच लागला होता !

मला काळजी वाटूं लागली, सरशी-नागू योगायोगानें आमच्या इथं आलीं. राहिलीं. तरी पण अडाणी माणसं. त्यांचं जमतय कसं आणि दोघे गुण्यागोविन्दानें नांदतायत कसे ? तो हिला छळील का हीच आकस्ताळपणानें त्याला सळोकापळो करून सोडील ?

पण सरशी हाडाची गरीब हें मला पहिल्यापासून माहित होतें. नागूचाच नेम मला वाटत नव्हता !

शेतकऱ्याच्या बायका पांढरपेशांच्या बायकासारख्या ऐतखाऊ नसतात. शेतामाळांत नवऱ्याच्या बरोबरीनें राबून आपला शेर आपण मिळवितात- सुंद्राच्या सांगण्यावरून मला हें माहित होतें; सरशी शेतावर राबत असेल. होतीही. आतां माझ्याकडे ती काम करूं लागल्यावर, तिच्या पोटापाण्याची व्यवस्था मला करणं भागच होतं. पोटाकरितां नागूवर तिचा कांहीं भार नव्हताच ! तरी पण अडाणी झाला-तरी नवरा तो तिचा. तिला केव्हां आणि कां छळील याचा काय नेम ?

पण नागूवर देखरेख ठेवायची मीं ठरविलें. सरशीलाही तो तुझ्याशीं काय वागतो-कसं वागतो हें मला सांगत चल असें सांगून ठेवलें होतें.

कसें का असेना, नागू सुतासारखा सरळ वागूं लागला. सरशीला चांगलें वागवूं लागला.

सरशी माझ्या घरांत मोकळेपणानं वागूं लागली. घरांतलीं सगळीं कामें जवळजवळ तीच करूं लागली. मला ती जीव कीं प्राण करी !

भोळीं-अडाणीं माणसं, त्यांना आपल्याला कोण जपतें-आपली माया करते, हें कसें अचूक कळतं; त्याचा मोबदला-शहाणपणानें, बुद्धीनें नसला तरी-भावनेनें, अंतःकरणानं-तसं'व उलट प्रेमानं कसा देतात, हें सरशीच्या संगतीनं मला रोज रोज अनुभवाला येऊं लागलं !

सरशी मोलकरणीची मुलगी-कुळंब्याची पोर-आपली नोकर-आपल्यापेक्षां मानानं-अधिकारानं कमी-आपण तिच्यापेक्षां श्रेष्ठ-असं

मला तिच्याबद्दल वाटेनाच ! माझ्या एवढ्या तेवढ्या चांगल्याकरितां ती जपे–काळजी घेई. मग मला तिच्याबद्दल परका भाव वाटणार कसा ?

तिचा स्वच्छपणा अमोदरच होता. पण माझ्याकडे आल्यापासून आणखी वाढला. कामंसुद्धां कशी नीटनेटकी–वेळच्या वेळीं करायची ती !

कांहीं न समजेल तर "ताई हें कसं करूं ? तें मला सांगा–शिकवा" असें विचारतांना तिला मुळींच संकोच वाटत नसे !

आपलीं कामं उरकून सरशी चट्‌दिशीं माझ्याकडे यायची. हाताखालीं भराभर कामं करूं लागायची–केव्हा तरी भीतभीतच पण विचारायची–

" ताई, मी स्वयंपाकात करूं लागूं ?–आवडेल तुम्हांला ?–"

तिनें एकदा स्वयंपाकाचा आग्रहच धरला. त्या दिवशीं आमच्याकडे बाहेरचं कुणी नव्हतंही. मी तिला स्वयंपाक करायची परवानगी दिली. ती आनंदानें तयार झाली. पण म्हणाली, " ताई, तुमच्यासारखं मला नाहीं हं करता यायचं–आमच्या घरींच जेवण करून घालतें मी !–"

सरशीच्या हातचा स्वयंपाक–स्वारीला कांहीं ठाऊक नव्हता. स्वयंपाक करून ती गेली. स्वारी आल्यावर आम्हीं मिळूनच जेवायला बसलों. काय खमंग अन् चमचमीत स्वयंपाक केला होता तिनं !

चवदार जिभेला लागला, पण झणझणीतपणानें–माझ्याच काय पण स्वारीच्या डोळ्यात पाणी यायला लागलं–तोंडाचा नुसता भडका उडाला ! " हें काय चारु, आज हा स्वयंपाक करणं का काय ?–"

मी स्वयंपाकाची खरी हकीकत सांगितली ?

तेव्हां स्वारीची हंसताहंसतां मुरकुंडीच वळली !

" आहे ! खमंग आहे ! चमचमीत आहे ! पण भयंकर जहाल आहे बोवा ! " हंसत–तोंडाचा भडका झाल्याने हाहा करीत पण पुन्हां आमटीचे भुरके मारीत स्वारी म्हणाली, " शिवाजी महाराजांना स्वराज्य मिळवून देणारे मावळे, आपल्या बायकाच्या हातचें असें जहाल जेवणच जेवून कडवे शिपाई बनले असले पाहिजेत ! खात्री झाली आपली !–"

त्या बोलण्यानें मलाही हंसूं आलें.

तेव्हां आणखी म्हणायचं झालं, " बाकी, मला आपल्या अंगीकृत कार्यात खरा आणि पुरा जहालपणा आणण्यासाठीं सरशीच्या हातचं जेवण घालायची नामी युक्ति काढलीस तूं चारू! आतां पहा माझे अग्रलेख कसे जहाल–जळजळीत–आणि ठणठणीत वठतील ते!––"

मग जेवतां जेवता सरशीबद्दल त्रोटक चौकशी झाली. नागूचाही विषय काढला. असल्या चांगल्या–कर्तव्यदक्ष, हुषार, चणचणीत बायका लाभल्या तर मूर्खांना त्यांची किमत कशी वाटत नाहीं? बेअकली, निर्दय त्यांना टाकून का देतात? हेंच आपल्याला कळत नाही असे उद्गार काढणं झालं!

आणखी एकदा विनोद करण्याची स्वारीला लहर आलीच– " आतां असं कर चारु, तुझा स्वयंपाक सरशीला शिकीव. म्हणजे तसल्या अन्नाच्या जेवणानें सरशीसारख्या चांगल्या बायकोला प्रेमानं कसं संभाळावं ही बुद्धि त्याला येऊं लागेल. आणि–" एवढें म्हणून मिस्किलपणानें माझ्याकडे पाहायचं झालं.

" आणि काय?–" मीं हंसत विचारलें–

" आणि असल्या खमंग आणि जहाल स्वयंपाकाची तऱ्हा सरशी-पासून तूं शीक!" स्वारी म्हणाली, " म्हणजे, मला नेहमीं ज्वलत्‌जहाल राखण्याचं कर्तव्यही पार पाडशील, अन् तुलाही हें असलं जेवण जेवतां आलं म्हणजे, काय होईल माहित आहे?"

मीं नुसतेंच प्रश्नार्थक नजरेनें स्वारीकडे पाहिलें.

मज सुत व्हावा देशभक्त खंबीर।
स्वातंत्र्य–रणीं रणशूर!......

असं कायसंस एकटीच केव्हां केव्हा गुणगुणतेस ना? तें सार्थ व्हायला त्या अन्नाची पुष्टि मिळून तुझे मनोरथ पूर्ण होतील!"

" इश्श! कांहींतरीच!" मी लाजून खालीं पहात तोंडांतल्या तोंडांतच पुटपुटलें!

माझे हे दिवस सुखाचे–समाधानाचे–आनंदाचे जात होते. नोकर-चाकर, गडी–माणसं हांकेला हजर असत. मी म्हणेन, इच्छा दर्शवीन, तें माझ्यापुढें येऊन पडत होतें.

आप्पांचीं खुशालीचीं पत्रें वरचेवर येत होतीं. मीपण त्यांना तशींच वेळच्या वेळीं पत्रं पाठवीत होतें. मी जें लाजेनें आप्पांना अजून कळविलें नव्हतें, तें सुंद्राकडून आप्पांना कळल्यावर, आप्पांनींसुद्धां एका पत्रांत काय पण माझी मुग्ध शब्दांत थट्टा केली होती! तेवढ्यानं देखील माझ्या सुखाची शीग चढली!

स्वारीचा छापखाना–वर्तमानपत्र भरभराटीला लागून–बाहेर वाढता सन्मान होत होता. स्वारीच्या परिश्रमांचं पारितोषिकच योग्य रीतीनें स्वारीला लाभत होतं!

मी ऐकत होतें, पहात होतें; त्या सुखाचा अनुभव नित्य घेत होतें.

त्या सगळ्यांत स्वारीचं माझ्याशीं वागणं काय होतं?–मला किती–किती जपायचं होई! माझ्या सुख–सोयी पहाणं होई.

पति–पत्नींतलं अनुपम, उच्च, विकार–विषयरहित, दवी, दिव्य प्रेम–प्रेम म्हणून जें काय म्हणतात, त्याचा साक्षात्कार या दिवसांत कितीदां तरी मला घडत होता!

सुखाशिवाय क्षण नाहीं. सुखाशिवाय पळ नाहीं. हा गोड अनुभव मी घेत होतें. जिकडून तिकडून, जिथून तिथून सुखं माझ्याकडे धांव घेत होतीं! जिथं पाहीन तिथं आनंद–घरांतली वस्तुन् वस्तु मला निर्मळ आनंदाची प्राप्ती करून देण्यासाठींच उत्कंठित झाली आहे, उत्कंठतेनें माझ्याकडे पहात आहे असं मला वाटत होतं!

हजार कामांनीं दमून भागून घरीं येणं झालं, तरी गोड बोलांनीं नी प्रेमळ वागण्यानें माझ्या हृदय–सागराला आनंदाची–सुखाची भरती आणण्यांत स्वारी चुकूनही कसूर करीत नव्हती!

मला काय आवडतं–काय हवं–काय मिळालं म्हणजे मला आनंद होईल, हें खरं सांगायचं, तर आतांशा माझ्यापेक्षां स्वारीलाच जास्त समजून चुकलें होतं. जणु काय आमचे–जीवशिव एकच झाले होते. माझ्या मनांत विचार यावा नी न बोलतांच स्वारीला तो समजावा, अशी स्थिति आमची झाली होती. कुणाला खरं वाटो–खोटं वाटो, एकच साधी गोष्ट सांगते—

मी स्वारीच्या बैठकीच्या जागेंत एकटीच कांहींतरी वाचीत आराम-खुर्चीवर पडलें होतें. वाचतां वाचतां सहज माझं लक्ष गेलें–त्या जागेंत, लोकमान्य, महात्माजी, आगरकर, गोखले, दास, नेहरू, पंडितजी, सुभाष-बाबू, कर्वे अशा वंद्य–थोरथोरांचीं चित्रें टांगलेलीं होतीं. शिवाजी, बाजीराव, शूरवीर लक्ष्मीबाई, देवी अहिल्या, लक्ष्मी–सरस्वती, यांच्यादेखील दर्शनीय तसबिरा लटकत होत्या. त्याकडे पहातां पहातां मला–उगीचच कां वाटलं कुणास ठाऊक–वाटलं, यांत एक सुंदर, मनमोहन बाळकृष्णाची तसबीर असती तर किती चांगलं झालं असतं ! पूर्णावतार तो !–त्याच्या तेजांत, इथल्या साऱ्या तसबीरा आणखीच खुलून दिसल्या असत्या !–इथं एक बाळकृष्णाची तसबीर हवीच आहे !–

अन् काय गंमत ?–

स्वारी त्याच वेळीं खरोखरीच प्रख्यात चित्रकाराची–एक नितांत रम्य कलाकृति म्हणून–अगदीं नवीनांत नवीन असलेली–बाळकृष्णाची तसबीरच घेऊन आंत आली !

मला दाखवणं झालं ! मी आश्चर्यातिरेकानं थक्कच झालें !

"मला हें चित्र हवं होतं हें आपल्याला कसं कळलं ?" मीं विचारलेंच.

"वाः ! म्हणजे ? तूं आणायला सांगितलं होतंस ना ?–" मलाच उलट आश्चर्यानें विचारणं झालं !

"केव्हां ? नाहीं ! माझ्या मनांत आता उगीचच हें आलं बरीक !"

"असें ? आश्चर्य आहे ! तुला हवं असं माझ्या अगोदर मनांत आलं कसं हेंच कळत नाहीं ! तुला हवं होतं ना ? आवडलं ना ?–ठीक आहे. बाकी तुला हें हवं होतं–आणलेलं आवडलं–छान आहे नाहीं ?–"

मला दाखवीत, माझ्या हातीं देत म्हणणं झालें. मी तन्मयतेनें त्या बाळकृष्णाकडे पाहूं लागले. स्वारी पहातच होती माझ्याकडे ! मीं सहज तिकडे तिरप्या नजरेनें पाहिलें–स्वारी माझ्याकडे हंसत पहात होती–मग काय आणखी माझी थट्टा करायची मनांत होती का कुणास ठाऊक !

अशा रीतीनें माझे चाललेले दिवस निरतिशय आनंदाचे आणि सुखाचे कां नसतील ?

आतांशा आप्पांनीं यावं; वसंतानें येऊन भेटावं असें वाटत असे.

आप्पा येतीलच ही खात्री नाहीं; वसंताबद्दल विचारच करायला नको ! तो कधीं पत्र पाठवायचा नाहीं; उत्तर लिहायचा नाहीं. मुलुखाचा भकेल. त्याला बोलावून तरी काय उपयोग ? मनात येई, कुणी तरी यावं, मी जास्त आनंदित होईन—पण बोलावलं तरी येणार नाहीं असें वाटे, मी मग तेवढ्यांत खट्टु होई !—

पण काय चमत्कार—ध्यानीं नाहीं, मनीं नाहीं, बोलावलं तरी येईल ही खात्री नाहीं, असं असतां, अचानक एक दिवस वसंता माझ्यापुढं हंसत हंसत दत्त म्हणून उभा !

वसंताला पाहिला, मला आनंदही झाला नी मी तितकीच घाबरलेंही !—असा अचानक—पत्रबित्र कांहीं नसता वसंत आला कसा !—आप्पांना विचारून तरी आला असेल का !—आठवड्यांत आप्पांचंही पत्र नाहीं—आप्पांची प्रकृति तर बरी नसेल ?

किती भरकन् वेडेवांकडे विचार माझ्या मनांत येऊन गेले एका क्षणांत !—पण जेव्हां, " काय चारुताईराव ! अकल्पित तुझ्याकडे येऊन केली कीं नाहीं मजा तुझी ? " असं हंसत वसंत म्हणाला तेव्हां मला बरं वाटलं !

" येणार म्हणून पत्रबित्र कुठं नाहीं पाठविलंस ?—" मीं वसंताला म्हटलं !

" छट् ! त्यांत काय मजा आहे मग ?—येणार येणार म्हणून नाटकमंडळीसारख्या आपण होऊनच जाहिराती कशाला लावायच्या ? लोक म्हणतात, येणार तर या; त्याचा एवढा गाजावाजा कशाला ?—शिवाय अशा अगाऊ सूचनेनं अकल्पितांतील मजा रहात नाहीं. आपल्याला सिनेमांतल्याप्रमाणं स्टंट करणं फार आवडतं बोवा ! एकदम धक्का बसतो ! एकदम चमत्कार वाटतो ! एकदम आनंद होतो प्रेक्षकांना !—मी पत्र पाठवून असा आलों असतों, तर आतां आश्चर्याचा

आणि आनंदाचा एकत्र अनुभव तुला मिळाला, तसा झाला असता का? अग, सिनेमापासून हेंच शिकायचं आणि शिकवायचं!—विजेसारखं चमकन् चमकावं–चकित करावं–अन् पटकन् नाहींसं व्हावं!–काय मजा आहे यांत!–"

"म्हणजे? तूं आलास तसा चट्कन् जाणार का काय?" मीं हंसत विचारलें.

"छेः ग! मीं आपलं सांगितलं तुला!–मी आलों आहें तुझ्याकडे चार दिवस रहायला!–सिनेमानाटकांतदेखील घरीं आलेल्या भावाला बहिण असं कधीं विचारीत नाहीं!–"

"पुरे रे तुझं सिनेमा–नाटकाचं पुराण!" मीं त्याला थांबविलें.

"ठीक आहे! मग काय तुला पडितरावाचं पुराण विचारूं? तें सांग!–कसे काय आहेत पंडितराव?–चांगला चालला आहे छापखाना–वर्तमानपत्राचा उद्योग?–बाकी त्यांचं वर्तमानपत्र चागलं चालून आम्हांला काय उपयोग म्हणा?–कधीं आमच्याबद्दल चार स्तुतीच्या ओळी द्यायचे नाहींत कीं चुकून आमचा फोटो छापायचे नाहींत! हे आमचे नातेवाईक, हा आम्हांला त्यांचा वशीला!–भल्याची दुनिया नाहीं हेंच खरं!–वर्तमानपत्रं आम्हांला हाताशीं धरीत नाहींत आणि–तीं स्तुती करीत नाहींत म्हणून आम्हांला कुणी नाटक–सिनेमा धंद्यांत शिरकाव करूं देत नाहींत–अशी साप्रत आमची शोचनीय स्थिति झाली आहे!..."

"पुन्हां आलाच तुझा सिनेमा! तूं माझ्याकडे आनंदानें आणि मुकाट्यानें रहायला आला आहेस का असली बडबड करायला आला आहेस?–वसंता, माझं ऐकशील जरा—"

"तुझ्या घरीं आलों आहें तेव्हां तुझं ऐकलंच पाहिजे—"

"बराच शहाणा झालास कीं!—"

"परिस्थिति प्रत्येकाला शहाणा बनविण्याची खटपट करीत असतेच!—चारूताई, मी कां आलों आहें सांगूं तुला?—"

"आप्पांनीं घालवून दिलं असेल—"

" तशी कांहीं आप्पांना मी जरूरीच पत्रं दिली नाहीं. मीच शहाणा झालों आणि घराच्या बाहेर पडलों."

" कशाला ?—"

" नोकरीच्या शोधासाठीं ! आता ठरवून टाकलं. आप्पाच्या जिवावर जगायचं नाहीं. मेलेलं अन्न खायचं नाहीं. कुठेंही नोकरी करायची. स्वावलंबी व्हायचं—"

वसंतानें हें गंभीर होऊनच सांगितलें. ऐकून बरं वाटलं.

प्रयत्नाला लागल्यावर मिळेल त्याला नोकरी. स्वारीदेखील आपण सांगितलं तर वसंताकरिता खटपट करील—मला जें आवडतं तें करण्यांत स्वारी कां कसूर करील ?—वसंतानें नोकरी धरली—कांहीं ना कांहीं मार्गाला लागला नीट, हें कळलें म्हणजे आप्पांनादिखील तितकं बरं वाटेल—मनांत आलं नी बरं वाटलं मला ! त्या सर्वांपेक्षां वसंत आला—नोकरी मिळेपर्यंत आपल्याजवळ राहणार—कसा कां असेना—माझा भाऊ, मायेचं माणूस—मला यावासा वाटत होता—तो आला—त्याचाच मला आनंद झाला जास्त !

वसंताचं स्वारीनंही मनापासून स्वागत केलं, पूसतपास केली. रहाण्याचा आग्रह केला.

आतां थट्टा, विनोद, कोट्या, प्रतिकोट्या याला ऊत आला. वसंता मुलुखाचा वाचाळ ! तर स्वारीदेखील त्याच्याशीं बोलतांना त्याच्या पातळीवर येऊन बोलायला कमी करीत नव्हती !

माझ्यादेखत, माझी थट्टा करायला दोघेही कमी करीत नसत.

जेवणावर बोलणीं चालायचीं—

" बोला वसंतराव ! तुमच्या ताईला काय होणार ?"

" पण तुम्हांला काय पाहिजे पंडितराव ?—मुलगा का मुलगी ?—"

" माझ्याकडे खालच्या नजरेनें पहात, हंसत म्हणायचं—"आपल्याला बोवा मुलगी आवडते !"

" तुम्हांला आवडेल खूप ! पण ताईला विचारांना ?—काय ताईराव !—तुला काय पाहिजे ?"

" पण तुम्हीं सांगा कीं ! भाचा हवा कीं भाची !-"

" मला-दोन्हीं हवींत ! कोणी झालं तरी मला मामाच म्हणणार ! आणि मुलगी झाली तरी आपण तिला ग्रेटा गार्बो बनवूं !-मुलगा झाला तर जॉकी कूगन !-नाहीं तर तुमच्या बॅरीचा ' पीटर पॅन ' करून सोडूं !"

" शाबास ! वसंतराव ! शाबास ! भाचा-भाचीचे नामवंत मामा होणार खरें ! असा हवा तसा वाचाळपणा दोघांत खूप चालायचा !—

मला तो आवडायचा ! खूप आनंद व्हायचा !

माझे बाळंतपणाचे दिवस भरत आले. सगळेजण मला जपतच. पण मला उगीचच काळजी वाटूं लागली. ' कसं होईल काय होईल ' असं वाटूं लागलं. कुणी जाणतं-जबाबदार बायकामाणूस घरांत नाहीं. कसं व्हायचं ?-कुणी तरी सुचवलं सूतिकागृहात पाठवावं-मलाहि तसंच वाटूं लागलें. मी हळूच एकिकडे-स्वारीला विचारलं, तेव्हां म्हणायचं झालं- ताजमहाल हॉटेल झालं तरी ती खाणावळच ! घरच्यासारखं जसं तिथं अन्न मिळायचं नाहीं-तसंच सूतिकागृहाचं ! ज्यांना इलाजच नसतो-घरीं करण्याचं सामर्थ्यच नसतं-त्यांना सूतिकागृहाशिवाय उपायच नाहीं. आपण, डॉक्टरणी, नर्सेस, घरीं आणूं. होईल थोडा जास्त खर्च !-पण घरींच, आपल्या देखरेखीसमोर बाळंतपण व्हावयाला पाहिजे. माझी धांवपळ-ओढाताण नको. तुझे हाल नकोत !—

" सरशी आहे, तूं सांगत असशील तर तिच्या आईला-आप्पासाहेबांना पत्र पाठवून बोलावून घेऊं या-घरी वाटेल तशी, वाटेल तिकडे जरूर त्या वेळेला दवडायला आपल्याजवळ माणसं मुबलक आहेत-मग सूतिकागृहाचाच सोस आणि आवड कशाला ?—

" शिवाय, तुझी कुप्रति तशी कांहीं अगदींच ही नाहीं-आप्पासाहेबांनीं तुझी जोपासना करून सुदृढता तुला बहाल केली आहे. तूंही तशी काळजीनें राखली आहेस-तेव्हां तुला किंवा मला भीति बाळगण्याचं कारण काय ?-" आणि माझ्या बाळंतपणाची व्यवस्था काळजीपूर्वक स्वारीनं किती छान ठेवली ! एका शुक्रवारीं सकाळीं उजाडतां-अगदीं सूर्योदयाबरोबर-माझी सुखरूप सुटका झाली !

आमच्या प्रीतीच्या संगमावर सुंदर कमल उललें–प्रीतिदेवतेनें प्रसाद दिला !

मला मुलगा झाला !

बाळाचं नांव प्रसाद ठेवावं असं स्वारीनं सुचविलं. मला पण तेंच आवडलं !–आप्पांनीं पत्रात त्याच नांवाला सानंद–अशिर्वादपूर्वक सन्मानिलें. वसंताला तेंच नांव पढलें–तरीसुद्धां जगविख्यात सिनेमा स्टारपैकीं कुणाचं नाव द्यावं–याचा आपण विचार करतो–असेंच म्हणूं लागला !–

एक विशेष गोष्ट–ज्या शुक्रवारीं सकाळीं प्रसाद जन्माला आला, त्याच दिवशीं एका राजकीय प्रचंड परिषदेच्या अध्यक्षपदाचा थोर मान स्वारीला मिळाला होता !

———

प्रकरण अकरावें

# ' दारूबंदी'चा उपाय !

फाड, फाड, फाड, फाड !

नागूच्या दोन्ही थोबाडांत रागाच्या सपाट्यांत मारलें जात असतां आवाज होत होता !

" नाग्या, गाढवा ! दारू पितोस. झिंगून येऊन घरांत बायकोला जनावरासारखा मारतोस !..."

प्रत्येक शब्दागणिक आणि वाक्यागणिक, नागूच्या पाठीवर सपासप हातांतल्या काठीचे सपाटे लाहीसारखे उडत होते.

" अग आई आई ! ओय-ओय-मेलों-मेलों-पाया पडतों, पुन्हां नाहीं दारू पिणार !-पुन्हां नाहीं बायकोवर हात टाकणार !-"

नागू विव्हळत होता. मार चुकविण्याचा प्रयत्न करीत होता. पण तुला जवळ ठेवला, पोसला. पोटाला मिळूं लागलं—शेफारलास, माजोरी झालास !-दारू प्यायला लागलास !-दारू प्यायला तुला पगार देत असतों काय ?-पिशील दारू ? झिंगून बायकोला मारशील ?..."

नागू नुसतां लाथाबुक्क्याखालीं एकसारखा चेंचला जात होता !-

सरशी एकाद्या भ्यालेल्या हरिणीसारखी थरथर कापत एका कोपऱ्यांत उभी होती !

दारांत मी उभी होतें. माझीदेखील गाळण उडून गेली होती; स्वारीचा त्या वेळचा-महारुद्रावतार पाहून !—

नागू केवढा दणगट. स्वारी त्याच्यापुढं शरीरानें नी ताकदीनं म्हणजे कुठल्या झाडाचा पाला; अशी अवस्था !

पण नागू अगदीं गोगलगाय झाला होता. स्वारीच्या हातचा मार खातांना त्याची त्रेधा उडाली होती !

" एकदां–दोनदां, तीनदां–हजारदां, समजावून सांगितलें, धाक दाखवून समजावलें, पुन्हां दारू प्यालेला पाहिला तर हाकून देईन म्हणून धाक घातला–तरी तुझा येळकोट चालूच आहे !–दारू पितोस !–" स्वारीचा राग कांहीं शमेना नी नागूला मारणं काहीं थांबेना ! मलाच तें बघवेना नी सहन पण होईना. मी धीर करून पुढें झालें–

" पुरे झाल ! किती मारायचं तें !–समजावून सांगितलं तर नाहीं का व्हायचं ?–" मीं भीत भीतच म्हटलें.

" समजावून ? शहाण्याला शब्दाचा मार–आणि असल्या गधड्याना असा ऊठ–बस लाथांचाच मार पाहिजे. तर हे शुद्धीवर आले तरच यायचे !–कर्जबाजारी होतात–शेतवाडी सावकाराच्या घरीं घालतात–भिकेला लागतात, तरी या लोकांचे हे ढंग चालूच राहतात !–दारूबंदीवर लेख खरडून, घसा फुटेपर्यंत व्याख्यानं देऊन, नाटकं–कादंबऱ्या लिहून का दारूबाजांचीं दारू सुटणार आहे ?—

यांना असेंच ठोकलं पाहिजे. तुडवलं पाहिजे. उपाशी तडफडत ठेऊन–मारलं पाहिजे !—

म्हणत म्हणत चवताळून जाऊन नागूवर हात उगारला–चार तोंडांत भडकावल्याच !

बिचाऱ्याची दारूची नशा पहिल्याच थोबाडींत खाड्कन् उतरली होती ! तो स्वारीच्या पायांशीं लोळण घेत होता !

मींच स्वारीच्या हाताला धरलं. जवळजवळ ओढीतच नागूच्या बिऱ्हाडांतून आपल्या घरीं आणलं !

नागू दारू प्यायला लागला होता; घरीं येऊन सरशीला मारहाण करून त्रास द्यायला लागला होता; हें मला सरशीकडून बरेच दिवसांपूर्वी कळलं होतं. पण स्वारीला कळलं होतं कीं नाहीं हें मला माहित नव्हतें. मी बोललें नव्हतें. न बोलायला माझ्या दृष्टीनें कारणही झालं होतं थोडंस. त्याचं असं झालं होतं—

माझ्या प्रसादला, माझ्याशिवाय नी स्वारी शिवाय सरशीचा लळा फार लागला होता पहिल्यापासून घरांत तिचा एक नी कचेरींत स्वारीच्या हाताखालीं वर्तमानपत्रांत उपसंपादक म्हणून असलेले निशिगंध लाड या नांवाचे एक तडफदार तरुण होते–त्याचा एक! कामाच्या धादलींत स्वारीला घ्यायला व्हायचं नाहीं प्रसादला. कचेरीत निशिगंध त्याला केव्हा केव्हा नेत; पण तें स्वारीला आवडायच नाहीं. ते केव्हा सहज घरीं आले, म्हणजे त्याला खाऊ द्यायचे–खेळवायचे. म्हणून ते आले कीं त्याच्याकडे झाप टाकून जायचा गुलाम!—वसताजवळ बरीक फारसा जात नसे. तो अगोदर घरीं फारसा नसेच. जेवला कीं नोकरीच्या शोधासाठीं म्हणून बाहेरच जायचा! घरीं असला तर कधींमधीं घ्यायचा–त्याला चागलं प्रसाद असं नांव असताना–नाटकातल्या नी सिनेमातल्या नटांचीं नांव द्यायचा, त्याच नावानीं त्याला बोलवायचा!–मला काहीं तें आवडायचं नाहीं. म्हणून मी त्याच्याजवळ प्रसादला देतही नसे. तसल्या नाटकी नांवानें हांका मारीत जाऊं नको म्हणून सांगत असे. त्यालाही प्रसादाच मनापासून तितकं प्रेम नव्हतंच!—

दिवसाचा बहुतेक सारा वेळ तो सरशीच्याच कडेवर असायचा! तिनें त्याला लळाच तसा लावला होता!

एके दिवशीं सरशी दुपारपासून संध्याकाळपर्यंत घराकडे फिरकलीच नाहीं. प्रसाद रडायला लागला. कांहीं केल्या राहीना. सरशीनें कडेवर घेऊन बाहेर हिंडवायची संवय त्याला लावली होती त्या दिवशीं निशिगंधही आले नव्हते. स्वारीच्या टेबलावर कामाच्या कागदाचा डोंगरच सांचला होता; तिथं नेऊन ठेवीन म्हटलं तर! मीं समजावलं तर राहीना. कामाला हातही लावू देईना. सरशी आतां येईल, मग येईल, प्रसादला घेऊन जाईल, म्हणून ती येण्याची वाट पाहूं लागलें, तर तिचा ठिकाणच नाहीं. मला तिचा राग आला–"झालंय् तरी काय मेलीला आज?"–पुटपुटत, प्रसादला उचलून सरशीच्या बिऱ्हाडीं मी गेलें.

सरशी जमिनीवरच निजलेली मला दिसली. तिला रागावून विचारणार, तों कण्हत होती. मला पाहून ती रडायला लागली. तशीच कण्हत उठली. तिचे दोन्ही गाल लालभडक झाले होते–चांगले सुजले होते.

तरी त्याही स्थितींत प्रसादला हात पुढें करून तिनं घेतलं. तो रडायचा थांबला! तिचं रडवं तोंड—लालभडक—सुजलेलं पाहून माझा राग कुठच्या कुठेंच मावळला! ' दुपारपासून का आली नाहींस?' असं विचारण्याच्या अगोदर, " सरशे, काय झालं ग?—रडतेस कां? कण्हतेस का? गाल सुजले कशानें?—" हेच प्रश्न तिला मीं केले.

ती काहींच सांगेना. " प्रसाद—बाळाला घ्यायला आलें नाहीं. क्षमा करा!—तो रडत असेल—हें कळत होतं, पण काय करूं?" असें म्हणून ती रडत होती.

मीं खोदखोदून विचारलें. तेव्हा नागूनें दुपारीं जेवायच्या वेळेला मारलं असें सांगितलें तिनें.

" नागून मारलं?—कां?—"

" मला माहित नाहीं!"

" तूं काय केलंस? काय चुकलीस?"

" कांहीं नाहीं!—"

" मग कां मारलं?"

पुष्कळ विचारलं. ती कांहींच सांगेना. " ताई, माफ करा. दया करा. मला कांहींच विचारूं नका! मला सांगतां येत नाहीं!" हेंच तिनें चालविलं. मला मोठं गूढ पडलं. सरशीला विचारायच्या भरीस मी मग पडलेंच नाहीं. पण जिवाला चुटपूट लागली. नागूचा मला राग आला आतां सोन्यासारख्या बायकोला नागूने सुखासुखी कां मारावं?

—हे अडाणी लोक आपल्या लग्नाच्या बायकांना छळतात—मारहाण करतात-मग त्या पळून गेल्या-दुसऱ्याचा हात धरून गेल्या, तर त्यांत नवल काय? नवऱ्याला सोडून—नवरा सुख देत असतांना आपसुख का बायको दुसऱ्याचा हात धरून जाईल?—सरशी तशांतली नाहीं, हें खरं, पण नागू जर तिला अकारण छळायला लागला-मारहाण करून जीव घ्यायला उठला, तर एकादे दिवशीं उठून जायला कमी का करील?

मराठ्याच्या बायकामुली कासोट्याच्या खंबीर असतात. कोणा अरेरावाची त्यांच्याकडे वांकड्या डोळ्याने पाहाण्याची छाती नसते. तिथल्या तिथं वाकड्या नजरेनें पहाणाऱ्याचीं हाडं खिळखिळीं करायला

त्या कमी करीत नाहींत. धामधुमीच्या ऐतिहासिक काळांतल्या गरीब–गुरीब शेतकऱ्यांच्या तेजस्वी नी तडफदार किती तरी लेकीसुनांच्या आदर्श गोष्टी आप्पांच्याकडून मीं ऐकल्या होत्या. सुंद्रासुद्धां कारणप्रसंगीं आतांच्या काळांतल्या आपल्या जातींतल्या बायकांच्या चांगल्या गोष्टी सांगे. सरशी-बद्दल मी निःशंक होतें. पण नागूच्या छळवादाला कंटाळून तिचीसुद्धां एकादे दिवशीं बुद्धि पालटली तर ? नागूनें तिला चागलं कां वागवूं नये ?

सरशीसंबंधानें त्या दिवशीं माझ्या मनांत असे वाटेल ते विचार भराभर येऊन गेले.

दुसरे दिवशीं सकाळीं नागू " मंडई काय काय करायची ?' म्हणून माझ्याकडे विचारायला आला. मी आदल्या रात्रीपासून चिडलेंच होतें त्याच्यावर. जवळपासही कोणी नव्हतें त्यावेळीं. माझा राग त्याला पहातांच अनावर झाला. आणि—

" नागू ! काल सरशीला मरेपर्यंत मारलंस ?–का रे ?–माणूस आहेस का जनावर आहेस तूं ? " मी त्याच्यावर कडाडलें !

ऐकून त्याचं तोंड खर्रकन् उतरलें. गोरामोरा होऊन त्यानें मान खालीं घातली. जागच्या जागींच खिळला तो !

" बायको जास्त झाली वाटतं तुला ? मिळाली म्हणून ? कां मारहाण करतोस तिला ? आचरटपणानें तिला टाकून आला होतास–आपण होऊन तुझ्याकडे आली तुला शोधीत. कांहीं–किमत आहे का तुला तिची ?—"

इतकं रागावून त्याला विचारूं लागलें, पण तो बोलतोय कुठें ?—मुखस्तंभासारखा गप्पच ! मी पण मग हट्टाला पेटलें. " कां मारलंस तिला ? तिची चूक काय झाली तें सांग–नाहीं सांगितलंस तर तुला आजच्याआज कामावरून काढायला लावीन–" असा निर्वाणीचा धाक घातला त्याला, तेव्हा—

" चूक एक का हजार आहेत ! पण दांत आपले, ओठ आपले ! बोलतां कुणाजवळ ?..." नागू पुटपुटला !

" काय रे सरशीच्या चुका आहेत ? पुटपुटूं नकोस. स्पष्ट काय तें सांग. मला तुझी नी सरशीची पण भीति नाहीं. तिची चूक असेल तर

तिचा कान धरायला कमी करणार नाहीं मी !—सांग, काय आहे— सरशीची चूक ?"

"ताईसाहेब ! तुमच्या जवळ सांगण्यासारखं नाहीं; कसं सांगणार मी ?–"

"म्हणजे ? असं मला न सांगण्यासारखें काय आहे ?–मग तर सांगच !–"

"उगच का सरशीला मीं टाकली होती ?–"

"म्हणजे काय ?–"

"पण तुम्हीच ती धोंड माझ्या गळ्यात बळजोरीनं बांधलीत !–"

"अरे पण गधड्या, झालं काय ? केलन् काय सरशीनें ?—कां मारलंस काल तिला सांग ना ?–"

"सरशीचा जीव घेतला नाहीं हेंच जास्त समजा !" नाक फेंदारीत ताठरपणानें नागू एकदम बोलून गेला–"ताईसाहेब, तुम्हीच विचारतां, शरम वाटते सांगायला, पण नाइलाज होऊन सांगतों–"

मी ऐकत राहिलें. काय सांगतो बेरड हेंच मला कळेना—

"ताईसाहेब, सरशी तुमची आहे. लहानपणापासून तुम्ही तिला पाहता—मीं सांगितलं तर तुम्हांला खरं वाटणार नाहीं—मी घरीं नसतांना, परक्या पुरुषांना बोलावणं—त्यांच्याशीं हंसण खिदळणं–"

"काय—काय सांगतोस नागू—तुझ्या जिभेला हाड आहे का ?–"

तो पुढे कांहीं न बोलतां चालतांच झाला माझ्यापुढून !

मी विचारच करायला लागलें !

सरशी-माझी सरशी !-अशी चवचाल असेल ?—नवऱ्याच्या छातीवर परक्या पुरुषाला घरांत घेत असेल ?-अशक्य !—

मी माझ्यावरून सरशीला पहात होतें !—मला अशक्यच वाटत होतें ! पण नागू-तिचा नवरा—तिच्याबद्दल हें सांगतो—त्या चिडीनें तो तिला मारहाण करतो !-

तरीच सरशीला खोदखोदून विचारलं तरी ती बोलली नाहीं ! मोघम-संशय येण्यासारखं बोलून गयावया करायला लागली !

गरिबांच्या मुली शीलानं आपल्या अशातशाच असायच्या-असें म्हणतात तेंच खरं शेवटीं !

सरशीचा आता मला राग आला. चीड आली. तिरस्कार वाटायला लागला. आपल्या घरात तिला येऊं देऊं नये-थाऱ्याला उभी करूं नये-प्रसादासारख्या पवित्र बाळाला, त्या अमंगळ सरशीचा विटाळदेखील होऊं देऊं नये-एकदम तिची हकालपट्टी करून द्यावी-जिला नीति नाहीं, शील नाहीं-तुपात तळलं, साखरेंत घोळलं-तरी कारल्याचा कडूपणा कसा जाणार ?-सरशीला आपल्याबरोबर घरात वागवलें-तरी तिचा देहस्वभाव-घाणेरडेपणा नाहींसा कसा होणार ?-

अशी सरशीबद्दल माझी कल्पना झाली होती.

तरी पण खरंखोटं करण्याचं माझ्या मनाने घेतलें. सरशीला एकटी एकीकडे गाठले. खूप तिच्यावर रागावलें-नी तिला नागू तुझ्याबद्दल असं, असं बोलतों-तूं अशी कशी दिवटी निघालीस ?-आत्ताच्या आत्तां घरांतून चालती हो-प्रसादाला हात लावू नकोस-असें म्हणालें.

तिला हा गहजबच झाला ! खळकन् तिच्या डोळ्यातून पाणी आलें. तिनं देवाची-गायीची, सुंद्राची, आपल्या गळ्याची शपथ घेऊन सांगितलं-नागूनं सांगितलं तें खोटं-साफ खोटं !

नागू दारू पितो-जुगार खेळतो-आंकडे लावतो-कर्ज काढतो !-देणेंकरी दारात आले म्हणजे तोंड लपवतो-घरीं लपून बसून-घरांत नाहीं म्हणून सांगायला, देणेकऱ्याच्या तोंडाला आपल्याला देतो-आपण ऐकत नाहीं म्हटलं, मालकांना आपले हे गुण सांगेन असें म्हटलं म्हणजे, चवताळतो; दारू पिऊन येऊन आपला सूड काढण्यासाठीं मारतो-अशी सरशीनें शपथेवर आपली कैफियत दिली !

मीं आश्चर्यानें थक्क होऊन तोंडांत बोटच घातलं !

आपली लबाडी लपविण्यासाठीं नागूनं धादांत खोटं सांगितलें. सरशीवरच उलटून भलतीच घाणेरडी तोहमत घेतली !

काय पुरुषाची जात राक्षसी तरी !

पुरुषांच्या असल्या राक्षसी करणीनं बायका बिघडतात-का बायका बिघडतात म्हणूनच पुरुष असे राक्षसी होतात ?

स्त्रीच्या विरुद्ध पुरुषांनीं आणि पुरुषांच्या विरुद्ध स्त्रियांनीं अकांड-तांडव करायला सुरुवात केल्याच ऐकलं म्हणजे माझ्या मनापुढें केव्हां केव्हा असे विचित्र प्रश्न उभे रहात !

कशावरून तरी असला विषय आम्हा दोघात निघे. नवरा मनासारखा मिळाला असला-तो सुख देत असला म्हणजे बायकाच्या मनात भलते सलते विचारच यायचे नाहींत–मग वाकडें पाऊल पडायचें दूरच अशी माझी पक्की समजूत !

वर्तमानपत्रात छापायला आलेल्या मजकुरात पुष्कळदा माझ्या मनाला न पटणाऱ्या गोष्टी यायच्या. त्याबद्दल स्वारीला मी विचारी. मानसशास्त्राच्या दृष्टीनें कोण कसं असेल नी कोण कसं नसेल, याचा नेम कुणी सांगावा ? दिसतं तस नसतं हें सत्य आहे.

एकादीचं नवऱ्यावर खरं प्रेमच असलं आणि तो तिचा नवरा कितीही खाष्ट असला–तिला मारीत झोडीत असला–तरी ती त्याच्यावर निर्व्याज प्रेम करीलच !

–आणि एकादी मोठी राजाची राणी झाली, सुखाच्या सिंहासनावर चढली–राजा तिच्यावर मनापासून प्रेम करीत असला–तिचही त्याच्यावर प्रेम असलं, तरी का, कसी व केव्हा तिच्या बुद्धीचा पालट होईल–मनानं चंचल होईल–आणि नवऱ्याशीं बेमानपणा करील–हें ब्रह्मदेवालासुद्धां सांगता येणार नाहीं ! अशा कल्पना व त्या सत्य असल्याच्या गोष्टी स्वारी अगदी सहज सहज निर्विकारपणाने उदाहरणासह सांगून टाकी !

–मी ऐकून बुचकळ्यांत पडे !—

–आता सरशीला संभाळायच कस ?-नागूला सुधारायचं कस ? हा प्रश्न माझ्यापुढें वरचेवर यायला लागला !

नागू सरशीला बरें पहात नाहीं. आमचाच तिला काय तो थोडासा तुटपुंजा आधार !

माझ्याचसारखी सरशी वसंताबरोबर खेळलीसवरलेली !

वसंत माझ्या घरीं होता. सरशीही घरीं वावरे !

वसंत एकादवेळीं सरशीशीं खूप बोलायचा. तिची थट्टामस्करी करायचा ! तिनें प्रसादला कडेवर घेतलेला वसंतानें पाहिला म्हणजे

" मालकिणीचं मूल कशाला घेऊन मिरवतेस ?—तुझं सत्तेचं मूल घेऊन केव्हां हिंडणार ? तें दाखीव ना ? " असेंसुद्धां तो तिला म्हणायचा !—

ती हंसायची !—" मलाही पण मूल होईलच कीं !—मी का अशीच राहणार आहे ? " असें मोकळ्या मनानें ती वसंताला सांगायची ! वसंत सरशी अशा रीतीनें फार वेळ बोलतांना मीं पाहिलं—म्हणजे कससंच वाटायचं ! सरशीचा मला रागदेखील यायचा !—

वसंताबद्दल सरशीचं मन चंचल तर नाहीं व्हायचं ?—असेंच मनात येई.

अलिकडे स्वारीसुद्धां सरशीशीं मोठ्या आस्थेनें बोले. तिची पूसतपास करी !

तिच्या प्रकृतीबद्दल विचारायच. जेवणाखाणाबद्दल चौकशी व्हायची. लुगडींचोळ्याबद्दलदेखील केव्हा केव्हा विचारणं होई !

सरशी पण मोकळ्या मनाने स्वारीशीं बोले. प्रसादला स्वारी-जवळून हंसत उचलून घेई. तिच्या कडेवरून पुष्कळदा आपल्याकडे घेणं होई !

स्वारीकडे सरशी कोणत्या नजरेनें पहाते, हे पाहण्याचासुद्धा मला पुष्कळ वेळां मोह अनावर होई !—नागूच्या चौकशीपेक्षां सरशीचीच चौकशी कां ? काळजी कां ?—

आता सरशी—नागूमधली तेढ, सरशीची स्थिति—नागूचा नादान-पणा स्वारीच्या कानांवर घालावा, असें वाटायला लागलं.

स्वारीचा स्वभाव मला पुरता माहित झाला होता. नागूची हकीकत कळली म्हणजे मग त्याची गय कांहीं व्हायची नाहीं. " नागू बाहेर कांहीं का करीना ? मरेना—आपल्याला काय करायच आहे ?—आपलं काम चोख करतो आहे ना ? आपण त्याचा पगार वेळेवर देतों आहों ना ?—मग बाकीची त्याची पंचाईत हवी कशाला ? " असल्या इंग्रजी विचारसर-णीचा स्वभावच नव्हता स्वारीचा !

ज्याला आपला म्हटला असेल, तो अंतर्बाह्य शुद्ध—निर्मळ असलाच पाहिजे—झालाच पाहिजे—आपण त्याला तसा केलाच पाहिजे. मग तो कोणीही असो. तिथं दयामाया क्षमा कांहीं नाहीं !

नागूचे ढंग माझ्याप्रमाणेंच स्वारीला अगोदरच कळले होते; स्वारीनें त्याच्यावर लांबून लक्ष ठेवलें होतें.

चार दोन वेळां नुसत्या संशयावरून नागूला समजही दिली गेली होती. त्यानं इन्कार करून आपला पाकपणा स्वारीला अट्टाहासानं पटविण्याचा प्रयत्नही केला होता !

ज्या दिवशीं नागूबद्दल स्वारीजवळ मीं सागायचं ठरवलं होतं, त्याच दिवशीं, स्वारीला माझ्या अगोदर सारं माहित आहे, त्याचमुळें स्वारी सरशीला आपला पाठिंबा तुला आहे, भिऊं नकोस, आपण एक दिवस नागूला चांगला तळ्यावर आणूं; अशा तऱ्हेचा धीर देण्यासाठींच गोड बोलते-वागते, असें मला प्रत्यक्षच कळले.

त्या दिवशींच पुन्हा मागील एका खेपेप्रमाणें सरशी दुपारपासून आली नव्हती. प्रसाद तिला हाका मारून, ती येईना म्हणून रडत होता. तिच्याकडे घेऊन चल म्हणून हट्ट धरून बसला होता.

म्हणून, प्रसादाला घरीं बसवून, "थांब हं, सरशीला घेऊन येतें" म्हणून त्याला सांगितलें. तो राहीना तर, त्याला कचेरींत निशिगंधांजवळ नेऊन दिला, नी मी सरशीच्या बिऱ्हाडीं—आणखी काहीं मागल्यासारखाच सरशीला मारहाणीचा प्रकार केला आहे कीं काय, हें पाहाण्यासाठीं गेले. त्याच कल्पनेने प्रसादला मीं बरोबर नेला नाहीं.

सरशीच्या उंबरठ्यांत पाऊल टाकतें तर काय ?–

दारू पिऊन झिंगून, हव्या त्या अवाच्य शिव्या हंसडीत नागू सरशीला झोडपीत असतांच—स्वारीनें अचानक तिथें माझ्या अगोदर क्षणभरच पाऊल टाकलें होतें—

नागूच्या कानफडांत चपराख लगवल्या होत्या !—

काठीचे तडाखे पाठीवर चालले होते !

"नाहीं ! नाहीं ! चुकलों माफ करा ! एकदा सोडा ! पुन्हां दारू पिणार नाहीं ! सरशीला मारणार नाहीं !!–" नागू गयावया करीत ओरडत होता !

"दारूबंदी"चा कडक रामबाण उपाय स्वारी स्वतः करीत असलेला पाहून मी थक्क होऊन दारांतच पहात उभी राहिलें !

———

प्रकरण बारावें

# वेध लागूं लागले–

काय असेल तें असो; पण दारूच्या व्यसनापासून कायमचा परावृत्त करण्यासाठीं म्हणून स्वारीनें नागूच्या पाठीवर चाबकाचे फटकारे लगावण्याची मुसोलिनी गाजविल्यापासून–तो देखावा माझ्या डोळ्यानीं पाहिल्यापासून एकपरी माझ्या मनाची शांतता ढळलीच !

कारण, त्या दिवसानंतर एकेक नव्या नव्या घटना–कांहीं आपोआप, तर कांहीं कुणा एकाद्याच्या सहजकृतीने–घडूं लागल्या.

त्या दिवसापासून नागू शुद्धीनें वागतोसा दिसू लागला–पण त्याला पाहिला कीं मला उगीचच वाटे, स्वारीनें या नागाला उगीचच दुखवलं–डिवचलं. बोलूनचालून अडाणी–अज्ञानी तो–केव्हां संधी पाहून केव्हां कुणाला डंख मारील कोण जाणे !

सरशीला हायसें झालं होतं–पण सुंद्रा अत्यवस्थ असल्याचें तिला एक दिवस पत्र आलें; आपल्या आईच्या समाचाराला–सेवेला तिनें कां जाऊं नये ?–सरशी आईकडे गेली !–

ती जवळ होती, तरी मला तिच्याबद्दल धाकधूक वाटत होती. आतां गेली तरी मनाला बरं वाटेना !

वसंत आमच्याकडे आला त्याला आतां जवळ जवळ एक वर्ष व्हायला आलं होतं; आला त्यावेळीं मला किती आनंद झाला होता. तो आपले उनाड ढंग सोडून नोकरी धरणार आहे, हें त्यानं सांगितलें, तेव्हां तर माझ्या आनंदांत भरच पडली होती.

पण एक वर्षांत त्याला नोकरीच मिळाली नाहीं–कां त्याला नोकरीच करायची नव्हती म्हणून मिळाली तरी त्यानें धरली नाहीं, कोण जाणे !–

आपलं जेवावं, अर्ज खरडून खिशांत घालण्याचें सोंग करून नोकरीच्या शोधासाठीं म्हणून बाहेर जावं, जाताना टांग्याला म्हणून, चहाफराळाला म्हणून माझ्याचकडून दरवेळीं आठ-बारा आणे, रुपाया घ्यावा; असा क्रम त्याचा चालू होता. पहिले एकदोन महिने केव्हां तरी चार आठ दिवसांतून वसंत संध्याकाळीं बाहेरून आला म्हणजे " काय वसंतराव, कुठंवर आलं तुमच्या नोकरीचं ?" स्वारीनें विचारलं असेल." होय, आलंय जुळत—दोन तीन ठिकाणीं आहे नोकरी, एक दोन दिवसात नक्की ठरविणार कोणती तें !—" असें वसंताने बेछूट उत्तर देऊन मोकळं व्हावं ! पण पुन्हा कांहीच नाहीं. स्वारीने त्याला पुन्हा कधीं प्रश्नच केला नाहीं.

मी विचारी वरचेवर. पण माझ्यावरच तो डोळे वटारी ! रागावून एकेक—दोन दोन दिवस घरीही मग यायचा नाहीं. बाहेरच कुठें तरी झोंपायचा—कुठें तरी जेवायचा !-पुन्हा घरीं आला कीं पहिल्यासारखं वागणं चालूंच त्याच ! मी बोलल्याचा-रागावल्याचा मनावर परिणाम नाहीं, स्वारी काहीं बोलेल याची धास्ती नाहीं. बाहेर जाताना, टांग्याला—चहाफराळाला माझ्याकडे पैसे मागताना संकोच कांहींच नाहीं. त्याचे कपडे फाटले, तर त्यानें माझ्याकडूनच भांडून झगडून पैसे घेऊन कपडे केले—ते देखील साधेसुधे नाहींत—चांगले एकाद्या बड्या श्रीमंताला लागतात तसले !

तरुण वय, मिळवायचं नाहीं काहीं, दुसऱ्याच्या घरीं महिनोन्-महिने खुशाल बिनदिक्कत जेवायचं—रहायचं. वर खर्चालाही मागायचं ! खुशालचेंडूसारखं मोठमोठ्या विद्वत्तेच्या गोष्टी सांगत—दुसऱ्याला—साऱ्या जगाला मूर्खात काढीत गांवात भटकायचं !

वसंताची ही अशी वागणूक. मी त्याची बहिण. पण मला त्याची वागणूक आवडेना-सहन होईना !

ही आली राजशालक-संस्थानिक शकार महाराजांची स्वारी ! अशा हेटाळणीच्या शब्दांनीं वसंताची कुचेष्टासुद्धां व्हायला लागली होती. पण त्याला त्याचं कांहींच नव्हतं !

वसंत माझ्याकडे आला हें आप्पांना लिहून मीं कळवलं; तर त्या वेळेपासून आप्पा माझ्या प्रसादाला पहायला देखील आले

नाहींत. हेंच वसंतानें नोकरी धरली असती, तो आपल्या पायावर उभा राहिला असता, तर आप्पांना आपला मुलगा इतका तरी शुद्धीवर आला म्हणून तेवढंच बरं नसतं वाटलं ? त्याला भेटायला-प्रसादला पाहायला आले नसते का आप्पा ?

पण जेव्हां पहावं तेव्हां नाटकाच्या-नी सिनेमाच्या गप्पा !-त्याला खंड नाहीं.

सरशी-नागूचं प्रकरण त्याला समजलं तेव्हां, वसंत माझ्याजवळच म्हणायला लागला-सरशीनें नवऱ्याला सोडचिठ्ठी द्यावी आणि सरळ सिनेमाच्या धंद्यांत शिरावं ! तिथं ती नाव आणि पैसाही कमवील. छान करील ती कामं. फोटोला तिच्या चेहऱ्याचा कट चांगला आहे. शरीर सौष्ठव आहे, तुझ्या सहवासांत भाषेचाही संस्कार तिच्या जिभेला लागला आहे- दरिद्री पोषाख टाकून ती चागला पेहेराव करूं लागली, तर एखाद्या राजाची राणी शोभेल. तिची इच्छा असेल तर आपण करूं तिची सिनेमांत व्यवस्था !-नवऱ्याची पत्रास ती ठेवतेच कशाला ? पोट भरण्यासाठीं ? झक् मारतो तो नवरा ! तिनं नोकरी पत्करली सिनेमात तर पैशांचा पाऊस पडेल तिच्यावर !-तिनें नोकरी कां धरूं नये ?

सरशीनें नोकरी का धरूं नये ? ही वसंताला काळजी-आणि स्वतःच्या नोकरीची काळजी कुठें कुणाला ?

स्वतःच्या नोकरीची वसंताला काळजीच नव्हती ! मनांत मीच मात्र त्याची काळजी करीत होतें !

त्याचं वागणं म्हणजे काय,-बोलणं काय, -मीं तर त्याच्या पोटापाण्याची तरतूद कर्तव्य म्हणून केलीच पाहिजे. पण साऱ्या जगानें-श्रीमंतांनींही केली पाहिजे. जगांतल्या साऱ्या श्रीमंतांची संपत्ति ती आपली संपत्ति ! आपण कांहीं हातपाय हलविणार नाहीं-लहर लागली, मर्जी वाटली, मनासारखं मिळालं तर जगावर उपकार करण्यासाठीं करूं कांहीं थोडं काम-पण पोटासाठीं कुणी राबवूंच लागलं तर आपण कांहींएक करणार नाहीं-हक्कानं आणि हट्टानें जगाकडून आम्ही भांडण करून घेऊं !-माझ्याजवळ वसंत हें बोलें पण स्वारीजवळ कांहींच बोलत नसे ! मिजासखोर बेकार भावाला पोसायचा तरी किती दिवस आणि त्याला घरांतून जा म्हणून सांगूं तरी कसें !-

तसें सांगतां येण्याइतकं मन घट्ट होईना—बहिणीची माया आड येत होती—चूकच झाली ती. मला कळत होती पण वळत नव्हती !

तेव्हां स्वारीला एकदां विचारलं मी, " वसंत आपल्या इथं नोकरी शोधण्याकरितां राहिला आहे. त्याला बाहेर नोकरी मिळत नाहीं. आपल्या छापखान्यांत नाहीं तर वर्तमानपत्राच्या कचेरींत त्याला एकादी नोकरी देतां नाहीं का येणार ? " " नाहीं ! " एकाच शब्दांत मला उत्तर मिळालं.

" का नाहीं पण ?......"

" नातेवाइकांना नोकरी देण्याच्या विरुद्ध आहे मी ! मोठं अशुद्ध आणि अवघड होऊन बसतं तें !—"

" पण वसंत माझा भाऊ आहे—"

" वशिल्याचा माणूस-निखालस कुचकामाचा !—"

" हें काय बोलणं ?—"

" चारु, तुला स्पष्ट सांगण्याचा राग येईल हें मला कळतं ! पण काय करणार ?-नातेवाईक, वशिल्याचा, हा आपला, असें पाहण्यापेक्षां खरा मन लावून काम करणारा कोण ? काम करणाराच्या हातून चूक झाली तर बोललेलं निमूट ऐकून घेऊन सुधारण्याच्या मार्गाला कोण लागेल ?—कामाला उपयोग कोणाचा होईल ?—" हें पाहावयाला नको का माझ्यासारख्याला, तूंच सांग !—"

" खरं आहे ! " एवढे दोनच शब्द मीं कष्टानें उच्चारले.

शिवाय चारू, तुझ्या गुणांपैकीं एक शतांश जरी वसंतरावाच्या ठिकाणीं गुण असते, तर तूंच मला सांगण्याची गरज होती ?—मीच त्यांना आपण होऊन आग्रहानें कामाला लावलं नसतं का ?-कार्यकारी माणसं मला नको का आहेत ?—वसंतराव त्या कोटींत येणारा नाहीं. श्रमाचं, बुद्धीचं, जिकीरीचें काम करणाऱ्यांपैकीं नाहीं तो !—नाटक—सिनेमासारख्या नटरंगी—पोषाखी—थोड्या कष्टांत अलोट संपत्ति मिळत असते-असा भास वाटणाऱ्या जगाची ज्याला चटक लागली असते, त्यापैकीं वसंतराव बनला आहे. तो छापखान्यांत—वर्तमानपत्रात कसं मानेवर जूं घेऊन काम करणार ?—आणि वसंतरावासारख्या फार पुढें मजल मारलेल्या गृहस्थाबद्दल मला विचार करणंच अशक्य झालं आहे !—नागूसारख्या अडाण्याला—तो

व्यसनाच्या मार्गाला लागला तर चाबकानें फोडून काढून ताळ्यावर आणतां येईल असं तरी वाटत असतें–पण वसंतरावासारख्याला ताळ्यावर आणायचं–उद्योगाला लावायचं म्हणजे–वाळूचे कण रगडून त्यातून तेल काढण्याचा प्रयत्न करणंच आहे–" स्वारी माझ्याकडे न पाहतांच हें बोलली !

मी चपापलें ! "वसंताला व्यसन लागलं ? कसलं ? काय केलंय त्यानें ?" घाबऱ्या घाबऱ्याच मीं विचारले स्वारीला.

माझ्याकडे वळून पहाणं झालं. कांहींतरी सांगायचं मनात होतं–ओंठ हलत होते–खिशाकडे जड हात वळत होता–

मी जास्तच भ्याले. माझ्याजवळच प्रसाद झोंपीं गेला होता• त्याला हलके हलकें थोपटीत होतें; तर त्याला थोपटायचं मी विसरलेंच. हातातली शक्तीच नष्ट झाली माझ्या ! काय सागणं होतंय–याकडेच माझं सारं लक्ष वेधलं.

कांहीं बोलायचं, तों मध्येंच तितक्यांत छापखान्यांतला एक नोकर–वर्तमानपत्राची आंतली एक बाजू–छापलेला कागद दाखविण्यासाठीं स्वारीकडे आला.

"लाडसाहेब बाहेर गेले आहेत, म्हणून दाखवायला आणला आहे—" असें म्हणत स्वारीच्यापुढें कागद केला. स्वारीचें लक्ष तिकडे वेधलें. डोळ्यावर चष्मा चढवीत, फाऊंटन पेन काढून, कागद उघडला. छापलेली बाजू उघडतांना आमच्या दोघांच्यामध्यें तो पसरला. एक बाजू स्वारी पाहूं लागली. कागदाची दुसरी निम्मी बाजू साहजीक माझ्या-समोर आली.

तपासून होईपर्यंत स्वारी बोलणार काय ?–समोरच्या कागदाकडे मी शून्य दृष्टीनें पाहूं लागलें.

" मुलींच्या बापांनो, आपल्या मुली संभाळा! "

सात स्तंभी मोठ्या ठशांतले लक्ष वेधणारें चमत्कारिक शीर्षक–मीं वाचलें. मी डोळे मोठे करून पाहूं लागले. 'का'. ' म्हणून खालीं मजकुराकडे दृष्टि वळविली

" मुलीच्या बापांना इषारा ! "

असे दोन रकान्यांत शीर्षक होते. त्याखालीं मजकुर होता. मी डोळे फाडून वाचूं लागले–

" आपल्या हौसेनें आणि मुलींच्या हट्टानें, आपल्या मुलींना मेळ्यांत घालणारे, शाळेंतल्या गॅदरिंगच्या नाटकांत काम करायला परवानगी देणारे, मुलींची आवड पुरविण्याकरिता बाजाची पेटी, ग्रामोफोन घरांत आणून देणारे, मुलींच्या प्रत्येक लाडाचें आणि हट्टाचे कृतीनें कौतुक करणारे जे कोणी बाप, पालक असतील त्याना सावध करण्यासाठीं, उघड्या डोळ्यांत आपली, आपल्या घरची आणि आपल्या मुलीच्या मनाची परिस्थिति पहाण्यासाठीं मी आपल्या अनुभवाची–आपल्या मुलीसंबंधानें पोळलेल्या, होरपळून निघालेल्या हृदयाची–लाजभीड, गुंडाळून ठेवून हकीकत लिहींत आहे.

" माझ्या एकुलत्या एका मुलीचे आम्हीं–उभयतांनीं लाड केले. कौतुक केलें. आमच्यापेक्षां ती शहाणी झाली आहे, असें मानून ती ' करील ती पूर्व ' अशा रीतीनें तिला स्वातंत्र्य दिलें. मेळ्यांत कामं करूं दिलीं. गॅदरिंगच्या नाटकांत नाचूं दिली.

" मी सनातनी आहे म्हणून मला बोल लावा कीं पुरोगामी आहे म्हणून माझा उदो उदो करा. मला कशाचीच पर्वा नाही.

" माझ्या मुलींत खरी कला असती, तर मला आनंदच झाला असता. तरीसुद्धां ती वयांत आल्यावर तिचं सालंकृत कन्यादान करून द्यावं, ती संसारी व्हावी, आणि मग हौसे करिता–मजेकरितां आपल्या पतीच्या परवानगीनें आणि सल्ल्यानें तिनं नाटक–सिनेमात कामं करावींत अशा मताचा मी होतों आणि अजूनही आहे !

" पण माझी मुलगी शेफारली. माझ्या शब्दाला कस्पटाप्रमाणें मानूं लागली, माझ्या–आपल्या आईच्या उपदेशाला धाब्यावर बसविले–आणि चार चटोर तरुणांच्या नादीं लागून, आमच्या हातावर तुरी देऊन–आम्हांलाच नादान ठरवून–माझी मुलगी घरांतून पसार झाली !–

" माझ्या मुलीजवळ कला नाहीं. असली तरी मला कळत नाहीं–घरोघरीं

मुलीमुलींत कला पिकली असती तर आणखी काय हवं होतं ?—हौसे-करितां मुलींना संमेलनाच्या नाटकात काम करण्यांत मला आनंद वाटला ! पण त्याच आनंदानें माझा सूड घेतला !

" मुली वर्तमानपत्रांतल्या नटींच्या वर्णनांच्या भडक जाहिराती वाचतात, त्यांचा आदर्श डोळ्यापुढें ठेवतात–प्रत्येकीला वाटतं आपण तशा होऊं–अपक्क बुद्धीच्या मुली–त्याना बोल नाहीं. पण जाणत्या–माझ्या-सारख्या बापानें डोळे उघडून पाहायला नको का ?–मीं पाहिलं नाहीं. फसलों. पोळलों. पिचलों. माझ्या मुलीनें कौतुकानें वाढविणाऱ्या आम्हां पतिपत्नींच्या तोंडाला काळं फासलं–तिची चूक नाहीं; आमची चूक !—

" माझी मुलगी ! आतां कसली माझी मुलगी ? ती आम्हाला मेली. आम्हीं तिला मेलों ! कायमचे मेलों.

" मुलींत कला नसली–तिला वाव मिळाला नाहीं–मग तिचं काय होणार ? ना प्रपंच ना परमार्थ !–लग्न नाहीं. संसार नाहीं–घर नाहीं दार नाहीं. गणगोत जवळ करणार नाहींत–आप्तेष्ट घरांत घेणार नाहींत–काय करील मग माझी मुलगी–काय करीत असेल–

" समाजांतली प्रतिष्ठा गेली. सज्जनपणा जळला !–पोरी, सुलभे, सुले, कार्टे, चांडाळणी, काय केलंस हे ?

" माझ्यासारख्या मुली ज्यांना असतील, जे माझ्यासारखेच आंधळ्या डोळ्यांनीं मुलींचे लाड करीत असतील–त्यांनीं माझ्या हृदयाची रक्ताळ-लेली शकलं पहावी–माझ्या मुलीनं काय दिवे लावले ते डोळे उघडून पहावं–माझ्या रक्ताच्या शाईने लिहीत आहे मी हें–ध्यानांत आणावें–आणि सावध व्हावं !–माझ्या मुलीनें, आपला, माझा, घराण्याचा सत्य-नाश केला–

" प्रत्येक वर्तमानपत्रानें माझ्या हृदयांतले–कढ-रक्ताच्या शाईनें लिहिलेले मुद्दाम छापावेत ! अशी माझी इच्छा आहे–विनंति आहे.

" सगळ्या ठिकाणीं, घराघरांत, नाटक सिनेमांत जाण्याच्या इच्छेनें गरीब, सभ्य, प्रतीष्ठीत घराण्यांत संगीत शिकणाऱ्या, सिनेमाला जाऊन नटींच्या अभिनयाचे धडे घेणाऱ्या–मुलींच्या–त्यापेक्षां त्यांच्या वडिलांच्या हातांत–डोळ्यापुढें–माझी ही हृदयविदारक करुण कहाणी जाऊं द्या—

" नाटक–सिनेमाच्या भडक वर्णनाची जादू कोवळ्या मुलींच्या मनावर पसरते, आईबापांना गोड पण फसवा मोह पडतो–त्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य माझ्या स्वानुभवाच्या या पत्रांत असो वा नसो, उपयोग होवो न होवो, पण एकदां माझी ही कहाणी लोकांना–मुख्यतः मुलींच्या बापांना तरी ऐकूं द्या–वाचूं द्या–"

मजकूर वाचला मी; कसा वाचला कोण जाणे! वाचतां वाचतां माझ्या डोळ्याला अंधेरी आली. मला घेरीच आली! पत्राच्या शेवटची सहीच मला दिसेना!

सुलभा–माझी मैत्रीण–सुलभा, आईला–वडिलांना लाथाडून पळाली! सिनेमांत गेली –?

सुलभा - आणि -

वसंत !—

वसंताला माहित झालं असेल? ठाऊक असेल? मीं त्याला विचारलं नाहीं. माझ्याजवळ त्यानें कधीं तिच्या नांवाचा उच्चार केला नाहीं!–तो मजकूर मी वाचीत असतां स्वारीनं माझ्याकडे पाहिलें. तो भाग तपासून दुरुस्त करण्यासाठीं खोळंबण्याचं झालं होतें.

मीं वर पाहिलें. कागद माझ्याकडून–माझ्याकडे पहात पहात फिरवून घेतला–

मी पहात होतें. स्वारीचं वाचणं झालं, दुरुस्त्या झाल्या. ताटकळत उभा असलेल्या नोकराजवळ सही करून छापण्याची परवानगी देत–कागदही दिला. नोकर कागद घेऊन निघून गेला.

" वाचलंस तें पत्र चारू?" मला विचारलं,–" सुलभेच्या बापाचं पत्र आहे तें!–तुझीच मैत्रीण सुलभा–नाहीं?"

मी काय बोलूं? गुदमरल्यासारखं झालं मला!–अपराधी नजरेनें स्वारीकडे मी पहात होतें. जणूं काय सुलभेनें म्हणजे मींच अपराध केला आहे!—स्वारीच्या चर्येवर सुलभेचा तो मजकूर आपल्याच पत्रांत आलेला वाचल्यावर तिरस्काराची सूक्ष्म छटा उमटली होती! माझ्याकडे पहात–मला ऐकायला येण्यासारखं

पण अर्धवटच पुटपुटणं झालें– " माझ्या वडिलांच्या आग्रहाला बळी पडून मीं सुलभेशीं लग्न केलं असतं–तिनंच नाकारलं माझ्या सुदैवानें–पण ती तयार झाली असती–तर त्यावेळींसुद्धां आपला मंगल विवाह झाला नसून–कायदेशीर व्यभिचाराचा परवाना आपण मिळविला आहे, असंच त्या वेळीं मला वाटलं असतं !–आणि त्या माझ्या लग्नाच्या बायकोचे हे चाळे–तिनें केले असते–केलेच असते बाकी–तर याही दृष्टीनें आतां जाहिररीत्याच आमचें लग्न कायदेशीर व्यभिचाराचचं ठरलं असतं; नाहीं चारू ?—"

मी काय बोलणार त्यावर ?

त्याच क्षणीं–निमिषमात्रच स्वारीनं, अभिमानानें, आदरानें आणि आत्यंतिक सात्विक प्रेमाच्या दृष्टीनें माझ्याकडे पाहिलें !

माझ्या सर्वांगांतून गोड लहरीनं संचार केला !

तितक्यांत आनंदानें प्रफुल्लित झालेले निशिगंध लाड घाईघाईनें स्वारीला शोधीत आले.

" कार्य झालं का ?–" त्यांना पहातांच स्वारीनं अति उत्सुकतेनें विचारलं !

" हो ! अगदीं सत्रा आणे !–चला कचेरींत; सारें सांगतों–"

आत्मविश्वासपूर्वक–विजयी स्वरांत लाडांनीं उत्तर दिलें.

स्वारी लगेच उठली.

जातां जातां लाडांनीं इकडे तिकडे पाहिलें. प्रसाद माझ्याजवळच झोंपला होता–तो दिसला त्यांना.

" युवराज प्रसाद झोपले वाटतं वहिनी ?" माझ्याकडे वळून हंसत लाडांनीं विचारलें. खिशांतून खाऊ–खेळणीं त्यांनीं आणली होती, ती त्यांनीं—

" प्रसादाला आणली होती गंमत–पण झोंपलीच आहे स्वारी–" म्हणत माझ्यापुढें केली. मीं हंसत तीं घेतलीं !

" आम्हांला लाडासारखीं कामाला माणसं लागतात !–इथं येरा-गबाळाचं कामच नाहीं !–" मला म्हणणं झालं; आणि लाडांच्याकडे वळून

"शाबास! लाड! छान कामगिरी उरकलीत--! आपण बहुत खुष आहोंत तुमच्यावर!" अगदीं मोकळ्या मनानें त्यांना म्हणायचं झालं.

तेवढ्यांत स्वारीला कशाची तरी आठवण झाली. लगेच लाडांना सांगितलें, "व्हा पुढें तुम्ही--आलोंच मी इतक्यांत--"

लाड गेले. जरा स्वस्थ--सचित उभं राहणं झालं--खिशांतून एक पत्र काढीत "आप्पासाहेबांचं आज सकाळीं मला पत्र आलं आहे. मन घट्ट करून--शांतपणानं वाच! मनाला लावून घेऊं नकोस--मघाशीं वसंतरावाबद्दल विचारलंस, तेव्हां एकदम नकार मी तुला दिला. तूं रागावलीस--स्वाभाविक आहे तुझा राग-पण या पत्राच्या वाचनानं तुझा राग नाहींसा होईल. निशिगंध लाडासारखे त्रयस्थ-पण लायख लोक मला कां हवे असतात--आणि वसंतरावासारखे आपले--पण नालायख लोक कां नको म्हणालों, हें तुझं तुलाच पटेल--" असं म्हणायचं झालं. पत्र माझ्या हातीं दिलं नी स्वारी चट्दिशी निघून गेली.

आप्पांचें पत्र मला न येतां स्वारीला?--असं कधीं झालं नाहीं--आणि आज हें--

धडधडत्या काळजानें पत्र उलगडून मी वाचायला लागलें--

नांव, मायना, आशिर्वाद, क्षेम, हें सारें भरभर वाचले.

पण पुढें जशी वाचायला लागलें, तशीं वाक्यावाक्याला अडखळायला लागलें.

"........चि. वसंत तुमच्याकडे आला. तुम्ही दोघांनींही सदूहेतूनेंच ठेवून घेतलात. मला तें पसंत पडलें नाहीं. पण तुम्हांला अकारण संत्रस्त करूं नये म्हणून कांहींच लिहिलें नाहीं त्याबद्दल.

पण आपल्याला आतां, त्याला ठेवून घेतल्याबद्दल दुवा देऊं कां दोष देऊं हेंच मला कळेना!--

तुमच्याकडे आला तो--तो कशाकरितां? नोकरीच्या शोधाकरितां? तुम्हांला खरें वाटलें; चि. सौ. चारूनें कळविलें तेव्हां मलाही खरं वाटलं; म्हणून मीही स्वस्थ बसलों.

पण इतक्या दिवसांनीं आज मला कळलें. एका सद्गृहस्थाचें सही-निशीं मला पत्रच आलें आहे—माझ्या अंगाचा भडका झाला आहे, तें पत्र वाचून!—तुम्ही तेथें असून तुम्हांला दाद नाहीं. मग मला इथं कशी लागणार दाद?—

चिरंजिवानं चांगलेच दिवे लावले आहेत. घराण्याला, माझ्या नांवाला, आणि स्वतःच्या चारित्र्याला चांगलाच भडाग्नि लावला आहे! पहा तरी एकदा—चौकशी करा!—कारट्याला ताबडतोब घराबाहेर हांकून द्या!

इथल्या एका गरीब कुलवंताच्या घराण्यांतली सुलभा नांवाची मुलगी कारट्यानं पळवून नेली! सिनेमांत घालण्याकरितां—कुठं तरी तिला ठेवली आहे त्यानं. अरेरे!! काय करूं? असल्या पोरट्याला गोळी घालून ठार करावं असं वाटतं!—

तुमच्या तिथं जेवतो—आणि त्या चवचाल बनलेल्या पोरीच्या खोलीवर जाऊन खुशाल लोळत पडतो कारटा!!..."

मला वाचवेनाच पुढें! शहारून गेलें मी! एकदम मोठ्यांदा किंचाळावंसं वाटलं मला!—

वसंताचा संताप आला! सुलभेबद्दल काय वाटलं मला?—चीड आली—तिरस्कार—मनस्वी तिरस्कार आला मला तिचा!

वसंतानं आप्पांना लांछन आणलं!—सुलभेनं तर कुलकन्येच्या पवित्रपणाला धडधडीत पेटता पलिताच लावला!

मी हतबुद्ध—जवळ जवळ बेशुद्धच झालें!

प्रसाद जागा होऊन मी त्याला घ्यायला हवं म्हणून रडत होता—पण मला त्याचं रडणं ऐकायला कुठं येत होतं?

प्रकरण तेरावें

# " मी साहिन हाल सुखानें-"

होणाऱ्याप्रमाणें माणसाला अगोदर बुद्धि होते म्हणतात, तें खरं कीं काय कुणास ठाऊक !

काम करीत असतां कांहींतरी-कुणाचं तरी गाणं गुणगुणायची माझी संवय-आतां मला एक मूल झालं होतं तरी-कांहीं सुटली नव्हती !

सरशी आपल्या माहेरी गेलेली-वसंताचा अगोचरपणा कळल्यावर मी त्याच्यावर खूप रागावलें; भांडलें, बोललें; म्हणून त्यानेंही माझ्या घरचें आपलें चंबूगवाळें उठवून तो कुठें एकदम चालता झालेला !

प्रसादाचा माझ्या जिवाला विरंगुळा होता. माझ्या मनाला प्रसन्न ठेवण्यासाठीं स्वारी मुळींच कधीं कसूर करीत नव्हती.

अलीकडे अलीकडे तर स्वारीच्या हाताखालीं काम करणारे निशिगंध लाड देखील माझ्याशीं मोकळ्या मनानें बोलत; विचारपूस करीत; माझ्यापेक्षांही प्रसादला घेऊन बाहेर जात; त्याच्यावर भारी-भारी माया करीत; त्यामुळें ते आले, बोलूं लागले म्हणजे मला बरं वाटे, आनंद होई.

मी एवढीशी खिन्न झालें, उदास दिसलें, कीं स्वारीचं लक्ष नसेल इतकं लाडांचें माझ्याकडे लक्ष असायचं. " वहिनी, खिन्न कां दिसतां ? उदास कां झालांत ? " असं खोदखोदून ते विचारून मला पुरे पुरे करीत.

मी हंसलें म्हणजे त्यांना बरं वाटायचें. " आतां मला आनंद झाला ! वहिनी, तुम्ही अशा आनंदांत नेहमीं असत जा बोवा ! तुम्ही आनंदांत दिसला म्हणजे आम्हांला काम करायला हुरूप येतो-तुम्ही हिरमुसल्या पाहिल्यावर पंडितरावांना कचेरींत काम करायलाही कांहीं सुचत नाहीं. आपण तर नक्की ओळखून ठेवलं आहे-पंडितरावांची

कामांत चलबिचल होऊं लागली कीं, घरीं वहिनींचें मनःस्वास्थ्य बिघडलं असलं पाहिजे म्हणून !

" आमच्यासाठीं—पंडितरावांच्या हुरूपीसाठीं—वर्तमानपत्राच्या भरभराटीसाठीं तरी वहिनी, तुम्ही सदा आनंदी, प्रसन्न राहिलंच पाहिजे ! कारण स्त्रियांच्या मनाच्या सुप्रसन्नतेवरच पुरुषांना आपल्या कर्तबगारीच्या मंदिरावर कीर्तीचा सुवर्णकळस चढवितां येत असतो !"

निशिगंध लाड वरीलसारख्या हंसत बोलण्यानें मला रिझवीत, तर—मला एकाद्या वेळीं करमेनासें झालें म्हणजे मी प्रसादाला घेऊन कचेरींत जाई; तेव्हां मला पाहून हंसत म्हणायचं होई;—

" या मालक ! देखरेख करायला आलांत आमच्यावर ? या ! आम्ही आमचं कर्तव्य चोख बजावतों आहोंत." इतर काम करणाऱ्या मंडळींकडे वळून " हुश्शियार मंडळी ! मालकिणबाई आल्या आहेत ! आपापल्या कामांत दक्ष असा !" पुन्हां मला विचारायचं, " काय चारु, कागदपत्र, हिशेब, पहायचे आहेत ?—तूं मालक, आम्ही नोकर—आम्ही मिळवतों, पण आहे तुझं; काय आहे—नाहीं, हें तुझं तुला असं मधून—मधून येऊन पाहिलंच पाहिजे. अशी येऊन पहातेस, याबद्दल आनंद होतो आपल्याला ! येतं किती—जातं किती, हें पाहण्याची आम्हां पुरुषांना सूक्ष्म दृष्टि नसते. आमची दृष्टि ढोबळ ! तुमची सूक्ष्म !—आम्हां पुरुषांना मिळवणं पुष्कळदां सोपं असतं पण मिळवलेलं राखणं जमत नाहीं. तुम्हीं बायका मिळवणार नाहीं कदाचित ! पण मिळवलेलं चातुर्यानें आणि दक्षतेनें राखावं तुम्हीं बायकांनींच !"......

कचेरींत गेलें म्हणजे मला बरें वाटेल असं कांहीं तरी स्वारी बोले; मला त्याचा लाडिक राग येई—पण आनंद होई. नवी वर्तमानपत्रं, मासिकं, पुस्तकं वाचायला मिळत; एकाद्या वेळीं कांहीं लिहावं असंसुद्धां कचेरींत असलं म्हणजे वाटे ! स्वारीला म्हटलं म्हणजे मला हटकून प्रोत्साहन मिळे. निशिगंध लाड तर आग्रहानें लिहावयासाठीं एकसारखा ससेमिराच लावीत !

" लिहा, लिहा, म्हणतां, पण लिहायचं काय सांगा पाहूं निशिगंध जी ?—कां आपलं पत्र आहे म्हणून वाटेल तें—वाटेल तसलं लिहित

सुटायचं?–माझे लेख छापून वर्तमानपत्राचे ग्राहक कमी करून घ्यायचे आहेत वाटतं तुम्हांला?" निशिगंधाना निरुत्तर करण्यासाठीं म्हणून मी बोललें, तर तसं न होतां उलट ते हंसून म्हणत, "छेः छेः, स्त्रियांच्या लेखनाला आपल्या बाजारांत अजून पुष्कळ भाव आहे! तुम्ही हवं तें लिहा–बाकी हवं तसं वेडंवांकडं तुमच्या हातून लिहणं व्हायचंच नाहीं ही माझी खात्री आहे–तुमचा लेख असलेला अंक थोडा तरी जास्त खपलेला मी दाखवून देईन तुम्हाला वहिनी?–"

"पण लिहूं काय मी!......"

"स्त्रियांच्यासंबंधीं स्त्रियानीं लिहावं! दुसरं काय?–स्त्रीविभाग आपण पत्रांत स्वतंत्र ठेवूं या ना?" स्वारीनें निशिगंधांच्याच आग्रहाला पुष्टि द्यावी. स्त्रियांचे प्रश्न स्त्रियांनींच हातीं घेतले पाहिजेत–आपलें सुख-दुःख, आपल्या गरजा, आपल्या अडचणी, मागण्या, महत्त्वाकांक्षा-आपलं आपणच जगापुढं सारं मांडायला हवं!–पुरुष राजकारणांत गुंतलेले–गढलेले–तो धक्काधकीचा मामला त्यांचा–आपण आपली बाजू घेतली पाहिजे–संभाळली पाहिजे—"

पण काय लिहायचं मी? सरशीच्या संसाराचे तीन तेरा–सरलेचं करुण जीवन–माझ्या आंवतीभंवतीच्या जगाकडेच मी पहाणार! दूरचं दिसतंय कशाला मला? अन् जवळचं असतांना दूरचं पाहूंच कशाला?–सुलभेच्या उत्तम आयुष्याची किळस उत्पन्न करणारी वाताहत!–अन् माझ्याबद्दल?–पण माझ्याबद्दल लिहिण्यासारखंच काय आहे म्हणून लिहावें? आपल्याबद्दल लिहायला–आपला जगाला कळकळीचा संदेश सांगायला आपल्याजवळ असायला नको कां काहीं?–परतंत्र देशांतल्या गुलाम जीवांना जीवनच नाहीं कांहीं तर त्यावर लिहायचं कसं नी काय?

स्वारीनं प्रोत्साहन दिलं, निशिगंधांनी आग्रह केला, माझ्या मनाला कितीही वाटलें, तरी जितक्या उत्साहानें लिहावंसं वाटे–तितक्याच निराशेनं लिहायचा विचार विलयाला जाई!

वसंताला उद्योगाला लावतां आला असता, सरलेला पाठीशीं घालून तिला कायमची निर्भय केली असती,–सुलभेला शुद्धीवर आणतां आली असती–थोडंतरी कुणाकरितां कांहीं वाणीनं आणि कृतीनं मला

वागतां आलं असतं, तर अधिकारवाणीनें–लेखणीनें मला जगाला कांहीं-तरी अनुभवाचे बोल देतां आले असते—

आतापर्यंत मी मनानं, दुसऱ्याकरितां झिजायला, झटायला, त्रास सोसायला तयार होतें कीं नाहीं कोण जाणें !–मी, माझं घर, स्वारी, प्रसाद, आणि माझं सुख, या पलिकडे माझी दृष्टि गेली होती कुठं अजून ?—

कधींतरी आप्पांच्याबद्दल कष्टी विचार यायचे–ते वाऱ्यावर विरायचे–वसंताबद्दल राग यायचा–तो पण आपल्या सुखाची लहर–जिवाला सुखवूं लागण्याचा क्षण-येण्याबरोबर कुठच्या कुठें नाहींसा व्हायचा !

एक दिवस–अशी संध्याकाळची वेळ होती. प्रसाद जागा होऊन आपल्याशींच हातपाय जुळवून–स्वारीचं मोडकं फाऊंटनपेन खेळायला हातांत धरलेलं–दुधाच्या चोखणीसारखं तोंडात धरून चोखीत–खेळत होता !

मला कुठं कीं जायचं होतं, म्हणून कपाटातलं मनासारखं नेसायला–लुगडं–पातळ काढायला कपड्याच्या कपाटाजवळ मी उभी होतें. सुखासीन जीवाच्या मनांत अशा वेळीं ज्या प्रकारचे विचार येत असतील,स्वतःबद्दलच्या स्वाभिमानाचे–आणि त्याबरोबर जगाला वेड्यात काढण्याचे–असेच कांहीं मनांत विचार चालले होते कीं काय कोण जाणे !–मी मनासारखं नटण्याचें सुख अनुभवित होतें-जास्त जास्त सुखाच्या मार्गे चाललें होतें–सरशी, सुलभा, सरला, याची आठवण त्याच वेळीं मनात घोळत होती–त्यांनीं आपल्याला जर विचारलें, "तूं आमच्या सुखाकरितां काय करशील ?–तूं सांगशील तसं आम्ही वागूं–पण तूं काय करशील ?–"

तर आपण काय त्यांना उत्तर दिलं असतं ?–मनांत येतं होतं–नी अभिमानाच्या तोऱ्यात मी स्वतःशींच गुणगुणत होतें–

**"मी साहिन हाल सुखानें । धैर्यानें । शांत मनें ॥–"**

मी तुमच्यासाठीं धैर्यानें, शात मनानें हाल सोशीन, पण तुम्ही जर माझ्या सांगण्याप्रमाणें वागलां, तर तुम्हाला सुखाचा मार्ग दाखवून देईन–मिळवून देईन ! —

पुनःपुन्हां 'मी साहिन हाल सुखानें' मी घोळीत होतें– कपाट उघड, मनाजोगता ब्लाऊज शोध, प्रसादकडे लक्ष दे, त्याच्याशीं त्याच्याच बोबड्या शब्दहीन भाषेंत बोल–तोच चरण पुन्हां गुणगुण–असा माझा

चाळा चालला होता! महेश्वरी लुगडं घेऊं कीं इलकलीच असूं दे?—कशाला नाहीं तर-बनारसी पांढरं साधंसुधं पातळ असलं म्हणून काय बिघडतंय?—

पांढरं पातळच काढल शेवटीं मी कपाटांतून पसंत करून नेसायला—घडी उलगडत होतें पातळाची, नी पुन्हां गुणगुणलें—

"मी साहिन हाल सुखानें। धैर्यानें, शांत मनें-
मी साहिन हाल सुखानें-"

नी, माझा स्वर थांबण्याच्या आंतच—मला बाहेरून सांथ मिळाली—

"वृद्ध असामी समजा मुकला।
गाडा वेगें पुढती ढकला।
रुतलेला, परवशतेनें—"

शेवटल्या चरणाला जुळूनच, माझ्या तोंडांतून—"मी साहिन हाल सुखानें" हा चरण आला—माझ्याच एकटीच्या नाहीं, तर तीन चरणाचें मधलें कडवें गाणाऱ्या स्वारीच्या मुखांतूनही तोच चरण माझ्या संगतींच—अगदीं बरोबर आला!

स्वारी गात गात बाहेरून येत होती.

स्वारीचा स्वर मी अगोदरच ओळखला. तोंडचं कडवं ऐकलं. मला सांथ केलेली आवडली—मी लाजलेही तितकीच अन् मला गंमतही वाटली तशीच!

"चारु, लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगाकडे जायला निघाले त्यावेळीं त्यांनीं आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून काय म्हटलं असेल, हें कुणा कवीनं काव्यांत चितारलेलं हें शब्दचित्र किती हृद्य—आणि ओजस्वी आहे नाहीं?......" म्हणत म्हणत स्वारी मी होत्यें तिथं आली—मी लुगडं बदलत्येंय् हें पाहून दूरच थबकणं झालं—माझ्याकडे ओझरतं पहायचं होतंय् इतक्यांत बाजूस खेळत असलेल्या प्रसादचे हुंकार कानीं पडल्यामुळें त्याच्याकडे वळणं झालं!

उपजत स्त्रीदाक्षिण्याचें शिक्षण स्वारीच्या अंगांत असलेलं पाहून मी गालांतल्या गालांत हंसलें!—

" प्रसादच्या हातांत फ्रांकेन्स्टाइन ?" त्याच्याजवळ जाऊन त्याला कुरवाळीत माझ्याकडे न पाहतांच म्हणायचं झालं !

" संपादकीय लेखणी आतांपासून हातीं घेतोय् गुलाम !–" मी हंसून उत्तरलें.

" ठीक आहे ! कांहीं वावगं नाहीं." स्वारी म्हणाली, " पण बेट्या, संपादकाचं जीवन–एक पाय घरांत आणि दुसरा तुरुंगांत–असं असतं, हेंही पण तुला ध्यानांत धरायला पाहिजे !"

तें ऐकून काय पण मी दचकलें !–तुरुंगाची भयप्रद कल्पना माझ्या मनांत उभी राहिली !–पातळ नेसतां नेसतां क्षणमात्र तशीच स्तब्ध जागच्या जागीं उभी राहिलें मी !

हंसऱ्या बालमुखाचा मुका घेण्यासाठीं स्वारीनें प्रसाद जवळ तोंड नेलं होतं–प्रसादनें चिमुकल्या हातानें स्वारीच्या नाकावरील चष्म्यावर झांप घातली होती ! बाळाच्या बहाद्दरीचें ' कौतुक करीत–आणि मला करायला लावण्यासाठीं बेभानपणानें " चारु, हें पाहिलंस ?–" म्हणत माझ्याकडे पहायचं झालं !

लाजेनें माझी किंचित् तारंबळ झाली. मी भानावर आलें—

माझ्या चर्येंत झालेला फरक स्वारीच्या ध्यानात आला असावा. लाजेनें उडालेल्या तारंबळीपेक्षां, तुरुंगाच्या भयाण कल्पनेची छटा माझ्या मुखावर वावरत होती–

' तुरुंगाचे त्रासदायक विचार आतांपासूनच बाळाला ऐकवायला नकोत गडे ! ' असं मी म्हणणार होतें; पण त्रासदायक विचारांतून मला बाहेर काढण्यासाठींच स्वारीनें माझ्या मनाला आंदोलन दिलें–

माझ्याकडे लावलेली दृष्टि न वळवितां मोठ्यांदा हंसून म्हणायचं–

" खाडिलकरांना सूक्ष्म दृष्टीचे सर्व श्रेष्ठ नाटककार कां म्हणतात तें आतां मला समजलं. नव्हे–पूर्ण पटलं !—"

" म्हणजे काय ?—" मीं गोंधळून विचारलें–

" नेसत असतांनाच बरी दिसतेस !—त्यांचा नायक आपल्या नायिकेला म्हणाला !–किती सार्थ आहे तें !–नाहीं !–"

"इश्श! असला विनयहीन विनोद शोभतो वाटतं आपल्याला!–" मी म्हणणार होतें, पण माझी जीभच उचलेना! मी लाजलें. गोंधळलें. पण आनंदही झाला.–त्या भरांत क्षणापूर्वीचे तुरुंगाचे त्रासदायक विचार वगैरे मी चटूलारे विसरलें!

सुखासीन जीव झाला म्हणजे तो आपल्या सुखाकडेच तेवढा सदा पाहूं लागतो. जगाकडे त्याच दृष्टीनें पहातो. जगांतल्या सुखावर आपला तेवढा हक्क आहे. दुःखाकरितां आपण नाहीं. आपल्याकडे तीं येणारही नाहींत–नी आपण त्यांना जवळही कधीं करणार नाहीं; असेंच त्या जीवाला वाटत असतं!

निदान माझी–माझ्यापुरती सध्यांची स्थिति अशीच नव्हती का? माझ्या सुखापलिकडे–मी कुठें पहात होतें?

सहज स्वारीच्या एका वाक्यानें मी हादरलें–भ्यालें. स्वारी वर्तमानपत्राच्या व्यवसायांत होती–त्यांचा एक पाय घरांत–दुसरा तुरुंगांत–अशी अवस्था होती–हें कुठं मला दिसत होतं? मी कुठें त्याचा विचार करीत होतें?–स्वारीनं प्रसादला उद्देशून म्हटलं, तें मला लागलं. पण स्वारीचं प्रत्यक्ष जीवन माझ्या डोळ्यांत भरलं नाहीं–उतरलं नाहीं–त्या कल्पनेची बाधा मला कधीं झाली नाहीं–तर मन हलणार कसं?

स्वारीच्या एका वाक्यानें त्रासदायक दुःखाची कल्पना आली–दुसऱ्या ललितपूर्ण-नर्म शब्दांनीं कस्पटासारखी भुर्रकन् निघूनही गेली! पण माणसाच्या कल्पनेच्या खेळापेक्षां-परिस्थितीचा खेळ मोठा जबर असतो! माणूस आवडत्या कल्पनेला हवा तितका वेळपर्यंत मनांत खेळवील–नावडत्या कल्पनेला–ती मनांत शिरली तरी–तत्काळ धुडकावून लावील! पण परिस्थितीनें खराखुरा खेळ करायला एकदां सुरुवात केली–नी तो नावडता त्रासदायक खेळ असला–तर त्याला लगेच धुडकावून देण्याची शक्ति माणसाच्या अंगांत असते थोडीच?

मलीं या परिस्थितीच्या राक्षसी खेळाची आजवर कधीं कल्पनाच नव्हती!–मग मी त्याचा विचार तरी कसला करणार?

आपल्या वर्तमानपत्रांतून-प्रजेला नाडणाऱ्या, छळणाऱ्या, गुलामगिरींत निरंतर पिचत ठेवण्यासाठीं चंग बांधलेल्या सैतानी सरकारावर,

तीव्र टीकांची स्वारी मुलुखमैदान तोफ बेदरकार डागीत होती. परवांचा लेख चांगला, कालचा उत्तम, आजचा उत्कृष्ट—असें स्वारीशीं बोलतांना लाड उत्साहभरानें सांगतांना—मी रोज ऐकत होतें; मला स्वारीबद्दलची स्तुति ऐकून आकाश आनंदानें ठेंगणं होत होतं! वर्तमानपत्राचा तडाखेबंद खप होतांना पाहून, साऱ्या जगांत, स्वारीचा पराक्रम गाजत आहे, हें ओळखून सगळ्यापेक्षां जास्त आनंद मला व्हायचा नाहीं तर कोणाला?

पण त्याच वेळीं सरकारी संकटाच्या घारी स्वारीला अपशकून करायला तळपत आहेत, सरकारी कठोर खुनशी तरवार स्वारीला घायाळ करायला मस्तकावर कुजक्या बारीक दोरीनें टांगलेली लटकत आहे, हें, माझे डोळे उघडे असून कुठें मला दिसत होतें?

आपल्या घरांत सुखासमाधानानें, आनंदानें, निःशंक वावरत होतें.

मला कसल्याच कल्पना नसल्या, तरी बाहेर विविध घटना घडत नव्हत्या असं थोडंच आहे?

—प्रसादला थोपटीत मी निजवीत होतें. मीही त्याला कुशींत घेऊन लवंडलें होतें; त्याला अंगाई गीत गातां गातां तो अगोदर झोंपीं गेला का त्याच्या अगोदर माझाच डोळा लागला कोण जाणे! झोंपतांना माझ्या मनांत आनंदाचेच विचार होते—स्वप्नं मला भारीं पडत होतीं. कसलीं नी काय?—भीतिदायक स्वप्न पडलें कीं भ्यावं—जवळ असलेल्या प्रसादाला आधाराकरितां अधिकच जवळ घ्यावं. त्यानं कुरकुर करावी—असं चाललं होतं!

बाहेरच्या ओसरीवर पडलेल्या नागूनं दाराची कडी केव्हां काढली, स्वारी आंत केव्हां आली, नी थेट मी निजलें होत्यें तिथंवर केव्हां आली, माझ्या तोंडावरचं पांघरूण काढलं, तरी मला कळलं नाहीं!

बर्फासारख्या गार हाताचा परिचित स्पर्श माझ्या गालाला लागला अगदीं लगटून बसायचं होतं—मी जागी झाल्यें.

गार हातावर माझा पांघरुणांतला उबदार हात दाबून त्या मधुर गारव्याची गोडी अनुभवित आळसटपणानें तशीच पडल्या पडल्या मी म्हटलं, "किती उशीर करायचा?"

"रोजच्या इतकाच ! संपादकाचं जीवन आहे ना?" रोजचंच उत्तर मिळालें.

"जेवायचंय ना?–"

"मग काय उपाशी ठेवणार आज?–अन् तुला नाहीं वाटतं जेवायचं?"

"उठायचं तर!–"

"तूं उठल्याशिवाय?"

आळस झाडून चट्दिशी मी उठलें–उभीच राहिलें. पण मला पुन्हां माझ्या हाताला धरून जोरानं बसविलें–

"म्हणजे काय? हें काय असें?" मीं म्हणत स्वारीकडे पाहिलें.

नेहमींपेक्षां स्वारीचा चेहरा मला यावेळीं विशेषच प्रफुल्लित दिसला!

"झोंप संपली?–" उत्कट भावनेच्या स्निग्ध दृष्टिनें पहात म्हणायच झालं!

"हो!–"

"चारू," म्हणायचं, "जेऊं या सावकाश! अगोदर बोलूं या पोटभर! तुझ्याशीं आज खूप–खूप–उजाडेपर्यंत बोलावंसं वाटतंय!–खूप बोलूं या!–खूप आनंद लुटूंया–"

प्रसाद झोंपेंत लोळत लोळत कुठेंच्या कुठें जाऊन पडला होता.

"चांगली जागी झालीस का चारू?–"

"समोर–जवळ बसल्येंय तरी दिसत नाहीं?–"

"आई! आई!" करीत प्रसाद जागा झाला. उठूनच बसला तो. "आई कुठाय?–"

"तुझी आई माझ्याजवळ आहे!–" म्हणायचं झालं.

आमची दोघांची दृष्टादृष्ट झाली. आम्हीं दोघेही हंसलों.

"अन्नाच्या गारगोट्या झाल्या आहेत अगोदरच!" मीं म्हटलं, "आणखी किती वेळ जेवायला उशीर करायचा तो? सोन्यासारखं अन्न गारढोण करून खायचं–काय सुख वाटतं कुणास ठाऊक!–"

" चाललंच आहे! तुझ्या हातचं गार अन्नदेखील अमृताच्या चवीला फिकं करतं! शिवाय–"

" शिवाय काय?–"

" आम्हां संपादकांना घरीं नेहमींच असल्या गार–बेचव अन्नाची संवय असली म्हणजे बाहेर कुठेंही प्रसंग आला, तरी नडायचं नाहीं–"

उठून बसलेल्या प्रसादला मी पुन्हां निजवून थोपटीत होतें. स्वारीच्या बोलण्याचा मला अर्थबोध झाला नाहीं. प्रसाद निजला बिचारा चट्टकन्!

आम्ही जेवायला स्वयंपाकघरांत गेलों, दोघांचं बरोबरच वाढून घेतलें. जेवणावर काय बोलायला सुरुवात होते, याकडे माझं लक्ष होतं.

" मी साहिन हाल सुखानें। धैर्यानें। शांत मनें।" गुणगुणायचं झालं!

मला राग आला. मीं स्वारीला म्हटलं, " माझी नक्कल करून, थट्टा करायची वाटतं?"

" तुझी थट्टा नव्हे चारू! अत्यानंदाचे सत्य आहे हें!"

" म्हणजे काय?—"

" माझी देशभक्ति, माझं अंगीकृत कार्य, माझी तपस्या हीं सर्व फळाला येण्याची सुवेळ समीप आली आहे!—"

" म्हणजे!—"

" चारु, आजपर्यंत तूं मानाची–शोभेची आणि ऐत्या मिळणाऱ्या सुखाची–कांहींशा परावलंबी आनंदमय जीवनाची–मालकीण होतीस. आता लवकरच–कदाचित् उद्यापासूनही खरी, स्वकष्टार्जित, स्वावलंबनयुक्तां अशी मालकीण होण्याचा थोर मान पटकावण्याचा योग तुझ्याकडे चालून येणार आहे—"

" असं वळसेवेलांट्यांनीं काय बोलायचं? स्पष्ट नी सरळ सांगितलं तर नाहीं चालणार का?–" जरा चिडक्या आवाजांतच मी म्हणालें. काय सांगायचं होतंय याची अंधुकदेखील कल्पना येईना. मग चिडूं नको तर काय करूं?

" देशासाठीं–मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं राष्ट्रोद्धारक–पण सरकारीदृष्ट्या राजद्रोही थोर थोर संतमहात्म्यांना बेमुदत ज्या पवित्र

स्थळीं निवांत नेऊन ठेवीत असतं सरकार—या जागीं अस्मादिकालाही पण सरकार नेऊन सोडणार आहे!—" स्पष्ट नी सरळ माझ्या इच्छेप्रमाणें स्वारींनें मला सहज हंसत हंसत सांगून टाकलें.

मी घाबरलें. हातांतला हातांत नी तोंडांतल्या तोंडांतच माझा घास राहिला! भयाकुल दृष्टीनें स्वारीच्या तोंडाकडे पहातच राहिलें.

"घाबरतेस चारु?" पुन्हां पहिल्यासारखंच हंसत म्हणायचं झालें. कर्तव्यकठोर, तेजस्वी आप्पासाहेबांची मुलगी, जगजाहीर ज्वलज्जहाल एकनिष्ठ देशसेवक पंडिताची पत्नि—एवढ्यातेवढ्याने घाबरते?—छट्! आपल्याला हें बिलकुल पसंत नाहीं.

माझ्या डोळ्यांतून अविरत अश्रुधारा वाहूं लागल्या! कसलें जेवण! मला सुचेच ना कांहीं!

"चारू, डोळे पूस पाहूं अगोदर! मिळत असलेल्या वेळाचा उपयोग आनंदांत—हंसण्याबोलण्यांत घालवायचा कां असं रडायचं?—" स्वारीची टकळी सुरूच—"जी चांगली कन्या असत नाहीं ती चांगली पत्नी होत नाहीं, आणि जी चांगली पत्नी असत नाहीं ती चांगली माता तरी कशी होणार?—सांप्रतच्या काळांत एकट्यानंच स्वावलंबी होऊन चालत नाहीं. प्रत्येकानं झालं पाहिजे! पुरुषांशीं समानहक्काची अधिकारानें मागणीच्या गर्जना करणाऱ्या स्त्रियांनीं तर प्रथम स्वखुषीनें स्वावलंबी बनलें पाहिजे. आपल्या तान्हुल्यांना तसं तयार केलं पाहिजे! आपली मायभू सर्वतंत्र स्वतंत्र होईपर्यंत—तुझ्या माझ्यापेक्षां प्रसादला आणखी कोणत्या कसल्या खडतर प्रसंगाशीं टक्कर द्यावी लागेल याची कल्पनासुद्धां करणं कठीण आहे! प्रसादला बनविण्याचं सुकार्य त्याची रडवी आई कशी यथास्थित पार पाडूं शकेल?—"

मी कांहींच बोलूं शकत नव्हतें. पुढें स्वारीच म्हणाली,

"चारू, या जगद्रंगभूमीवरील जिवंत नाटकांत आपण निसर्ग-निर्मित पात्रें आहोंत—आपल्याकडे ज्या वेळीं, ज्या स्थळीं जसें नाचावें लागेल—तसें निमूटपणें, आनंदानें—आणि कर्तव्यतत्परतेनें नाचलें पाहिजे. आपापल्या भूमिका साजऱ्या रीतीनें वठविल्या पाहिजेत—जीवननाटकांतले हे प्रसंग, या असल्या घटना टाळण्यांत कांहीं मौज आहे काय?"

गंभीरपणानें एवढें म्हटलें, पण लगेच विनोदाची लकेर येऊन आणखी म्हणायचं–" आणखी चारू, तुला सांगतों. माझं म्हणणं नव्हे, सरकारी खात्यांतल्या माझ्या स्नेह्यांनीं मला जें सांगितलें तें तुला सांगतों–ते म्हणाले, पंडितराव, सरकार तुमची उचलबांगडी करणार आहे, हें तुमचं नशीब समजा ! तुमच्या छापखान्यावर व वर्तमानपत्रावरच गदा आली असती तर, तुम्हीं आणि तुमचीं बायका–मुलं उद्यांच भिकेला लागला असतां !–दारोदार हिंडला असतां तर–लब्धप्रतिष्ठित समाजानें तुम्हांला भीकसुद्धां घातली नसती !–तुम्ही बेमुदत डांबले गेलां तरी–तुमच्या बायको–मुलाला पोटाची तर पंचाईत उद्यांच पडायची नाहीं–मग आतां तूंच सांग चारू, होणार हेंच ठीक आहे कीं नाहीं ? उद्यां तूंच छापखाना–वर्तमानपत्र चालवशील तर स्वार्थ आणि परमार्थही तूंच साधशील कीं नाहीं ? मला दोन्ही पक्षीं समाधान आहे–आनंद आहे ! आणि तुलाही हें मान्य असलेंच पाहिजे !—"

मी काय बोलणार ? अशा प्रसंगांत स्वारीला हंसवतं कसं–बोलवतं कसं ? आपलं वीरत्व प्रत्येक शब्दांत, हास्याच्या प्रत्येक लकेरींत स्वारी मला पटवीत होती–मी मात्र अगतिक झालें होतें–मी वीरकन्या–वीरपत्नी नाहीं, असंच आंतलं मन मला हृदयाच्या दरेक ठोक्यासरशीं जाणवत होतें !–

'निशिगंध लाड आपल्या हाताखालीं चांगला तयार झाला आहे, आपल्यासारखा तो भावनेच्या शिखरावर नाचणारा नाहीं–स्थळ–काळ–वेळ जाणून–लव्हाळ्याप्रमाणें पूर आला असतां नमून पुन्हा ताठ राहणारा आहे, त्याचें साह्य तुला चांगलें होईल,' हें सांगून मला निःशंक करण्याचा, धीरानें वागण्याचा स्वारीनं प्रयत्न केला.

इतकंच नाहीं तर, गप्पा, गोष्टी, कोट्या, प्रतिकोट्या करून मला उजाडेपर्यंत स्वारीनं रिझवलं–हंसविलें–आनंदामृताचे घुटक्यावर घुटके पाजले !

मला वाटतं होतं–रात्र संपूंच नये–उजाडूंच नये–अन् स्वारीला माझ्यापासून दूर व्हायची ती दुष्ट वेळच येऊं नये—

पण मी वाटेल तें म्हटलं म्हणून उजाडल्याखेरीज कां राहणार ?–उजाडलंच मेलें अखेर !

सकाळीं घराच्या बाहेर पडण्याच्या वेळीं जीव मुठींत धरून-करुण दृष्टि स्वारीकडे लावीत, रुद्ध कंठानं विचारलं—

"बेमुदत सरकार स्वारीला डांबणार?—" कारण तेवढाच विचार मनांत जोरानें घोळत होता—

पण स्वारी उत्तरादाखल—

षड्वर्षादिक षण्मासांनीं।
दैवें आलों जरि परतोनी।
कार्य यशस्वी झालों बघुनी।—
भेटेन तुम्हां प्रेमानें।
मी साहिन हाल सुखानें॥

मला असें ऐकवीतच स्वारी बेगुमान घराबाहेर पडली!

माझ्या कानांत तें गाणें घुमत होतें—पण आतां गाण्याचें धृपद म्हणावसं वाटत नव्हतें!—कसं वाटणार?

———

## प्रकरण चौदावें

# नवी सृष्टि–

रोजची सृष्टि नवीच. जाणारा दिवस आपल्याबरोबर जुन्या सृष्टीला आपल्याबरोबर घेऊन जात असतो, उजाडणाऱ्या दिवसाबरोबर नवी सृष्टि आपल्यापुढे आलेली दिसते ! रोजच आहे हा प्रकार ! नित्याच्या परिचयानें एकाद्याला–सगळ्यांनाच नव्या सृष्टीचा नवीनपणा भासत नाहीं !

पण मानवी आयुष्यांत जेव्हां विशेष प्रसंगाच्या खुणेचे दगड येतात, त्या वेळीं सृष्टीची नवीनता एकदम डोळ्यात भरते–जाणवते.

परीक्षेचा पहिला दिवस, लग्नघटिकेची वेळ, पुरुषाच्या नोकरीची–स्त्रीच्या पहिल्या बाळंतपणाची वेळ, घरांतल्या जबाबदार माणसावरील एखाद्या आपत्तीची अगर मृत्यूचीच घटका–अशा जेव्हा येतात, उलटून जातात; त्या अगोदरची जुनी सृष्टि व त्यानंतरची नवी सृष्टि म्हणजे काय असते, याची स्पष्ट कल्पना येते !

स्वारीला सरकारी पाहुणचार घ्यायला बेमुदत जावं लागलं–माझी जुनी सृष्टि संपली–नव्या सृष्टींत मी आलें–नव्हे मला यावंच लागलं !

स्वारी दुरावल्यानें मी निराधार एकाकी झालें. हताश, निराश होऊन जुन्या सुखावलेल्या डोळ्यानीं नव्या सृष्टीकडे कावरीबावरी होऊन पाहूं लागलें. डोळ्यांतलें पाणी पहिले किती दिवस तरी खळत नव्हतें !

काय करावें, कसें करावें; मी एकटी–बायको माणूस ! शिरावर जबाबदारी घ्यायची इच्छा नी धीरही होईना ! पण जबाबदारी घेतल्या-शिवाय गत्यंतरच नव्हतें !

स्वारीबद्दलची हकीकत आप्पांना कळवायच्या अगोदरच साऱ्या वर्तमानपत्रांनीं स्तुतीस्तोत्रांच्या नगाऱ्यांनीं कळवीलीच होती. आप्पांना पत्र लिहून कांहीं दिवस आधार म्हणून बोलावणार होतें.

त्या अगोदरच आप्पांचं पत्र मला आलें. 'खरे वीर पुरुष' या शब्दांनीं आप्पांनीं स्वारीची स्तुति केली होती. 'तूं वीरपत्नी झालीस. त्या योग्यतेनें वाग व पद्वी सार्थ कर!' असा आशिर्वादपूर्वक उपदेश मला केला होता. ते आले नाहींत. येईन असा उल्लेखही केला नाहीं त्यांनीं. जवळ आप्पा नाहींत. वसंत निघून गेलेला. स्वारी दुरावलेली—मायेचं कुणीच नाहीं माझ्याजवळ!—मायेचीं माणसं असून दुरावलेलीं—मला अगदीं उभं वारं सुटल्यासारखं झालं होतं.

लोक म्हणतात—जगांत कुणावर कसले प्रसंग येत नसतात का काय? कल्पनातीत दुर्धर प्रसंग येतात एकेकावर! अमक्यानं असें प्रसंगाला तोंड दिलें नी तमकीनें तशी प्रसंगाशीं झुंज दिली!—हुं कीं चूं केलं नाहीं. हृदय हदरूं दिलं नाहीं. डोळ्यांत पाण्याचा टिपूस येऊं दिला नाहीं.

मला त्या थापा वाटतात—एकाद्याला अनेक बऱ्या वाईट प्रसंगांतून गेल्यावर मोठेपणा आल्यावर सुंदर रामायण रचावं—तशा अद्भुतरम्य गोष्टी रचून मागून त्याच्या चरित्राला चिकटविल्या जातात! खरं दडविलेलं असत—नी खोट्या चांगल्याला सोन्याचा मुलामा दिलेला असतो!

काळ्याकुट्ट माणसाचं छायाचित्र—पुष्कळ काळ लोकांना दिसावं म्हणून चित्रकार मुद्दाम काळा रंग लपवून गोरं नाहीं का करीत? तशांतलीच गत!—इतर कुणाचं कसं का असेना!—स्वारी तुरुंगात गेल्यावर नवी सृष्टि माझ्या डोळ्यापुढें उभी राहिली—मी तिला पाहून भ्यालें, बावरलें; हें अगदीं खरं खरं सांगतें. मला मग कुणी कांहीं का म्हणेना!—दुसऱ्याच्या आधारावर विसंबूं नये, धडाडीनें स्वावलंबी व्हावं, जबाबदारी आपखुषीनें शिरावर घ्यावी—म्हणजे भीती वाटत नाहीं नी गांगरायला पण होत नाहीं—परोपदेशे पांडित्य—हें ठीक आहे. उपदेश नी लाथा दुसऱ्याला द्यायला फार बरं वाटतं—पण घेणाऱ्याच्या यातना कुणाला कळणार? ज्याच्या त्यालाच!

पुरुषांचा प्रश्न क्षणभर बाजूला ठेवला तरी बायकांना—ज्यांना, बाप, भाऊ, पति—मित्र—मुलगा—यांच्या आधाराशिवाय क्षणभर चालत

नाहीं–त्यांतून माझ्यासारख्या सुखावलेल्या जिवाला तर क्षणभर एकटं–एकाकी राह्यचं–जबाबदारी अंगावर घ्यायची म्हणजे प्राणसंकटच नव्हे का ?–जबाबदारीचा मला काय अनुभव ?–पुस्तकी पोपटपंचीची–जबाबदारी शिरावर घेतांना एकदम काय उपयोग ?

शौर्य गाजवून–हंसतमुखानं–छाती वर करून स्वारी तुरुंगांत गेली. त्यावेळीं मित्रानीं, मैत्रिणींनीं अभिनंदनाच्या आणि स्तुतीच्या तारा–पत्रांनीं माझ्यावर मुसळधार पाऊस पाडला. त्यावेळीं मात्र आनंदानं आकाश ठेंगणं झालं क्षणभर मला !–पण क्षणभरच हं !—

व्यवहाराच्या–धक्काधकीच्या–सृष्टींत पाऊल टाकलें–नव्या सृष्टीकडे भित्र्या डोळ्यांनीं अपरिचितासारखी पाहूं लागलें.

नव्या सृष्टीला उगीच भ्यालें नाहीं–उगीच बावरलें नाहीं मी !–कारण एकेक अनुभवच तसे येऊं लागले मला !

"आई, बाबा कुठं गेलेत ग ?–" प्रसादनं गळ्यांत चिमुकले हात घालून लडिवाळपणानं विचारावं; मग माझ्या डोळ्याला झुरणी लागल्याशिवाय कशी राहील ?

"आई, बाबांच्याकडे आपण जाऊं या! घेऊन चल मला !" प्रसादनं हट्ट घ्यावा. माझ्या हृदयाचं पाणी पाणी झाल्याशिवाय राहील का ?

"बाबा यायचे कधीं ?"

या प्रश्नाला बेमुदत बंदी आहे असं चिमुकल्याला सांगूं कसं ? सांगितलं तरी त्याला कळणार कुठून ? हृदय नुसतं फुटून जाई !

स्वारी कचेरींत असतांना चांगलचुंगलं पातळ नेसून, प्रसादला नटवून थटवून बाबा गाडींतून घटकाभर गंमतीनं घेऊन जावं–छापखान्याच्या यंत्राची मौज आपण पहावी–प्रसादला दाखवावी. मानाची मालकीण म्हणून उगीच इकडून तिकडे हिंडावं–नोकराचाकरांनीं "बाईसाहेब आल्या, बाईसाहेब आल्या–फार चांगल्या मायाळु आहेत आमच्या बाईसाहेब" असं मला दुरून पाहून आपापसांत कुजबुजलेलं मीं ऐकावं–जवळ गेलें म्हणजे नम्रपणानें हंसून त्यांनीं प्रणाम करावा आणि हें पाहून काय तरी अभिमान वाटावा मला !

घटकाभर निशिगंध लाडांच्या टेबलाजवळ जाऊन त्यांनाच कसली तरी माहिती विचारीत सुटावं-स्वारीच्या टेबलाजवळ जाऊन कामांत व्यत्यय आणण्यांतच करमणूक करून घ्यावी. प्रसाद टाक उचलतोय-दौत उपडी करतोय-कागद ओढतोय-फोन उचलण्याचा प्रचंड उद्योग-उपद्याप करतोय-पाहून स्वारीनं 'कशाला आणलास याला इकडे या वेळीं'-लटक्या रागानें मला म्हणावं. प्रसादाचा गोड मुका घेत खूप मोठ्यांदा हंसावं—

असं होतं, त्यावेळीं छापखान्यांत नी वर्तमानपत्राच्या कचेरींत मला काय मजा वाटे!-किती सुखदायक वाटे!

पण जबाबदार-मालकीण म्हणून जेव्हां कचेरींत खुर्चीवर जाऊन बसूं लागलें-टेकीनं तासचे तास बसायचं-सगळीकडे लक्ष ठेवायचं-लिहायचं-तपासायचं-निशिगंधांनीं जें जें पुढें आणावं तें समजावून घ्यायचं-किचकट-रुक्ष आकडेमोडीचे रोजचे हिशेब पहायचे-असा जीव हैराण व्हायला लागला-असा नकोसा व्हायला लागला जीव-कीं बोलायची सोय नाहीं!

बोलणं सोपं-पण कृति फार कठीण!-हें आतां मला चांगलं पटूं लागलं. क्षणभराची गंमत-म्हणून ज्या गोष्टींचं प्रेम वाटतं, तींच कर्तव्य म्हणून करायची पाळी आली म्हणजे गंमत कसली नी मजा कुठली?-पुरुषांनीं राबावं-शारीरिक श्रम-काबाडकष्ट करावेत-त्यांच्या जिवावर नी श्रमावर आम्हीं बायकांनीं खुशाल हौसा-मौजा कराव्यात-पुन्हां एवढं तेवढं पुरुषांच्या हातून मनाविरुद्ध घडलं कीं गेलीच मर्जी आमची! बसलोंच फुगून आम्ही-अगदीं काडी मोडण्याचा धाक घालायला देखील आमची तयारी!—

आमच्या वर्तमानपत्रावर स्वारीच्या नांवाच्या जागीं संपादिका म्हणून माझं नांव आलं-स्वारीनें बनावलंच होतं तसं-तूंच जबाबदारी उचलली पाहिजे म्हणून-मी संपादिका झाल्यें!

पहिल्या पहिल्यानें संपादिका झाल्यें हें आपल्यावर दुर्दैवच ओढवलं कीं काय असं दरघडी मला वाटायला लागलं! सार्वजनिक कार्यात पडलें ना?-झालें, व्यापारी, लेखक, कामगार, धंदेवाले, असे नाना

प्रकारचे, अनेक विचारांचे नी हजार पंथाचे लोक, कुणी भेटायला म्हणून, कुणी लेख द्यायला, कुणी आपल्याबद्दल वर्तमानपत्रांत अनुकूल मजकूर लिहायला सांगायला, सभेला बोलवायला, संस्था पाहायला यायला, चर्चा करायला यायला लागले माझ्याकडे; त्यांत श्रीमंत, विद्वान्, तरुण, म्हातारे कोतारेही असायचेच! लोक-सेवेला लागल्यावर कुणाला बसा म्हणू नी कुणाला चालते व्हा म्हणू?–

अन् जो यायचा तो आपलं ऐसपैस गुऱ्हाळ सांगत सुटायचा–सगळ्यांत विशेष–बहुतेक सगळ्यांचीच वृत्ति माझ्याशीं बोलण्यांत वेळ काढण्यापेक्षां माझ्या रूपाकडे कामुक नजरेनं पहाण्याकडेच वळलेली! कुणाची वृत्ति उत्तान तर कुणाची शालिनतेच्या पडद्याआडून दिसणारी!

एकाद्या सभेला गेलें अळेंबळें, तरी तिथंही प्रकार तोच! मोठमोठे विद्वान्, प्रतिष्ठित, पोक्त, प्रथितयश म्हणून गाजणारे देखील माझ्या शेजारची जागा पटकावून–माझ्याशीं बोलायला मिळावं,—अगदीं सभेत चाललेल्या कार्यक्रमाकडे दुर्लक्ष करूनसुद्धां–टपलेले!

वागतांना जीव मेटाकुटीला येई. नको वाटे जिणं हें!

बुजऱ्या मनानें नव्या सृष्टींत शिरलें अन् रोज बाहेर असा एकेक नवा अनुभव मिळूं लागला. बाहेरून मोठा वाक्पंडित वाटावा–बोलण्याचा प्रसंग आला म्हणजे त्याचं अंतरंग कुजकं नासकं असल्याचं प्रत्ययाला यावं? पापाचरणाशिवाय पाऊल टाकतां येणारच नाहीं का पुढं?–आपल्या शीलाला–चारित्र्याला केव्हां, कसं, कुणाकडून ग्रहण लागेल ही धास्तीच मनाला लागून रहावी! साऱ्या जगानंच पापानं पाय धुतले आहेत का?–आपल्यावर मळीणपणा येणार कां काय कधीं तरी?–अशा भीतीनं हृदयाची धडधड व्हावी!

स्त्री–सुलभ–सहज नाजूक शरीराला एकीकडे राबण्याचे कष्ट, आणि दुसरीकडे जगांत वावरतांना आपल्या कल्पनेविरुद्ध मिळणाऱ्या अनुभवाच्या यातना!–पण जिवाभावाची गोष्ट, कौतुक करून घेण्याकरितां नव्हे, जिवावरचा भार हलका करायला तरी बोलूं कुणाजवळ? मन मोकळं करायचं कुठें?

पहिले सहा आठ महिने तर माझे असे दारुण यमयातनेंत गेले. पण तेवढ्यात बाहेरचे आघात सहन करण्याची–मला नकळतच संवय झाली. काळ सर्व काहीं घडवून आणतो–अशक्य तें शक्य करून दाखवितो. वीषसुद्धां पचनीं पाडायला लावतो म्हणतात तें अगदीं सत्य आहे!

एकाकी जीवनांत शीलाचं संरक्षण होण्याचीच स्त्रियांना विवंचना जास्त! प्रेमाच्या माणसाच्या सावध दृष्टीच्या पहाऱ्यांत शीलसंरक्षणाची जबाबदारी काय ती आपल्या मर्जीवरच असते! पण एकाकी जीवनांत सर्वच जबाबदारी आपल्यावर पडते! चालतें जग खुशाल शीलाचा अपहार करायला तयार असतें.

नागूच्या वागण्यानें सरशीच्या शीलाची काळजी मला वाटे. म्हातारा नवरा मिळाला म्हणून सरलेच्या शीलाची विवंचना मी करी; आईवडिलांच्या वेड्या लाडानं सुलभा शीलभ्रष्ट झाली म्हणून आठवण आली म्हणजे तिचा सात्विक संताप अनावर होई!

आतां स्वारी दूरावल्यामुळें–अनिश्चित कालपर्यंत दूरावल्यामुळें जगांत वागताना माझ्या शीलसंरक्षणाची काळजी मला लागली–नव्या सृष्टीची भीति मला वाटत होती, ती याचकरितां! आप्पा जवळ असावेत, वसंत या वेळीं असता तर चागलं झालं असतं, असें मनांत बारंवार यायचं तें याचसाठीं!

आप्पांनीं माझं नाव चारु–शीला ठेवलं होतं–माझं शील चारु–चांगलं रहावं अशीच त्यांची सात्विक सुदर इच्छा! मी तिकडच्या नितांत प्रेमाच्या राज्यांत आजवर राहिलेंही तशीच!

शील संभाळून जगतां आलं पाहिजे–नीति माझी पाठराखी असली पाहिजे–शील चोरीला गेल्यावर मग जगांतलीं सुखं पाय चाटायला–वैभवाच्या शिखरावर चढवायला आलीं तरी मला त्याचं काय होय? शील–भ्रष्टतेपेक्षां मृत्यु पुरवला! ही माझी आत्यंतिक इच्छा–आवडती–मंगल इच्छा!

शीलावर घाला येण्याचा प्रसंग आला–मी मनानं नाहीं तरी शरीरानं दुबळी होतें, तर मला सांवरायला आधार कुणाचा?–कुणाला मी हांक मारायची?

मनांत यायचं नी मग मला घाबरं सुटायचं ! थरकांप व्हायचा माझ्या जिवाचा ! पहिल्या सहामाहींत मी कचेरींत नियमित जात असे काम पहात असे, पण मी काय करतें–कुणाशीं काय बोलतें, माझ्याशीं कोण काय बोलतें, हें मला कांहींच कळत नाहीं. उसनें हंसूं तोंडावर ठेवायचं–सगळ्याशीं–प्रसंग पडेल त्याच्याशीं बोलायचं इतकेंच !

असेच दिवसामागून दिवस जात होते; नाहीं म्हणायला निशिगंध लाड साऱ्या कचेरींतल्या माणसांत, एकनिष्ठेनें आणि प्रामाणिकपणानें वागत होते ! प्रत्येक गोष्ट मला समजावून त्यांनीं द्यायची. हंसतमुखानं धीर–प्रोत्साहन द्यायचे. कुणाच्या लबाड्या, कुणाच्या चोऱ्या, कोण आगचोरपणानें कामें करतो–कुणाला कसं बोलायचं–वागवायचं हें लाडांनीं मला सांगावं.

लाडांच्या बोलण्यावागण्यानें मला खराखुरा त्यांचाच आधार वाटायला लागला होता. त्यांचाच विश्वास वाटायला लागला. इतकंच कशाला ? सहा महिन्यांच्या अल्प काळांत बाहेरच्या धक्काधकीची संवय–मला नकळत लागली ती लाडांच्या!च आधारानें, श्रमानें आणि वागण्यानें, असें म्हटलं तर त्यात खोटं कांहींच नाहीं.

माझी कदर आदरानें लाड–संभाळीत. एकाकी निराधार अवस्थेंत त्यांचा आधार मिळाला याचें मला आश्चर्याइतकंच समाधान वाटायला लागलं. ईश्वर निराधार जीवाला असाच कुणाच्या तरी मनीं–मुखीं उभा राहून आधार देत असतो का ?

निशिगंध नम्र पण उत्साही–स्वभावानें सरळ नी कामाला विलक्षण चतुर–साहसी !–मला त्यांच्याबद्दल मोठी मौज नी अभिमान वाटे कधीं कधीं एकटी असलें म्हणजे !

कचेरींत काम करीत असतांना आम्ही दोघे मोकळ्या मनानं बोलत असूं–चर्चा करीत असूं. बोलण्यांत फटकळ विनोदीपणा फार लाडांच्या. केव्हां बोलण्याच्या भरांत ते कांहींच्याबांहींच बोलून जात ! पण कोणापुढें काय बोललों आपण, हें मागाहून लक्षांत येऊन चट्कन् आपली जीभ चावत !

वर्तमानपत्रांत छापायला आलेल्या विचित्र-चमत्कारिक मजकुराबद्दल-बातम्याबद्दल बरेच वेळां बोलण्याची पाळी आमच्यांत येई!-अशावेळीं लाडांच्या फटकळ बोलण्याला नुसता ऊत येई! मला त्यांचें बोलणें ऐकावं लागे. निमूट मान्य करावं लागे.

एक दिवस लाडांनीं कोर्टांत नुकत्याच सुरू झालेल्या खटल्याचा वर्तमानपत्राकरितां रिपोर्ट आणून मला वाचायला दिला.

एका उच्च कुलीन घराण्यांतली तरुणी घरांतून पळवून नेऊन तिचें शील भ्रष्ट केलें गेलें होतें-आरोपी पकडले होते. पहिल्या दिवशींची सारी हकीकत होती ती!

रिपोर्ट वाचून मला किळस आली.

"हा रिपोर्ट वर्तमानपत्रांत द्यायचा लाड ?" मीं विचारलं.

"हो, त्यासाठींच तर धापा टाकीत जाऊन आणला आहे!-"

"नका देऊं हा!"

"कां ?-"

"असल्या किळसवाण्या बाईची किळसवाणी हकीकत मला आवडत नाहीं-"

"पण वाचकांना आवडणार आहे! आपल्या पत्राचा झपाट्यानं खप झाला पाहिजे ना ?-"

निशिगंध लाड म्हणाले, "वहिनी, वर्तमानपत्रकाराला जगाच्या बारशालाही जेवावं लागतं आणि बाराव्यालाही हजर रहावं लागतं!"

"त्या बाईची बे-अब्रू जगाच्या चव्हाट्यावर आणण्यांत तुम्हांला आनंद वाटतो-निशिगंध ?—"

"कोर्टात खटला सुरू झाला तेव्हां जगाच्या चव्हाट्यावर यायचं काय राहिलं आहे ? "

"त्या बाईला नीच लोकांनीं पळविली, त्यांत तिचा बिचारीचा काय दोष ?-"

"या विषयावर चर्चा करण्यापेक्षां आपल्या पत्राचा खप वाढला पाहिजे हा विचार करूं या!-तो काय नी ती काय ?-तें सगळं त्या

दोघांत गोंधळ घालून वर्तमानपत्रकारांना खाद्य पुरवीत असतं; हें खरें नाहीं का ?—"

लाडांनीं आकर्षक आणि जंगी शीर्षकें भराभर लिहून तो रिपोर्ट खिळेजुळाऱ्यांकडे दिला. मी चूपच बसलें.

निरिगंध लाडांचं बोलणं विनोदमिश्रित फटकळ होतें—पण खरं होतें. खटल्याला कारणीभूत असलेली अपरिचित कोणी तरुणी—दुसऱ्या कामाच्या—गर्दीत मग मी तिला थोड्या वेळांत विसरूनही गेलें.

त्यानंतर त्याच आठवड्यांतील हकीकत असेल—

आमचा नागू नोकर—घरीं वागायचा. स्वारी गेल्यापासून तो माझ्याच दिमतीला असायचा. नीट वागूं लागला होता तो !—सरशी अजून माहेराहून आली नव्हती. घरीं माझी तारंबळ होत असे. नागूला सरशीला माझ्या हाताखालीं आणायला सागत होतें. तो ऐकलं न ऐकलं करायचा. एकदां त्याला निक्षून सांगायला गेलें—तर तो खालच्या मानेनं पुटपुटला—" तिची आई मेल्याशिवाय तिला ती सोडणार नाहीं—आणि मेली तरी माझी गरज तिला लागेल कीं नाहीं कुणास ठाऊक ! तिला बोलवायलाच कशाला पाहिजे ! माझी गरज असती तर आपण होऊन आली नसती याच्या अगोदरच ?—आपण कांहीं तिला बोलावणार नाहीं !—"

तोच नागू, त्याला मीच दोन्ही वेळां जेवायला घालीत होतें. माझ्याबरोबर कुठें जाईन तिथें नेत होतें. बाहेरच्या ओसरीला माझ्या सोबतीसाठीं तो निजत असे रात्रीं नेहमीं !

कचेरींत माझं डोकं दुखायला लागलें, म्हणून लाडांच्यावर काम सोंपवून मी घरीं आलें. जेवायची इच्छा नव्हतीच. पण प्रसाद जेवायचा—नागू जेवायचा. दोघांकरितां स्वयंपाक करून त्यांना वाढलं.

प्रसादला कुशींत घेऊन अंथरुणावर जाऊन पडलें. चैन पडत नव्हतं संध्याकाळपासून ! स्वारीची आठवण येऊन डोळे वरचेवर पाण्यानें भरत होते. " काय हें आपलं एकाकी जिणं ? " या कल्पनेनें हृदय दाटून आलें होतें.

नागू पहात होता. त्यानें चारदोन वेळां मला विचारलं. काय सांगणार मी त्याला ? त्याच्याशीं काय बोलणार ? पण अशा अवघडल्या वेळीं कुणी का कसल्या बुद्धीनं आपली चौकशी करीना ? खोट्या सहानुभूतीच्या शब्दांनीं देखील रडायचा उमाळा जास्त येतो माणसाला !–

नागूच्या विचारण्याला मीं उत्तर दिलं नाही, पण त्याच्या विचारण्यानें माझ्या डोळ्याना जास्तीच पाणी बरीक आलें.

तशाच संत्रस्त मनःस्थितींत मी अंथरुणावर पडलें होतें. माझा डोळाही लागला. भर मध्यान्ह असेल—

बाहेर दारावर कुणीतरी टक् टक् करीत होतें. निजतांना दाराला आंतून कडी लावली होती मी ! खडबडून जागी झालें.

"कोण आहे ? –" मीं विचारलें

"वहिनीसाहेब ! दार उघडा बरं जरा !–" कण्हत आवाज आला. नागूचा आवाज होता तो !

मीं दार उघडलं–नागूनं दोन्ही हातांनीं आपलं पोट घट्ट दाबून धरलं होतें. मीं विचारलं, "काय झालं रे नागू ? –"

"पोट दुखतंय !–चढाला लागलंय–सोडा असला तर द्या मला !"– नागू म्हणाला. "बरं" म्हणून मी आंत आलें. सोडा शोधला. कपांतून पाणी आणलं–सोडा त्यांत टाकला–तो घेऊन नागूला द्यायला मी बाहेर जायला वळलें–तों–

नागू माझ्या मागेंच उभा !–डोळे फिरलेले–मुद्रा भयानक झालेली–मेल्यानें मला विचारायची क्षणाची फुरसद दिली नाहीं—

"हा घे सोडा–" म्हणायच्या अगोदरच नाग्यानें–त्या काळसर्पानें कप असलेला हात एकदम पकडला !

मांगहृदयी पशूच्या दुष्ट हेतूची कल्पना मला आली. माझा एक हात मोकळा होता. मनांत कल्पना यायचाच अवकाश–एवढा धटिंगण मेला–पण त्याच्या श्रीमुखांत एकदम भडकावली मी ! माझ्या हाताला झिणझिण्या आल्या; त्या झटक्यांत त्यानें हात सोडला–

दूर झाला तो; पण तेथून गेला नाहीं. मी मोठ्यानें ओरडतें कीं काय! शेजाऱ्यांना जागें करतें कीं काय हें क्षणमात्र पाहण्याकरितां तो थांबला!

" नाग्या, मेल्या, मांगा–" मी हातानें बाहेरचा रस्ता दाखवीत त्याला सांगितलें–" अगोदर चालता हो बाहेर !"

माझा आवाज मोठा झाला. त्याची खात्री झाली. जास्त ओरडा करीन–लोक गोळा केल्याशिवाय मी रहाणार नाहीं–मग आपली धडगत रहाणार नाहीं !–दुष्ट, अडाणी आणि मूर्ख !!—

नाग्यानें माझे पाय धरले ! " चूक झाली ! ओरडून गांव गोळा करूं नका !–तुमचें लेकरूं समजा !" बडबडायला लागला—

त्याला अगोदर बाहेर लोटला–दाराला पुन्हां कडी घालून अंथरुणावर आंग टाकलें !

क्षणात काय झालें ? कसला प्रसंग आला होता ? शीलाला–चारित्र्याला खग्रास ग्रहण लागण्याची पाळी ?–एका यःकश्चित् नाग्याकडून ?–स्वारीनं नाग्याच्या पाठीवर चाबकाचे फटकारे–दारु प्याल्याबद्दल मारले–त्याचा हा सूड घेत होता नाग्या ?–माझ्यावर त्याची नजर ?–मी काय चुकलें ?–मी रडलें–उदास झालें. नाग्यानें विचारलें त्यावेळीं मी बोललें नाहीं–पण रडलें, त्याचा त्यानं भलता अर्थ केला—

एक ना दोन ! हजार–लाख विचार माझ्या मनांत आले. एकाकी स्त्रीचं जिणं वाईट–भयंकर वाईट !–रात्रभर मला झोंप आली नाहीं.

नाग्याला घरांतून उद्यांच्या उद्यां–घालवून द्यायचा निश्चय मीं केला–पण उजाडल्यावर पाहातें–शोधतें तर तो होता कुठें ? काळं तोंड घेऊन केव्हां पसार झाला होता कोण जाणे !—

मला बरंही वाटलं नी वाईट वाटलें. प्रसंग टळला म्हणून बरं वाटलं तर असा प्रसंगच आपल्यावर कां यावा–म्हणून वाईट वाटलें. माझ्या एकाकी जीवनांतला–नव्या सृष्टींतला पहिला चमत्कारिक अनुभव होता हा !

याबद्दल मी कुणाजवळ कशी बोलणार ? होतं कोण सांगायला माझ्याजवळ ?–अचानक ग्रहण लागायची वेळ आली होती खरी– माझ्या शीलाला–काळ आला होता–पण वेळ आली नव्हती म्हणतात तशांतलीच गत झाली !

रोजच्यासारखी मी वेळेला कचेरींत गेलें–आदल्या दिवशींच्या प्रसंगाचीं उलट सुलट चित्रें मनांत नाचत होतीं–हातानं काम चाललंच होतं–तितक्यांत माझ्या खोलींत कुणी तरी मला भेटायला म्हणून आलें.

कोण म्हणून मी वर पाहायला गेलें–त्या व्यक्तीला पाहून मी एकदम दचकलें–आश्चर्यानें थक्क झालें !

ती–माझ्यासमोर ?–कां ?–

## प्रकरण पंधरावें

# —नवी दृष्टि !

" कोण ? सुलभा !—सुलभा ! ! "

" ओळखलंस चारू तूं मला ? बरं झालं ! मी तुझी भेट घ्यायलाच आलें आहें !—आतां मला इथं कांहीं वेळ बसायला हरकत नाहीं ! " सुलभाच होती ती !—तिला अशी अकस्मात् पाहून, तिच्याविषयींच्या राग, संताप, तिरस्कार, या विकारांनीं एकदम माझ्या मस्तकांत उचल केली. ही बया माझ्याकडे कां आली ?—तिला बैस म्हणायचें माझ्या मनांतच आलें नाहीं. उलट तिनें एकदम माझ्या पुढून चालतें व्हावें, तिला बाहेर नोकराकडून घालवावें, असेंच मला वाटलें.

सुलभेनें माझ्याकडे पाहिलेंच नाहीं. मी तिला दिसलें—माझ्या औपचारिक " बैस " शब्दाची तिनें अपेक्षाहि न करितां—माझ्या टेबला-पलीकडची दूर असलेली खुर्ची तिनेंच ओढून घेतली—ती माझ्यासमोर बिनदिक्कत बसली. नंतर तिनें सावकाश माझ्याकडे पाहिलें.

संतापानें माझे ओठ अजून थरथरत होते. सुलभेविषयींचा तिरस्कार माझ्या तोंडावर अजून थयथय नाचत होता—

" चारू, मला पाहून तूं रागावणार—माझ्याकडे तिरस्कारानें पहाणार—हें मला माहित आहे !—" सुलभा एकदम बोलायलाच लागली माझ्याशीं—

" त्याच नजरेनें तूं माझ्याकडे पहाते आहेस हें मला ओळखतें—पण चारू, असं असूनही मी मुद्दाम तुझ्याकडे आज आलें आहें—"

" कशाला आलीस माझ्याकडे ?—"

" काळं तोंड घेऊन दाखवायला- असं म्हण कीं त्याच्यापुढें !- " खक्ष हंसत सुलभा म्हणाली, " चारू, तूं मला तसं म्हणशील-मला एकदम चालती हो असंही अधिकारानें सांगशील- मला तुझं ऐकावं लागेल- तसं वागावंही लागेल- "

" माझ्याकडे काय काम आहे तुझें ?-"

" करशील तर आहे माझं काम ! " ऐकून एकदम तिनें चालतं व्हावं अशाच आवाजांत मीं केलेल्या प्रश्नाला उत्तर देत सुलभा संथपणानें म्हणाली, " माझं काम आहे-त्याकरितांच मी तुझ्याकडे आवर्जून आलें आहें. पण मला अगोदर भूक लागली आहे, दोन दिवसांत अन्नाचा कण मला मिळाला नाहीं. मी कांहीं तुला जेवायला मागत नाहीं. एक चहाचा कप दे मला-पावाचा तुकडा दिलास त्याबरोबर तर मनापासून मी तुझे आभार मानीन-पण मागत नाहीं तुला !-"

तिचें हें ऐकून मी स्तंभितच झालें. कोण बेफाम निर्लज्जपणा हा ! तिच्याकडे नुसती पहात राहिलें-

" एके काळीं मी तुझी मैत्रीण होतें—आतां तूं मला त्या दृष्टीनें पाहणार नाहींस-प्रतिष्ठितपणाच्या उच्च स्थानावर विराजमान झालेली तूं-घरदार सोडून तुझ्या, समाजाच्या दृष्टीनें, नादान होऊन बहकून भटकणारी मी-मला तूं बरोबरीची-मैत्रिण मानणार नाहींस; नको मानूस-एक भुकेनें कळवणारा जीव-क्षणभर तकवा येण्यासाठीं-मला तुझ्याशीं बोलायला शक्ति येण्यासाठीं-चहापाव मागत आहे-"

खरेंच सुलभेला बोलवत नव्हतें. तोंड उतलेलं,-भेसूर झालेलं आतां माझ्या लक्षांत आलें. तिचे डोळे पाण्यानें भरले. दोन्ही हात तोंडावर धरून हुंदके देत ती स्फुंदूं लागली !

माझा हात मला न विचारतांच टेबलावरच्या कॉलबेलकडे वळला! कॉलबेलचा आवाज झाला. सुलभेनें दचकून तोंडावरचे हात काढीत माझ्याकडे पाहून विचारलें-

" मला नोकराकडून बाहेर घालविणार आहेस !-चहा न देतां ? "

नोकर दारांत येऊन उभा राहिला. त्यानें माझ्याकडे पाहिलें. सुलभेनं त्याच्याकडें नी माझ्याकडे पाहिलें.

आई–वडिलांना दुःखांत लोटून घराबाहेर पडलेली–उनाड बनलेली आपल्या आणि आपल्याबरोबर वसंताच्या आयुष्याची धूळधाण करणारी सुलभा अवदसा पण तिची अवस्था पाहिली–माझा राग, तिरस्कार कुठच्या कुठें नाहींसा झाला. तिची कींव आली मला–

शेजारच्या उपाहारगृहांतून सुलभेसाठीं, चहा, पाव, बटाट्याची सुकी भाजी–नोकराला आणायला मी सांगितलें. नोकर निघून गेला.

सुलभा–बेफाट सुलभा–माझ्याकडे विस्मयानें, आदरानें, कृतज्ञतेनें पाहूं लागली!

"दैवानं सुखाच्या सिंहासनावर उगीच नाहीं बसवलं तुला चारू!–" असं कांहीं तरी सुलभा पुटपुटली!

सुलभेच्या तोंडची माझी स्तुतीच काय, पण तिचं कांहींच ऐकायची माझी इच्छा नव्हती. तिनें म्हटलेलं मला आवडलं नाहीं–ऐकावसंही वाटलं नाहीं. चहा–पाव घेऊन ती जाईल–बसूंच लागली, तर तिला स्वच्छ जायला सांगावं–आपल्या कामाचा वेळ व्यर्थ घालवूं नये–असे विचार माझ्या मनांत येत होते–

पण मीं सुलभेच्या भुकेल्या पोटाची कींव केली–तेवढाच आधार तिला मिळाला. त्या आधाराला ती चिकटली–

"माणसाला दैव असावं लागतं–मग त्याच्यांत विशेष गुण नसले तरी चालतात. माझ्यांत आणि तुझ्या वसंतांत–गुण नसते तरी चालले असते एकादे वेळीं–पण गुण नाहींतच आमच्याजवळ–हें आतां ठरल्यासारखंच आहे. गुण असते तसेच अलौकिक आकर्षक गुण असते–तर आमची ही अवस्था झालीच नसती! खरं आहे हें!–पाणी कुणाला शोधीत जात असतं का माझी तहान लागली आहे कां म्हणून कुणाला विचारायला? कस्तुरी–गुलाबाचं फूल कुणाला विनंति करायला जातात कां–आमचा सुगंध लुटायला या अशी? तहानेलेला जीव, रसिक प्राणी, आपोआपच त्यांच्याकडे जातात! त्यांचा उपभोग घेतात–तृप्त-प्रसन्न होतात! नाहीं ग चारू?–

"अत्यवस्थ तळिरामाची प्रकृती तपासून–औषधोपचार करायला–आर्य-मदिरा मंडळांतल्या तळिरामाच्या मित्रांनीं दारु पिणारा डॉक्टर

बोलवावा-आणि बोलवायला जाणाऱ्यांनीं डॉक्टर न आणतां नुसताच दारु पिणारा आणावा-तळिरामाचा प्राण तो काय वांचविणार!-तळिरामही मरायचा-नुसता दारुबाज आणणें हास्यास्पदच व्हायचा!-

" तुझा वसंत आणि मी असेच गुणाशिवाय नुसतेच नादाचे व्यसनी ठरलो."

" गुण नाहींत तर नाहींत, पण आम्हाला दैव तरी अनुकूल असायला नको होतं का? दैवाचा पाठिंबा असता, तर श्रीमंत कुलीन कन्यका आपल्याला लाभली-करा तिचा जयजयकार, करा तिला अभिनयसम्राज्ञी-दांत वेडेवाकडे आहेत-आपल्या खर्चानें करा ते वाकड्याचे कुंदकळ्यासारखे! गाजवा तिचें साऱ्या वर्तमानपत्रांतून नांव, असें नसतें का आमच्या वाट्याला आलं?-

" हेंच कशाला? देश-परदेशांत तुटपुंज्या अभिनय-गायन-नृत्याचे दौरे काढले असते-उल्लू श्रीमंत तरुणांना झुलवायला लावून हजारो-लाखो रुपयाला लुबाडून शेवटीं त्याच्या तोंडाला पान पुसून पसार झालें असतें.--"

सुलभा असंबद्ध, विचित्र, हृदय पिळवटून काय बोलत होती कोण जाणे! मला त्याचा अर्थ कळत नव्हता. ऐकण्याची इच्छा नसून तिची बडबड ऐकावी लागत होती!

नोकरानें चहा, पाव वगैरे आणून बाजूच्या छोट्या टेबलावर ठेवला. बोलणं थांबवून खुर्ची सरकवून सुलभा त्या टेबलाजवळ गेली. चहापान ती करूं लागली, मी माझ्या कामात लक्ष घालण्याचा प्रयत्न करूं लागलें. पण सुलभा समोर असेपर्यंत कामाकडे लक्षच लागेना.

अगतिक होऊन आपल्याकडे आलेल्या प्राण्याला जेवायला घालायचें आणि त्या मोबदल्यांत, त्याच्या गतवर्तनावर टीका करून, हृदयावर घाव घालावयाचे हें अत्यंत वाईट; सुलभा चहापान करील-नंतर निघून जाईल आपोआप-भुकेल्यावेळीं आली, कांहीं तरी बोलली-नंतर आपल्याशीं काय बोलणार आहे? मग उगीच तिला कशाला बोलूं?

असें असूनही माझा जीव रहावेना. हीच कोणी अनोळखी असती, कसला तिचा संबंध नसता तर भूतदयेनें प्रेरित होऊन तिलाही खायला

प्यायला दिलें असतं नी कांहीं न बोलतां चालती हो म्हणून सांगितलं असतं—सुलभेचं माझं नातं तसं नव्हतं !—माझी एकवेळची मैत्रीण ती–बरोबरची. चुकली–फसली–चांगल्या आयुष्यक्रमाला मुकली--वसंताची अवस्था अशीच झाली तर त्याला हृदयाच्या तळमळीनें आपण नाहीं का बोललों ?–तसंच सुलभेला बोलणें–चार गोष्टी सांगणें आपलं कर्तव्यच आहे असेंही वाटायला लागलें. उपदेश करायला मी सुलभेला कांहीं शोधीत गेलें नसतें–गेलें नव्हतें; ती माझ्याकडे आली होती–मग तिला चार शब्द सांगावेसे वाटले मला, तर त्यांत अनुचित काय होतें ?–

निशिगंध लाडांकडून नोकर लेख मागायला मध्येंच आला. कांहीं लिहिलेंच नाहीं तर देणार काय ? अन् आतां लिहितां येईल असेंही वाटेना–नोकराजवळ "निशिगंधांना सांग-आज अग्रलेख मी लिहित नाहीं तुम्हीच लिहा–" निरोप सांगितला; नोकर मान नमवून गेला.

सुलभेच्या गत आणि भावी आयुष्याचा भीषण चित्रपट ती दिसतांच माझ्या डोळ्यापुढें दिसूं लागला होता. माझं मन कळवळून गेलं होतं–त्या भरांत सुलभेला मीं म्हटलेंच "सुलभे, आपल्या आयुष्याचं काय हें केलेंस ?"

"तुझ्या वसंतानं आपल्या आयुष्याचें काय केलं ग ? जें त्याच्या आयुष्याचं तेंच माझ्या आयुष्याचं ! दुसरें काय ?" सुलभेनं ताड्कन् उत्तर दिलं. आणि हात धुवून, पाण्याचा घोंट घेत माझ्यासमोर पहिल्यासारखी बसत म्हणाली, "चारू, आतां बोल–नव्हे ऐक माझं मी काय सांगतें तें !–

"मीं सांगितलेलं व्यर्थ नाहीं जायचं–तुझा वेळ फुकट गेला असंही तुला वाटायला नको !–तुझं वर्तमानपत्र आहे ना ? त्याला हवं तितकं खाद्य मिळेल माझ्यापासून !-ऐकतेस ?—"

"मला कांहीं ऐकायला नको आहे—"

"कां ग ? समाजांत माझं प्रतिष्ठित स्थान नाहीं म्हणून ?—"

"तूं जाशील का इथून आतां ?-"

"तुझ्याशीं बोलल्याशिवाय ?–छी : !"

"काय बोलायचं आहे माझ्याशीं ?–"

" तुझ्या वर्तमानपत्राला माझी एक मुलाखत घे—चांगली झणझणीत मुलाखत देत्यें मी—"

" मला नको आहे तुझी मुलाखत ! "

" बरोबर आहे ! मी सुखवस्तु लब्धप्रतिष्ठित कुठें आहे ?—माझ्या मुलाखतीपासून तुझ्या वर्तमानपत्राला फायदा काय आहे ? जाहिरातीचा मलिदा नाहीं. प्रतिष्ठेला बाध येईल ही भीति ! मी मुलाखत देणार, म्हणजे इथून तिथून साऱ्या संभावितांच्या अंगावरचीं प्रतिष्ठितपणाचीं वस्त्रें बाजूला काढून—फाडून त्यांचं सत्यस्वरूप उघडं करणार !—जें सत्य आहे तें सांगणार "

" म्हणजे काय ? "

" म्हणजे काय तेंच मुलाखत घे म्हणजे सांगतें म्हणतें ना ?—पण चारू, सत्याचा प्रखर प्रकाश तुझ्या डोळ्यांना तरी सहन होईल कीं नाहीं—कोण जाणे ! आयत्या बिळांत सुखानं डुलणारी नागीण तूं-तुला खरं सहन व्हायचं नाहीं-समजायचंही नाहीं. कांहीं सांगितलं तर तूं आपल्या-वरच हा प्रहार आहे, असं म्हणून उलट माझ्यावर फणा उभारून फुत्कार करूं लागशील—"

" सुलभे, तुला जें काय बोलायचं असेल तें झट्कन् सांगून टाक नी आपला रस्ता सुधार पाहूं—"

" वसंत कुठं आहे ग चारू ?—"

" तो कुठं आहे, मला विचारतेस ? "

" म्हणजे मी काय त्याला लपवून ठेवलाय ?—ठेवला असता—त्याला पोसायला माझ्याजवळ कांहीं असतं-मला संभाळायला त्याच्याजवळ कांहीं असतं तर त्याला लपवूनही ठेवला असता !-पण तशांतला कांहींच प्रकार नाहीं.

" त्याला घरांतून घालवून दिलंस म्हणून तुला विचारलं मी हं ! पण त्याला घालवून दिल्यावर, तूं त्याची चौकशी कशाला करतेस म्हणा ! कींव येते बापड्याची ! कुठें बेकार भटकत असेल-काय त्याचे हाल होत असतील " स्वतःच्या पोटाची भ्रांत असतांना, वसंताची आठवण सुलभा करते, त्याच्या असहाय्य स्थितीबद्दल कळवळते—उदास निश्वास टाकते !—काय नवल ?— " चारू, वेडे आईबाप, मुला-मुलींचे मूर्ख लाड करतात,

शाळा-कॉलेजांतले अधिकारी, भलत्याच विषयांत विद्यार्थी-विद्यार्थिनींना नसतेंच उत्तेजन देतात, आणि तारुण्यांतल्या अननुभवी मनाला स्वतः तरुण-तरुणी मोकाट मोकळें सोडतात-हें अगदीं खरें! प्रत्येकजण आपापल्यापरी थोडे फार चुकीचे धनी असतात-पण तरुण-तरुणींच्या चुकीचा खिळा करायला तुम्ही वर्तमानपत्रवालेच खरेखरे सज्ज असता!-

" माझं ऐक किंवा नको ऐकूं. मुलाखत घे अगर नको घेऊं. जातां जातां एक सांगतें तें तरी माझं कृपा करून ऐक. वर्तमानपत्र चालविण्यासाठीं म्हणजे न्यायनीतीला पर्यायानें पायाखालीं तुडवून पोट भरण्यासाठीं जाहिरातीचे मलिदे घेऊन, वाटेल त्याची किंवा तिची, ' प्रथितयश ' ' अभिनयसम्राज्ञी, ' अशीं संबोधनें खुशाल आपल्या अधिकारात चलतीं नाणीं निर्माण करून तरुण-तरुणींच्या मनाला मोह पडेल, असं करीत जाऊं नकोस!-निदान चारू, तूं तरी करीत जाऊं नकोस!

" माणुसकीची राखरांगोळी केलेल्या जिवालाही क्षणभर बसूं दिलंस, खायला-प्यायला दिलंस-मनाचा दुर्मिळ झालेला मोठेपणा दाखविलास-म्हणूनच अधिकाराची मर्यादा सोडून तुला बोललें-इतर पोटभरू वर्तमानपत्रांच्या पंक्तीला तूं बसूं नकोस. माझा बळी जसा या पत्रांतील भडक जाहिरातींनीं-आणि आंतल्या भुलविणाऱ्या नटनटींच्या वर्णनांनीं घेतला तसा प्रकार तुझ्या वर्तमानपत्रातल्या-जाहिरातींचा मलिदा मिळतो म्हणून-मजकुरानं आपल्यांतल्या मुली माझ्यासारख्या फसतील-चुकतील-त्रिशंकूसारख्या बनतील असं करूं नकोस!

" हजारांचा सत्यनाश व्हावा तेव्हां एक क्रोडोपती होतो. तो एक संभाळण्याकरितां त्याच्यापुरतं त्याला काय सुंदर शब्दांनीं गौरवायचं असेल तें खुशाल गौरव-पण बाकीच्या नउशेनव्याण्णव-अर्धवट-मूर्ख-उतावळ्या जिवांना घरांतून बाहेर ओढून-माझ्यासारखं-वसंतासारखं केवळ पोटाकरितां लाजीरवाणं जिणं जगविण्याची पाळी आणूं नको!-

" देव तुझं भलं करो! चारु, तूं यशस्वी झालीस. प्रतिष्ठा पावलीस. माझ्यासारख्या धुळींत लोळणाऱ्या अपेशी जीवाला अत्यंत तिरस्कारानें वागविलं असतंस तरी तें तुला साजलंच असतं!-पण तूं निराळ्या तऱ्हेनं वागलीस-देव तुझं कल्याण करील-जाते मी आतां-"

असें म्हणत अगदीं वेडाची लहर यावी, तशी लहर आल्यासारखी ती उठली–

तिला जवळ ठेवून घ्यावी, मायेनं वागवून तिला सन्मार्गाला लावावी, अशी चट्कन् एक कल्पना मनांत येऊन गेली, त्यासरशीं मीं तिला म्हटलें.

" सुलभे, चाललीस कुठें ?–पुढें करणार काय ?–"

" कुठं चाललें ?–मागून आलें, पुढें चाललें–आतां पुढंच जायचं ! " जगत्–चाललें पुढें पुढें । आजकालच्या सरापुढें ॥ " असं कुणीसं म्हटलं आहे–पुढं कुठं वसंत भेटतो का पाहीन–भेटला तर सांगेन त्याला तूं भेटली होतीस म्हणून–माझ्याशीं बोललीस-वगैरे–"

" वेडे, पुढं कुठं जाणार ? जाऊन करणार काय ?– जगणार कशी तूं ?–"

" छीः ! वेडा प्रश्न ! नुसता स्वतः जगायचा कशाला विचार करूं मी ?–नुसता जगाला मारायचा विचार, उद्योग करणार म्हणतें मी–दुसऱ्याला मारलं कीं–स्वतः आपोआपच जगायला होतं !–

" माझी नको काळजी वाहूंस–अन् इतका वेळ मीं तुझ्याशीं बोललें, रडलें, तुझ्या हृदयाला हलविलें–पाणी आणलं, म्हणून तुला वाटलें असेल, आपण सुलभेला जवळ ठेवावी-तिला चांगलं वागवावं–तिच्या आईबापांना बोलावून त्यांच्या स्वाधीन करावी-होय ना ?–वेडी कुठली ?–आतां कां तें तुला-मला जमणार आहे ? तुला मला संभाळतां येणार नाहीं–तुझ्या कल्पनेप्रमाणें मार्गावर आणतां येणार नाहीं–मी आतां फार, फार पुढें गेलें आहे–मागं वळून पाहूं कशाला ?-मागं पहायचा काळ एकदांच-तो भलत्या रस्त्याला पुढें पाऊल टाकण्याच्या अगोदरचा ! आतां काय त्याचें ! !

" कुणामुळं कां असेना, मी या गतीला आलें–माझ्यासारखी अवस्था इतर मुलींची न होईल याकरितां दक्षता ठेव फार झालं तर !–अवलोन्नति करायला लेखणी घेऊन बसलीच आहेस–कर त्याचा कांहीं चांगला उपयोग !–दांभिकपणानें लिहूं नकोस ! प्रतिष्ठेकरितां लिहूं नकोस !

पक्षपात करून लिहूं नकोस! जाहिरातींच्या मलिद्याच्या आशेनें वाटेल त्याची भरमसाट स्तुति आणि हवी त्याची मनसोक्त निंदा करूं नकोस!–

"क्षमा कर चारू! तुला अधिकार असून तूं आपला अधिकार जाणवून मला हिणवलं नाहींस–दुखवलं नाहींस!–माझा अधिकार मातीमोल झाला असतांही मीच अधिकाराचा अतिक्रम करून तुला बोललें. क्षमा कर मला. विसरून जा–संभावित जगांत तुझ्यासारखेही जीव वावरत असतात–म्हणून त्यांच्याच पुण्याईवर जगाचं धारणपोषण होत असेल–आमच्यासारख्या बहकलेल्या जिवांना क्षणाचा विसावा–निमिषाचा आनंद–आणि सात्विक पश्चात्तापाची लवमात्र तरी गोड लकेर अनुभवायला मिळत असेल—

"म्हणूनच तुला धन्यवाद देतें–स्वीकार कर न कर, त्याचं सुख-दुःख नाहीं!–

"माझ्याविषयींचं जगाला कळण्यासाठीं तुझ्या वर्तमानपत्रांत माझ्या वडिलांचें पत्र छापलें होतेंस. वाचलं होतं मी तें—

"आतांपर्यंत मी हवं तें बडबडलें, यांतलें, तुला कांहीं वाटलें तर खुशाल लिही तुझ्या पत्रांत–आईबापांना बेशक मूर्ख म्हटलं–शाळा–कॉलेजांतल्या अधिकाऱ्यांना–अपरिपक्व मनाच्या मुलामुलींची भलतीच खोटी स्तुति करून त्यांना नादी बनविणाऱ्यांना–आचरट म्हटलं–जाहिरातींच्या भरपूर मलिद्याच्या आशेनं भरमसाट नालायक नट–नटींची स्तुति करून तरुण–तरुणींना नसतंच आकर्षण लावणाऱ्या वर्तमानपत्र–वाल्यांबद्दल अनुदार शब्द काढले–"आम्हांला–उनाड बनलेल्या मला–जें प्रतिष्ठित जग छीः थूः करणार–तेंच जग तुला आरशांत कसं दिसतं हें दाखविलं–माझं काम झालं–त्याच्या दर्शनानें तुला जर नवी दृष्टि लाभली तर बरंच झालं–लाभेलसं वाटतं–आजच्याही परिस्थितींत तूं माझ्याशीं जसं वर्तन केलं आहेस, त्यावरून–नाहीं तर तूंही त्याच प्रतिष्ठित जगांतलीच आहेस- ऐस बापडी!—"

सुलभा जशी आकस्मिक आली–तशीच बडबडत असतांच–अर्धेंच बोलणें टाकून अनपेक्षित पसार झाली!–

ती गेली-पण तिनें माझ्या मस्तकांत अनेक प्रकारच्या विचारांचीं बीजें टाकलीं. तीं कुठें मला चैन पडूं देत होतीं ?—

सुलभा बाहेर निघाली होती · निशिगंध लाड माझ्या सूचनेवरून अग्रलेख लिहिलेला वाचून दाखवायला घेऊन येत होते-ते अगदीं आदरानें-अदबीनें माझ्या खोलींत पाऊल टाकीत होते-

" या निशिगंध, मला आतां वेळ आहे—"

मी येऊं का ? म्हणून निशिगंधानीं मला विचारायच्या अगोदरच मी त्यांना म्हटलें.

निशिगंधांचे माझ्याकडे लागलेले डोळे, मी त्यांना 'आत या' असे सांगितलेले शब्द, बाहेर पाऊल टाकणाऱ्या सुलभेनें पाहिले-ऐकले !

ती क्षणमात्र जागींच थांबली ! चपापली ! तिनें पुन्हां निशिगंधांकडे पाहिलें. माझ्याकडे दृष्टिक्षेप टाकला · मिस्कील हास्याची छटा तिच्या तसल्या परिस्थितींतही-तोंडावर चमकली !-मला ओझरतें दिसलें. सुलभा गेली—

मला जास्त विचार करायला वेळच नव्हता !-

निशिगंधांनीं आणलेल्या कामाकडे मला तत्क्षणीं वळावेंच लागलें होतें. कामांत मन गुंतवीत होतें—

पण सुलभा डोळ्यांपुढून हलत नव्हती-" नवी दृष्टि " हे तिचे शब्द उगीचच कानात पुनःपुन्हां घुमत होते-

कामांत पूर्ण लक्ष नसल्यानें माझ्याच हातून चुका होत होत्या-निशिगंध लाड-लाडिकपणानेंच माझ्या चुका दाखवून देत होते. दुरुस्त्या सुचवीत होते-आणि " शहाण्या माणसांच्या हातून देखील अशा चुका होतात अं एकूण ?-" अशा शब्दांनीं थट्टाही करीत होते ते माझी !-

लाडांचा अग्रलेख समग्र लक्षपूर्वक वाचला. अतिशय सुंदर लिहिला होता त्यांनीं. मला भारी भारी आवडला. अत्यंत आनंदानें त्यांच्या लेखाची मनमुक्त स्तुति करीत, लेखाचे कागद जुळवून त्यांच्या हातीं देत मीं म्हटलें,

" लाड, किती छान-सुंदर लिहितां हो तुम्ही ! "

लार्डांना अति आनंद झाला. माझ्या हातांतले लेखाचे कागद घेतांना त्यांना माझ्या हाताचा स्पर्श झाला ! त्यासरशीं विस्फारित नेत्रांनीं लार्डांनीं माझ्याकडे चट्कन् पाहिलें—नी लगेच दुसरीकडे दृष्टि वळविली—ते घाईनें निघून बाहेर गेले—मला कससंच झालं !—नवी सृष्टि—नवी दृष्टि ! !—

ही कसली नवी दृष्टि ?—कल्पना आली नी क्षणार्धांत नव्या सृष्टीं-तल्या नव्या दृष्टीनें माझ्या सर्वांगाला कंप सुटला !—शीः ! कसली ती नवी दृष्टि ?

---

प्रकरण सोळावें

# आत्महत्या !

" आई ! आई गऽ! कुठं आहेस तूं ?-"

प्रसाद तापानं नुसता फणफणला होता. चार दिवस झाले, रात्रीच्या रात्री माझ्या डोळ्याला डोळा लागला नव्हता. जीव नुसता उडून गेला होता. मला कांहींएक सुचत नव्हतें. काय करणार मी एकटी ? घरांतलें करूं, प्रसादाच्या आजाराकडे पाहूं, का वर्तमानपत्राच्या कामाकडे लक्ष पुरवूं ? " आई ! आई !! " करून प्रसाद ओरडायला लागला, रडायला लागला म्हणजे त्याला मांडीवर घ्यावं, चमच्यानं थोडं थोडं पाणी घालावं; थोपटावं; "राजा, कुठलें रे बाबा तुला हें दुखणं आलंय शोधीत !-" असं कांहीं तरी बडबडत त्याच्या तापानं कढत कढत झालेल्या गालाचे मायेनें मुके घेत, मीच रडायला लागे !

स्वारीची या वेळीं एकसारखी आठवण यायची ! कशाला संकट स्वारीनें आपल्यावर ओढवून आणावं ? हीच स्वारी अशा वेळीं जवळ असती-तर मला तेवढंच हें झालं नसतं का ?

पण देव माझा पाठिराखा !-खरी शहामत निशिगंध लाडाची !-त्यांना प्रसाद आजारी असल्याचं कळवायला मला तीन चार दिवस सुच-लंच नव्हतं. कचेरींत मला जाता आलं नाहीं. निशिगंधाना माझी चौकशी करायला यायलाही-कामाच्या गर्दीमुळं-घरीं यायला झालं नव्हतं ! पण जेव्हां तीन दिवस गेले नाहीं, तेव्हा तशांतसुद्धां सवड करून ते मुद्दाम आले; पहातात तर प्रसादची ही अवस्था !

निशिगंधांना पाहिलं नी मला एकदम रडायलाच यायला लागलें. ते घाबरले. त्यांनीं प्रसादच्या आजाराबद्दल चौकशी केली. माझ्या जवळून त्यांनीं त्याला उचलून घेतला. त्यांचा जीव प्रसादसाठीं कळवळला.

'चार दिवस झाले, प्रसाद आजारी आहे-!' हें मीं जेव्हां त्यांना सांगितलें, तेव्हां माझ्यावर ते किती रागावले ?

"हें काय वहिनी ? इतका प्रसाद आजारी झाला तर मला नाहीं कळवायचं ? हा कसला तुमचा स्वभाव ? डॉक्टरला तरी आणलं होतं कीं नाहीं ?" निशिगंधांनीं विचारलें.

"नाहीं. मला सुचेनाच कांहीं. घाबरून गेलें मी!-अन् एकटी मी-नाग्या असता या वेळीं, तर त्याला डॉक्टरना बोलवायला-नी तुम्हांला कळवायला पाठवला असता-घरांत दुसरें कोण आहे माझ्याशिवाय ?-प्रसाद क्षणभर मला सोडीना. त्याला एकटा ठेवून मी तरी कशी बाहेर जाणार निशिगंध ?" मी रडत होतें नी लाडांना सांगत होतें.

"तुम्हीं एवढ्या शिकल्या सवरलेल्या आणि तुम्ही असं गडबडून जावं ?-मला अगोदर कळलं असतं तर मी आलों नसतों ?-आम्ही तुमचीं इतकीं माणसं असतांना आपण एकट्याच आहोंत असं कां वाटावं तुम्हाला कळत नाहीं ? आम्हांला तुमच्या घरांतलीं कामं सांगायला तुम्हाला संकोच कां वाटतो समजत नाहीं मला. घरगुती कामं करायला कमीपणा वाटेल असं वाटतं वहिनी तुम्हांला ?"

निशिगंध माझ्यावरच रागावले. त्यांनीं माझ्याजवळ प्रसादला दिला नी ते अगोदर डॉक्टर आणायला गेले.

त्याच्या रागाच्या बोलण्याचा मला राग आला नाहीं. बरंच वाटलं मला. ते येतांच मला हायसें झालें. केवढा तरी धीर आला.

डॉक्टर आले. त्यांनीं प्रसादला दाखविला. डॉक्टरांचें औषध प्रसादाला सुरू झालं.

त्या दिवसापासून सकाळ-संध्याकाळलाच नव्हे, तर रात्रीं कचेरींतलें काम उरकून जागायला तासन् तास-प्रसादला मांडीवर घेऊन बसायला-निशिगंध यायला लागले. "प्रसाद चांगला खडखडीत बरा होऊन पहिल्यासारखा रांगाय-खेळायला लागेपर्यंत कचेरींत यायची घाई करण्याचं तुम्हांला कारण नाहीं. माझीं मी सारीं कामं संभाळीन. महत्वाचीं कामं तुम्हांला घरीं आणून दाखवीत जाईन." अशी पहिल्याच दिवशीं त्यांनीं मला ताकीद दिली.

संकटाच्या वेळीं कुणी असं धांवून आलें, आस्था दाखविली म्हणजे किती त्याच्याबद्दल आपल्याला आधार वाटतो? किती आपुलकी वाटायला लागते? आम्हां बायकांना सुखाच्या-आनंदाच्या वेळांपेक्षां आपल्या किंवा आपल्या बाळाच्या अशा आजारीपणांत जवळ बसून त्याला संभाळणाऱ्याबद्दल-त्याच्याबद्दल धीराच्या गोष्टी सांगणाऱ्याबद्दल-केवढा आत्मीयभाव वाटायला लागतो, याची कल्पना त्या स्थितीचा अनुभव घेतलेला असलेल्यालाच खरी नी पुरी येईल.

प्रसाद चांगला पहिल्यासारखा बरा व्हायला चांगले पंधरा दिवस लागले. त्या वेळांत निशिगंधांनीं किती तत्परतेनें नी आपलेपणानें वागणूक केली. माझ्या नुसत्या मायेपेक्षां निशिगंधांच्या परिश्रमानेंच माझा प्रसाद लवकर बरा झाला, यांत काडीची शंका नाहीं

याच त्यांच्या वागणुकीनें पूर्वी कधींही वाटली नाहीं, इतकी आपुलकी मला निशिगंधांबद्दल वाटूं लागली. मी धनी न् ते आमचे नोकर-ही त्यांच्याविषयींची भावना नष्ट होऊन, ते अगदीं आपल्या कुटुंबांतले-नात्यागोत्याच्या माणसांपेक्षां जास्त, असंच त्यांच्याबद्दल मला वाटायला लागलें.

आलेलं एक संकट टळलं-पण त्या संकटामुळेंच निशिगंधांची एकतऱ्हेनें परीक्षा झाली! स्वारीनं किती चाणाक्षपणानें माणसाची निवड करून त्याला जवळ केलं होतं, हें माझ्या चांगलं लक्षात आलें. स्वारी-वरचं प्रेम नि निशिगंध लाडांबद्दलचा आदर-हीं दोन्हीं माझ्या मनांत एकसारखींच त्या प्रसंगानें वाढलीं.

पण काय झालं होतं कोण जाणे! आमचे दिवसच खडतर यायला लागले होते. एका संकटांतून निघावं तों दुसरें संकट आपलं दत्त म्हणून माझ्यापुढें ठेवलेलं!

कसलंही संकट आलें कीं, निशिगंध हजर असायचे, धीर द्यायचे, राबायचे, हें खरें-पण त्या वेळीं त्यांना बोलवायच्या अगोदर मनांत यायचं, उठल्या सुटल्या निशिगंधांनाच आपण कां राबवावं? त्यांनाच कां त्रास द्यावा? कितीही नाहीं म्हटलं तरी त्यांना राबवितांना मला संकोच वाटे!-ते पुरुष!-त्यांच्यापेक्षां एकादं बाई माणूस आपल्याजवळ

स्वारीनंच आपण होऊन बोलायला सुरुवात केली. स्वारी अगदी हंसत बोलत होती. औपचारिकच प्रश्नोत्तरें होत होतीं. पण त्यांतही स्वारीचें चातुर्य होतेंच. हवीं असलेलीं उत्तरें स्वारीन कशीं खुबीनें आमच्याकडून काढून घेतलीं होतीं !–

भेटीची वेळ संपली–स्वारीनं मोठ्या प्रेमानें–प्रसादचे पुष्कळ मुके घेतले. मग त्याला माझ्याजवळ देऊन, मला त्याला चांगला सभाळायला सांगणे झाले; मला जपायची आज्ञा निशिगंधांना झाली.

त्याच्याबद्दल स्वारीला मीं निर्वाळा दिला !-आम्हीं परत आलों.

आठ दिवस झाले असतील नसतील-तेवढ्यांत एक भलें मोठें संकट माझ्या दाराशीं टेकलें.

मुद्रक-प्रकाशक-संपादक म्हणून, सरकारी नोटीस माझ्यावर बजावली गेली. जातीजातींत वैमनस्य निर्माण करण्याच्या बुद्धिपुरस्सर प्रयत्नाबद्दल–मुसलमानाविरुद्ध हिंदूंना चिथावणी देणारा लेख लिहिल्याबद्दल–छापखाना आणि वर्तमानपत्र यांकडून वेगळ्या वेगळ्या, भारी रकमा जामिनकीबद्दल भरण्याची मला नोटीस होती !–

माझ्या तोंडचं पाणीच पळालें ! जामीनकी भरायला रक्कम आणायची कुठून ?–माझ्या परीक्षेची वेळ आली !

निशिगंध लाडांनाही पंचाईत पडली ! त्यांनीं आपल्या पायाला चक्र बांधलें !

कचेरीचं काम माझ्यावर सोंपवून, सकाळ–संध्याकाळ–दुपार, जेवण नाहीं, खाणें नाहीं, पिणें नाहीं, एकेकाच्या घरचे उंबरठे झिजवायला त्यांनीं सुरुवात केली. दिवसभर हिंड हिंड हिंडावं, कुणीं 'होय' म्हणावं कुणीं, छापखाना नी वर्तमानपत्र बंदच ठेवा ना ?- करता कशाला हा व्याप ?– असा तोंडभर सल्ला द्यावा.

पैशाची बाब आली कीं कोणी कोणाचा नव्हे ! दूरचे जास्तच दूर पळतात; पण आपले म्हणविणारेसुद्धां तोंड चुकवूं लागतात !

दिवसभर वणवण करून निराश होऊन निशिगंध परत आले–त्यांचा उतरलेला चेहरा पाहिला म्हणजे माझ्या काळजांत धस्स व्हावं !

जगांत सारीं सोंगं साजरीं करतां येतात–पण पैशाचें सोंग कांहीं साजरें करतां येत नाहीं. पैशाचा पेंच पडला म्हणजे सिंह गोगलगाय होईल, विद्वान् मूर्ख ठरेल, सत्ताधीश लाचार बनेल, पांडित्य फोल बनेल ! अगदीं अशीच आमची गत झाली ! !

जिथें पुरुषांचे प्रयत्न निष्फळ ठरतात, तिथें स्त्रियांना यश येण्याचा संभव असतो. स्त्री ही एक अमोघ शक्ति आहे. तिच्या दर्शनानें, संभाषणानें महाभाग वळूं शकतात !

अशी निशिगंध लाडांनीं कल्पना काढली, "वहिनी, तुम्ही स्वतः प्रयत्न कराल तर तुमच्या शब्दाचें वजन पडेल. आपल्याला जरूर ती रक्कम उभारता येईल. तर चला, तुम्हाला बरोबर घेऊन आपण प्रयत्न करतों."

नाइलाज होता–मला होय म्हणणंच भाग होतं. निशिगंधाना मीं कबूल केलें; त्याना घेऊन मी एकेकाचीं दारं पुजूं लागलें.

नुसता पैसा पाहणाराला पुरुष काय आणि स्त्री काय ? दोघांची कदर सारखीच ! कार्याकडे–गुणांकडे पाहून कोण पैसा द्यायला तयार होणार ? निशिगंधांना रोखठोक जबाब मिळंत, तर मला पर्यायानें नकार मिळूं लागले ! इतकाच फरक !–

माझ्या प्रयत्नालाही यश येण्याचं कुठेंच चिन्ह दिसेना ! एकेक ठिकाणीं तर किळसवाणे दृष्टिक्षेप आणि दुरुत्तरें निमूटपणें ऐकून घ्यावीं लागलीं !-पाहून आणि ऐकून माझ्या सर्वांगाची लाही झाली ! पण काय ?- छापखाना–वर्तमानपत्र उद्यां बंद पडल्यावर करायचं काय ? व्हायचं कसं आपलें ? स्वारीला काय वाटेल ?

मी अगदीं रडकुंडीला आलें. सर्व बाजूंनीं मी कोंडींत सांपडलें. आकाश फाटल्यागत झालं मला !

रिकाम्या हातांनीं नी जड अंतःकरणानें रोज हिंडून मी घरीं परत येत होतें. जामिनकीची रक्कम भरायला दोन का तीनच दिवसांचा अवधि उरला होता !–रक्कम भरली जाणार का छापखाना–वर्तमानपत्र बंद ठेवावीं लागणार ? हें भलेंमोठें प्रश्नचिन्ह माझ्या डोळ्यांसमोर उभें राहून मला भीति दाखवीत होतें.

मी प्रतिक्षणीं घाबरत होतें, निराश होत होतें; निशिगंध लाडांना अधीऱ्या मनानें विचारीत होतें, " लाड, कसं हो या अडचणींतून पार व्हायचं ?-निघेन कां मी या संकटांतून ?-"

" प्रयत्न तर चाललेच आहेत. निराश व्हायचं काय कारण ?-प्रसंगच माणसाला मार्ग सुचवतो-परिस्थितीचं कोडं परिस्थितीच सोडवते। तुमच्याचकरवीं संकटांतून निघण्याचा मार्ग दिसेल ! काळजी कां करतां वहिनी ?-" निशिगंध मला अशा शब्दांनीं एकसारखा धीर देत होते। " कांहीं झालं तरी आपण जामिनकीची रक्कम भरूं-छापखाना आणि वर्तमानपत्र जिवंत ठेवूं ! छापखाना आणि वर्तमानपत्र यांपेक्षां आपल्याला जगांत जास्त काय आहे ? तें हांतून गेल्यावर जिवंत राहण्यांत तरी अर्थ काय आहे ?-"

निशिगंधाच्या विश्वासाच्या शब्दांनीं मला तितकाच धीर येत होता. ऐनवेळीं आपल्याला कुठून तरी सहाय्य येणार-निशिगंधच कुठून तरी सहाय्य आणणार, असा भरंवसा मला वाटे !-निशिगंध खात्रीचा धीर देतात. तेच आपले जगांत एकच एक आधार आहेत-मी त्यांच्याकडे सादर भावानें पाही, त्यांच्याविषयीं आत्यंतिक अभिमान मनांत उत्पन्न होई !

निशिगंधांचें अजून लग्न झालं नव्हतें. एकटेच रहायचे, खाणावळींत जेवायचे. भारी हाल करून घेत असायचे.

मी त्यांना लग्न कां करून घेत नाहीं ? असे हाल करून कां घेतां ? असें केव्हां थट्टेनें तर केव्हा खऱ्याच भावनेनें विचारीत असे. निरनिराळ्या वेळीं ते निरनिराळीं उत्तरें देत ! सुलभेची हकीकत त्यांना कळली-तिला त्यांनीं पाहिलें; त्या वेळीं " असली बायको .मिळाली तर माझे धिंडवडेच निघायचे नाहींत का ?-" असें आपण होऊनच मला म्हणाले.

सरशीला पळविली ती हकीकत छापली-तेव्हां तो मजकूर मला दाखवून म्हणाले, " आम्ही रात्रीं वर्तमानपत्राच्या कचेरींत काम करणारे-या सरशीसारखीच पठाणानें आपली बायको पाळत ठेवून पळविली तर घ्या काय ? म्हणून आपण लग्नाच्या भानगडींतच पडत नाहीं-"

पुन्हां एकदां रात्रीच्या वेळीं निशिगंध फोनवरून वर्तमानपत्रा'-करितां बातम्या घेत होते, त्यावेळीं मी तिथें उभी होतें-तोंडाला फोन

लावून हंसत, “ हं, काय, असं, असं, ठीक आहे ! अरे वा: !! मजा आहे !!–” असें म्हणतांना मला गंमत वाटली; मी त्यांना थट्टेनें, “ इतके लाड रंगांत आलात; आहे काय हें ? कुणाशीं इतक्या प्रेमानें बोलतां ? ’ मीं त्यांना विचारलें.

त्यावर त्यांनीं फोन बाजूला करून हंसून मला सांगितलें, “ अहो वहिनी, आम्ही बोलून चालून रात्रपाळीचे संपादक ? फोन हीच आम्हां संपादकाची धर्मपत्नि !!–तिच्याशीं हसत खेळत नको गुजगोष्टी करायला ? फोनशिवाय आम्हाला सुचायचं नाहीं–आमच्याखेरीज फोनला करमायचं नाहीं ! असे आमचं इथं लग्न लागलेलं आहे ! इतकी चांगली सहचारिणी सोडून दुसरी करण्याच्या फंदात पडावं कशाला ? हिचा योगक्षेम कचेरी चालविते–खऱ्याखुऱ्या बायकोचा खर्च स्वत: करावा लागायचा म्हणून आपण त्या तसल्या लग्नाच्या फंदातच मुळीं पडत नाहीं !! ”
असलें काहीं तरी विक्षिप्तासारखे बोलावयाचे ते !

ते प्रसादला जीव की प्राण करीत. माझी थुकी झेलायला हात पुढें करीत–वर्तमानपत्राचा अंक वेळेवर आणि सर्वांगसुंदर–सगळ्यापेक्षां चटकदार काढण्याकरिता तर मरमर मरत असत !

ते माझ्याकरितां इतकं करायचे–अत्यंत आपलेपणानें माझ्याशीं वागायचे तर–त्याच्यासाठीं मला कांहींच करावंसं कसं वाटणार नाहीं ? मधल्या चहाच्या वेळेला चहाबरोबर त्यांच्याकरितां खायला मी रोज कांहीं तरी करून पाठवी; सकाळीं चहाफराळाला त्यांना बोलवी, पुष्कळदां आग्रह करून जेवायला ठेवून घेई ते घरीं आले म्हणजे !—असं करावंसंच वाटे मला. त्यांचं पाहायला मायेचं होतं कोण ? त्यांच्यासाठीं घस सोसण्यांत मला आनंद होत असे ! निशिगंध संकोचित होत ! “ फार करतां बोवा हें ! आपल्याला आवडत नाहीं ! ” असें पुष्कळ म्हणायचे तर केव्हां केव्हां अगदीं सहजगत्या बोलून जायचे कीं, “ तुमच्याइतक्या योग्यतेची आपल्याला बायको मिळाली तर आपण लग्न करणार ! नाहीं–तर आजन्म अविवाहित राहणार वहिनी ! ”

सहज थट्टेची–विनोदाची त्यांची ती भाषा ! मला हंसू येई, “ मिळेल बरं माझ्यासारखी तुम्हांला सोबतीण ! कांहीं काळजी करूं नका !–” मी आशीर्वादाच्या आवाजांत त्यांना मनापासून म्हणे !–

आमच्यावर संकटांवर संकटं यायला लागल्यापासून आमच्या तसल्या बोलण्याला अलिकडे बराच फाटा मिळाला होता !

अगदीं अगतिक होऊन मी रडत होतें.

" वहिनी, दोन दिवस कचेरीचं सारें काम पहा. मला रजा द्या—तुमच्या जीवासाठीं निर्वाणीचा उपाय योजला पाहिजे आता मला. मी माझी सारी शेतवाडी सावकाराकडे गहाण ठेवतों—वाटल्यास विकतों, पण जामिनकीची रक्कम वेळेच्या आंत भरण्याची व्यवस्था करतों." निशिगंधानीं माझी भेट घेऊन असें मला सांगितलें.

ते यापेक्षां जास्त कांहीं बोलले नाहींत. मी आश्चर्यानें थक्क होऊन त्यांच्याकडे पाहूं लागलें.

निशिगंधही माझ्याकडे पाहात होते.

निशिगंधानीं मला काय सांगितले ?—

पण ते फार वेळ माझ्यासमोर उभेच राहिले नाहींत ! त्याच पावलीं परत फिरून ते एकदम तडक बाहेर पडले !

माझ्या जीवासाठीं निशिगंध आपली शेतवाडी विकून रक्कम आणणार ?-कां ?-त्यानीं माझ्याकडे चमत्कारिक रीतीनें असें कां पाहिलें ? —माझ्याशीं बोलताना त्याच्या आवाजांत फरक झाला होता का ?—शब्द तुटक येत होते—जड येत होते ? हो !-कां ?—

माझ्या मनांत एक चमूकन् विचित्र कल्पना चमकून गेली ! मला कसेंसेंच झालें !

त्या दिवशीं त्यांच्या हातीं त्यांचा अग्रलेख देतांना—माझ्या हाताचा त्यांना स्पर्श झाला ! त्यावेळीं जसं मला झालं—त्यांनीं ज्या नजरेनें माझ्याकडे पाहिलें—तोच अनुभव, यावेळीं मला पुन्हां आला का ?

होय !

मी अगदीं बेचैन झालें !—निशिगंध लाडांचा मला संताप आला—तिरस्कार वाटला !

पुरुषजात इथून तिथून सारखीच !—मी अडचणींत आलें—उद्यां छापखाना बंद होणार !—वर्तमानपत्र बंद पडणार ! तें बंद पडूं नये म्हणून निशिगंधांची खटपट कीं......

माझी विचारशक्तिच थांबली !

निशिगंध आजपर्यंत माझ्याशीं वागले कसे ? मी त्याना वागविलं कसें ? त्याच्याशीं वागण्यांत माझ्या हांतून कसली चूक झाली का ?– त्यांच्या मनांत माझ्यासंबंधानें असल्या भावना उत्पन्न व्हाव्यात असें त्यांना उत्तेजन मिळेल, या रीतीनें माझी कृति झाली होती का कधीं ? तशा उत्तेजक रीतीनें मी बोललें आहे का त्यांच्याशीं ?–

माझ्याच मनाचं मी संशोधन करूं लागलें ! मला कांहींच स्मरेना. आठवेना ! माझी अभिलाषा धरून निशिगंध आपलें सर्वस्व विकणार ? मला आणून देणार ? मला ऋणांत आणणार ? त्या ऋणाच्या भाराखालीं आपल्याला चेपून......

निशिगंधांनीं असं आपलं स्वरूप प्रगट केलं ?

निशिगंध म्हणजे अडाणी–मूर्ख नागू नव्हे ! चांगले सुशिक्षित– सुसंस्कृत आहेत ! कामांत तरबेज आहेत ! त्यांना लाथेनें उडवावं कसं ?– त्यांना शुद्धीवर आणावं कसं ?......

स्वारीची पुण्याई कमी झाली ? त्यांच्यावरची माझी निस्सीम भक्ति उणी पडली ?

स्वारीची मनोमन पूजा केल्याशिवाय माझा एक क्षण जात नाहीं ! मग माझ्यावर हा पेंच कां यावा ?–कशी मी या प्रसंगांतून सुटणार ? कचेरींतून मध्येंच नोकर आला–माझे विचार तितकेच थांबले. मी कचेरींत गेलें.

ताजीं वर्तमानपत्रें पाहूं लागलें. बाहेरचा मजकूर आलेला पाहूं लागलें. वाचतां वाचतां एका मजकुरावर माझी दृष्टि गेली, ती त्यावरच खिळली ! पापणीच लवेना माझी !–

तो मजकूर—

**“ बालावृद्धविवाहाचे दुष्परिणाम ! ”**

**“ सरलेची आत्महत्या ! ! ”**

या शीर्षकाखालीं होता तो मजकूर !

सरला—माझी मैत्रिण सरला ! म्हाताऱ्याशीं लग्न झालेली ती सरला !—म्हातारा आसन्नमरण झाला—आतां तो वांचत नाहीं—त्याच्या मृत्यूनंतर आपली धडगत राहणार नाहीं—म्हाताऱ्याच्या बरोबरही आपण एकनिष्ठेनें आणि पवित्रपणानें वागलों; तोच पवित्रपणा आजीव टिकावा, याच उच्चतर हेतूनें—पावित्र्याला प्राणापेक्षांही मोल आहे—तें आपल्याला हवें—याच उदात्त भावनेनें सरलेनें धांवत्या आगगाडीखालीं स्वतःला लोटून आत्मार्पण केलें !

सरलेसंबंधींचा मजकूर वाचून मन भारावलें. निर्वाणीचा मार्ग जणूं काय सरलेनें स्वतःच्या उदाहरणानें मलाच दाखवून दिला का ?

तशा विचित्र मनःस्थितींतही मला त्या विचारानें एक प्रकारें बरेंच वाटलें !—

प्रकरण सतरावें

# ग्रहणापूर्वी सुटका !

" दे दान सुटे गिराण ! दे दान सुटे गिराण ! "

असंख्य गोरगरिबाचे घोळकेच्या घोळके रस्तोरस्तीं मोठमोठ्यानें कंठशोष करीत हिंडत होते !

आकाशांत चंद्र मंद गतीनें आपली वाट चालत होता. आकाशात ढग इतस्ततः वावरत होते. साऱ्या जगावर भयप्रद छाया पसरली होती. गार वारा अंगाला झोंबत होता. बाहेरचें वातावरण उदास, मनाची स्थिति अत्यंत विषण्ण !

माणसाचं मन प्रसन्न असलं कीं सृष्टि सुप्रसन्न असते. खिन्न मनाला सारी सृष्टि आपल्या सारखीच खिन्न असल्याचा प्रत्यय येत असतो !

जडसृष्टीच्या सुखदुःखाचे परिणाम जीवसृष्टीवर होतात—का जीवसृष्टीचे तसले परिणाम जडसृष्टीवर होत असतात—कांहीं कळत नाहीं.

आज चंद्राला ग्रहण लागलें होतें. चंद्र संकटग्रस्त होता. त्याची अवकळा अखिल जगतावर पसरली होती.

माझी अवस्था चंद्रासारखीच झाली होती. शून्यमनस्क होऊन मी खिडकींत बसलें होतें. प्रसाद केव्हांच झोंपीं गेला होता.

लोक वाटेनें जात होते. कुजबुजत होते. कुणाच्या बोलण्यांत उत्साह, आनंद नव्हता ! प्रत्येकाच्या तोंडीं चंद्रग्रहणाचा एकच एक विषय !

कुणी जुन्या सनातनी-वेडगळ पक्षाचे—कुणी नवीन चिकित्सक पक्षाचे आपापल्यापरी बोलत होते, चर्चा करित होते !

जपी, तपी, ऋषी, मुनी, चंद्राला संकटमुक्त करण्याकरितां स्नान करून तपश्चर्येला बसले होते, मांत्रिक मंत्रसिद्धीसाठीं नदीच्या पाण्यांत गळ्याइतके बुडून उभे होते! ग्रहणाचा वेध लागण्याच्या अगोदर जुन्या चालीच्या कुटुंबांतील, मुलें, अशक्त, म्हातारे, यांना जेवायला घालण्यांत आलें होतें. ग्रहण लागतांच, घरांतले देव पाण्यांत बुडवून ठेवण्यांत आले होते. अन्नावर, घरांतल्या प्रत्येक लहान मोठ्या पदार्थावर जुन्या म्हाताऱ्या बायकांनीं तुळशीपत्र ठेवलें होतें.

चंद्र-सूर्यासारख्या अति सामर्थ्यवान् ताऱ्यांना ग्रहणाचे भोग भोगावे लागतात. त्यांना संकटांशीं झुंजावं लागतं–

मी अशीच संकटांच्या ग्रहणांनीं ग्रासलें होतें. छापखान्यावर आणि वर्तमानपत्रावर मी तुळशीपत्र ठेवून बसलें होतें.

ग्रहणापासून मुक्त होऊन पहिल्यापेक्षांही तेजस्वी तेऱ्यानें चंद्रानें चमकावें म्हणून अखिल जनता त्याच्यासाठीं तपश्चर्या करित आहे–देहाला आणि मनाला कष्टवीत आहे!

मला संकटग्रहणांनीं ग्रासलें आहे, त्यांतून मला मुक्त कोण करणार? माझ्यासाठीं तपश्चर्या कोण करणार?

तुरुंगात स्वारीची खडतर तपश्चर्या चालली आहे. पण ती तपश्चर्या स्वदेशाच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठीं! यःकश्चित् छापन्याची–वर्तमानपत्राची खिसगणती स्वारीला काय!

अखिल जनतेची उग्र तपश्चर्या फळाला येईल–चंद्र संकटमुक्त होईल–

मी संकटमुक्त कशी होऊं? माझ्याकरितां कुणी तपश्चर्या करावी, अशी मी कोण? माझी योग्यता काय? पुण्याई किती?

एकेक विचार मनात येत होते–मनाला घाबरवून टाकीत होते–

सरशीला पठाणानें ग्रासलें! सरलेला मृत्यूनें ग्रासलें. सुलभेला जगाच्या-समाजाच्या क्रांतीच्या परिस्थितीनें ग्रासलें–नी मला संकटांनीं वेढलें!

संकटें कुणाला सोडीत नाहींत. त्यांना कुणाची दयामाया नसते, तीं कुणाची पर्वा करीत नाहींत. अन् संकटाशिवाय माणुसकीची किंमतही माणसाला कळत नाहीं. योग्यताही वाढत नाहीं.

संकटांत स्वतःची योग्यता स्वतःला कळते. जगाचीही पारख चांगली होते–कळते. चंद्र थोर–चांगला–जगाला अत्यंत उपकारक–म्हणून त्याच्यावर चंद्रग्रहणाचें संकट ओढवतांच साऱ्या ब्रह्मांडाची त्याच्या सुटकेकरितां धांवपळ होते.

आपल्यावरच्या संकटानीं जगानें हळहळावें–तळमळावें–त्यांतून मुक्त करण्याकरितां घरादारावर तुळशीपत्र ठेवून धांवून यावें, असें आपल्याजवळ विशेष कांहीं असायला नको का?–

आपण कुणाकरितां कांहींच कधीं करायचं नाहीं–उष्ट्या हातानें कावळ्यालादेखील हांकायचें नाहीं आणि आपण संकटांत सांपडलों म्हणजे कुत्रादेखील आपल्या धावण्याला धावत नाहीं, म्हणून उगीचच ओरड करीत सुटायचें. त्या आरडाओरडीला कांहीं अर्थ असतो का?–

जग संकटांच्या मुशींत माणसाला घालून तावून–सुलाखून त्याचं सोनं कसाला लावीत असतें. खरं सोनं असतं तें टिकतं–अधिक तेजस्वी होतें. बाकीच्याची राखरांगोळी होत असते.

माझी संकटांनीं अशीच परिक्षा चालविली होती का?–

–आप्पा आले. भेटले. माझ्यावरच्या संकटांबद्दल त्यांनीं अतिशय मायेनें पूसतपास केली. हकिकत ऐकून त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले––

ते मला म्हणाले–

"चारू, लहान मुलांना आई–बाप परब्रह्म वाटतात! ब्रह्मांड संकटं निवारण करण्याचं–कर्तुमकर्तुम् सामर्थ्य त्यांच्या ठिकाणीं असतं–अशी त्यांची समजूत असते. त्यांच्यापरि तें खरेंही असतें. पण जो तो मोठा झाला–स्वतंत्र झाला–स्वतःची जबाबदारी उचलता झाला म्हणजे लहानपण रहात नाहीं. पुष्कळ वेळां तो आई–बापाहूनही मोठा होतो–आईबाप लहान होतात–त्यांची शक्ति मर्यादित आहे हें ओळखतें.

"माझी शक्ति आज तुझीं संकटें निवारण्याला अगदीं असमर्थ आहे. माझ्या डोळ्यांतल्या निरुपद्रवी पाण्यांत तीं वाहून नेण्याचं सामर्थ्य नाहीं–शुद्ध आशीर्वादांत त्यांना गति देण्याचें बळ नाहीं. आज माझ्यापेक्षां तूंच मोठी आहेस–पडलं तर तुझंच सामर्थ्य तुला उपयोगी पडेल.–"

-आप्पा आले आणि गेले.

—आप्पांचा आधार संपला!

—माझे श्वशुर आले. त्यांना मीं कधीं पाहिलं नव्हतें. पण त्यांचें बोलणें, हावभाव, स्वारीबद्दलचा तिरस्कार, माझी हेटाळणी करणें, यावरून ते माझे श्वशुर हें मी ओळखलें. "प्रीतिविवाह करायला पाहिजे! देशभक्तीचे चोजले माजवायला पाहिजेत ना तुम्हां लोकांना? करा-घ्या आता त्याचीं फळं! मला तरी हेंच पहायचें होतें!

"आतां काय करणार तूं? पोरटा तुरुंगाची हवा खात कायमचा पडला आहे तिकडे. सुखाचा जीव दुःखात घातलान् लेकानं! माझ्या तोंडाला काळं फासलं—माझ्या नाकावर टिच्चून स्वतंत्र दिमाखानं नांदत होता नाहीं का?- माझ्या वडिलकीची कदर करीत नव्हता! माझ्या पैशाला कःपदार्थ समजत होता!—माझे दुर्गुण चवाठ्यावर माडण्यात—मला टोंचून बोलण्यांत पुरुषार्थ मानीत होता—भलं त्याचं प्रायश्चित भोगतो आहे आतां!

"तुमच्या छापखान्याला कुलूप लागलं. तुमचं वर्तमानपत्र बंद पडलं. फार आनंद झाला मला! असंच व्हावयाला हवं होतं!!—

"साऱ्या जगाकडे पैशाकरिता भीक मागत फिरलांत—माझ्याकडे यायला तुम्हाला लाज वाटली-आता माझ्याकडे यायला तोंड कुठं आहे?—

"कुठं जाणार तूं यापुढं टिचभर पोराला घेऊन? पोट कसं भरणार?—भीक मागणार?—तारुण्याचं आणि सौंदर्याचं दुकान माडून बसणार?

"जग असा कांहींतरी मोबदला घेतल्याशिवाय पोटाला घालायला वेडं नाहीं!—

"येऊं दे ऐकायला! पाहूं दे माझ्या डोळ्याना तेही अमंगळ सोहाळे!—

"पण तुम्हांला त्याचं तरी काय होय? त्यांतसुद्धां नवीन जगाला कृतकृत्यच वाटेल—"

पोटच्या पोराबद्दल-त्याच्या धर्मपत्नीबद्दल असलं अर्वाच्य बोलतांना श्वशुरांना कांहींच वाटत नव्हतें! मला किळस आली! त्यांचा संताप

आला. त्यांना माझ्यासमोरून एकदम चालते व्हा असें मी म्हणणार होतें–तों तेच अगदीं विकट हांसत–माझ्याकडे तिरस्कारानें पहात चालते झाले एकदम !

माझ्या दृष्टीपुढून अत्यंत त्रासदायक तें दृश्य नाहींसें झालें !

माझं सर्वांग थरारलें. दृश्य दृष्टिआड झालं तरी श्वशुरांचे कडवट शब्द अजून कानांत घुमत होते–हृदयाची कालवाकालव करीत होते !

छापखाना–वर्तमानपत्र–पोटापाण्याची शहाजोग तरतूद करणारीं तीं साधनं हातचीं गेल्याचा भेसूर देखावा दिसूं लागला !–

मी प्रसादाला पोटाशीं घेऊन, स्वतःच्या पोटासाठीं–भुकेलेल्या प्रसादाला वाटीभर दूध मिळविण्यासाठीं दारोदार भटकत आहे, केविलवाण्या शब्दांनीं घरोघर विनवणी करीत आहे–जो तो माझ्याकडे–अभिलाष दृष्टीनें पहात आहे–अभद्र शब्द ऐकवीत आहे–फाटक्या वस्त्रांतून शरिराच्या दिसणाऱ्या किळसवाण्या भागावर कोट्या करीत आहे–

पहात होतें, ऐकत होतें. मनाला वाईट वाटत होतं. क्षणोक्षणीं रडूं कोसळत होतें, पण करूं काय ?

संकटांना चुकविण्याकरिता एकसारखी कुठेंतरी पळत सुटलें होतें. पण एकही संकट माझी पाठ सोडीत नव्हतें.

"ताई, ताई, काय हो तुमची ही दशा झाली–?" कुठून तरी सरशीचा आवाज माझ्या कानीं येत होता! "माझी गोष्ट वेगळी! माझा नवराच नादान निघाला ! मला पठाणानं पळवून माझ्या जन्माची दुर्दशा केली. मी गाईसारखा हंबरडा फोडला तरी कसायाच्या तावडींतून सोडवायला समाजाला सवड आहे कुठें ? मी बोलून चालून गरिबाची पोर !–पण तुमचं तसं नाहीं. तुम्ही केवढ्या मोठ्या, किती चांगल्या, अन् तुम्ही अशा प्रसंगांत ? हा समाज· तुमचेदेखील हाल करायला कचरत नाहीं-काय म्हणावं या समाजाला ?–"

मी पहायला लागलें–सरशी मला कुठेंच दिसेना. भिरभिर मी पाहूं लागलें. कुणी तरी मोठ्यानें माझ्याकडे पाहून हंसत आहे–हो, सुलभेचेंच तें हंसणें–!

"चारू, समाजाला भिणारी, समाजाला मानणारी—सन्मानणारी चारू तुला भीक मागायला लावलं समाजानं ! समाजाकरितां—देशाकरितां तुरुंगांत दिवस कंठणाऱ्या पंडिताच्या बायकोवर—कुणाच्या उण्यादुण्यांत न पडणाऱ्या चारूवर—दारोदार हिंडायची पाळी आणणाऱ्या समाजाला अजून तूं मानतेस ?—मला हंसलीस, माझा तिरस्कार केलास, 'समाजाच्या आज्ञा पाळल्या नाहींस, म्हणून तुला घर—समाज पारखा झाला,' असे शब्द तूं मला ऐकवलेस—त्याच समाजानं अशी तुझी अवस्था का केली ग ?—आतां तूं काय करणार ?—कुठं जाणार ? समाज किती क्रूर—निर्दय असतो, याची अजून परीक्षा तुला घ्यायची आहे ?

" हपापलेल्या—अधाशी समाजाच्या दारीं जाऊन तुला काय मिळणार ? तुझ्या सर्वस्वाचा तो बळी घ्यायला कमी करणार नाहीं !—माझ्या पंक्तीला तूं यावेंस, असं मी स्वप्नातही म्हणणार नाहीं. पण यावं लागलं—तशी पाळी तुझ्यावर आली तर करणार काय ? सरशीनं समाजाला दोष दिला. सुलभेनं समाजाला लाखोली वाहिली; मी ऐकत होतें. पण संकटं समाज आपल्यावर आणतो आहे, त्याला दोष द्यावा, असं अजून माझ्या मनांत येत नव्हतें.

आपलंच कुठं तरी केव्हां तरी चुकलं असलं पाहिंजे. दोष—अपराध आपला आहे—समाजाचा नव्हे, असंच मला—कां कोण जाणें—वाटत होतें !

सूर्य—चंद्र काय चुकतात म्हणून त्यांवर ग्रहणाची संक्रांत यावी ?—त्या संकटानीं पृथ्वीचा प्रलयकाल जवळ कां यावा ?

आयुष्य हें एक ईश्वरनिर्मित नाटक आहे. या नाटकांत भूमिका ज्याला जी आली ती त्यानें जाणिवीनं यथासांग पार पाडली पाहिजे.

माझ्या आयुष्याचं असंच नाटक चाललं आहे. माझ्या आयुष्याच्या नाटकाची माझ्या मनाजोगती सुंदर सुरुवात झाली. पंडितरावांसारखे मला पति लाभले. त्यांच्या संगतींत अत्यंत सुखाचा काळ गेला. प्रसाद-सारख्या पुत्ररत्नाचा लाभ मला झाला !—तो—सुखाचा काल भुर्रकन् गेला—

आतां संकटांचा—कष्टाचा काळ आला. सुखांत काळ घालविलेल्या माझ्या जिवाला दुःखांच्या जगात सोडून, तेथें तो कसा वागतो—' विपदि धैर्य ' धरतो, कीं—वैतागून कसल्याही सुखाला कवटाळण्याकरितां सारासार

विचार–सदसद्विवेकबुद्धि सोडून–स्वैरसंचार करूं लागतो–याची परीक्षा पाहण्याकरितां तर आपल्यावर हे संकट–प्रसंग आले नसतील ?–

माझ्या आयुष्याच्या नाटकांतले प्रवेशामागून प्रवेश भराभर चालले होते–मला जगाच्या विविध प्रकारांतून जावें लागत होतें. माझें मन खूप-खूप पुढें जाऊन कल्पनातीत प्रसंगांतून हिंडवीत होतें.

आता एका नव्याच आणि अत्यंत महत्त्वपूर्ण–अगदीं कसोटीच्या प्रवेशाला सुरुवात झाली असें मला वाटलें. आतापर्यंत पाहिलें-ऐकलं-भोगलें–तें पार कुठच्या कुठं नाहींसं झालं–

निशिगंध लाड माझ्यापुढं येऊन उभे राहिले !

ते आनंदांत होते–हंसत होते !–

" काय झालं लाड ?–" मीं त्यांना विचारलं.

" काम फत्ते झालं !– जामिनकीची रक्कम सरकारांत भरली मी–आपल्या छापखान्यावरचं आणि वर्तमानपत्रावरचं गंडांतर टळलं–म्हणापूर्वींच त्याची सुटका झाली !–"

निशिगंधांनीं मोठ्या अभिमानानं–विजयी मुद्रेनं सांगितलं.

मला आनंदानं आकाश ठेंगणं झालं !

"लाड-लाड !-किती हो चांगले आहांत तुम्ही ?" मीं निशिगंधांना धन्यवाद दिले.

" खरंच मी इतका चांगला आहे ?–"

" शंका आहे का ?–"

" मी तुम्हांला आवडलों ?–"

" किती पण !–"

" माझं सर्वस्व विकलं त्याचं सार्थक झालं म्हणायचं !–आज मी धन्य झालों !"

" म्हणजे काय ?–"

" माझ्या सर्वस्वाचा निकाल लावून तुमच्या मनाला आनंदित केलं तें कशाकरितां असं तुम्हांला वाटतं ?–"

" कशाकरितां ?–"

" तुमचं प्रेम माझ्यावर आहे म्हणून ! "

" काय म्हणालांत ?–"

" माझं प्रेम तुमच्यावर आहे म्हणून !–"

" काय बोललांत ?–पुन्हां बोला पाहूं ?–"

" खोट कशाला बोलूं ?–प्रेमाला खोट्या शब्दाचं वावडं असतें !–"

" निशिगंध !–"

" तुम्हीं सांगा खरं–माझ्यावर तुमचं प्रेम नाहीं ?–"

" बहिणीचं प्रेम तुमच्यावर आहे–"

" भगिनीप्रेमाचा वर्षाव करायला माझी सख्खी बहिण आहे !–"

" जशी प्रसादावर–तशी तुमच्यावर माझी आईची माया मी करतें–केली आहे !–"

" माझ्या आईच्या मायेचं संपूर्ण कृपाछत्र माझ्या घरीं आहे !–"

"निशिगंध !–तुम्ही तरुण आहात. उच्छृंखल आहात ! मी तुमच्यावर रागावत नाहीं. मला तुमची दया येते–"

" दयेची भीक मला नको आहे -"

" नादान !–"

" प्रेमी जीव नादान असतो !–मला नादान म्हटल्याबद्दल राग येणार नाहीं !–नादान झाल्याशिवायच का मी सहजासहजीं तुमच्या प्रेमाच्या प्राप्तीकरितां माझ्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून आलों ?–"

" पंडितरावांची मी धर्मपत्नि आहें हें माहीत आहे ना तुम्हांला ?"

" धर्म म्हणजे समाजाला घातलेली अफूची गोळी आहे, असं समजणारा मी आहे !–"

" कायद्यानंही मी त्या पंडितांचीच आहे !–"

" कायद्याचं बंधन कायद्यानं तोडतां येतं !–"

" पंडितांचं माझ्यावर किती प्रेम आहे, याची कल्पना तरी आहे तुम्हांला ? आम्हीं प्रेमाच्या बंधनानं किती एकरूप झालें आहोंत–"

" लग्नबंधन–म्हणजे एक चैनीच्या सुखाची बाब आहे–"

" पण्यांगनांच्या प्रेमबंधनांत—आणि कुलवतीच्या पवित्र विवाह-बंधनांत कांहींच फरक नाहीं तुमच्या दृष्टीनं तर ?—माझे पंडित माझ्या हृदयींचे आवडते गुलाब आहेत—"

" गुलाब आवडता असला म्हणजे निशिगंध नावडता असलाच पाहिजे असं थोडंच आहे ?—धनुर्धर धनंजय द्रौपदीला प्रिय वाटत असले तरी कर्णाबद्दल तिच्या मनांत उत्कट प्रेमाची भावना उत्पन्न झालीच होती ना ?—"

" कथेकऱ्याच्या त्या बाष्कळ बडबडी आहेत !—अन् तुम्हांला अनुकूल तेवढंच बरं आठवलं ? शिवाय मन ओढाळ असतं. मनाचा चंचलपणा हा धर्मच आहे. पण संयम म्हणून कांहीं तरी मोठी चीज असते ना ?—मस्त हत्तीला वळवायला जसा अंकुश—तसा चंचल मनाला आवरायला संयमाचा अंकुश असतो—हें तुमच्यासारख्या शहाण्यासुर्त्या-कर्त्या माणसाला सांगायला पाहिजे ?—"

" मला हें कांहीं पटत नाहीं !—"

" खट्याळ इच्छेच्या विरुद्ध आहे म्हणून ? "

" तसं म्हणा हवं तर !—"

" पातिव्रत्य ही काय दिव्य चीज असते, याची जाणीव तुम्हांला राहूं नये—आश्चर्य आहे !—"

" वेडगळ पातिव्रत्याचं स्तोम माजविण्याचे हल्लीचे दिवस आहेत असें वाटतें—? "

" परक्याचा गोजिरवाणा मुलगा एकादीनं कडेवर घेतला कीं, तिच्या पातिव्रत्याचा भंग होतो—असं मानणाऱ्या खुळ्या सनातनी मताची मी नाहीं. तुमच्याशीं बोलले, आपुलकीनं वागविलं, एकत्र बसलें—हंसलें, तर तेवढ्यानं माझ्या पातिव्रत्याला उणेपणा आला असं समजणारी मी नाहीं."

" होय ना ? झालं तर! मग तुमच्याकरितां सर्वस्वावर पाणी सोडणाऱ्या मला तुमच्या प्रेमाचा लाभ कां होऊं नये ?—"

" मूर्ख आहांत लाड !—ज्या दोन जीवांचे प्रेमानं एक जीव झाले, ज्यांनीं दिव्य आनंदांत काल घालविला आहे—ज्यांच्यापुढें वैषयिक सुखा-

पेक्षां विशेष असें श्रेष्ठ कांहीं ध्येय असून, त्याच्या सिद्धीकरितां तनु-मनानें धडपड चालं आहे, त्या जिवाला सुखाच्या-चैनीच्या विषयाच्या सेवनाची लालसा उरत नाहीं. माझे प्रेमाचे पंचप्राण पंडित देहानें दूर तुरुंगांत असले-माझ्या दुर्दैवानें त्यांच्या सांनिध्याचा लाभ मला पुन्हा केव्हांही झाला नाहीं तरीदेखील मनानं आम्हीं सतत एकमेकाजवळ असतों! माझ्या प्रेमाचा भाग-त्यांच्या नव्हे माझ्या संपूर्ण इच्छेनं त्यांचाच आहे-या जन्मांत तो दुसऱ्याचा कोणत्याही-केवढ्याही मोबदल्यानें होणं अशक्य आहे!-पंडित ते पंडित आणि तुम्ही ते तुम्ही! लक्षांत ठेवा!-जा पाहूं आतां येथन-"

"कसा जाऊं? मी तुमच्यावर प्रेम केलं-तुम्हीं आजपर्यंत अनेक प्रकारांनीं माझ्या प्रेमाला उत्तेजन दिलेंत-मला नांवाजलंत-वाखाणलंत-तुमच्यासाठीं वाटेल ते दिव्य केलं-आतां कुठं जाऊं?-मी तुमचे पाय धरतों-मला लोटूं नका!-"

"पुरुष विषयांध झाला म्हणजे तो अडाणी असो कीं शहाणा असो-अशिक्षित असो की सुशिक्षित असो-असा तुमच्यासारखा पागल बनतो. सोडा माझे पाय व्हा; दूर व्हा. चालते व्हा बाहेर मुकाट्यानें!-"

"शक्य नाहीं. शक्य नाहीं. कालत्रयीं शक्य नाहीं! आग भडकणं सोपं असतं-विझवणं कठीण असतें. निर्लज्ज-नादान-मूर्ख-पागल-पशू-काय वाटेल तीं विशेषणं दिलीं तरी चालतील. उद्यां काय व्हायचं असेल तें होऊं द्या. आज-आत्तां-येथून हलणार नाहीं-माझ्या सर्वस्वत्यागाचा मोबदला-तुमच्या प्रेमाच्या स्वरूपांत घेतल्याशिवाय दूर होणार नाहीं-हे असे हात धरीन-असा जवळ जबरदस्तीनं खेंचीन-" माझ्या शांतपणाची सीमा सुटली! सहनशीलता नष्ट झाली! मूर्ख नाग्याच्या कोटीला निशिगंधांचा दुष्टपणा पोंचला! आजवर माझ्याशीं ते भलेपणानें वागल्याचें मी क्षणांत विसरलें. माझ्याशीं वागण्यांतला त्यांचा बुडाशीं असलेला नीच हेतु उघड झाला-माझा मूळ स्वभाव जागा झाला!—

अस्सल नागिणीच्या शेपटीवर पाय दिल्यासारखेंच लाडांनीं केलें!-माझ्या पावित्र्य-चंद्राला खग्रास ग्रहण लावण्याचीच दुष्ट वेळ आणली त्यांनीं!-

माझा एक हात त्यांच्या हातांतून सोडवून घेतला–पंडितांचं पुण्य स्मरण केलं–आणि दुसरा तिसरा कांहींएक विचार न करतां–लाडांच्या श्रीमुखांत फाड फाड भडकावयाला लागले–

फाड, फाड, फाड, फाड–खड–खड–आवाज होत होता !–

नी मी तेवढ्यांत खडबडून जागी झाल्यें !–

बाहेर चक्क उजाडलं होतं. पूर्वेकडच्या खिडकींतून सूर्याचीं कोंवळीं सुवर्णकिरणें खोलींत इतस्ततः खेळत होतीं–दारावर कुणी तरी खडखड बोटं आपटीत होतें !–

मी उठलें !–स्वप्नस्मृति अजून ताजी होती—

स्वप्नांतसुद्धां मी माझ्या पावित्र्यचंद्राला ग्रहण लागूं दिलं नाहीं–ग्रहणापूर्वीच सुटका झाली !–मी मनाशींच विचार घोळवीत होतें !–

दार उघडलें !–तों काय ?–

निशिगंध लाड–नी त्यांच्या हातांत हात घालून पंडित-स्वारी दारांत उभे !–मी डोळे चोळीत आश्चर्यानें पहातच राहिलें !–

" अं ?–हें काय ?–मी अजून स्वप्नांत तर नाहीं ?–" आपल्याशींच अर्धवट दोघांकडे पहात पुटपुटलें !–

दोघे आंत आले !–

" वहिनी, अशा आश्चर्यानं पहातां काय ?–नवीन अधिकारारूढ झालेल्या कांग्रेसच्या मंत्रिमंडळानें राजबंद्यांना ताबडतोब बंधमुक्त केलं ना ?–कालच प्रेसमध्यें यांच्या सुटकेची तार येऊन पडली होती !–"

झोंपी गेलेल्या प्रसादला उठवण्याची स्वारीला घाई झाली होती !–

" छापखान्याला आणि वर्तमानपत्राला ग्रहण लागण्यापूर्वींच आपला जमीनजुमला विकून लाडांनीं सुटका करण्याची तयारी केली–" स्वारीनं लाडांकडे पहात अभिमानानें म्हटलं !–

" बाकी आज जामिनकी भरली तरी आमचं कॉंग्रेस मंत्रिमंडळ ती रक्कम परत केल्याशिवाय रहाणार नाहीं म्हणा !–" लाड म्हणाले.

निशिगंध लाड बोलतांना मी त्यांच्याकडे सहेतुक पहात होतें. स्वप्नांत अनुभवलेला प्रकार–आतांचा प्रत्यक्ष प्रकार–दोहोंत कांहींच ताळमेळ नव्हता !

माझ्या मनाचेच सारे खेळ–बायकांचें मन किती संशयी–सावध नी वाईट पण असतें !–

> बेमुदत बंदीच्या ग्रहणांतून स्वारीची सुटका झाली ! ज्या कठोर समाजाबद्दल मी अत्यंत चिडलें होतें–त्याच समाजांतील एका निशिगंध लाडसारख्या लहानशा घटकानें स्वतःच्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून छापखाना व वर्तमानपत्र या दोघांची संकट–ग्रहणांतून सुटका केली ! चंद्राला ग्रहण लागलंच नव्हतें–माझ्या कल्पनेंत–स्वप्नांत लागलें होतें–तें सुटलं–चंद्राची सुटका झाली. माझ्या पावित्र्य–चंद्राला कल्पनेंत–स्वप्नांत ग्रहण लागूं पहात होतें–पण माझीही ग्रहणापूर्वीच सुटका झाली !–

प्रसाद जागा झाला !–तो क्षण आम्हां सर्वांनाच किती तरी आनंदाचा लाभला होता–दुःखामागून सुखाचं आगमन झालं म्हणजे त्या सुखाचं तेज आणखीच कांहीं असतें नाहीं ?

स्वारींच्या गैरहजेरींत योग्य कामगिरी आम्हीं बजावल्याबद्दल स्वारीनं योग्य शब्दांत–यथायोग्य कृतींत आम्हांला योग्य तें पारितोषिक दिलें हें सांगायलाच पाहिजे का ?

\+ + +

कर्तव्य करीत असतां–झाल्या गेल्या गोष्टींची पुनःपुन्हां आमच्यांत चर्चा चालत असे. एक दिवस असाच आला—

स्वारीसह मी फिरायला गेलें होतें. बोलतां बोलतां आम्हीं दुःखाचा अडचणींचा काल कसा काढला–कोणकोणत्या अनुभवांच्या दिव्यांतून गेलों–हें साहजिक निघालें.

माझी कहाणी स्वारीनं अगदीं रंगून ऐकली नी मग मला सांगायचं झालं–नव्हे आग्रहच केला–

“ चारू, तुझी ही सारी हकीकत एकदां लिहून काढ. आपण ती पुस्तकरूपानं छापून काढूं !–”

"आपली आपण करी स्तुति, तो एक पढतमूर्ख! असें होईल ना पण?"–मी विनोदानें म्हटलें.

"होऊं दे! चालेल–आपल्या प्रसादला तो एक तुझा प्रसाद होईल. उद्यां एकादी क्रांति कन्या तुझ्या उदरीं जन्माला आली–तर आपल्या आईचा एवढा तरी जीवनवृत्तांत तिला आदर्शासारखा होईल! त्याकरितां तरी तूं लिहायलाच हवंस!—"

मी लाजलें. हंसलें. स्वारींची आज्ञा मला मान्य करावीच लागली!–

"लिहीन मी!–पण तें पुस्तक छापलं तर इकडेच अर्पण करीन अं?-"

"जरूर!" एकदम स्वारीनं आनंदानें मला मान्यता दिली!–अन् मग जें काय लिहिलें–जसं लिहिलं–अन् छापलं–तें हें—

ग्रहणापूर्वी सुटका!

# उपसंहार

योगायोग मोठा गंमतीचा होता! दुःखं येऊं लागलीं म्हणजे सारखीं दुःखंच येतात–आनंदाचे क्षण यायला लागले म्हणजे–त्यालाही मग सुमार रहात नाहीं.

स्वारीनं पुस्तकाची करकरीत नवी प्रत माझ्या हातीं दिली. तेंच पुन्हां मी वाचलें पाहिजे असा आग्रह केला–

मी वाचायच्या वेळेला–आमच्या आनंदांत भर घालायला–तुरुंगांतून सुखरूप सुटून आल्यानंतर-स्वारीला भेटायला–अभिनंदन करायला म्हणून आप्पा त्या दिवशीं अचानक आले–

पुस्तकाचीं उपमुद्रितें स्वतः निशिगंध लाडांनीं हौसेनं तपासलीं होतीं. ते पण वाचायच्या वेळेला मुद्दाम उपस्थित झाले होते–

प्रसादला काय कळणार?–पण तोदेखील गुलाम–एकाद्या आजोबाचा आव आणून ऐकायला बसला होता जेठा मारून!–

आप्पा, निशिगंध, स्वारी, प्रसाद–एवढ्याच मोजक्या सुजाण–अजाण–पण अत्यंत जिव्हाळ्याच्या श्रोतृसमुदायापुढें माझ्या पुस्तकाचें मी वाचन केलें!

वाचून झाल्यावर आनंदभरानें–स्वारीच्या हातीं तें पुस्तक देत मी म्हटलें, "आपल्याच सहवासांत–आग्रहानें प्रोत्साहनानें तयार झालेलें–हें पुस्तक मी आपल्याला आतां अशी अर्पण करीत आहे!–"

"अन् मी त्याचा तितक्याच तत्परतेनें आणि आनंदानें स्वीकार करतों!" सर्वत्र आनंद झाला. मला किती झाला हें सांगायला–माझ्या भाषेंत शब्द नाहींत-प्रसादनेंही आपल्या चिमुकल्या हातांनीं टाळ्या पिटल्या!–

---

**यत्कृतं मत्करिष्यामि तत्सर्वं न मया कृतम् ।**
**त्वया कृतं तु फलभुक् त्वमेव मधुसूदन ॥**

कादंबरी वाङ्मयास नवीन दिशा लावणारी

सुप्रसिद्ध गांधीशिष्या कुमारी प्रेमा कंटक यांनीं लिहिलेली

अगदीं नवीन घर्तीची कादंबरी **काम आणि कामिनी** किं २॥ रु. पोष्टेज ४ आ.

नागपूरचे सुप्रसिद्ध लेखक प्रो. बेहरे आपल्या परीक्षणांत लिहितातः—

" भारतीय तत्त्वज्ञान, महात्मा गांधींचें राजकारण, हिंदी संस्कृति, आधुनिक आर्यमहिलाची महनीयता, आत्मोद्धार व देशोद्धार करणारा स्वातंत्र्यनिरीवर चढण्याचा मार्ग, यांचे मनोहर चित्रण करणारी ही स्वतंत्र कादंबरी मराठी वाङ्मयक्षेत्रात अपूर्व तेजाने सदैव झळकत राहील."

महाराष्ट्राचे आवडते लेखक दे. भ. साने गुरुजी, प्रो. फडके, खांडेकर वगैरे सर्व लेखकांचीं पुस्तकें आमच्याकडे मिळतात.

एकवेळ मागणी करून पहा.

महाराष्ट्र ग्रन्थ भांडार,

प्रकाशक व पुस्तकविक्रेते, महाद्वार रोड, कोल्हापूर.

---

नवीन लघुकथा-संग्रह **पेंच प्रसंग** लौकरच प्रसिद्ध होईल.

ले. ना. वि. कुलकर्णी

प्रकाशक—महाराष्ट्र-ग्रन्थ-भांडार

महाद्वार रोड, कोल्हापूर.

---

**प्राविण्य** सहकारी ग्रंथकार लिमिटेडचें मासिक.

वर्ष ९ वें. वार्षिक वर्गणी १॥ रु.

(प्रत्येक महिन्याच्या ८ तारखेस प्रसिद्ध होतें.)

प्रमुख विषयः—उद्योगधंदे, विमा, बोलपट.

मुंबई-मध्यप्रांत सरकारकडून शाळा खात्यांकरितां मंजूर.

संपादक—प्र. ह. खाडिलकर. संचालक—का. म. ताम्हनकर, B A.

जाहिरातदारांना प्रसिद्धीचें परिणामकारक साधन.

अधिक खुलाशासाठीं लिहा. —व्यवस्थापक 'प्राविण्य'

डोंगरे बिल्डिंग, लॅमिंग्टन रोड, मुंबई ७.

तारेचा पत्ताः—Techlab, Bombay.

# वाळवीचा शत्रू

म्हणजेच

# —: वुडगार्ड :—

ओल, बुरशी, वाळवी व इतर कीड यांनीं लांकूडकाम खाऊन टाकल्यामुळें आपल्या घराचें, लाकडी सामानाचें होणारें नुकसान टाळावयाचें असेल तर

## —: वुडगार्ड :—

वापरण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

वुडगार्ड वापरल्यानें झाडास नुसती कीड लागत नाहीं इतकेंच नव्हे तर त्याच्या रासायनिक क्रियेमुळें त्याला अधिक बळकटी येते. त्यामुळें त्याचें आयुष्यहि अधिक वाढतें.

वुडगार्ड साध्या रंगांप्रमाणेंच कुंचलीनें लांकडास लावलें म्हणजे काम भागतें.

वुडगार्ड लावल्यानें वरच्या रंगास एक प्रकारचा तुकतुकीतपणा प्राप्त होतो.

वुडगार्ड हें द्रव्य पाण्यानें धुवून न जाणारें असल्यानें पुनः लावावें लागत नाहीं.

**वुडगार्ड मिळण्याचीं मुख्य ठिकाणें:—**

**इंडियन टेक्निकल इंडस्ट्रीज,**

ऑफिसः—कामिसारिअट बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई.

कारखाना, शीव, मुंबई नं. २२

**Poona Agent:—L. N. TOL, Esq.**
12, Connaught Road, Poona.

# दृष्टीमुळेंच सृष्टि

आयुष्य समाधानकारक घालविण्यासाठीं नजर साफ लागते. कोणत्याही कारणामुळें तुमच्या डोळ्यास त्रास होत असेल तर—

सर्वांच्या खात्रीचे आणि विश्वासु

# चष्म्याचे व्यापारी



## आर. एन्. शिंदे अँण्ड सन्स

यांच्या येथें डोळ्यांच्या हॉस्पिटलमध्यें काम करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टराकडून डोळे मोफत तपासून घ्या.

**उत्तम माल व माफक दर.**

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांस विशेष सवलत.

[१] २०७ गिरगांव रोड.

[२] चमारबाग, पोयबावडी मुंबई नं. १२.

[३] रानडे रोड, दादर मुंबई नं. १४.

[४] शिवाजी चौक, कल्याण.